अहवाल क्रमांक : १५२

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या अमरावती जिल्हा परिषदेच्या
सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन
अहवालातील परिच्छेदाबाबत

# आठवा अहवाल

सत्यमेव जयते

(सदर अहवाल दिनांक डिसेंबर, २०१७ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस
सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१७

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या अमरावती जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व
२०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन
अहवालातील परिच्छेदाबाबत

# आठवा अहवाल

## पंचायती राज समिती
**(सन २०१७-२०१८)**

**समिती प्रमुख :**

१. श्री.सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री.बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री.चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री.रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. डॉ.देवराव होळी, वि.स.स.
८. डॉ.सुरेश खाडे, वि.स.स.
९. डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री.सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री.किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री.राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री.तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री.भारत भालके , वि.स.स.
१७. प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री.राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री.प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. श्री.तानाजी सावंत, वि.प.स.
२३. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६. श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री.श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(५) श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख :**

(१) *श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.अनिल गोटे, वि.स.स.
(३) श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
(४) श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
(५) श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
(६) श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.
(७) श्री.समीर कुणावार, वि.स.स.
(८) श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
(९) श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
(१०) श्री.अनिल बाबर, वि.स.स.
(११) श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
(१३) श्री.राजाभाऊ वाजे वि.स.स.
(१४) ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
(१५) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
(१६) श्री.अमित झनक, वि.स.स.
(१७) श्री.राहुल मोटे, वि.स.स.
(१८) श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
(१९) श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
(२०) श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
(२१) श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.
(२२) श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
(२३) श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
(२४) **रिक्त
(२५) **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

***** सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची "कार्यकारी समिती प्रमुख" म्हणून नामनियुक्ती केली.

****** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिति
## (सन २०१५-२०१६)

**समिति प्रमुख :**

(१) श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
(३) श्री.अनिल गोटे, वि.स.स.
(४) श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
(५) श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
(६) श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
(७) श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.
(८) श्री.समीर कुणावार, वि.स.स.
(९) श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
(१०) श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
(११) श्री.अनिल बाबर, वि.स.स.
(१२) श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१३) श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
(१४) श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.
(१५) ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
(१६) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
(१७) श्री.अमित झनक, वि.स.स.
(१८) श्री.राहुल मोटे, वि.स.स.
(१९) श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
(२०) श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री.पांडुरंग फुंडकर; वि.प.स.
(२२) श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
(२३) श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.
(२४) श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
(२५) श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री.प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा नववा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ करिता दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी समिती गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous Range and Complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of Administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They Derive Authority from the Lesgislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणे देखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई देखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने अमरावती जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने अमरावती जिल्हा परिषदेस दिनांक ०५, ०६ व ०७ नोव्हेंबर, २०१५ रोजी भेट देऊन श्री. सुनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ करिता गठीत झालेल्या समितीने अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ३ व ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी जिल्हा परिषद, अमरावती संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/ प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीच्या वेळी श्री.श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, डॉ.प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.र.अ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.ना.भा.रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. संतोष कुमार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या अमरावती जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १९ डिसेंबर, २०१७.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | पुरक पोषण आहाराबाबत. (सन २००८-०९) | ४.३२९/२१ | १ |
| (२) | दोन | पाणीपट्टी वसुली थकबाकी बाबत (पंचायत समिती, मोर्शी). (सन २००८-०९) | ४.३४९/११/४२ | ९ |
| (३) | तीन | थकित आगाऊ रकमा (थकित अग्रिम)(सन २००८-०९) | ३.१०३९/२८ | १५ |
| (४) | चार | एअर कॉम्प्रेसर वाटप योजनेचे खर्चातील अनियमितता (सन २००८-०९) | ३.८२८/१४ | २० |
| (५) | पाच | असाध्य रोगाचे रुग्णांना अर्थसहाय्य खर्चातील अनियमिततेबाबत (सन २००८-०९) | ३.८३१/१७ | २४ |
| (६) | सहा | वलगाव येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चे बांधकामातील अनियमितता (सन २००८-०९) | ३.२२९/४८ | २७ |
| (७) | सात | प्राथमिक आरोग्य केंद्र काटकुंभ ता.चिखलदरा येथील वर्ग ३ कर्मचारी निवासस्थान बांधकाम खर्चातील अनियमितता (सन २०११-१२) | ३.२३१/५७ | ३४ |
| (८) | आठ | अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना विलंबाने समायोजन करणेबाबत. (सन २०११-१२) | ३.१२१/१ | ४३ |
| (९) | नऊ | शालेय पोषण आहार खरेदी खर्चातील अनियमिततेबाबत. (सन २०११-१२) | ३.१२४/२० | ५० |
| (१०) | दहा | साठवण तलाव जामुननाला, ता.चिखलदरा कामावर झालेल्या खर्चातील अनियमितता. (सन २०११-१२) | ३.३२६/५ | ५७ |
| (११) | अकरा | जिल्हा निधीतुन करण्यात आलेल्या बांधकामातील अनियमितता (सन २०११-१२) | ३.२२३ | ६६ |
| (१२) | बारा | ग्रामपंचायतीस बांधकामे देतेवेळी आर्थिक स्थितीचा आढावा न घेता व शासन निर्देशाचा अवलंब न करणेबाबत. (सन २०११-१२) | ३.२२५/१६ | ७४ |
| (१३) | तेरा | थकित आगाऊ रकमा (थकित अग्रिम)(सन २०११-१२) | ३.८१४/१८ | ८० |
| | | **परिशिष्ट** शासनाचे आदेश व परिपत्रके आणि समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | |

प्रकरण एक

# जिल्हा परिषद, अमरावती

## पूरक पोषण आहाराबाबत

**(परिच्छेद ४.३२९/२१) (सन २००८-२००९)**

पंचायत समिती, वरुड, जिल्हा अमरावती यांनी सन २००८-२००९ (परिच्छेद क्रमांक २१) सन २००८-२००९ या वर्षात पूरक पोषण आहारावर रक्कम रुपये ६०,७९,४२१/- खर्च केलेला होता. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :

(१) अंगणवाडी सेविकांना/पर्यवेक्षिका यांनी सादर केलेल्या अहवालाप्रमाणे लाभार्थी संख्या २६,३२,०५६ असून त्यावर रक्कम रुपये ६०,७९,४२१/- खर्च केलेला आहे. परंतु अंगणवाडी केंद्र क्र.सुरळी, वाठोडा, धनोडी इ.केंद्र मध्ये अंगणवाडी सेविकेने सादर केलेल्या अहवालाप्रमाणे पूरक पोषण आहारावर रक्कम रुपये १,३२८/- जादा खर्च केला आहे.

(२) सदगुरु महिला बचत गट केंद्र क्र. ४३ च्या माहे मार्च, २००९ मध्ये महिला व मुले लाभार्थी संख्या मध्ये खोडतोड होती. सबब अंगणवाडी सेविकेचे अहवाल उपलब्ध करुन लाभार्थी संख्या बाबत खात्री पटत नाही.

(३) खर्च केलेल्या रक्कमेच्या अचूकतेबाबत खात्री करता आलेली नाही. सबब अंगणवाडी सेविकेचे मुळ अहवाल उपलब्ध करुन अचुकतेबाबत खात्री पटत नाही.

(४) शासन निर्णय दिनांक २८/१०/२००५ मधील अट क्रमांक १० अन्वये शासकीय प्रयोगशाळेकडून वर्षातून दोन वेळा अचानक आहार तपासणी करणे आवश्यक होते, परंतु त्याप्रमाणे अहवाल सादर केले नाहीत.

(५) मा.आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्या दिनांक १८/०९/२००६ अन्वये माता बाल समिती गठीत केल्याचे अहवाल उपलब्ध नाही.

(६) बचत गटांना रक्कम मिळण्याबाबत पोच घेतली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर आक्षेपाबाबत खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

(१) अंगणवाडी केंद्र संबंधित महिला बचत गटांना जादा प्रदान करण्यात आलेली रक्कम रुपये १,३२८ संबंधित बचत गटाकडून वसूल करण्यात आलेली असून चलान क्र.४१३, दि.११.०९.२०१५ अन्वये शासन खाती जमा करण्यात आलेली आहे.

(२) सदगुरु महिला बचत गट केंद्र क्र. ४३ चे माहे मार्च, २००९ मध्ये महिला व मुले लाभार्थी संख्या बाबतीत अंगणवाडी चा अहवाल संबंधित परिक्षेत्राची पर्यवेक्षिकाकडून उपलब्ध करुन लाभार्थी संख्येबाबत खात्री पटविण्यात आलेली आहे.

(३) संबंधित अंगणवाडीकडून लाभार्थ्यांबाबतचे मूळ अहवाल उपलब्ध करण्यात आले असून अचूकतेबाबत खात्री पटविण्यात आली.

| केंद्र क्रमांक | वसूल करण्यात आलेली रक्कम | | |
|---|---|---|---|
| सुरळी १०४ | ६०X३.९८ | = | २३९ |
| वाठोडा ११८ | ११८X३.९८ | = | १९९ |
| भेमडी २० | ३X३.९८ | = | १२ |
| भापकी १८ | २१९X३.९८ | = | ८६२ |
| वरुड १४५ | २X३.९८ | = | ८ |
| शिंगोरी १२६ | २X३.९८ | = | ८ |
| | | एकूण रु. . . | १३२८ |

(४) शासन निर्णय दिनांक २८/१०/२००५ मधील अट क्रमांक १० अन्वये शासकीय प्रयोगशाळेकडून वर्षातून दोनवेळा अचानक आहार तपासणी करणे आवश्यक आहे. अनावधानाने सदरची प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. त्याबद्दल क्षमापित करावे. परंतु माता समिती मार्फत आहाराचे दर्जाची तपासणी केली जाते.

(५) अंगणवाडी परिक्षेत्रात अंगणवाडी साठी गठीत करण्यात आलेली एक माता समितीची बैठक अंगणवाडी स्तरावर होत असते. समिती बैठकमध्ये अंगणवाडीत पुरवठा केला जाणारा आहार चांगल्या दर्जाचा आहे किंवा नाही हे तपासले जाते. त्याबाबतचे अभिलेख संबंधित पर्यवेक्षिकांकडून उपलब्ध करुन घेण्यात आलेले आहे.

(६) बचत गटांना त्यांचे आहार पुरवठ्याचे देयकाची रक्कम त्यांचे (बचत गटांचे) बँकेचे खात्यामध्ये जमा करण्यात येते. रक्कम बचत गटांचे खात्यात जमा झाल्याची पोच दफ्तरी जमा आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अंगणवाडी केंद्र सुरळी, वाठोडा व धनोडीमध्ये पूरक पोषण आहाराचे झालेले जादा प्रदान ४ वर्षे विलंबाने वसूल करण्याचे कारण काय आहे, तसेच, सद्‌गुरु महिला बचत गट केंद्र क्र.४३ च्या लाभार्थी संख्येच्या अहवालात खाडाखोड कोणी केली, सदर लाभार्थी संख्या योग्य असल्याची खात्री कोणी व कशी केली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस अशी माहिती दिली की, महिला बचत गटांना १,३२८/- रुपयांचे जादा प्रदान करण्यात आले होते. ते दिनांक ११.९.२०१५ रोजी वसूल करण्यात आले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की लाभार्थी संख्येत खाडाखोड करण्यात आलेली आहे असे असताना यादी कशी प्रमाणित करण्यात आली, लाभार्थ्यांची यादी समितीला दाखवू शकता काय, गट क्र.३ ने चिखलदरा अंगणवाडी केंद्राला भेट दिली असता साठा रजिस्टरमध्ये खाडाखोड करण्यात आल्याचे समितीला आढळून आले. तसेच, रजिस्टरमधील रकाने पेन्सिलने भरण्यात आल्याचे समितीला आढळून आले. याबाबत विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालविकास यांनी समितीस माहिती दिली की, आयसीडीएसकडून एप्रिल महिन्यात ११ रजिस्टर आलेले आहेत. त्या संदर्भात अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण दिलेले आहे. परंतु, प्रशिक्षण केंद्राकडून अंगणवाडी सेविकांना मौखिक सूचना देण्यात आल्या होत्या की, आपण नवीन रजिस्टर प्रथमच भरणार आहात. त्यामुळे रजिस्टरमध्ये चुका होण्याची शक्यता असल्याने सुरुवातीला पेन्सिलने रजिस्टर भरावे.

सद्‌गुरु महिला बचत गट केंद्र क्र.४३ च्या लाभार्थी संख्येच्या अहवालात खाडाखोड करण्यात आलेली आहे, साठा रजिस्टर पेन्सिलने भरण्यात आले आहे, त्याची चौकशी करुन समितीला अहवाल सादर करावा, जी खाडाखोड करण्यात आलेली आहे त्याची तपासणी करावी असे निदेश समितीने दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, शासन निर्णय दिनांक २८.१०.२००५ नुसार पोषण आहाराची गुणवत्ता तपासणी वर्षातून दोन वेळा शासकीय प्रयोग शाळेतून करण्याची तरतूद असताना ही कार्यवाही कोणत्या प्राधिकारान्वये डावलण्यात आली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, शासन निर्णय दिनांक २८.१०.२००५ नुसार वर्षातून दोन वेळा शासकीय प्रयोग शाळेकडून पोषण आहाराची गुणवत्ता तपासून घेणे आवश्यक आहे. परंतु, अनावधानाने सदर प्रक्रिया राबविता आलेली नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

वरील योजनेअंतर्गत साठा रजिस्टरमध्ये जी खाडाखोड करण्यात आली आहे त्याची तपासणी करुन साठा रजिस्टर पेन्सीलने का भरण्यात आले याचीही चौकशी करुन तसेच शासन निर्णय दिनांक २८/१०/२००५ नुसार पोषण आहाराची गुणवत्ता तपासणी वर्षातून दोन वेळा शासकीय प्रयोग शाळेतून करण्याची तरतूद असतांना ही कार्यवाही कोणत्या प्राधिकारान्वये डावलण्यात आली याची चौकशी करण्यात यावी व त्याबाबत अहवाल समितीस सादर करावा असे निर्देश दिलेले आहे त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

अंगणवाडी केंद्रावरील साठा रजिस्टर मध्ये असलेली खाडाखोड आणि रजिस्टर पेन्सीलने भरण्यात आल्याबाबत मा. पंचायती राज समितीने चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने दिनांक ०७ जानेवारी, २०१६ रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि बालविकास प्रकल्प अधिकारी चिखलदरा यांनी प्रस्तुत अंगणवाडीची सखोल चौकशी केली.

महिला व बालविकास विभागाकडून जिल्हयातील सर्व अंगणवाडी केंद्रांना प्रत्येकी ११ नवीन रजिस्टर पुरविण्यात आले होते. साठा रजिस्टर हे सुध्दा या ११ रजिस्टर पैकीच एक होते. अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिका यांना देण्यात आलेल्या मार्गदर्शक पुस्तीकेत **(परिशिष्ट १.१)** अनुक्रमे पान क्रमांक ७ ते २७ वर पेन्सीलने नोंदी घेणेबाबत सूचना आहेत.

एप्रिल, २०१५ पासून सदर रजिस्टर चा उपयोग करण्यात येत होता. अंगणवाडी सेविका हया केवळ १० वा वर्ग उत्तीर्ण असतात तर मेळघाटातील पुर्वनियुक्त झालेल्या अंगणवाडी सेविका १० वा वर्गही उत्तीर्ण नाहीत. रजिस्टर मधील भरावयाची माहीती सखोल असल्यामुळे सेविकांकडून चुका होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. यामुळे प्रशिक्षणाच्या वेळी सर्व रजिस्टर मधील नोंदी पेन्सीलने घेणेबाबत प्रशिक्षकांकडून सूचना देण्यात आल्या होत्या. यामागे रजिस्टर भरते वेळी काही चुका झाल्यास त्या दुरुस्त करता याव्यात हा उद्देश होता.

प्रस्तुत अंगणवाडी केंद्राची दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी तपासणी केली असता केंद्रास प्राप्त झालेला साठा आणि अंगणवाडी सेविकेने लाभार्थ्यांना वाटप केलेला आहार यामध्ये कोणतीही तफावत नाही. तसेच ज्या ठिकाणी खाडाखोड करण्यात आली होती तेथील नोंदी सुध्दा बरोबर असल्याचे दिसुन आले. सबब यामध्ये कोणत्याही प्रकारची अफरातफर झालेली नाही.

मा. पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशाप्रमाणे जिल्हयातील सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी यांना यापुढे सर्व रजिस्टर पेनने लिहीण्याबाबत परिपत्रक दिनांक १० डिसेंबर, २०१५ **(परिशिष्ट १.२)** नुसार निर्गमित केले आहे. त्यामुळे सर्व ठिकाणी पेन्सील ऐवजी पेनने रजिस्टर भरली जात आहेत.

जिल्हयात कार्यरत २४९७ अंगणवाडी केंद्रांपैकी ४२७ अंगणवाडी केंद्रांना बचत गटामार्फत शिजवुन आहार देण्यात येतो. उर्वरित सर्व अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना मदतनीस मार्फत आहार अंगणवाडी केंद्रातच शिजवुन देण्यात येतो. यासाठी अंगणवाडी केंद्रांना जे धान्य पुरविण्यात येते त्यामधील तांदुळ शासनाव्दारे पुरविलेला आहे तूरमुग/तूरदाळ, मटकी, चवळी, वाटाणे आणि तेल हळद मीठ हे बचत गटाकडून खरेदी करुन पुरविण्यात येते. या आहाराचा पुरवठा करण्यापुर्वी जिल्हा रसायन शास्त्रज्ञ यांचे प्रयोग शाळेतून तपासणी करुनच पुरवठा करण्यात येतो. त्यानंतरच त्यांची देयके प्रकल्प स्तरावरुन अदा करण्यात येतात.

ज्या अंगणवाडी केंद्रांना स्थानिक बचत गटामार्फत गरम ताजा आहार पुरविण्यात येतो त्यांची शासन निर्णय २८ ऑक्टोबर, २००५ **(परिशिष्ट १.३)** अन्वये वर्षातून २ वेळा अचानक तपासणी करण्याबाबत सूचित केले आहे. स्थानिक स्तरावर (तालुका) तपासणीची सुविधा उपलब्ध नसल्याने वर्षातून २ वेळा तपासण्या करणे शक्य होत नाहीत. सदरची बाब लक्षात घेवुन शासन निर्णय ३१ ऑक्टोबर, २०१२ **(परिशिष्ट १.४)** अन्वये माता पालक समिती मार्फत आहाराचा दर्जा योग्य असल्याबाबत प्रमाणपत्र घेवुन त्यांचे देयक अदा करता येतात. ज्याठिकाणी स्थानिक बचत गट आहाराचा पुरवठा करतात तेथे प्रत्येक महिन्याला माता-पालक समितीकडून असे प्रमाणपत्र घेण्यात येवुन देयके अदा केली जातात.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिलेल्या अभिप्रायास सहमत आहे.

**चौकशी अहवाल**

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, चिखलदरा अंतर्गत एकूण २३२ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून सर्व २३२ अंगणवाडी केंद्रांना गायत्री महिला बचत गट, जवळा शहापुर, ता.चांदुर बाजार यांचेमार्फत अन्नधान्य साठा पुरवठा करण्यात येतो.

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हयाला दिनांक ५, ६, ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीमध्ये भेट दिली असता दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजी पंचायती राज समितीने सेमाडोह येथील केंद्र क्र.१ ला भेट दिली होती. त्यामध्ये आहार साठा पाहणी करुन साठा रजिस्टरची पाहणी करुन साठा रजिस्टरची पाहणी केली असता सदर रजिस्टर मधील माहीती ही पेन्सीलनी भरल्याबाबत तसेच खाडाखोड केली असल्याचे दिसून आले. याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना मा.पंचायती राज समितीने दिल्या होत्या.

दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) व बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी सदर अंगणवाडी केंद्राला भेट देऊन नवीन MIS नुसार वापरात असलेल्या सर्व रजिस्टरची सखोल तपासणी केली यामध्ये साठा रजिस्टर क्र. २ चा सुध्दा समावेश होता. साठा रजिस्टर क्रमांक २ मध्ये माहे एप्रील २०१५ पासून नोंद करण्यात आली आहे. त्यामध्ये गरोदर स्त्रिया, स्तनदा माता व तिव्र कमी वजनाची बालके यांना ७५ ग्राम तांदुळ, २० ग्राम डाळ व नाश्ताकरिता ३७ ग्राम वाटाणा किंवा ४१ ग्राम चवळी तसेच ६ ग्राम तेल याप्रमाणे वाटपाचे प्रमाण ठरविले आहे. किशोरी, मध्यम कमी वजनाचे व साधारण श्रेणीतील बालके यांना ५९ ग्राम तांदुळ, १६ ग्राम डाळ, २८ ग्राम वाटाना किंवा ३१ ग्राम चवळी तसेच ६ ग्राम तेल याप्रमाणे वाटपाचे प्रमाण नोंद करण्यात आली आहे.

आहार वाटप रजिस्टर क्रमांक २ मध्ये पृष्ठ क्र. F-२१ अन्वये नियोजन F-२२-A अन्वये THR वाटप नोंद व F-२२-B अन्वये गरम ताजा आहार साठा वाटपाच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. मेळघाट भागात मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये THR वाटप बंद असल्यामुळे या ठिकाणी फक्त गरम ताजा आहार देण्यात येत आहे.

माहे डिसेंबर, २०१५ मध्ये प्राप्त झालेला साठा व आज रोजी उपलब्ध साठा याबाबतची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवरण | मागील शिल्लक कि.ग्राम | डिसेंबर १५ प्राप्त साठा कि.ग्राम | एकुण साठा कि.ग्राम | वाटप केलेला आहार साठा ५ डिसेंबर ते ७ जानेवारी | दिनांक ७/१/२०१६ रोजी शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तांदुळ | ० | ३१७ | ३१७ | ९०.३३० | २२६.६७० |
| २ | मुगदाळ | ८७.४४२ | ८६ | १७३.४४२ | २२.७४२ | १५०.७०० |
| ३ | चवळी | ० | १३५ | १३५ | २४.१५० | ११०.८५० |
| ४ | वाटाणा | ० | १४० | १४० | २१.००० | ११९ |
| ५ | तेल | ६.३०० | ३२ | ३८.३०० | १२.८६० | २५.४४० |

आज रोजी उपलब्ध तांदुळ, मुगदाळ, चवळी,वाटाणा इ.ची प्रत चांगली आढळून आली आहे. प्राप्त आहार साठा आणि अंगणवाडीमध्ये वाटप करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार साठा बरोबर आढळून आलेला आहे. त्याचबरोबर एप्रिल २०१५ पासून ७ जानेवारी, २०१६ पर्यंत आहार साठा रजिस्टर मधील प्राप्त साठा, वाटप आणि शिल्लक साठयाची पडताळणी केली असता सर्व बाबी योग्य असल्याचे दिसून आले. ज्या ठिकाणी खाडाखोड दिसली येथील नोंदीचीही तपासणी करण्यात आली असून त्या योग्य आहेत.

अंगणवाडी सेविका केवळ १० वा वर्ग उत्तीर्ण असल्याने आणि रजिस्टर्स मधील भरावयाची माहिती सखोल होती त्यामुळे अंगणवाडी सेविकाकडून चुका होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. यामुळे रजिस्टर प्रशिक्षण सत्रामध्ये राज्यस्तरीय प्रशिक्षकांकडून सुरुवातीला रजिस्टर मधील नोंदी पेन्सीलने घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. रजिस्टर पेन्सीलने लिहीण्या बाबतच्या सूचना अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिका यांना देण्यात आलेल्या मागदर्शक पुस्तिकेतील पान क्रमांक ७ व २७ यावर अनुक्रमे दिलेल्या आहेत. तसेच सेमाडोह येथील अंगणवाडी केंद्राला अंगणवाडी सेविकेचे पद हे रिक्त होते. त्यामुळे तेथील कार्यभार अंगणवाडी मदतनीस कडे देण्यात आला होता. अंगणवाडी मदतनीस ला सदर रजिस्टर ची माहीती भरणे शक्य झाले नाही. त्यामुळे घेतलेल्या नोंदी दुरुस्त करण्याकरिता रजिस्टर मध्ये काही ठिकाणी दुरुस्ती करण्यात आली आहे असे सेविकेने सांगितले आहारसाठा बरोबर असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आली नाही. यापुढे सर्व रजिस्टर पेन्सीलच्या ऐवजी पेनाने भरण्याबाबत सूचना अंगणवाडी सेविकेला देण्यात आल्या.

सबब, सेमाडोह अंगणवाडी केंद्रातील आहार साठयाची तपासणी केली असता प्राप्त साठा आणि लाभार्थ्यांना वितरीत केलेला साठा बरोबर असल्याचे आढळून आले. ज्या ठिकाणी अनावधानाने खाडाखोड झाली होती तेथील नोंदीही बरोबर आहेत. सेविकेने माहे नोव्हेंबर, २०१५ पासूनच (पंचायती राज समिती दौ-यानंतर) रजिस्टर पेनने लिहायला सुरुवात केलेली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, वरील योजनेअंतर्गत साठा नोंदवही मध्ये जी खाडाखोड करण्यात आली आहे त्याची तपासणी करुन साठा नोंदवही पेन्सीलने का भरण्यात आले याचीही चौकशी करुन तसेच शासन निर्णय दिनांक २८/१०/२००५ नुसार पोषण आहाराची गुणवत्ता तपासणी वर्षातून दोन वेळा शासकीय प्रयोग शाळेतून करण्याची तरतूद असतांना ही कार्यवाही कोणत्या प्राधिकारान्वये डावलण्यात आली याची चौकशी करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा असे निर्देश दिलेले आहे, त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले, यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अंगणवाडी स्तरावर समितीने भेट दिली होती. त्यावेळी नोंदवही मधील पेन्सीलने केलेल्या नोंदीमुळे समितीने आक्षेप व्यक्त केला होता. त्याचे असे आहे की, सर्वसाधारणतः अंगणवाडी स्तरावर नोंदवहीमध्ये नोंद ठेवण्याकरिता असलेल्या कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता किमान दहावी पास असते, परंतु दुर्गम आदिवासी भागामध्ये दहावी पास कर्मचारी उपलब्ध होत नसल्यामुळे त्या भागापुरती ही अट शिथिल केली होती. आदिवासी दुर्गम भागामध्ये अंगणवाडी स्तरावर आठवी पास कर्मचा-यांची नियुक्ती नोंदवही एन्ट्रीकरिता केली गेली होती. त्यांना त्यावेळी नोंदवही एन्ट्रीचे प्रशिक्षण देण्याचे काम चालू होते. प्रशिक्षणाच्या काळात रजिस्टरमधील टेंटेटिव्ह एन्ट्री पेन्सिलने करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या, अंतिम नोंदी त्यावरच पेनाने करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या होत्या, त्याप्रमाणे अंतिम नोंदी पेनाने करण्यात आल्या आहेत. रजिस्टर नोंदणीकरिता विभागीय स्तरावरुन जिल्हा पातळीवर एक मार्गदर्शक सूचनांचे पुस्तकही निर्गमित करण्यात आले होते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, राज्यात शालेय पोषण आहारासंदर्भात अनेक ठिकाणी विविध प्रकारची अनियमितता आढळून आलेली आहे. याकरिता रजिस्टर नोंदणीबाबत उपलब्ध कर्मचारी वर्गाला प्रशिक्षित करुन रेकॉर्ड पेनाने मेंटेन करणे गरजेचे आहे. यावर सचिव, महिला व बालविकास यांनी पुढे समितीस अवगत केले की, प्रशिक्षणाच्या काळात सदरहू कर्मचा-यांना चुका होऊ नये म्हणून तात्पुरत्या स्वरुपातील नोंदी पेन्सीलने करावयास सांगितले होते. त्यानंतर मार्गदर्शक सूचनांप्रमाणे रजिस्टरवर अंतिम नोंदी पेनाने करण्यात आलेल्या आहेत. यावर समितीने अशी सूचना केली की राज्यात शालेय पोषण आहारासंदर्भात अनेक ठिकाणी विविध प्रकारची अनियमितता आढळून आलेली आहे. याकरिता रजिस्टर नोंदणीबाबत उपलब्ध कर्मचारी वर्गाला प्रशिक्षित करुन रेकॉड पेनाने मेंटेन करणे गरजेचे आहे.यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीला माहिती दिली की, प्रशिक्षणाच्या काळात सदरहू कर्मचा-यांच्या चुका होऊ नये म्हणून तात्पुरत्या स्वरुपातील एन्ट्रीज पेन्सीलने करावयास सांगितले होते. त्यानंतर मार्गदर्शक सूचनांप्रमाणे रजिस्टरवर अंतिम नोंदी पेनाने करण्यात आलेल्या आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहारासंबंधीचा रेकॉर्ड तात्काळ नीटनेटक्या स्वरुपात पेनाने मेंटेन करणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागामध्ये डी.एड व पदवीधर तरुणांची संख्या मुबलक असतानाही अंगणवाडी स्तरावर काम करण्याकरिता दहावी उत्तीर्ण कर्मचारी मिळू नये, ही गोष्ट समितीला पटत नाही. ग्रामीण पातळीवर देखील सुशिक्षित बेकार मुले आहेत. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या संदर्भातील एक प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यासंबंधी एक समिती नेमण्याचा विचार आहे, यासंबंधीचा एक प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, माता-बालक मृत्यूचे प्रमाण आदिवासी भाग विशेषतः मेळघाट येथे वाढत आहे, याकरिता अनेक संस्था, एनजीओ, शासकीय विभाग कार्यरत आहेत. याकरिता अतिरिक्त निधी शासनाने देऊन यासंदर्भातील अनुशेष भरुन काढणे आवश्यक आहे. गरम अन्नपदार्थ चाचणी व त्याचा रिपोर्ट यासंबंधी सखोल चौकशी करुन या प्रकरणासंबंधीचा निर्णय विभागाने घेणे आवश्यक आहे, यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित

केले की, यासंबंधीचा एक प्रस्ताव आता लवकरच कॅबिनेटपुढे सादर केला जाणार आहे. केंद्र शासनाची परवानगी घेऊन याबाबत पीडीसीसी चौकशी सुरू आहे. यासंदर्भातील कार्यक्रमांतर्गत आता सुधारणा दिसून येत आहे. यावर पुढे समितीने असे मत व्यक्त केले की, नंदुरबार, धुळे, मेळघाट, पालघर येथे कमी वजनाची बालके व कुपोषित बालके यांची संख्या सर्वात जास्त आढळून येते. या ठिकाणी शालेय शिक्षण तर सोडाच परंतु अंगणवाडी प्रभावीपणे चालत नाहीत याकरिता विभागाने काहीतरी ठोस कार्यवाही करून प्रभावी कार्यक्रम राबविण्याची गरज आहे. यावर सचिव, महिला व बाल-विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या आदिवासी भागामध्ये ४९ अंगणवाड्यांना ग्रामपंचायतीमार्फत आर्थिक सहकार्य प्राप्त होते.यासंदर्भात करार झालेला आहे. यांसंदर्भातील करार अतिशय विचारपूर्वक केलेला आहे, याकरिता आता या अंगणवाडयांचा वेळ वाढवून घेणे आवश्यक आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अंगणवाड्यांमार्फत जे शिजलेले अन्न बालकांना पुरविले जाते, त्याचे नमुने तपासणीकरिता अमरावती जिल्हयातील लॅबमध्ये नेला जातो की अन्य कोठे तपासणीकरिता पाठविला जातो, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस माहिती दिली की, अमरावती जिल्ह्यामध्ये लॅब नाही, सदरहू शिजविलेल्या अन्नाचे नमुने नागपूर येथील लॅबमध्ये तपासणीकरिता पाठविले जातात. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, हॉट मिल तर नागपूरला नेईपर्यंत थंड होऊन त्यामध्ये विविध अभिक्रिया चालू होतात, त्यानंतर त्याच्या तपासणी अहवालास अनुसरुन कोणत्या प्रकारची कार्यवाही केली जाते, कोणत्याही प्रकारच्या अन्नाचा पुरवठा करताना त्याची तपासणी केली पाहिजे, हे तर कायदद्यानुसार बंधनकारक आहे. याकरिता प्रत्येक लहान जिल्ह्यामध्ये जेथे लॅबची सुविधा उपलब्ध नाही, तेथेही ती निर्माण केली पाहिजे, हे ही ओघाने आले. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, जिल्हा रसायन शास्त्रज्ञ हे युनिट आहे, हे जिल्हा पातळीवर कार्यरत असते. हे युनिट अन्नाची चाचणी करून ते खाण्याकरिता योग्य आहे, अशा सूचना देतात. यावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस माहिती दिली की, अमरावती जिल्ह्यातही एक प्रयोगशाळा आहे, परंतु ती आता कार्यरत नाही. याकरिता या अन्नाचे नमुने ज्यावेळी तपासणीकरिता पाठविण्याची आवश्यकता असते, त्यावेळी ते नागपूर जिल्ह्यातील प्रयोगशाळेमध्ये तपासणीकरिता पाठविले जातात. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, विभागीय मुख्यालयी प्रयोगशाळा आहे की नाही ही माहिती सचिवांनी सर्वप्रथम देणे आवश्यक होती, ती बंद आहे व कोणत्या कारणामुळे बंद आहे, ही माहितीही सादर करणे आवश्यक होते, ज्यावेळी जिल्हास्तरावर काही पदार्थांच्या किंवा अन्य रासायनिक चाचण्या करण्याची वेळ येते, त्यावेळी प्रत्येक नमुने तत्परतेने नागपूर येथील प्रयोगशाळेमध्ये पाठवून त्याचा पाठवूरावा करून त्याप्रमाणे अवलंबन केले जाते का, तसेच प्रत्येक वेळी नागपूर येथील लॅबमधील रिपोर्टस वेळेवर घेऊन त्यातील माहितीप्रमाणे अन्न पदार्थ व इतर रासायनिक चाचण्यांच्या निष्कर्षाप्रमाणे अवलबंन केले जाते का, अमरावती जिल्ह्यामध्ये एक अद्ययावत लॅब सरू करून त्यामध्ये अन्नपदार्थांचे नमुने व इतर रासायनिक चाचण्या, तातडीच्या चाचण्या करून त्याच्या निष्कर्षाप्रमाणे त्वरित कार्यवाही झाली तर या विभागाच्या योजनांच्या अवलंबनामध्ये सुधारणा होईल. सर्वप्रथम अमरावती येथे लॅब आहे का ती कार्यरत आहे का, अमरावती येथील लॅबमधून चाचणीचा तपासणी अहवाल समर्पक अशा प्रकारचा तत्परतेने प्राप्त होत नव्हता. अमरावती येथील लॅब अद्ययावत असणे आवश्यक आहे. हॉट मिल नागपूर प्रयोगशाळेमध्ये नेताना थंड होईल. अमरावती लॅब अद्ययावत केली तर अमरावती प्रयोगशाळेमध्ये हॉट मिल योग्य पध्दतीने तपासण्यात येईल. ज्यावेळी गरम अन्नाचे नमुने तपासणीकरिता नागपूर येथे चाचणीकरिता पाठविले जात नाहीत, त्यावेळी रोजच्या रोज ते खाण्याकरिता योग्य आहे, असा अहवाल कोण देते. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, हॉट मिल प्रतिदिन नागपूर लॅबमधून तपासून आणणे हे फिजिबल नाही. त्यामुळे या शिजलेले अन्नाचा नमुना प्रतिदिन माता-पालक समितीकडून तपासून त्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येते. डफरिंग प्रयोगशाळा सॅम्पल मध्ये प्रोटीन कंटेटही तपासले जातात. एनएबीए लॅब नागपूर येथेही या गरम अन्नामधील प्रोटीन कंटेंट पुरेसे आहेत का याची तपासणी केली जात होती. या हॉट मिल प्रुफ तपासणी अंतर्गत असे लक्षात आले की, मेळघाट, अमरावती, नंदुरबार येथील हॉट मिल प्रुफ नागपूर येथील प्रयोगशाळेमध्ये तपासणीकरिता नेत असताना ते प्रवासामध्येच फर्मेंट होत असते. यामुळे या तपासणी अहवालामध्ये अडचणी निर्माण होतात. एफसीआयमार्फत आलेले कच्चे धान्य म्हणजे गहू, तांदुळ याचीही या एनएबीए प्रयोगशाळेमध्ये तपासणी केली जाते.

समितीने पुढे विचारणा केली की, एफसीआयकडून आलेले कच्चे धान्य त्यामध्ये एवढे खडे व माती असते की ते शिजवून खाण्यालायकही नसते. त्यानंतर बालकांना शिजवलेंले अन्न तपासणी करून पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हे शिजविलेले अन्न तपासणी करिता कोठे पाठवावे, हा प्रश्न निर्माण झालेला आहे. याचा अर्थ असा होतो की,

विभागाची उदासिनता इतकी आहे की, अंगणवाडीतील मुलांना रोजचे दोन वेळचे पोषक अन्न पुरविण्यासही यंत्रणा सक्षम नाही. शिजविलेल्या अन्नाचा नमुना माता-पालक समितीकडून तपासून घेऊन त्याचे सर्टिफिकेट सादर केल्यानंतर या अन्नाचे व इतर संबंधित देयके अदा केली जातात. शिजविलेले अन्न तपासताना त्यातील प्रोटीन व जीवनसत्व आवश्यकतेनुसार आहेत का, याचीही तपासणी करणे आवश्यक असते. याबाबत माता-पालक समिती, ग्रामपंचायत समिती यांचे याबाबतचे कार्यवृत्त वाचणे आवश्यक आहे. याबाबतचा आणखी तपशील त्या कार्यवृत्तामध्ये आढळून येईल. ग्रामस्तरावर ग्रामसमितीचा पदसिध्द सदस्य सचिव हा सरपंच असतो. माता-पालक समितीसंबंधातील शासन निर्णय शासनाने निर्गमित केला होता, त्याची प्रतही समितीला सादर करण्यात यावी असे समितीने सूचीत केले असता यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, आदिवासी दुर्गम भागातील अंगणवाड्यांमध्ये जे पोषक अन्न मुलांना पुरविले जाते, त्याची तपासणी लॅबकडून न झाल्यास माता-पालक समितीकडुन केली जाऊन त्याचे प्रमाणपत्र सादर केल्यावर देयकेही अदा केली जातात.

समितीने पुढे विचारणा केली की, तेथील मुलांना पोषक अन्न पुरविले जाते या अन्नातील प्रोटीन कंटेट, जीवनसत्व तपासून ते आरोग्यदायी आहे का हेही तपासणे आवश्यक आहे. या अन्नातील प्रोटीन कंटेटविषयी सरकारचे व विभागाचे दुर्लक्ष होत आहे. विभागाने भरारी पथक या भागामध्ये पाठवून तेथील शिजविलेल्या अन्नाची अचानक चाचणी घेऊन आवश्यकतेनुसार योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. शिजविलेल्या अन्नाची चाचणी तपासणी अहवालावर ठेकेदार, माता-पालक समिती सदस्य व अंगणवाडी सेविका यांच्या सह्या घेतल्या जातात व तपासणी न करता हे अन्न मुलांना खाण्यास दिले जाते. मेळघाट, नंदुरबार, धुळे, अमरावती येथील कुपोषित मुलांची संख्या कमी होऊन बालमृत्यूचे प्रमाण कमी होणे आवश्यक आहे. याकरिता तेथील मुलांना दोन वेळचे पोषक अन्न वेळचेवेळी मिळण्याकरिता त्या भागामध्ये अद्ययावत प्रयोगशाळा सुरू करणे आवश्यक आहे. या प्रयोगशाळेमध्ये अन्नाची व धान्याची तपासणी होऊन सकस अन्न आदिवासी भागामध्ये पुरविता येईल. जेणेकरून येथील पोषणविषयक समस्या कमी होतील. या समितीच्या सूचनेवर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी होकारार्थी उत्तर दिले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती, वरुड, जिल्हा अमरावती यांनी सन २००८-२००९ या वर्षात पुरक पोषण आहारावर रक्कम रुपये ६०,७९,४२१/- खर्च केलेला होता. यासंदर्भात सदगुरु महिला बचत गट केंद्र क्र. ४३ च्या माहे मार्च, २००९ मध्ये महिला व मुले लाभार्थी संख्यामध्ये खाडाखोड आढळून आली, तसेच शासन निर्णय दिनांक २८-१०-२००५ मधील अट क्रमांक १० अन्वये शासकीय प्रयोगशाळेकडून वर्षातून दोनवेळा अचानक आहार तपासणी करणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे अहवाल सादर करण्यात आले नाहीत. तसेच आयुक्त एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्या दिनांक १८-०९-२००६ अन्वये माता बाल समिती गठीत केल्याचा अहवाल उपलब्ध नसल्याबाबतचे प्रमुख लेखा आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आले होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीच्या वेळी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीला असे सांगण्यात आले की, अंगणवाडी सेविका या केवळ दहावी उत्तीर्ण असल्यामुळे आणि रजिस्टर मधील माहिती सखोल असल्यामुळे रजिस्टर भरतेवेळी होणाऱ्या चुका टाळण्यासाठी महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मॅनेजमेंट इर्न्फमेंशन सिस्टम (MIS) तथा अंगणवाडी सेविकांसाठी मार्गदर्शिका व प्रशिक्षकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका याच्या अनुक्रमे पृष्ठ क्रमांक ७ व २७ वर “रजिस्टर भरताना पेन्सिलचा उपयोग करा” अशा सूचना देण्यात आलेल्या असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील सेविकेने रजिस्टरमध्ये पेन्सिलने नोंदी घेतल्या व तसा लेखा आक्षेप परिक्षणाचे वेळी आढळून आला आहे. **त्यामुळे सदर खुलासा मान्य करण्यात येत आहे. कारण महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी परिपत्रक निर्गमित करून यापुढील काळात सर्व नोंदी पेन्सिल ऐवजी पेनने करण्यात याव्यात अशा सूचना सर्व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना दिलेल्या असल्याचे समितीला प्राप्त झालेल्या माहितीवरून दिसून येते त्यासंदर्भात समिती समाधान व्यक्त करते.**

राज्यातील ग्रामीण, आदिवासी आणि नागरी भागामध्ये अंगणवाडीतील ६ वर्ष वयोगटाखालील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना पुरक पोषण आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी इत्यादी विविध सेवा, केंद्र पुरस्कृत एकात्मिक बालविकास सेवा योजनेद्वारे देण्यात येतात. दिनांक २८ ऑक्टोबर, २००५ रोजीच्या महिला व बालविकास विभागाच्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्रमांक १० व महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकामध्ये तयार आहाराचे नमुने स्थानिक प्रयोगशाळेकडून वर्षातून दोनवेळा अचानक

तपासून घेण्याचे बंधनकारक करण्यात आले होते, असे असतानाही प्रस्तुत प्रकरणात अशा अचानक तपासणीचा अहवाल लेखा परिक्षकांना आढळून आलेला नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर अशा प्रकारची तपासणी अनावधानाने राहून गेल्याचा खुलासा करण्यात आला तर विभागीय सचिवांची साक्षीवेळी स्थानिक स्तरावर (तालुका) तपासणीची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे वर्षातून दोनवेळा तपासण्या करणे शक्य होत नाही अशा प्रकारची लेखी माहिती समितीस प्राप्त झाली. गरम व ताजा आहारामधील प्रोटीन कंटेंट पुरेसे आहेत किंवा कसे याची तपासणी नागपूर येथील एन.ए.बी.ए. प्रयोगशाळेत केली जात असते परंतू मेळघाटातील ग्रामिण भागातून गरम व ताजा आहार नागपूर येथील प्रयोगशाळेत जाईपर्यंत त्याचे किन्वीभवन (farmatation) होत असल्यामुळे अशी तपासणी सुसाध्य नसल्याची बाब विभागीय सचिवांची साक्षीचे वेळी स्पष्ट झाली. अतः गरम ताज्या आहाराच्या नमुन्याची प्रयोगशाळेतून तपासण्याच्या अडचणी लक्षात घेऊन शासनाने दिनांक २८ ऑक्टोबर, २००५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १० मधील तरतूद रद्द करून शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणात व ठरवून दिलेल्या दर्जाचा आहार लाभार्थ्यांना मिळतो किंवा नाही हे पाहण्यासाठी अंगणवाडी परिक्षेत्रातील दहा सदस्यांची माता समिती गठीत करण्यात आल्याची व त्या समितीने गरम व ताज्या आहाराची महिन्यातून किमान एक वेळा तपासणी करून खात्री करावी अशा प्रकारचा शासन आदेश दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी निर्गमित करण्यात आला असल्याची माहिती समितीस देण्यात आली. मुलतः पिपल्स युनियन फॉर सिविल लिबर्टीज विरूध्द युनियन ऑफ इंडिया या जनहित याचिकेमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पुरक पोषण आहाराचा पुरवठा कंत्राटदारामार्फत करण्यात येऊ नये असे आदेश दिलेले होते. त्यानुसार दोन वर्षाखालील मुलांना आणि २ ते ६ वयोगटातील मुलांना खाण्यास आणि पचण्यास हलका असा आहार वेगवेगळ्या पाककृतीतून देण्याचा शासनाने निर्णय घेतला. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार विशेषतः अमरावती जिल्ह्यातील कुपोषित मुलांची पचनशक्ती कमी झाल्यामुळे त्यांना पचण्यास हलका व जास्त सत्वयुक्त आहार देण्याची आवश्यकता असून ६ महिने ते २ वर्ष वयोगटातील मुलांना पेज स्वरूपात ३०० उष्मांक आणि ८ ते १० ग्रॅम प्रथिनेयुक्त पौष्टीक आहार पाककृती मधून तयार पुरक पोषण आहाराद्वारे देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कुपोषित मुलांना ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील श्रेणी-३ व श्रेणी-४ ची मुले यांना द्यावयाचा अतिरिक्त आहार ३०० उष्मांक आणि ८ ते १० ग्रॅम प्रथिनेयुक्त देण्यात यावा अशी तरतूद उक्त शासन निर्णयात करण्यात आली.

उपरोक्त नमूद शासन निर्णयात माता समितीच्या सदस्यांनी महिन्यातून एकदा तपासणी करण्याबाबत नमूद केले आहे. माता समितीने तपासणी करणे हे समितीला अनाकलनीय वाटते. तपासणी या शब्दाचा अर्थ अन्नाच्या चवीशी सविस्तरपणे निगडीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे या शासन निर्णयात दुरूस्ती करून अन्नाची चव घेऊन त्याबाबत सविस्तरपणे अभिप्राय देण्याबाबतची बाब नमूद करणे आवश्यक आहे असे करताना उक्त अंगणवाडीत एक नोंदवही ठेवणे व या शासन निर्णयाची माहिती माता समितीला व अंगणवाडी कर्मचाऱ्यांना असणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते.

प्रयोगशाळेत अन्नाची तपासणी करण्यासाठी विलंब होतो ही बाब सत्य आहे. प्रत्येक अंगणवाडीच्या ठिकाणी किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी प्रयोग शाळा उभारणे ही बाब अत्यंत खर्चिक व अंगणवाडीच्या ठिकाणाहून जिल्ह्याच्या ठिकाणी प्रयोग शाळेत जाण्यासाठी गैरसोयीची आहे असे असले तरी या अन्नाची तपासणी ही प्रयोगशाळेतून एका वर्षातून दोनवेळा करणे अनिवार्य करावे. तसेच प्रत्येक वेळी आहार बदलला असल्यास त्या-त्या वेळी तपासणी करणे अनिवार्य करण्यात यावे असे समितीला वाटते.

**माता समितीने चव घेणे ही बाब समितीला प्रशंसनीय वाटते. कारण अंगणवाडी शाळेतील ही मुले त्या संबंधित मातेचीच असतात व कोणतीही माता आपल्या मुलांना योग्य दर्जाचा आहार मिळावा अशीच दक्षता घेत असते त्यामुळे ही बाब व्यवहार्य आहे असे समितीला वाटते. परंतु एखाद्या मातेला अन्नाच्या चवीची तक्रार करावयाची असल्यास अशी तक्रार करण्यास वाव असावा व तशा प्रकारची नोंदवही अंगणवाडीत असावी व त्या नोंदवही मध्ये माता समितीने अभिप्राय नमूद केल्यानंतर अशा अभिप्रायाचे परिमार्जन करणे संबंधित विस्तार अधिकाऱ्यांमार्फत गट विकास अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अनिवार्य करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, अमरावती

### पाणीपट्टी वसुली थकबाकी बाबत (पंचायत समिती मोर्शी)

**(परिच्छेद ४.३४९/११/४२) (सन २००८-२००९)**

पंचायत समित्यांच्या हद्दीमध्ये असलेल्या पाणीपुरवठा व प्रादेशिक योजनांमधून कुपनलिका विहिरीतून तसेच विद्युतपंप व हातपंपाच्या सहाय्याने ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा केला जातो. हा पाणीपुरवठा लोकसंख्या व कुंटूबे यांच्या संख्येवर आधारीत असतो. सन २००८-०९ च्या लेखापरिक्षणात सदर पंचायत समित्यांच्या पाणीपुरवठा योजनाबाबतच्या हिशोबाच्या नोंदवह्या तपासल्या असता, दिनांक ३१ मार्च, २००९ अखेर बऱ्याच रकमा वसुली अभावी थकित असलेल्या दिसून आल्या. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून पंचायत समित्यांनी वेळच्यावेळी करणे आवश्यक होते. वसुली न केल्याने थकबाकीच्या रकमा वर्षागणिक वाढत जाऊन ग्रामपंचायतीकडून वसूल करणे कठीण जाते. वसुलीबाबत पंचायत समित्या विशेष प्रयत्न करतांना दिसत नाही असे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. दि. ३१ मार्च, २००९ अखेर खालील २१ पंचायत समित्यांकडे रक्कम रूपये १८,४३,४५,८७९/- इतकी पाणीपट्टीची थकित वसुली आहे. उदाहरणादाखल खालील पंचायत समित्यांचे आक्षेप एकत्रित करून तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ११ | अमरावती | मोर्शी | ४३ | १,०४,१५,२९६ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सार्वजनिक योजनेव्दारे पाणीपुरवठा होत नसल्याने सर्व कुटूंबांकडून मुळसारखीच घरगुती पाणीपट्टी खर्चावर आधारित दरानुसार वसुली करण्यात येत आहे. ७० गाव पाणीपुरवठा योजने अंतर्गत पाणी घेणाऱ्या कुटुंबांना पाणीपट्टी आकारणी, विद्युत देयक व देखभाल दुरूस्तीचे आधारीत खर्चावर करण्यात येत असल्यामुळे पाणीपट्टीची आकारणीही महिन्याप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र | वर्ष | वर्षनिहाय झालेली वसुली | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २००८-०९ | ३०,४०,००० | |
| २ | २००९-१० | १,००,७४,९०० | |
| ३ | २०१०-११ | ६४,४७,३०० | |
| ४ | २०११-१२ | ४६,५९,४६१ | |
| ५ | २०१२-१३ | २९,३७,१४० | |
| | एकूण झालेली वसुली | २,७१,५८,८०१ | |

सदर योजना एकूण ७० गावांची होती, परंतू एकूण ७० ग्रामपंचायती पैकी फक्त ३४ गावे पाणी घेत असल्याने व ७० गावांचा कच्चे पाणी, विद्युत देयक व देखभाल दुरूस्तीचा बोजा ३४ गावांवर पडत असल्यामुळे सदर ३४ गावे ही योजना सक्षमपणे चालविण्यासाठी प्रत्येक कुटुंबांकडून १०० टक्के वसुली होत नसल्याने सदरची एकूण रक्कम ३,४६,६०,६४५ एवढी थकित आहे. त्यामुळे ऑगस्ट, २०१३ पासून सदरहू योजना बंद पडलेली आहे, त्यामुळे वसुली शिल्लक आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ७० गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची पाणीपट्टीची थकबाकी रु.३,४६,६०,६४५/- वसूल न होण्याची कारणे काय आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ७० गावांच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजने अंतर्गत पाणी घेणाऱ्या कुटुंबांकडून पाणीपट्टी, विद्युत देयक व देखभाल दुरूस्तीच्या खर्चाच्या आधारावर पाणीपट्टीची रक्कम वसूल करण्यात येते. थकित रकमेपैकी २,७१,५८,८०१/-रुपये वसूल झालेले आहेत. ७० गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजने अंतर्गत ३४ गावांना पाणी मिळत होते. इतर गावांना पाणी मिळत नव्हते. त्यामुळे ३४ गावांवर भार पडत होता. म्हणून लोक पाणीपट्टीची रक्कम देत नव्हते. त्यामुळे पुढील वसुली झालेली नसून सदर योजना बंद झालेली आहे. ७० गावांची एकत्रित पाणीपुरवठा योजना होती. सन २013 पासून ती योजना बंद झालेली आहे. आता तेथे दुसरी योजना सुरू झालेली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ७० गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर किती रक्कम खर्च झालेली आहे, ती योजना बंद पडल्यामुळे लोकांना पाणी मिळत नसेल तर या योजनेवर झालेला खर्च वाया गेलेला आहे. यावर कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा यांनी समितीस विदित केले की, ५४ कोटी रुपये खर्च झालेले असून ज्यावेळी ही योजना सुरु झाली, त्यावेळी गावात पाणी टंचाई होती. परंतु, त्या भागात धरण झाल्यामुळे पाण्याची पातळी वाढली आणि दुसरी स्वतंत्र योजना कार्यान्वित झाली. या योजनेतून हळूहळू गावे बाहेर पडली. तांत्रिकदृष्ट्या यामध्ये काहीही अडचण नाही. यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दर्यापूर येथे दुसरी योजना सुरू केलेली आहे. परंतु ७० गावांची प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद झालेली असून इतर मोठ्या योजना सुरू आहेत.

समितीने पुढे विचारणा केली की, सदरहू योजना केव्हा पासून बंद आहे, पाईप लाईन, जॅकवेल इत्यादींचे काय करण्यात आले, यावर कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा यांनी समितीस विदित केले की, सदरची योजना २013 पासून बंद आहे. तोपर्यंत पाणीपुरवठा सुरू होता. सदरहू पाणी एकही गाव पिण्यासाठी वापरत नव्हते. पाणी टंचाई निर्माण झाल्यास त्यातून पाणी घेतले जाते.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

प्रस्तूत आक्षेपाधिन प्रकरणी शासनाचे ५४ कोटी रुपये खर्च करण्यात येवूनही ७० गावांसाठी असलेली प्रादेशिक पाणी पुरवठा योजना सन २01३ पासून बंद पडली आहे. सदरहू योजना बंद पडण्यामागे केवळ थकीत पाणीपट्टी नव्हेच तर इतर योजना कार्यान्वित होणे, परीसरात धरण होवून भूजल पातळी वाढणे इत्यादी कारणे असल्याचे समितीस सांगण्यात आले. परंतु सदर उत्तराने समितीचे समाधान झालेले नाही. असे प्रकरण भविष्यात घडूनये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मोर्शी तालुक्यातील ७० गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे सर्वेक्षण केल्यानुसार, या गावांमधील भूगर्भातील पाण्याची पातळी उन्हाळ्यात फार कमी होत असल्यामुळे, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिलेल्या ठरावानुसार अपर वर्धा धरणावरून सदर योजना तयार करण्यात आली.

७० गावांपैकी ५ गावे योजना सुरूहोण्यापूर्वीच GSDA च्या अहवालानुसार वगळण्यात आली. सदर योजनेची कामे माहे फेब्रुवारी, २००० रोजी सुरू करण्यात येवून, माहे डिसेंबर-२००४ पासून टप्पाटप्पाने चाचणी घेण्यात आली. माहे मार्च, २००८ रोजी ६५ गावांपैकी ४ गावांनी पाणी घेण्यास नकार दिल्यामुळे ६१ गावांचा पाणीपुरवठा सुरू असून सदर योजनेसाठी रु. ५४ कोटी खर्च करण्यात आला. सदरहू योजना दि. ३१-१२-२००८ रोजी जिल्हा परिषदेस हस्तांतरित करण्यात आली. जिल्हा परिषदेने ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास "ठेव तत्वावर" दिनांक १-१-२००९ पासwन चालविण्यास दिली. त्यानुसार वीज बिल जिल्हा परिषदेने भरणे व देखभाल दुरूस्तीसाठी रु. ५.०० लक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देणे आवश्यक होते.

सदर योजना दि. १९/८/२०१३ पर्यंत सुरु होती. या योजनेत एकुण ३५ गावांनी मागणी केल्यानुसार पाणी पुरवठा सुरु करण्यात आला होता. उर्वरीत गावांनी पाणीपट्टी भरण्यास असमर्थता दर्शविल्याने संपुर्ण योजना चालविण्याचा खर्च रुपये १४.७५ लक्ष प्रतिमाह (विद्युत देयक ८.५० लक्ष ६९५ H.P+५ लक्ष रु. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण देखभाल दुरुस्ती व अशुध्द पाणी रुपये १.२५ लक्ष) इतका खर्च येत होता. या ३५ गावामध्ये ९७९० नळ ग्राहकांची संख्या होती. त्यामुळे पाणीपट्टी दरसाधारण रुपये १६० प्रतिमाह येत आहे व वसुलीची टक्केवारी (५० %) सुध्दा कमी असल्यामुळे योजनांची विद्युत देयके भरणे व इतर खर्च पाणी पट्टी वसुलीमधुन भागविणे शक्य नव्हते, त्यामुळे योजना ऑगस्ट, २०१३ पासुन बंद आहे.

सद्यस्थितीत योजनेमधील बहुतांश गावांना या परिसरामध्ये झालेल्या धरणामुळे पाण्याची पातळी वाढुन त्यांचे जुने स्त्रोत पुनर्जिवित झाल्यामुळे त्यांनी या योजनेतुन पाणी घेण्याची मागणी केली नाही. सदर ७० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील समाविष्ट बऱ्याच उपांगाचा ग्रामपंचायत मार्फत चालविण्यात येत असलेल्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेत वापरात घेण्यात आलेली आहेत.

७० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पुनर्जिवित करण्यासाठी शासन निर्णय क्र.ग्रापापु-१११५/प्र.क्र.९२/पापु ०७, दिनांक ७ मे, २०१६ **(परिशिष्ट २.१)** अन्वये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (परिशिष्ट ब) मध्ये समावेश करण्यात आलेला आहे. सदर योजनेतील समाविष्ट गावांना, योजनेत समाविष्ट होण्याकरीता जिल्हा परिषद अमरावती मार्फत ठराव मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या ४८ ठरावांपैकी ४६ ग्रामपंचायतींनी योजनेत समाविष्ट होण्याची सहमती नाकारली आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

राज्यातील **"पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजना"** अंतर्गत शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक पापुयो-२०१५/प्र.क्र.५५/उर्जा-५ दिनांक १९/११/२०१५ **(परिशिष्ट २.२)** नुसार कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, प्रस्तुत आक्षेपाधिन प्रकरणी शासनाचे ५४ कोटी रुपये खर्च करण्यात येवुनही ७० गावांसाठी असलेली प्रादेशिक पाणी पुरवठा योजना सन २०१३ पासुन बंद पडली आहे. सदरहु योजना बंद पडण्यामागे केवळ थकीत पाणीपट्टी नव्हेच तर इतर योजना कार्यान्वित होणे, परिसरात धरण होवुन भुजल पातळी वाढणे इत्यादी कारणे असल्याचे समितीस सांगण्यात आले, परंतु सदर उत्तराने समितीचे समाधान झालेले नाही. असे प्रकरण भविष्यात घडू नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, यावर अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, सदरहू पाणीपुरवठा योजना सन २००७-२००८ मध्ये सुरु झाली होती, ती योजना सन २०१३ मध्ये बंद पडली. पाणीपुरवठा योजनेचे विजेचे देयक गावक-यांनी अदा केले नाही. गावक-यांनी याकरिता निधी जमा केला नाही, शेवटी ही योजना बंद पडली. बंद पडलेल्या योजना पुन्हा चालू करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींचा ठराव घेणे आवश्यक आहे. ६५ गावांमध्ये ४८ ग्रामपंचायती आहेत, यांना पाणीपुरवठयासंबंधीचा ठराव करण्यास विनंती केलेली आहे. परंतू त्या गावांकडे पर्यायी पाणीपुरवठा योजना असल्यामुळे त्यांनी या योजनेच्या वापरास नकार दिला आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, याचा अर्थ असा होतो की, या योजनेसाठी खर्च केलेले पैसे वाया गेले यास प्रकरणास कोण जबाबदार आहे. यावर अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, ही योजना संबंधित गावांच्या सहमतीने, ठराव घेवून व त्या भागातील लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्यानंतरच करण्यात आली आहे. या योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात आलेले आहे. ७० गावांसाठी असलेल्या या पाणीपुरवठा योजनेमध्ये केवळ टाकीपर्यंत पाणी पोचविणे नियोजित होते. अंतर्गत पाणीपुरवठयाची व्यवस्था गावांमध्ये अगोदरच उपलब्ध होती. परंतु त्यावेळी पाण्याची टंचाई भासत असल्यामुळे ही योजना राबविता आली नाही. या कालावधीत काही पर्यायी पाणी पुरवठा उपलब्ध झाला व ही योजना पंपिंगवर आधारित असल्यामुळे यामधून होणा-या पाणी पुरवठयाचा दर देखील तुलनेने जास्त होता. त्यासाठी सुमारे ५५ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. योजना पूर्ण होऊन तिच्या अंमलबजावणीसाठी ७ ते ८ वर्षाचा कालावधी गेला. सन २०१३ पर्यंत ही योजना वापरात होती. या कालावधीत विजेचे देयक जास्त आले व गावक-यांनी

पाणीपट्टी न भरल्यामुळे सदरहू योजना बंद झाली. यावर समितीने विचारणा केली की, ही गावे सद्यस्थितीत पाण्यापासून वंचित आहेत का, यावर अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, या गावांना सध्या पाणी उपलब्ध आहे. या गावांनी पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था केलेली आहे.

समितीने अशी विचारणा केली की, ही योजना करण्यापूर्वी संबंधित ग्रामपंचायतींची संमती घेणे आवश्यक होते. तसेच या योजनेपासून होणा-या पाणी पुरवठयासाठी एवढे पैसे लागणार आहेत याबाबत देखील ग्रामपंचायतींच्या सभेमध्ये चर्चा करण्यात आली होती का, तेथे पूर्वी अस्तित्वात असलेल्या पाणीपुरवठा योजनेवरुनच त्या गावांना पाणी मिळत आहे, तरी देखील गरज नसताना ही योजना का करण्यात आली, त्या काळात शासनाचे विनाकारण सुमारे ५४ कोटी रुपये बुडाले व यामध्ये कोण दोषी आहे, दोषी अधिका-यांवर काही कारवाई केली आहे का, ही रक्कम त्यांच्याकडून वसूल झाली पाहिजे. विभागीय सचिवांनी शासन म्हणून याबाबत व्यवस्थित माहिती दिली पाहिजे. हे शासनाचे म्हणजेच सर्वसामान्य जनतेचे पैसे आहेत व त्याचा दुरुपयोग होता कामा नये. त्याचा सदुपयोगच झाला पाहिजे. यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, या योजनेंतर्गत ज्या टाक्या बांधण्यात आल्या त्या सर्व वापरात आहेत. ही योजना सन २००८-०९ मध्ये सुरु झाली व २०१३ पर्यंत ती सुरु होती. यामध्ये एकूण ७० गावांचा समावेश होता. ५ गावे वगळण्यात आली व उर्वरित ६५ गावांमध्ये ही योजना उपरोक्त कालावधीमध्ये सुरु राहिली. या योजनेमध्ये पाणीपट्टी वसुलीचे फार मोठे काम होते. खूप मेहनतीने गट विकास अधिकारी यांच्या माध्यमातून पाणीपट्टी वसूल करुन योजना सुरु ठेवण्यात आली होती. सन १९९८-९९ या कालावधीत ही योजना सूचविण्यात आली तेव्हा ज्या ज्या ग्रामपंचायतीचे जे काही ठराव घेण्यात आले आहेत. त्या सर्व ठरावावर कोणते मुद्दे नमूद केले आहेत, या संदर्भात अभ्यास करणे आवश्यक आहे. एखाद्या ग्रामपंचायतीकडून आपण किती पाणीपट्टी वसूल करणार आहोत, हे संबंधित ग्रामंचायतींना माहिती असणे आवश्यक आहे. सन २००८ मध्ये सदर योजना पूर्ण करण्यात आली तेव्हा पाणी पुरवठयाचे बिल जास्त होते त्याचे कारण असे की, पाणी पुरवठा करणा-या विजेच्या बिलांचा त्यात समावेश होता. त्यामुळे सदर ग्रामपंचायतींना हा खर्च देणे शक्य नसल्यामुळे जवळपास तीन ते चार वर्ष पाणी पुरवठयाचे बिल जिल्हा परिषदेने भरले आहे. मध्यंतरी यातील काही गावांमध्ये धरण आणि जलसंधारणाची कामे करण्यात आली, त्यामध्ये विहीर, हातपंप मोठया प्रमाणावर झाल्यामुळे तेथील गावांचा पाणी पुरवठ्यांचा प्रश्न संपुष्टात आल्यामुळे संबंधित ग्रामपंचायतीने सांगितले की, पाणी पुरवठयांचा जो स्त्रोत आहे, तो स्त्रोत पुरेसा असून यासाठी ग्रामपंचायतीस कोणत्याही प्रकारचा खर्च येत नसल्यामुळे आम्ही या योजनेमध्ये समाविष्ट होणार नाही. त्यामुळे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना बंद आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधित विभाग यासंदर्भात कोणत्या उपाययोजना करणार आहेत, या विषयांच्या संदर्भात तात्काळ चौकशी करुन दोषी अधिका-यांवर कारवाई करावी अशा सूचना समितीने विभागाला दिल्या होत्या, त्या सूचनेप्रमाणे विभागाने काय कार्यवाही केली आहे, समितीच्या प्रश्नावर अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विनंती केली की, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषी अधिका-यांवर एक महिन्यात कारवाई करण्यात येईल.

समितीने पुढे विचारणा केली की, यासंदर्भात विभागास चौकशी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या सूचनेप्रमाणे विभागाने काय चौकशी केली त्या बाबतच्या अहवालाबाबत माहिती द्यावी, सचिव महोदयांनी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी या संदर्भात चर्चा केली आहे का या समितीच्या प्रश्नावर सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी होकारार्थी उत्तर दिले व सकाळीच या संदर्भात चर्चा केल्याचे सांगितले. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आज साक्ष आहे म्हणून सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी विभागाशी चर्चा केली आहे का, सन २०१५ पासून काही योजना बंद झालेल्या आहेत. त्यातील काही योजना प्रलंबित आहेत. या योजनेवर शासनाचे करोडो रुपये खर्च झालेले आहेत. या सर्व योजना सुरु करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी काय प्रयत्न केले आहे,या योजनेतील निधीचा अपव्यय झाला त्यामुळे काही गावांना योग्य तो पाणी पुरवठा झाला नाही, या कामांमध्ये जे अधिकारी दोषी असतील तर त्यांच्यावर विभागाने काय कारवाई केली आहे. यावर समितीस उत्तर प्राप्त झाले नाही. परंतू अतिरिक्त मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस अनुमोदन दिले की, प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात विभागाने चर्चा केली आहे व असे निदेश दिले आहेत की, अशा प्रकारच्या योजनेच्या निधीचा अपव्यय होणे चुकीचे आहे. याबाबत विभागाने सखोल चौकशी करुन संबंधित अधिका-यांवर योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. यावर

समितीनेही विभागास निदेश दिले की, सदर दिलेल्या माहिती नुसार यासर्व प्रलंबित बंद योजनेची सखोल चौकशी करुन त्यात दोषी असलेल्या अधिका-यांवर एक महिन्याच्या आत कारवाई करावी. यावर अतिरिक्त सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, सदर प्रकरणाची चौकशी करुन एक महिन्याच्या आत संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती मोर्शी अंतर्गत सन २००८-२००९ या वर्षातील पाणीपट्टी वसुली थकबाकी दिनांक ३१ मार्च, २००९ अखेर १,०४,१५,२९३/- एवढी होती. पाणीपट्टीच्या थकबाकीच्या रकमा वर्षागणिक वाढत जातात. सदर पाणीपट्टीच्या वसूलीकरीता पंचायत समित्यांमधून विशेष प्रयत्न केले जात नाहीत असा आक्षेप प्रामुख्याने प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला होता. त्यासंदर्भात ७० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून केवळ ३४ गावे पाणी घेत असल्यामुळे कच्चे पाणी, वीज देयक व देखभाल दुरुस्तीचा बोजा ३४ गावांवर पडत असल्यामुळे समितीने भेट देईपर्यंत सन २०१३ मध्ये सदरहू योजना बंद पडून एकूण थकबाकी ३,४६,६०,६४५/- एवढी झाल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली.

प्रस्तुत आक्षेपाधीन प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर शासनाचे ५४ कोटी रुपये खर्च झालेले असून ७० गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ही केवळ थकीत पाणीपट्टी या एकाच कारणामुळे नव्हेतर इतर योजना कार्यान्वित होणे, परिसरात धरण होऊन भूजल पातळी वाढली व गावांतील पाण्याचे स्त्रोत पुनर्जीवित झाल्यामुळे सदर योजना बंद पडल्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या साक्षीच्या वेळी समितीस सांगण्यात आले, परंतू समितीचे यावर समाधान झाले नसल्यामुळे समितीने दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

विभागीय सचिवांचे साक्षीच्या वेळी मोर्शी तालुक्यातील ७० गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात अनेक बाबी समितीच्या निदर्शनास आल्या. मोर्शी तालुक्यातील ७० गावांमध्ये भुगर्भातील पाण्याची पातळी फार कमी असल्यामुळे जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिलेल्या ठरावानुसार अपर वर्धा धरणावरुन सदर योजना तयार करण्यात आली. नियोजनाच्या पातळीवरच्या चुका या स्तरावरच झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले, कारण योजना सुरु करण्यापूर्वी भुजल सर्वेक्षण यंत्रणेच्या अहवालावरुन योजनेतील पाच गावे वगळण्यात आली. योजनेचे काम फेब्रुवारी, २००० ला सुरु झाले ते दिनांक ३० जून, २००९ रोजी कार्यान्वीत झाले. त्यापूर्वीच उर्वरित ६५ गावांपैकी ४ गावांनी यातून पाणी घेण्यास नकार दिला त्यामुळे ६१ गावांना पाणीपुरवठा सुरु करण्यात आला. दिनांक २९ जानेवारी, १९९८ ला प्रशासकीय मान्यता ते माहे जून, २००९ पर्यंत कार्यान्वयन या कालावधीत योजनेतील ९ गावे वगळल्यामुळे योजनेचे नियोजन अत्यंत ढिसाळ पध्दतीचे होते या निर्ष्कषाप्रत समिती आली आहे.

माहे जून २००९ ते ऑगस्ट २०१३ या कालावधीत केवळ पाच वर्षे पाणी पुरवठा योजना सुरु होती. परंतू पाणीपट्टी वसुलीची टक्केवारी ५०% पेक्षा कमी असल्यामुळे वीज देयके भरणे, देखभाल दुरुस्ती करणे अशक्य झाल्यामुळे सदर योजना बंद पडली आहे. योजना बंद पडलेली असली तरी दरम्यानच्या काळात ७० गावांतील परिसरात झालेल्या धरणामुळे पाणी पातळीत वाढ झाल्यामुळे या गावांचे पाण्याचे पारंपरिक स्त्रोत पुनर्जिवीत झाल्यामुळे ही गावे सदर योजनेतून पाण्याची मागणी करीत नाहीत ही वस्तुस्थिती सचिवांनी समितीसमोर विषद केलेली असली तरी योजनेवरील तब्बल ५४ कोटी रुपयांचा खर्च निष्फळ केल्याचे तथ्य नाकारता येत नाही.

७० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पुनर्जिवीत करण्यासाठी शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.पु.१११५/प्र.क्र.९२/पापु ०७ दिनांक ७ मे, २०१६ अन्वये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सदरहू योजना घेण्यात आल्याची माहिती समितीस देण्यात आली. सदर योजनेला पुनर्जिवीत करण्यासाठी शासनाने २८९ लक्ष रुपयांची तरतूद देखील केलेली होती. परंतू योजनेत समाविष्ट करावयाच्या ४८ पैकी ४६ ग्रामपंचायतींनी योजनेत सामील होण्यास नकार कळविलेला असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. **या पार्श्वभुमीवर शासनाच्या ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनांचे** पुनर्जिवीन **करण्याकरीता मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांच्या अंमलबजावणी संदर्भात प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. दिनांक ७ मे, २०१६ च्या शासन निर्णयाद्वारे सुमारे १३०.८६ कोटींची तरतूद शासनाने योजना पुनर्जिवीत करण्याची केलेली होती. सदर निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला थेट वितरीत करण्यात येणार होता. सदर निधीतून परिशिष्ट "ब" मधील मोर्शी तालुक्यातील ७० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा सारख्या बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवीत करण्यात**

**येणार आहे. त्यामुळे मोर्शी तालुक्यातील ७० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या धर्तीवर शासन निर्णयातील परिशिष्ट "ब" मधील इतर पाणी पुरवठा योजना पुनरुज्जीवित झाल्यात किंवा कसे याचा पुन्हा आढावा घेण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे, कारण इतर ठिकाणी मोर्शी प्रमाणे पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अत: प्रसंगी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांच्या शासन निर्णयात आवश्यक ती दुरुस्ती करावी व योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता सखोल नियोजन करुन तिचा कालबध्द आढावा घेवून त्या पूर्णत्वास न्याव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

मोर्शी तालुक्यातील ७० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर "पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजना" अंतर्गत शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक पापुयो २०१५/प्र.क्र.५५/ऊर्जा-५, दिनांक १९/११/२०१५ नुसार कार्यवाही होणे अपेक्षित असल्याचे लेखी अभिप्राय ग्रामविकास विभागाने समितीस सादर केले आहेत. **सदरहू शासन निर्णयाद्वारे राज्यातील पाणी पुरवठा योजनांचा विज पुरवठा सुरळीत चालू ठेवण्यासाठी सवलत देण्यात आली. या योजनेत स्वेच्छेने सहभागी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी जून, २०१५ अखेर असणाऱ्या विज बिलांच्या मुळ थकबाकी पैकी ५०% रक्कम एक रकमी किंवा १० समान हप्त्यांत महावितरणकडे भरणे आवश्यक होते. परंतू अशा प्रकारची ग्रामविकास विभागाला अभिप्रेत असलेली कार्यवाही अमरावती जिल्हा परिषदेकडून झालेली नाही किंवा त्याबाबतचा पाठपुरावा ग्रामविकास विभागाने केलेला समितीला आढळून आलेला नाही याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.**

**प्रस्तुत प्रकरणातील पाणी पुरवठा योजनेचा पाया म्हणजे नियोजनच अपरिपक्व होते असे समितीचे मत आहे. अन्यथा सुमारे ५४ कोटी रुपये खर्च करुन पूर्ण झालेली योजना बंद पडली नसती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करणे व सुमारे ५ ते ६ वर्षे या योजनेचे काम सुरु होण्यास विलंब, त्यानंतर ती योजना बंद करण्यात येणे या बाबी समितीला अनाकलनिय वाटतात म्हणून समितीने विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सचिवांना या प्रकरणी व जिल्ह्यातील इतर अशा प्रकारे बंद पडलेल्या योजनेसंदर्भात चौकशी करुन एक महिन्यात अहवाल सादर करण्याबाबत निदेश दिले होते. तथापि, विभागाने अद्यापही चौकशी केली नाही तसेच याबाबत काहीही माहिती समितीला पाठविली नाही, याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.**

**जनतेचे ५४ कोटी रुपये पाणी पुरवठ्याच्या योजनेवर खर्च होऊन त्या पैशाचा विनियोग नियोजित प्रयोजनासाठी न होणे व केलेला खर्च वाया जाऊन योजना बंद होणे, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी होणे समितीला अगत्याचे वाटते. नुसती चौकशीच नाही तर संबंधित जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक वाटते. लोकप्रतिनिधींच्या आग्रहाखातर अशा योजना राबवून शासनाचे कोट्यवधी रुपये खर्च होणे ही बाब देखील गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. याबाबत विभागाने कडक स्वरुपाच्या सूचना निर्गमित करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे समितीला आश्वासीत केल्याप्रमाणे तातडीने चौकशी करुन या प्रकरणी योजना बंद होण्यास कारणीभूत असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला एक महिन्यात तातडीने पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, अमरावती

### थकित आगाऊ रकमा (थकित अग्रिम)

**(परिच्छेद ३.१०३९/२८) (सन २००८-२००९)**

जिल्हा परिषदांमध्ये निरनिराळया योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधीत ठेकेदार, विभाग प्रमुख अगर कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात येतात. अशाप्रकारे दिलेल्या रक्कमांचे संबंधित वर्षा अखेर खर्चाची प्रमाणके व हिशेब समायोजन/वसुली करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रक्कमांचे समायोजन/वसुली झाल्यावर नवीन आगाऊ रक्कमा देता येतात. परंतु जिल्हा परिषदांकडील आगाऊ रक्कमांच्या नोंदवहया पाहता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रक्कमांचे समायोजन/वसुली होत नसल्याचे आढळून येते. अशा थकित आगाऊ रक्कमांमध्ये फार जुन्या म्हणजेच १९६२ पासूनच्या आगाऊ रक्कमांचे समायोजन/वसुली थकित असल्याचे दिसुन येते. उदाहरणादाखल, पुढील जिल्हा परिषदांमध्ये सन २००८-०९ अखेर खाली दिल्याप्रमाणे आगाऊ रकमा समायोजन/वसुली अभावी थकित होत्या.

| अ. क्र. | जि. प. चे नांव | जि.प.चा विभाग | ले. प. अहवालातील परी. क्र. | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| २८ | अमरावती | लघु पाटबंधारे | ५८ | २२,७६,४४५ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

रु. २२,७६,४४५ रक्कम प्रलंबित आहे. वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लघु पाटबंधारे विभागांतर्गत ठेकेदार, विभाग प्रमुख व कर्मचारी यांना दिलेले अग्रिम रुपये २२,७६,४४५/- प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, तसेच सदरचे अग्रिम किती कालावधीपासून प्रलंबित आहेत, अग्रिम वसुलीसाठी खात्याने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत, यावर कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, सन १९९२-९३ पासून ते २००२-०३ या कालावधीत विविध कारणांसाठी दिलेल्या २२ लाख रुपयांची अग्रिम प्रलंबित आहे. सदर अग्रिमे बांधकाम, लोखंड खरेदी, वाहन दुरुस्ती, डिझेल खरेदी इत्यादी बाबींसाठी दिलेली होती. ४ लाख पर्यंतचा अग्रिम प्रोजेक्ट विभागाला दिला जात होता. त्यामध्ये पाझर तलाव, इंदापूर टप्पा विशेष प्रकल्प, वरखेड करिता ९७ हजार रुपये आहे. तसेच लोखंड खरेदी करिता ९ लाख रुपये व वाहन दुरुस्तीसाठी ७ लाख रुपये अग्रिम दिलेले आहे. ते सन १९९८-१९९९ पासून प्रलंबित आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन १९९२-१९९३ पासूनची वसुली करावयाची आहे. शासनाचा लाखो रुपयांचा निधी त्यांच्याकडे वापरात आहे. त्यांना एवढ्या वर्षांपासून विना व्याज निधी वापरण्यास मिळत आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, संबंधितांकडून सदरहू रकमा वसूल होत नसेल, तर त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात यावा. ज्या रकमा सन १९९२-१९९३ वर्षांपासून प्रलंबित आहेत. त्या जुन्या रकमांच्या प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी. अनेक प्रकरणातील रकमा ७ लाख रुपये, ९ लाख रुपये, २२ लाख रुपये अशा मोठ्या स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे संबंधितांवर एफआयआर दाखल करण्यात यावा व रक्कम वसूल करण्यात यावी.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधितांवर आतापर्यंत कार्यवाही का करण्यात आली नाही. लघु पाटबंधारे विभागाच्या एकाच हेड खाली २२ लाख ७६ हजार रुपयांची वसुली बाकी आहे. यावर कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, समितीने दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही केली जाणार आहे. एकूण रक्कम १४ कोटी रुपयांची आहे. प्रथम छोट्या रकमा असणाऱ्यांना नोटीस देणार आहोत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, या थकित रकमांसंदर्भात पंचायती राज समिती येण्यापूर्वी किती जणांना नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत. एखाद्या अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे काय, एखाद्या ठेकेदारावर कार्यवाही केली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस नाही असे उत्तर दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, पंचायती राज समिती येईल तेव्हाच काम करायचे काय, काही मार्गदर्शक सूचना आहेत किंवा नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, १४ कोटी रुपयांची वसुली करावयाची होती. त्यावर कार्यवाही सुरु केलेली असून जवळपास ३ कोटी रुपये वसूल झालेले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, आताच समितीने या प्रकरणातील दोषींवर कार्यवाही करण्याच्या जिल्हापरिषदेला सूचना केल्या आहेत. परंतु या पूर्वी आपण किती ठेकेदारांना काळ्या यादीत टाकले आहे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, आतापर्यंत अशी ॲक्शन घेतलेली नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, अशा स्वरुपाची कार्यवाही केली असती, तर सदरहू वसुली आतापर्यंत झाली असती. प्रशासनामध्ये कुठेतरी पाणी मुरते, यामधील ठेकेदारांना काळ्या यादीत टाकावे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली थकित आगाऊ रकमा (थकित अग्रिम)**

लघुपाटबंधारे विभागाअंतर्गत ठेकेदार, विभाग प्रमुख व कर्मचारी यांना दिलेल्या अग्रिमाची वसुली रु. २२,७६,४४५ प्रलंबित ठेवण्यावर कोणतीही प्रशासकीय कार्यवाही केली नसल्याप्रकरणी यांच्यावर कार्यवाही करुन प्रलंबित रकमा त्यांच्याकडून वसुल करण्याबाबत समितीने निर्देश दिलेले आहेत, त्यानुसार जबाबदार अधिका-यांवर कोणती कार्यवाही केली आहे व आतापर्यंत किती रक्कम वसुल झाली आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

लघुपाटबंधारे विभागाने ठेकेदारांना कुठल्याही अग्रिमाचे अदायगी केलेले नाही. सदर अग्रिम विभागाला दिलेला असून विभागाने प्रलंबित अग्रिमांपैकी रु. १४,७८,६७० समायोजित करण्यात आलेली असुन उर्वरित प्रलंबित अग्रिमांबाबत तपशिल खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | प्र.क्र. | दिनांक | प्रयोजन | रक्कम | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| २००१-०२ | २०२५ | १०/५/२००१ | वाहनाचे दुरुस्तीकरीता डिझेल पेट्रोल टायरटयुब खर्चा-करिता | रु. ७,००,००० | या प्रकरणात FIR क्र.३३८ दि. ४.८.२००६ ला पो.स्टे.गाडगे नगर, अमरावती येथे दाखल करण्यात आला. सदरहू प्रकरणात विभागीय चौकशी करण्यात आली असुन श्री.दुबे शा.अ.(यांत्रिकी) यांना बडतर्फ करण्यात आले. |
| १९९३-९४ | १०८८५ | | विशेष प्रकल्प विभाग अम.नरखेड ते कु-हा येथील कामासाठी | रु. ९७,७७५ | उपरोक्त निधी समायोजनाबाबत विशेष प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती या विभागाशी खालील प्रमाणे पत्रव्यवहार करण्यात आला पत्र क्र.१६६८ दि.१९.०५.२०१६, पत्र क्र.२३०० दि.२६.०७.२०१६,पत्र क्र.२४०८ दि.०६.०८.२०१६, पत्र क्र.२६७० दि.०३.०९.२०१६, पत्र क्र.३६२४ दि.०७.१२.२०१६ तसेच दिनांक २३.१२.२०१६ अन्वये संबंधित विभागास व त्यांचे वरीष्ठ अधिका-यांस पत्राव्दारे कळविण्यात आले आहे. परंतु संबंधित विभागा- |

| वर्ष | प्र.क्र. | दिनांक | प्रयोजन | रक्कम | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | कडून याबाबत प्रतिसाद नाही. तद्-नंतर पत्र क्र. २९७६ दिनांक २२.०९.२०१७ अन्वये त्यांना कळविण्यात आले असून अद्यापपर्यंत सदर रक्कमेचे त्या विभागाकडून समायोजन झाले नाही. |

अग्रिम वसुलीबाबत योग्य कालावधीत कार्यवाही न केल्यामुळे तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. अ. ना. राणे (सेवानिवृत्त) व श्री. आर. के. भगत, तत्कालीन प्रभारी कार्यकारी अभियंता यांचेविरुध्द अनुक्रमे पत्र क्र.१७३९ व पत्र क्र.१७४० दिनांक २४.०५.२०१६ खाते चौकशी प्रस्ताव जलसंधारण विभागास सादर करण्यात आला आहे. त्यानुषंगाने त्यांचे मंत्रालयीन संबंधित जलसंपदा विभागाने दिनांक २७.०१.२०१७ रोजी संबंधित दोन्ही अधिकाऱ्यांविरुध्द ज्ञापन बजाविले आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

थकित अग्रिम वसुलीबाबत ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र.झेडपीए-२००९/प्र.क्र.५२२/वित्त-९. दिनांक १० डिसेंबर, २०१० **(परिशिष्ट ३.१)** अन्वये सर्व जिल्हा परिषदांना स्पष्ट सूचना दिल्या असून प्रलंबित अग्रिमाचे समायोजन व वसूली तात्काळ करण्याबाबत जिल्हा परिषदेला दिनांक १२ मे २०१६ च्या पत्रान्वये पुन्हा सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषदेकडून सदर प्रकरणाबाबत दोषी अधिकारी श्री. अ. ना. राणे (से.नि.) व श्री. आर. के. भगत, तत्कालिन प्रभारी कार्यकारी अभियंता यांचा प्राप्त झालेला विभागीय चौकशीचा प्रस्ताव जलसंपदा विभागास पाठविण्यात आला आहे व जलसंपदा विभागाने दिनांक २७.०१.२०१७ रोजी संबधित दोन्ही अधिका-यांविरुध्द ज्ञापन बजाविले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लघुपाटबंधारे विभागाअंतर्गत ठेकेदार, विभाग प्रमुख व कर्मचारी यांना दिलेल्या अग्रिमाची वसुली रु. २२,७६,४४५/- प्रलंबित ठेवण्यावर कोणतीही प्रशासकीय कार्यवाही केली नसल्याप्रकरणी यांच्यावर कार्यवाही करुन प्रलंबित रक्कमा त्यांच्याकडून वसुल करण्याबाबत समितीने निर्देश दिलेले आहेत, त्यानुसार जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली आहे व आतापर्यंत किती रक्कम वसुल झाली आहे, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ठेकेदाराने अग्रिम अदा केलेला नाही, याबाबतचा हा परिच्छेद आहे या अनुषंगाने समितीस माहिती देऊ इच्छितो की, २२ लाख ७६ हजार रुपयांपैकी १४ लाख ७८ हजार इतकी रक्कम समायोजित करण्यात आलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, विषय समितीच्या मंजुरी शिवाय मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना अग्रिम देण्याचे अधिकार आहेत काय, यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विदित केले की, नियम २१० ब नुसार १ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम असेल तर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या सल्ल्याने त्याबाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असतात. यावर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या विषय समितीच्या मंजुरी शिवाय खर्च करता येत नाही. हा जिल्हापरिषदेचा निधी असल्याने विषय समितीला मंजुरी देण्याचे अधिकार असलेच पाहिजेत. याबाबतची पॉलिसी सुधारण्याची गरज आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अगोदर सांगितल्याप्रमाणे २२ लाख ७६ हजार रुपयांपैकी १४ लाख ७८ हजार रुपये समायोजित झालेले आहेत. उर्वरित ७ लाख रुपयांच्या संदर्भात सबंधित अधिकारी श्री.दुबे यांना बडतर्फ करण्यात आले असुन या प्रकरणाबाबत एफ.आय.आर. देखील दाखल करण्यात आलेला आहे. यामध्ये खर्च करण्यास मंजुरी देणे व खर्च करण्यास मंजुरी मिळाल्यानंतर अग्रिम देणे असे दोन विषय आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, यामध्ये नियमबाहय काम झाले आहे काय, असल्यास, त्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या परिच्छेदामध्ये असा आक्षेप नमूद करण्यात आला आहे की, नियमबाह्य पध्दतीने अग्रिम देण्यात आला. मात्र प्रत्यक्षात तसे नव्हते. अग्रिम दिल्यानंतर समयोजन झालेले नाही असा हा विषय आहे. समितीस माहिती दिल्याप्रमाणे उर्वरित ७ लाख रुपयांच्या संदर्भात संबधित अधिकारी, श्री. दुबे यांना बडतर्फ करण्यात आले असून या प्रकरणाबाबत एफ.आय.आर. देखील दाखल करण्यात आलेला आहे. ९७ हजार रुपयांच्या वसुलीची कारवाई झालेली नाही. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस अधिक माहिती दिली की, ९७ हजार रुपये सन २००१ मध्ये काही कामांकरिता दिले होते. अद्याप त्यांचे समायोजन केलेले नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २००१ मध्ये पैसे दिले तेव्हापासून त्याप्रकरणात लक्ष घालण्यात आले नाही. याप्रकरणी दोषी कोण आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, वाहन दुरुस्तीकरिता ७ लाख रुपये दिले होते. त्या प्रकरणी एफ. आय.आर. दाखल करण्यात आला आहे. तसेच प्रलंबित अग्रिमाच्या समायोजन व वसूली प्रकरणी वारंवार पत्र व्यवहार करण्यात आला होता, परंतु निधी समायोजित करण्यात आला नाही. यापूर्वी ग्रामविकास विभागाने विशेष प्रकल्प विभाग, कार्यकारी अभियंता यांना देखील पत्र दिले आहे.

समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, सार्वजनिक बांधकाम विभागाने ९७,०००/- रुपये रक्कमेचे समायोजन अद्याप केले नाही. सदर ५ हजार पेक्षा अधिक रक्कमेचे प्रदान करण्यात आले असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकार नसताना ते प्रदान करण्यास मंजूरी कशाच्या आधारे दिली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस माहिती दिली की, सदरहू काम सन १९९३-९४ मधील असून त्यासाठी ९७ हजार रुपयांचे प्रदान विभागाला करण्यात आले होते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने विभागाला पैसे देण्याचे काही कारण नाही. त्यांचेकडे अकांऊट नसते. जिल्हा परिषदेचा आर्थिक व्यवहार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या माध्यमातून करण्यात येतो. जिल्हा परिषदेच्या कोणत्याही विभागाला आहरण संवितरण अधिकारी नाही. त्यामुळे सदर रक्कमेचे विभागाला अग्रिम देण्याचे कारण काय, विभागाला रक्कम प्रदान केली असेल तर त्याचे आहरण संवितरण अधिकारी कोण आहेत, विभागाने सदरहू रक्कम कोणत्या खात्यामध्ये जमा केली, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सन २००१ मध्ये कामाचे अंतिम देयक झाले नसेल त्यामुळे अग्रिमाची रक्कम विभागाला दिली व विभागाने ती रक्कम प्रदान केली असेल. विभागाकडून त्या रक्कमेचे समायोजन करण्यात आले नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांचे आर्थिक व्यवहार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या माध्यमातून केले जातात व धनादेशही त्यांच्याच माध्यमातून दिले जातात, अशी वस्तुस्थिती असताना विभागाने कशाप्रकारे रक्कमेचे प्रदान केले, सदरहू प्रकरण २००१ मधील आहे. कोणतीही कार्यवाही नियमानुसारच केली पाहिजे. विभागाने रक्कमेचे प्रदान केले असेल तर त्याचा हिशेब ठेवला पाहिजे. सदरहू प्रकरणी चूक झालेली असून रकमेचे समायोजन करुन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा. शासनाचा धोरणात्मक निर्णय असताना त्याची अंमलबजावणी करण्यात येत नाही. हा केवळ अमरावती जिल्ह्याचा प्रश्न नाही. त्यामुळे उक्त प्रकरणी सर्व जिल्हा परिषदांना धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करण्यास पत्राव्दारे कळविण्यात यावे. यावर सचिव, ग्रामविकास यांनी समितीला विदित केले की, प्रत्येक जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांना अग्रिम रक्कम देताना अडचण येते. यावर समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणाचा विचार करुन अशा प्रकारच्या घटना घडू नये याकरिता विभागाने तातडीने सर्व जिल्हा परिषदांना सूचित करावे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अधिकारी स्वत:च्या खर्चासाठी अग्रिम रक्कम घेत नसतात किंवा ती घेऊन शासनाला फसविण्याचा मानस नसतो. परंतु अशा रक्कमांच्या संदर्भात अडचण निर्माण झाली तर संबंधित अधिका-यास निवृत्तीच्या वेळी अडचण येते. त्यामुळे ग्रामविकास विभागाने माहे मार्च, २०१७ मध्ये एक परिपत्रक काढून सर्व संबंधितांना कळविलेले आहे. यापुढे रकमा प्रदान करताना आधार लिंकव्दारेच देण्यात येणार आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषदांमध्ये निरनिराळया योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधीत ठेकेदार, विभागप्रमुख अगर कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात येतात. अशाप्रकारे दिलेल्या रक्कमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशेब समायोजन/वसुली करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रक्कमांचे समायोजन/

वसुली झाल्यावर नवीन आगाऊ रक्कमा देता येतात. परंतु जिल्हा परिषदांकडील आगाऊ रक्कमांच्या नोंदवह्या पहाता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रक्कमांचे समायोजन/वसुली होत नसल्याचे आढळून येते व अशा रक्कमा थकित राहतात. **अमरावती जिल्हा परिषदेमध्ये सन २००८-०९ अखेर २२,७६,४४५/- एवढ्या आगाऊ रक्कमा समायोजन/वसुली अद्यापि थकीत होत्या. समितीने अमरावती जिल्हा परिषदेस दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली तोपर्यंत एकूण रकमेपैकी कोणत्याही रकमेचे समायोजन/वसुली झालेली नव्हती. समितीने सदरहू बाब गांभिर्याने घेऊन त्यावर विभागीय सचिवांची दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीपर्यंत जिल्हा परिषदेने नाममात्र रकमेचे समायोजन केलेले होते, ही बाब समितीच्या निदर्शनास आली. थकीत रकमेचे स्वरुप पाहता कमी रकमेचे समायोजन केल्याबाबत समिती तीव्र चिंता व्यक्त करते.**

ग्रामविकास विभागाने यासंदर्भात आपल्या लेखी उत्तरात निदर्शनास आणले की, थकित अग्रिम वसुलीबाबत दिनांक १० डिसेंबर, २०१० अन्वये सर्व जिल्हा परिषदांना स्पष्ट सूचना दिल्या असून प्रलंबित अग्रिमाचे समायोजन व वसूली तात्काळ करण्याबाबत जिल्हा परिषदेला दिनांक १२ मे २०१६ च्या पत्रान्वये पुन्हा सूचना देण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकान्वये सर्व जिल्हा परिषदांना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ नियम २१० नुसार आपल्या कार्यालयाकडून देण्यात आलेले वेतन अग्रीम, प्रवास भत्ता अग्रीम, वाहन अग्रीम इ. सर्व प्रकारचे प्रलंबित अग्रीमांची वसूली करण्याबाबत व त्यांचे नियम २१२ नुसार योग्य ते अभिलेखे व नोंदवह्या ठेवणे व विशेष योजनाबध्द मोहिमेचे आयोजन करुन सदर अग्रीमे वसूल करण्याबाबत पुढील प्रमाणे ठळक सूचना देण्यात आल्या जसे प्रलंबित अग्रिमाची वसुली नियमाप्रमाणे तात्काळ करावी, जे कर्मचारी बदलीने अन्यत्र बदलून जातात त्यांच्या प्रलंबित अग्रीमाची नोंद त्याच्या अंतिम वेतन प्रमाणपत्रामध्ये घेण्यात यावी, जे कर्मचारी/अधिकारी सेवानिवृत्त झाले त्यांची त्यांच्याकडील अग्रिमाची वसुली नियमाप्रमाणे करावी, जे कर्मचारी/अधिकारी मयत झाले त्यांचेकडून अग्रिम वसूली होणे शक्य नाही त्यांचेबाबत निर्लेखनाची कार्यवाही करावी, कार्यालय प्रमुखांनी जे अग्रिम दिले आहेत त्यांच्या कागदपत्रांचा शोध घेऊन समायोजनाची कार्यवाही करावी, वरील पैकी कार्यवाही करुनही वसुली होत नसल्यास संबंधितांचे मालमत्तेतुन वसुली नियमाप्रमाणे करण्याची कार्यवाही महसुल खात्यामार्फत करावी. म्हणजेच आर.आर.सी.द्वारे वसुलीची कार्यवाही करावी, अग्रीमांचे अभिलेख अद्ययावत व योग्य प्रकारे ठेवावे, एकदा अग्रीम दिले असल्यास त्याची वसुली झाल्याखेरीज दुसरे अग्रीम देवू नये.

**शासन परिपत्रक दिनांक १० डिसेंबर, २०१० रोजी निर्गमित करुनही संबंधितांकडून यासंदर्भात पालन केले जात नाही याबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करते. यासंदर्भात विभागाने वारंवार पाठपुरावा करुन लेखा आक्षेपातील व त्याशिवाय थकित असलेल्या शासनाच्या रकमांचा आढावा घ्यावा व अशा प्रकारचे अग्रिम थकीत राहू नयेत याकरीता विभागाने युध्द पातळीवर निश्चित कालबध्द कार्यक्रम हाती घ्यावा व थकित अथवा अग्रिम रकमा समायोजित/वसुल करण्याबाबत ठोस कार्यवाही करुन त्याची माहिती समितीस अवगत करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**सामान्यतः जिल्हा परिषदांमध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहितेच्या नियम २१० (ब) नुसार अग्रिम देता येतात. परंतू या अग्रिमांच्या बाबतीत अधिकतम मर्यादा व विषय समित्यांच्या पूर्व मंजूरीची आवश्यकता आहे. साक्षी दरम्यान अग्रिम मंजूर करण्यासंदर्भात मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या भुमिकेबाबत समाधानकारक खुलासा होवू शकला नाही. अत: अशा प्रकारची संदिग्धता जिल्हा परिषद स्तरावर निर्माण होवू नये याकरीता अग्रिमांची स्वतंत्र नियमावली तयार करण्याची आवश्यकता असल्याचे समितीला वाटते. त्याकरिता विभागाकडून अग्रिम देण्यासंदर्भात असलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे. यामध्ये काही संभ्रम असल्यास तो दूर करण्याकरीता लेखा संहितेतील उक्त नियमात आवश्यक ती सुधारणा तातडीने करावी तसेच विभागीय सचिवांनी आश्वासित केल्याप्रमाणे अग्रिमांच्या रकमा प्रदान करताना उक्त रक्कम संबंधित अधिकाऱ्यांच्या आधार कार्डाशी (UID क्रमांकाशी) अनिवार्यपणे संलग्न करण्याबाबतचा शासन निर्णय शिघ्रतेने निर्गमित करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, अमरावती

### एअर कॉम्प्रेसर वाटप योजनेचे खर्चातील अनियमितता

**(परिच्छेद ३.८२८/१४) (सन २००८-२००९)**

जिल्हा परिषद, अमरावती सन २००८-२००९ (परिच्छेद क्रमांक १४) समाज कल्याण विभागाने २० टक्के मागासवर्गीयांचे कल्याणार्थ रुपये १०,००,००० तरतुदी मधून रुपये ९,८८,६५० एवढे एअर कॉम्प्रेसर खरेदीवर खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) पुरवठा आदेशातील अटीनुसार ४५ दिवसाचे आत साहित्याचे पुरवठा करावयाचा असतांना साहित्य प्राप्त झाल्याचे चलानान्वये पंचायत समिती, मोर्शी येथे दिनांक १८.४.२००९ रोजी ९ नग एअर कॉम्प्रेसर उशिरा पुरविण्यात आल्यामुळे विलंब दंड रक्कम रु. ६८५ वसूल करणे आवश्यक होते.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-१०९३/प्र.क्र.१२३९/३४ दि.०१.०९.१९९३ **(परिशिष्ट ४.१)** अन्वये ज्या वर्षी साहित्य खरेदी केले. त्याच वर्षी वाटप करणे आवश्यक आहे. परंतु सन २००८-०९ मध्ये खरेदी केलेले साहित्य सन २००९-१० मध्ये वाटप केले आहे.

(३) सदर योजना सन २००८-०९ साठी असतांना लाभार्थीचे सन २००९-१० चे कागदपत्र घेतल्यामुळे योजनेचा लाभ पुढील वर्षी देण्यात आला आहे.

(४) लेखा परिक्षण कालावधी पावेतो ५ नग एअर कॉम्प्रेसर शिल्लक होते. त्यांची किंमत रुपये ७६,०५० गुंतून पडली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर आक्षेपाबाबत खालील प्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

(१) पुरवठा आदेश या कार्यालयाचे पत्र क्र. ३४६/०९ दि. २७-०२-२००९ अन्वये देण्यात आला होता. आदेशातील अट क्र.३ नुसार ४५ दिवसाचे आत मालाचा पुरवठा न केल्यास १/२ टक्के दंड प्रति आठवडा आकारण्यात जाईल असे नमूद केलेले असून त्याप्रमाणे पंचायत समिती मोर्शीला एअर कॉम्प्रेसर दि. १८-०४-२००९ रोजी ९ नग पुरवठा करण्यात आला. दिलेल्या आदेशानुसार ५ दिवसांचा विलंब झालेला असल्याने दंडाची रक्कम रुपये ६८४.५० *i.e.* रुपये ६८५/- दंड वसूल पात्र असून दंडाची रक्कम चलान क्र. २४३ दि. ३०/०९/२०१५ रुपये ६८५/- जिल्हा निधी मध्ये भरणा करण्यात आलेली आहे.

(२) निवड केलेले लाभार्थी हे ग्रामिण भागातील असून लाभार्थ्यांनी कागदपत्रे विहित कालावधीत पंचायत समिती मध्ये सादर न केल्यामुळे सन २००८-०९ मधील साहित्य सन २००९-१० या वित्तीय वर्षात वाटप करण्यात आलेले असून आजमितीस साठा निरंक आहे.

(३) निवड केलेले लाभार्थी हे ग्रामीण भागातील असून पंचायत समिती स्तरावरुन साहित्य घ्यावयाचे असल्याने लाभार्थ्यांनी विहित वेळेत कागदपत्रे सादर न केल्याने सन २००८-०९ मधील निवड केलेल्या लाभार्थ्यांना सन २००९-१० मध्ये लाभ देण्यात आला.

(४) लेखा परिक्षण कालावधीत शिल्लक असलेल्या ५ एअर कॉम्प्रेसरचे वितरण लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर वितरण करण्यात आले. पंचायत समिती स्तरावर साठा निरंक आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, एअर कॉम्प्रेसर वाटप योजनेअंतर्गत लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पुर्तता उशिराने केल्याने साहित्य वाटपास विलंब झाल्याचा खुलासा केला आहे. कागदपत्रांची पुर्तता नसताना लाभार्थ्यांची निवड कशाच्या आधारे करण्यात आली, तसेच ज्या लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली नाही अशा लाभार्थ्यांऐवजी अन्य लाभार्थ्यांची निवड का करण्यात आली नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी

यांनी समितीस विदित केले की, सन २००८-०९ मध्ये लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. परंतु, त्यांना सन २००९-१० मध्ये लाभ दिलेला आहे. यामध्ये विलंब झालेला आहे, हे खरे आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, अनेक जिल्हा परिषदांमध्ये वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या संदर्भात अडचणी निर्माण झालेल्या आहेत. कारण, पंचायत समिती मार्फत लाभार्थ्यांची यादी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येते. त्यानंतर समाज कल्याण विभागाकडून त्यास मान्यता घेण्यात येते व त्यानंतर प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी लाभार्थ्यांची यादी पंचायत समितीकडे पाठविण्यात येते. यामध्ये बराच कालावधी होत असल्याने अनेक वेळा त्याच वर्षात लाभार्थ्यांना प्रत्यक्ष योजनेचा लाभ देता येत नाही व वैयक्तिक लाभासाठीची साधन सामुग्री पंचायत समितीकडे तशीच पडून राहते. या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, लाभार्थ्यांची निवड सदस्यांकडून केली जाते. वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये लाभार्थी हिस्सा सुरुवातीला भरुन घेण्याची तरतूद आहे. परंतु, लाभार्थी आपला हिस्सा वेळेवर भरत नसल्यामुळे लाभार्थ्यांची अंतिम निवड करणे शक्य होत नाही. माहे नोव्हेंबर व डिसेंबर पर्यंत लाभार्थ्यांची यादी पूर्ण झाली पाहिजे आणि शेवटच्या तीन महिन्यात साहित्याची खरेदी करुन त्याचे वाटप झाले पाहिजे, असे अपेक्षित आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**एअर कॉम्प्रेसर वाटप योजनेचे खर्चातील अनियमितता :-**

समितीने भेटी दिलेल्या जिल्हा परिषदांमध्ये समितीच्या निदर्शनास आले की, वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. लाभार्थ्यांची निवड करणे व त्यास पंचायत समिती, जिल्हा परिषद यांची मान्यता घेणे इत्यादीमध्ये बराच कालापव्यय होतो. परिणामी, वैयक्तिक लाभार्थ्यांस वाटप करावयाच्या वस्तु गोदामामध्ये पडून राहतात अतः वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या अंमलबजावणी मधील त्रुटी काढून त्यात कार्यपध्दती विषयक कालानुरुप बदल करण्यासंदर्भात शासनाचे धोरण काय आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २००८-०९ या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाने २० टक्के मागासवर्गीयांचे कल्याणकारी योजनेकरीता रु.१०,००,००० रक्कम तरतूद करण्यात आली होती व जिल्हा परिषदेच्या मान्यतेनंतर रु.९,८८,६५० रक्कम एअर कॉम्प्रेसर खरेदीवर खर्च करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.झेडपीए-२०००/प्र.क्र.४१/३३ मंत्रालय, मुंबई दि. १७ जानेवारी, २००१ **(परिशिष्ट ४.२)** व शासन परिपत्रक क्र. झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९, दि. २० जून, २००८ **(परिशिष्ट ४.३)** अन्वये कालबध्द कार्यक्रम ठरवून दिलेला आहे. त्याप्रमाणे वेळापत्रकाचे पालन करुन लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. तथापि वेळापत्रकात नमूद पेक्षा विलंबाने कार्यवाही झाली असली तरी परिच्छेदात सर्व एअर कॉम्प्रेसरचे वाटप लाभार्थ्यांना झालेले आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/ वित्त-९, दि.२० जून, २००८ अधिक्रमित करुन जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी बाबत शासन परिपत्रक क्र. झेडपीए-२०१६/ प्र.क्र.९/वित्त-९ दि. १९ मे, २०१६ **(परिशिष्ट ४.४)** अन्वये नव्याने सूचना निर्गमित केल्या आहेत.

## चौकशी अहवाल

सन २००८-०९ या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाने २० टक्के मागासवर्गीयांचे कल्याणकारी योजना अंतर्गत एअर कॉम्प्रेसर पुरविणे योजनेकरीता रुपये १०,००,००० तरतुद करण्यात आली होती व जिल्हा परिषदच्या मान्यतेनंतर रु. ९,८८,६५० एअर कॉम्प्रेसर खरेदीवर खर्च करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.झेडपीए-२०००/प्र.क्र.४१/३३ मंत्रालय, मुंबई दि. १७ जानेवारी, २००१ अन्वये वेळापत्रक दिलेले आहे. त्या प्रमाणे वेळापत्रकाचे पालन करुन लाभार्थ्यांना लाभ देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. परंतु लाभार्थी स्तरावरुन होणारा विलंब यामुळे वेळापत्रकात नमुद पेक्षा विलंबाने कार्यवाही झाली आहे. परिच्छेदात नमुद सर्व एअर कॉम्प्रेसरचे वाटप लाभार्थ्यांना झालेले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, समितीने भेटी दिलेल्या जिल्हा परिषदांमध्ये समितीच्या निदर्शनास आले की, वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. लाभार्थ्यांची निवड करणे त्यास पंचायत समिती, जिल्हा परिषद यांची मान्यता घेणे इत्यादीमध्ये बराच कालापव्यय होतो. परिणामी वैयक्तिक लाभार्थ्यास वाटप करावयाच्या वस्तु गोदामामध्ये पडून राहतात. अतः वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या अंमलबजावणीमधील त्रुटी काढून त्यात कार्यपध्दती विषयक कालानुरुप बदल करण्यासंदर्भात शासनाचे काय धोरण आहे, याबाबत समितीस माहिती देण्यात यावी. यावर उप सचिव, ग्रामविकास यांनी समितीस माहिती दिली की, दिनांक १९ मे, २०१६ रोजी याबाबत नव्याने परिपत्रक निर्गमित करुन सूचना देण्यात आल्या आहेत.

समितीने पुढे विचारणा केली की, यामध्ये लाभार्थ्यांची निवड करुन सभागृहाची मंजूरी कधी घेतली जात नाही. प्रथम लाभार्थ्यांची मंजुरी झाली पाहिजे. ही प्रक्रिया कशा प्रकारे केली जाते याबाबत समितीस माहिती देण्यात यावी. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, विहित कालावधीमध्ये लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. यावर समितीने विचारणा केली की, आर्थिक वर्ष संपल्यानंतर या वस्तुचे वाटप कसे झाले व याबाबतचा अधिकार कोणाला आहे, ही योजना कोणत्या विभागामार्फत राबविण्यात आली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, सदर योजना समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात आली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हे सेस फंडाचे पैसे असतील. यासाठी वेगळा शासन निर्णय काढण्याची गरज नाही. विभागाने शासन निर्णय काढला ही बाब वेगळी, पूर्वीदेखील शासन निर्णय होता. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, यामध्ये लाभार्थ्याची निवड झाल्यानंतर त्यास दिनांक २१.०६.२००८ रोजी प्रशासकीय तांत्रिक मान्यता दिलेली आहे, त्यानंतर त्याची निविदा प्रसिध्द करण्यात आली ही सर्व प्रक्रिया वेळेत केलेली आहे. त्यानंतर निविदा स्विकारुन साहित्याच्या तपासणीकरीता ते शासकीय आय.टी.आय. यांच्याकडे पाठविले व त्यांचे आदेश आल्यानंतर साहित्य प्राप्त केले. त्यानंतर दिनांक ३० मार्च, २००९ रोजी देयक अदा करण्यात आले. यावर समितीने अशी विचारणा केली की, याचा पुरवठा आदेश कधी दिला होता, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, दिनांक २६ फेब्रुवारी, २००९ रोजी देण्यात आला होता, कारण साहित्य पुरवठयाची तांत्रिक तपासणी करणे आवश्यक होते. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हा पुरवठा करण्याची काही तरी मुदत असणार व ज्या आर्थिक वर्षात पुरवठा करणे आवश्यक होते, त्या आर्थिक वर्षामध्ये लाभार्थ्यांना लाभ मिळाला नाही. कारण दिनांक ३० मार्च, २००९ रोजी देयक अदा करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेला या प्रकरणी देयक अदा करण्याची खूप घाई असल्याचे दिसून येत आहे. ही समाजकल्याण विभागाची १०० टक्के अनुदानाची योजना असूनही त्याचा लाभार्थ्यांना लाभ का मिळाला नाही, समितीच्या मते त्या आर्थिक वर्षात पुरवठा झाला नाही तर केवळ कागद रंगविण्यात आले. १०० टक्के अनुदानाच्या योजनेचा लाभ मिळत नसेल तर ही गंभीर बाब आहे. जिल्हा परिषदेने केवळ देयक अदा केले आहे. लाभार्थ्यांना हा लाभ त्याच आर्थिक वर्षामध्ये मिळणे आवश्यक होते. जिल्हा परिषदेने एप्रिल महिन्यामध्ये साहित्य वाटप केले आहे, ही बाब आक्षेपार्ह आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वासित केले की, पुढे शासन निर्णयाप्रमाणे १०० टक्के वाटप करण्यात येईल. प्रकरण तपासले असुन याबाबत काटेकोरपणे दक्षता घेण्यात येईल व शासनाच्या नविन निर्णयाप्रमाणे लाभार्थ्यांना १०० टक्के वाटप करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, अमरावती समाज कल्याण विभागाने सन २००८-२००९ मध्ये २० टक्के मागासवर्गीयांचे कल्याणार्थ रु.१०,००,०००/- तरतुदीमधून रु. ९,८८,६५०/- एवढे एअर कॉम्प्रेसर खरेदीवर खर्च केला आहे. यासंदर्भात लेखा परीक्षकांनी शासन निर्णय दिनांक ०१.०९.१९९३ अन्वये ज्या वर्षी साहित्य खरेदी केले. त्याच वर्षी वाटप करणे आवश्यक आहे. परंतु सन २००८-०९ मध्ये खरेदी केलेले साहित्य सन २००९-१० मध्ये वाटप केले आहे हा प्रमुख आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेतलेला होता. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली त्यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या उत्पन्नाच्या किमान २०% रक्कमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी द्यावयाच्या योजना शासन निर्णय दिनांक २० ऑक्टोबर, १९९९

मधील तरतुदी तसेच परिपत्रके दिनांक १७ जानेवारी, २००१, दिनांक २० जून, २००८ व दिनांक १९ मे, २०१६ नुसार राबविताना लाभार्थीच्या वाटपा संदर्भात अडचणी निर्माण झाल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना अनेक अडचणी निर्माण होतात. लाभार्थ्यांची निवड करणे व त्यास पंचायत समिती, जिल्हा परिषद यांची मान्यता घेणे इत्यादीमध्ये बराच कालापव्यय होतो. परिणामी, वैयक्तिक लाभार्थ्यांस वाटप करावयाच्या वस्तु गोदामामध्ये पडून राहतात. अतः वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या अंमलबजावणीमधील त्रुटी काढून त्यात कार्यपध्दती विषयक कालानुरुप बदल करण्यासंदर्भात शासनाचे धोरण काय असावे यासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता सचिवांनी वैयक्तिक लाभाच्या योजनांकरीता वेळापत्रकाची अट काढून टाकली असल्याबाबत निदर्शनास आणले.

प्रस्तुत प्रकरणातील समाजकल्याण विभागाची एअर कॉम्प्रेसर वाटपाची योजना जिल्हा परिषदेच्या सेस फंडातील समाजकल्याण विभागाच्या २०% निधीतून राबविण्यात आली. सदरहू योजना दिनांक २० जून, २००८ रोजीच्या परिपत्रकातील वेळापत्रकाप्रमाणे राबविणे आवश्यक होते. सदर योजनेची प्रशासकीय तांत्रिक मान्यतेची तारीख ३१ सप्टेंबर, २००८ अशी आहे. वस्तुतः परिपत्रकाप्रमाणे ती ३१ ऑगस्ट पूर्वी देणे आवश्यक होते. याकरिता मुळात २ महिने उशीर झाला आहे. तद्नंतर लाभार्थीची निवड व निविदा प्रक्रियापूर्ण करुन खरेदीस सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता ३१ ऑक्टोबरच्या आत घेऊन ३० नोव्हेंबर पूर्वी पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना विभागाने एअर कॉम्प्रेसरचा पुरवठा आदेश ३ महिने विलंबाने दिला आहे. पुरवठा ४५ दिवसांच्या आत करणे बंधनकारक असताना तो दिनांक ३१ मार्च, २०१७ नंतर म्हणजेच सन २००९-२०१० या पुढच्या आर्थिक वर्षात पुरवठा झाल्यामुळे मालाचा पुरवठा व खर्च दिनांक ३१ मार्च, २००९ पूर्वी करण्याचे नियोजन करणे शक्य झाले नाही. प्रस्तुत प्रकरणात वेळापत्रकाचे पालन झाले नाही, तसेच दिनांक १ सप्टेंबर, १९९३ रोजीच्या शासन निर्णयातील ज्या आर्थिक वर्षात खरेदी केली त्याच वर्षात वाटप या तत्वाचे पालन झालेले नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी लाभार्थी स्तरावरुन विलंब झाला अशा सबबी सांगण्यात आल्या त्या समिती कदापि मान्य करणार नाही. कारण प्रस्तुत प्रकरणी बहुतांश लाभार्थ्यांच्या अर्जावर दिनांक टाकलेले नाहीत परंतू अर्जासोबत दिलेली कागदपत्रे जसे उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे ही सन २००९-१० या आर्थिक वर्षातील आहेत. याचा अर्थ समाजकल्याण विभागाने प्रस्तुत योजना नियमानुसार राबविलेली नाही. त्यासंदर्भात मंत्रालयीन स्तरावरुन चौकशी करण्याची आवश्यकता आहे. योजनेच्या अंमलबजावणीमध्ये पर्यवेक्षकीय पातळीवर देखील कर्तव्यात कसूर झालेली आहे. त्यामुळे मागासवर्गातील लाभार्थी लाभाच्या योजनेपासून वंचित राहिले आहेत. **योजनेची अंमलबजावणी सत्वर होऊन रक्कम अखर्चित राहणार नाही यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मासिक कृती कार्यक्रम तयार करुन त्याचा आढावा घेणे इत्यादी सर्व जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी व समाजकल्याण अधिकारी यांच्यावर दिनांक २० ऑक्टोबर, १९९९ च्या शासन निर्णयाद्वारे टाकलेली असतानाही त्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केलेली आहे. त्याचबरोबर शासनाचे पत्र दिनांक ५ जून, १९८९ अनुसार विभागीय सहाय्यक आयुक्त (विकास) यांच्यावर २०% रकमेच्या संनियंत्रणाची जबाबदारी असून ती त्यांनी देखील पार पाडली नसल्याचे प्रस्तुत प्रकरणाबाबत स्पष्ट होत आहे. अतः प्रस्तुत प्रकरणात सर्व तत्कालिन जबाबदार अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी करावी व जबाबदारी निश्चित करुन दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतर्गत कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, अमरावती

### असाध्य रोगाच्या रुग्णांना अर्थसहाय्य खर्चातील अनियमिततेबाबत

**(परिच्छेद ३.८३१/१७) (सन २००८-२००९)**

जिल्हा परिषद, अमरावती सन २००८-२००९ (परिच्छेद क्रमांक १७) समाजकल्याण विभागाने २० टक्के जिल्हा परिषद उपकरातून मागासवर्गीयांचे कल्याणार्थ कॅन्सर, किडनी, हृदयरोग इत्यादी असाध्य रोगांच्या रुग्णांना अर्थसहाय्य योजनेवर प्रति रुग्ण रुपये १० हजार प्रमाणे ३१ लाभार्थ्यांना एकूण ३ लाख १० हजार एवढा खर्च केलेला असून याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन ग्राम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक २ एफसी-२००६/प्र.क्र.४७९८/ वित्त-३, दि.१५.१२.२००६ परिपत्रक क्र. ४७७० दिनांक ०३.११.२००६ अन्वये जिल्हा परिषदचे अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांची समिती गठीत करुन असाध्य रोगाची निवड करायची असतांना अशी समिती गठीत केली नाही.

(२) वरील ३१ लाभार्थींच्या अर्जासोबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असताना तसे प्रमाणपत्र नसल्यामुळे तांत्रिक अटींचे पालन झाल्याची पडताळणी होणे आवश्यक आहे.

(३) लाभार्थ्यांना प्रत्येकी रुपये १० हजार लाभ मिळाल्याबाबत पोच पावत्या घेण्यात आलेल्या नाही.

(४) प्रशासकीय मान्यता असतांना खर्च रुपये ३ लक्ष १० हजार केल्याने जादा खर्च रुपये १० हजार झाला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर आक्षेपाबाबत खालील प्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

(१) असाध्य रोगांना अर्थसहाय्य योजना ही २० टक्के जिल्हा निधी अंतर्गत असल्यामुळे या योजनेच्या लाभार्थ्यांच्या निवड यादीला समाजकल्याण समितीची मंजुरी घेण्यात आली आहे. परंतु शासन निर्णयानुसार समिती गठीत केलेली नसल्याने संबंधितास या कार्यालयाचे पत्र क्र. २५४४ दि. ३०/९/२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(२) वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या आधारावर लाभ देण्यात आला. भविष्यात या बाबीची नोंद घेण्यात येईल.

(३) पोच पावत्या दप्तरी उपलब्ध आहे.

(४) सुधारीत अंदाजपत्रक सन २००८-०९ मध्ये तरतूद रुपये ३,१०,००० करण्यात आलेली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, असाध्य रोगाच्या रुग्णांना अर्थ सहाय्य योजनेअंतर्गत रोग्याची निवड करण्यासाठी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक दिनांक ३.११.२००६ नुसार एक समिती गठीत करावयाची आहे. ही कार्यवाही कोणत्या प्राधिकारात डावलण्यात आली, या अनियमिततेस कोण जबाबदार आहे, तसेच, या योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ देताना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची कार्यवाही का डावलण्यात आली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, समिती स्थापन करण्यात आली आहे. परंतु, समितीची मंजुरी घेतलेली नाही. त्यांनी परस्पर वाटप केलेले आहे, त्यासंबंधितांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. यावर समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) असाध्य रोगाच्या रुग्णांना अर्थसहाय्य योजने अंतर्गत रोगाची निवड करण्यासाठी महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक दिनांक ०३/११/२००६ नुसार एक समिती गठीत करावयाची आवश्यक होते. तसेच या योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ देताना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची कार्यवाही डावलण्यात आली असणे, यासंदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले ?

(२) असाध्य रोगाचे रुग्णांना अर्थसहाय्य योजना भविष्यात प्रभाविपणे अंमलात आणण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना अंमलात आणली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

समितीने दिलेल्या निर्देशाप्रमाणे चौकशी करण्यात आली असुन त्याबाबतचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

असाध्य रोगाचे रुग्णांना अर्थसहाय्य योजना अंतर्गत सन २००८-०९ मध्ये ३१ लाभार्थ्यांना प्रत्येकी रुपये १०,०००/- चा लाभ दिला आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक एल.एफ.सी-२००६/प्र.क्र.४७९८/वित्त-३ दिनांक १५/१२/२००६ व परिपत्रक क्रमांक एल.एफ.सी-२००६/प्र.क्र.४७७०/वित्त-३ दिनांक ०३/११/२००६ नुसार मा. अध्यक्ष जि.प.यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन समितीने त्यास मान्यता देणे आवश्यक होते. परंतु समितीची लाभार्थी यादीची मंजुरी घेण्यात आली नव्हती. या अनियमिततेसाठी श्री.शहाणे, तत्कालीन (प्रभारी) जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस दिली असता लाभार्थी पात्र असुन समितीची मान्यता न घेतल्याची चुक झाल्याचे मान्य केले असून संबंधित अधिकारी दिनांक ३१ डिसेंबर, २०१० ला सेवानिवृत्त झाले असल्याने व त्यांना सेवानिवृत्त होवून ४ वर्षाच्या वर कालावधी लोटल्याने सद्यस्थितीत त्यांची विभागीय चौकशी करता येत नाही. याप्रकरणी लाभ दिलेले सर्व लाभार्थी पात्र असल्याचे व त्यांना दिलेली रक्कम धनाकर्षाव्दारे दिल्याची उपलब्ध अभिलेख्यावरून खात्री करण्यात आलेली आहे. तसेच लाभार्थी यादीला दिनांक १३/०५/२०१६ ला उक्त शासन निर्णयात नमुद समितीची कार्योत्तर मंजुरी घेण्यात आलेली आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दुर्धर रोगाने पिडीत असलेल्या रुग्णांना जिल्हा परिषद स्वनिधी मधुन आर्थिक मदत देण्यासंबंधात ग्रामविकास विभागाच्या दिनांक ३ नोव्हेंबर, २००६ च्या परिपत्रकामधील सुचना स्वयंस्पष्ट आहेत.

**चौकशी अहवाल**

सन २००८-२००९ मध्ये २० टक्के जिल्हा परिषदसेस योजनेअंतर्गत असाध्य रोगाचे रूग्णांना अर्थ सहाय्य पुरविणे ही योजना जिल्हा परिषद, अमरावती मध्ये राबविण्यात आली. सदर योजना राबवितांना झालेल्या अनियमिततेबाबत मा.समिती प्रमुखांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे व्दि सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली. समिती मध्ये भाऊराव चव्हाण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी व अजित रामेकर, सहाय्यक लेखा अधिकारी यांना घेण्यात आले. त्याबाबत चौकशी अहवाल पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

सन २००८-०९ मध्ये असाध्य रोगांच्या रुग्णांना आर्थिक सहाय्य योजना २० टक्के जिल्हा परिषद वाढीव उपकरामधून राबविण्यात आली आहे. सदर योजनेवर सन २००८-०९ मध्ये रु.३ लक्ष मुळ तरतूद ठेवण्यात आली होती, त्यानुसार प्रशासकिय मान्यता घेण्यात आलेली आहे. सुधारित अंदाजपत्रकानुसार रक्कम रू.३,१०,०००/-इतका खर्च करण्यात आला आहे व ह्रदयरोग, कर्करोग व किडनी या रोगाकरिता एकूण ३१ लाभार्थीना सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग परिपत्रक क्र.२ एप्रिल २००६/प्र.क्र.४७९८/वित्त-३ दि.१५/१२/२००६ **(परिशिष्ट ५.१)** व परिपत्रक क्र. ४७७० दि.०३/११/२००६ नुसार जिल्हा परिषदेचे मा.अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांची समिती गठीत करून असाध्य रोगांचे रूग्णांची निवड करणे आवश्यक असतांना अशी समिती गठीत करून लाभार्थी निवड करण्यात आलेली नाही. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रमाणपत्र न घेता वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्रानुसार समाज कल्याण समितीची मंजूरी घेवून असाध्य रूग्णांना लाभ प्रदान केल्याचे दिसून येते. यामुळे शासन परिपत्रक क्रं. दि.१५/१२/२००६ चे उल्लंघन झालेले आहे.

असाध्य रोगाचे रूग्णाना आर्थिक सहाय्य प्रदान करतेवेळी लाभार्थीची पोच रजिष्टरला घेण्यात आली आहे. तसेच सुधारित अंदाजपत्रकानुसार सदर योजनेवर रक्कम रू.३,१०,०००/- खर्च करण्यात आला असून प्रशासकीय मान्यता रू.३,००,०००/- घेण्यात आली, परंतू सुधारित अंदाजपत्रकानुसार सदर योजनेस रू.३,१०,०००/- ची प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली नसल्याचे दिसून आले.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, असाध्य रोगाच्या रुग्णांना अर्थसहाय्य योजनेंतर्गत रोगाची निवड करण्यासाठी महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक दिनांक ०३.११.२००६ नुसार एक समिती गठीत करावयाची आवश्यकता होती. तसेच या योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ देताना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची कार्यवाही डावलण्यात आली असणे, यासंदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले, याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. सदर प्रकरणातील श्री.श्रीधर शहाणे, तत्कालीन (प्रभारी) जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे सेवानिवृत्त झाले आहेत व त्या प्रकरणास ४ वर्षे होऊन गेले आहेत. यामध्ये चूक झाल्याचे जिल्हा परिषदेने मान्य केले आहे. यावर समितीने या पुढील काळात दक्षता घेण्याचे निदेशित केले.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषद, अमरावती यांनी सन २००८-२००९ मध्ये २० टक्के जिल्हा परिषद उपकरातून मागासवर्गीयांचे कल्याणार्थ कॅन्सर, किडनी, हृदयरोग इत्यादी असाध्य रोगांचे रुग्णांना अर्थसहाय्य योजनेवर प्रति रुग्ण रुपये १० हजार प्रमाणे ३१ लाभार्थ्यांना एकूण ३ लाख १० हजार एवढा खर्च केला. परंतु त्यांनी शासन परिपत्रक दिनांक १५.१२.२००६ व परिपत्रक दिनांक ०३.११.२००६ अन्वये जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांची समिती गठीत करुन असाध्य रोगांची निवड करायची असतांना अशी समिती गठीत केली नाही हा आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला.

रुग्णांना अर्थसहाय्य देण्यापूर्वी रुग्णांची निवड करण्यासाठी व योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषद अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करणे आवश्यक होते. ज्यामध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा समावेश असणे आवश्यक होते. अशा प्राधिकृत समितीची मान्यता घेतलेली प्रस्तुत प्रकरणात दिसून येत नाही असा आक्षेप लेखा परीक्षकांनी घेतलेला असूनही दोषी अधिकारी निवृत्त होऊन पाच वर्षांनी समितीने अमरावती जिल्हा परिषदेला भेट देईपर्यंत त्यांच्यावर कारणे दाखवा नोटीस देखील प्रशासनाने बजावलेली नाही, याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करते.

**लेखा आक्षेपांचे अनुपालन वेळच्या वेळी होणे आवश्यक आहे. लेखा परिक्षणाचे वेळी लाभार्थ्यांना प्रत्येकी दहा हजार रुपये मिळाल्याबाबतच्या पोच पावत्या उपलब्ध नसणे हे अनाकलनीय आहे. जेव्हा लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ दिला तेव्हा त्यांचे नावे पैसे दिले असल्यास तशा पावत्या उपलब्ध नसणे यात शंका घेण्यास वाव आहे. त्यातही तत्कालिन जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधितांवर कारवाई करण्यास दिरंगाई केली. लेखा आक्षेपात बाब उपस्थित होऊनही संबंधितांवर वेळीच कारवाई न होणे हा प्रशासकीय गलथानपणा व दोषी अधिकाऱ्यांना मुक्त करण्याचा प्रकार अशोभनीय आहे. एकंदरच या प्रकरणी समिती खेद व्यक्त करीत असून तत्कालिन अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांचेवर जबाबदारी निश्चित करणे समितीला आवश्यक वाटते. भविष्यात अशा प्रकारे ढिसाळपणा होऊ नये याची जिल्हा परिषदेने दखल घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, अमरावती

### वलगाव येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चे बांधकामातील अनियमितता

**(परिच्छेद ३.२२९/४८) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद, अमरावती सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक ४८) याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

(१) निविदा व अटी व शर्तीनुसार कार्यारंभ आदेश पारीत झाल्यानंतर संबंधीत कंत्राटदाराकडून सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांचे परिपत्रक क्र. कस४/(४)/१०६१, दि. १२/३/२०१० व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. ZPA-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९, दि. २०/६/२००८ नुसार बांधकामाचा नियोजित कार्यक्रम प्राप्त करणे गरजेचे असताना कार्यक्रम पत्र विभागाने प्राप्त करुन घेतले नसल्याचे दिसून येते.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय सिमेंट २००९/प्र.क्र. ११४/जल, दि.२०/४/२०११ **(परिशिष्ट ६.१)** नुसार बांधकामाकरिता वापरण्यात येणा-या सिमेंटबाबत निकष नमूद केलेले असतांना त्याप्रमाणेच सिमेंट वापरल्या गेल्याबाबत अधिकृत दस्ताऐवज आढळून आले नाही.

(३) गौण खनिज कपातीच्या रकमा शासनास भरणा केल्याबाबतचे अधिकृत दस्तऐवज सादर करण्यात आलेले नाही. सदरहू दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.

(४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.cat १०९७/६९३/ इमारती/२/ दि.२७/०१/२००४ नुसार चालू कामाच्या निविदेत विद्युतीकरणाचा समावेश करण्यात आलेला नसल्यामुळे एकाच ठिकाणच्या सलग असलेल्या कामाचे तुकडे पाडण्यात आले आहे, त्यान्वये महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय ZPA-१०९९ / प्र.क्र २०८९/ भाग २ /३३/ दि.१७/०७/२००० च्या आदेशाप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

(५) महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-२०१०/ प्र.क्र. २९१/ पदूम-४, दि.३०/०८/२०१० ला अनुसरून वरील काम प्रस्तावित केल्याबाबतचे अधिकृत दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेले नाही.

(६) संदर्भीय काम ३०/०५/२०११ रोजी पुर्ण झालेले असतांना मात्र वापरातील साहित्य चाचणी व तपासणी करिता प्रयोग शाळेत चाचणी फी चा भरणा दि.२७/०१/२०१२ रोजी केलेला आहे. काम पुर्ण झाल्यावर ८ महिने विलंबाने चाचणी केल्याने बांधकामाची गुणवत्ता व दर्जाबाबत दखल घेण्यात आलेली नाही.

(७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ११४, १५३ व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४ चे नियम २६४ नुसार वाढीव बांधकामे जादा खर्च व त्या संबंधात अंगिकारावयाची कार्यपध्दती नमूद असतांना रक्कम रूपये १,०१,८९१ च्या जादा खर्चाबाबत सक्षम प्राधिकारी यांची मंजूरीचे दस्तऐवज सादर करण्यात आलेले नाही. रक्कम वसूली  होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक २०११/ प्र.क्र.१८,दि.१६/०३/२०११ नुसार लेखापरीक्षेस अभिलेख उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना सुध्दा मोजमाप पुस्तिका, प्रथम व व्दितीय धावते देयक लेखापरिक्षेस उपलब्ध झाले नसल्याचे दिसून येते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) कंत्राटदाराने वलगाव येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकामाबाबत नियोजन कार्यक्रम प्राप्त केला असून अनुपालनार्थ सोबत जोडण्यात आला आहे.

(२) बांधकामातील वापरण्यात आलेले सिमेंट ओ.पी.सी. ग्रेड ४३ चे असून सिमेंट कॉंक्रीट क्युबची चाचणी अहवाल योग्य असून अनुपालनार्थ सोबत जोडण्यात येत आहे.

(३) मोजमाप पुस्तक क्र. ७६७९ व पान क्र.५५ नुसार ३०३.५३ घ.मी. पान क्र.७३ वरील ४२.४५ घ.मी. अशी एकूण ३८५.९८ घ.मी. चे गौण खनिज वाहतूक परवाना देयकासोबत जोडले आहे. पान क्र. ९२ वर ५०.१४ घ.मी. गौण खनिजाची रुपये ३५.३४ प्रमाणे एकूण १७७२ रुपये देयकातून वसुली केली आहे.

(४) सदर काम रूपये १४.९९ लक्ष चे असल्याने या कामाचे निविदामध्ये विद्युती करणाचा समावेश करण्यात आला नाही. या कामावर रुपये १४.७२ लक्ष खर्च झाला असून मुळ तांत्रिक मंजुरी पेक्षा जास्त नाही.

(५) सदर कामाला पसवि/पविअ/११९ दि.१३/०१/२०१०, रोजी प्रशासकीय मंजुरी दिली नाही.

(६) बांधकाम सुरू असतांना साहित्याची चाचणी करीता नमुने व चाचणी फी उशीरा प्रयोगशाळेत सादर केले. साहित्याचे चाचणी अहवाल योग्य असून अनुपालनार्थ सोबत जोडले आहे.

(७) वलगाव येथील पशु वैद्यकीय दवाखानाचे अंदाजित रक्कम रूपये १४.९९ लक्ष आहे. अनुसुची ब ची किंमत १३.७१ लक्ष आहे व या कामावर एकूण १४,७२,९१२ एवढा खर्च झालेला आहे. त्यामुळे खर्च अदांजपत्रका पेक्षा कमी आहे. मोजमाप पुस्तके क्र.७६७९ चे झेरॉक्स प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक २०/०६/२००८ व सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दिनांक १२/०३/२०१० नुसार कोणत्याही बांधकामाचे नियोजित कार्यक्रम प्रथमतः उपलब्ध करुन घेऊन त्यानुसार काम करणे बंधनकारक असताना असा नियोजित कार्यक्रम का उपलब्ध करुन घेतला नाही, या कामासाठी वापरण्यात आलेल्या सिमेंटचा गुणवत्ता चाचणी अहवाल कोणत्या दिनांकास प्राप्त झाला, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस माहिती दिली की, नियोजित कार्यक्रम सादर करण्यात आला होता. चाचणी अहवालाची तारीख २७ जानेवारी, २०१२ आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की,सदरहू काम दिनांक ३० मे, २०११ रोजी पूर्ण झाले आहे काय, त्यासाठी वापरण्यात आलेल्या सिमेंटचा गुणवत्ता चाचणी अहवाल कोणत्या दिनांकास प्राप्त झाला, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी होकारार्थी उत्तर दिले, समितीने पुढे अशी विचारणा केली की, चाचणी अहवाल नंतर कसा आला, सदरहू दवाखान्याचे काम दिनांक ३०.०५.२०११ रोजी पूर्ण झाले आणि चाचणी अहवालाची तारीख काम पूर्ण झाल्यानंतरची म्हणजेच २७.०१.२०१२ ही आहे. आठ महिन्यानंतर चाचणी अहवाल कशासाठी करण्यात आला, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी होकारार्थी उत्तर दिले, वास्तविक पहाता बांधकाम पूर्ण होण्यापूर्वी चाचणी अहवाल घेणे आवश्यक होते. परंतु त्यावेळी चाचणी अहवाल न घेण्यास त्यावेळचे संबंधित अधिकारी आणि कर्मचारी जबाबदार आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्यांचे अंतिम देयक अदा झाले आहे काय, अंतिम देयक अदा कसे काय करण्यात आले, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस माहिती दिली की, होय, दिनांक ३०.०५.२०११ रोजी अंतिम देयक अदा झाले आहे. या प्रकरणी चूक झाली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, फी केव्हा भरण्यात आलेली आहे, या प्रश्नावर जिल्हापरिषदेकडून काहीही उत्तर प्राप्त झाले नाही. समितीने याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सॅम्पल आणि पैसे केव्हा भरण्यात आलेले आहेत, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस माहिती दिली की, सॅम्पल आणि पैसे दिनांक २५.०५.२०११ रोजी भरण्यात आले होते. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, कार्यकारी अभियंता (बांधकाम) हे योग्य उत्तर देत नाहीत. २०१२ मध्ये काम पूर्ण झाले असून त्याचे पेमेंट २०११ मध्ये करण्यात आले आणि दिनांक २५.०५.२०११ रोजी सॅम्पल आणि फीचा भरणा केलेला आहे. म्हणजेच पाच दिवस अगोदर फी भरलेली आहे. याचाच अर्थ त्यांना कामाच्या दर्जा विषयी काहीच देणेघेणे नव्हते, हेच यातून स्पष्ट होते ही अत्यंत गंभीर बाब आहे. समितीने सीसी ची तारीख तपासून घ्यावी अशी सूचना केल्यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस सीसी ची तारीख तपासून घेतो असे विदीत केल्यावर समितीने नापसंती व्यक्त केली.

समितीने पुढे असे विचारले की, सीसी त्याच तारखेची आहे काय, यामध्ये खाडाखोड दिसत आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, काम पूर्ण झाल्यानंतर चाचणी अहवाल घेण्यात आला आणि काम पूर्ण होण्यापूर्वीच पेमेंट करण्यात आले. त्यावेळी कोण अधिकारी होते, असे विचारले असता, संबंधित अधिकारी सेवानिवृत्त झाले, असे उत्तर देण्यात आले. एखाद्या प्रकरणात अनियमितता करणारा अधिकारी सेवानिवृत्त झाला असला तरी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे त्याच्यावर कारवाई करता येते. या प्रकरणामध्ये करण्यात आलेल्या अनियमिततेची तत्कालीन कार्यकारी अभियंता, उप अभियंता व सेवानिवृत्त झालेला अधिकारी यांची चौकशी करण्यात यावी व त्याचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. या प्रकरणाची विभागीय चौकशी करण्यात यावी व त्याचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

चाचणी अहवालाकरिता प्रत्येक जिल्ह्याला प्रयोग शाळा असणे आवश्यक आहे. १५ दिवसात चाचणी अहवाल यायला पाहिजे. परंतु त्यास विलंब होतो. ही बाब देखील समितीच्या निदर्शनास आली आहे. या प्रकरणामध्ये अहवालाची प्रतिक्षा न करता रक्कम देण्यात आलेली आहे. कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी सुरुवातीला सांगितले की, ९०% पेमेंट करुन १०% पेमेंट रोखून ठेवण्यात येतात. परंतु ९०% पेमेंट केव्हा करायचे त्याचे निकष ठरविण्यात आलेले आहेत. केलेले पेमेंट नियमाला धरुन केलेले नाही. शासन निर्णयामध्ये कामाचे ९० टक्के पेमेंट करण्यासंबंधी निकष दिलेले आहेत, त्यानुसार कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. परंतु शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कामाचे पेमेंट केलेले नसल्यामुळे या प्रकरणी विभागीय चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल समितीकडे पाठवावा असे निदेश समितीने दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, या कालावधीत कार्यरत असलेल्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नावे काय आहेत, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, अमरावती जिल्हा परिषदेत दिनांक १/४/२०११ ते १/८/२०११ या कालावधीत श्री.ओमप्रकाश बकोरिया आणि दिनांक २/८/२०११ ते २१/३/२०१२ या कालावधीत श्री.आनंद जगताप, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, या प्रकरणी मोठी अनियमितता झाली आहे. तत्कालीन अधिकाऱ्यांनी गंभीर स्वरुपाची चूक केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना चौकशी करण्याचे व त्यानंतर कारवाई करण्याचे अधिकार आहेत. प्रत्येक विभागात संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, विभाग प्रमुख काम करीत असल्यामुळे त्यांची मुख्य जबाबदारी असते. परंतु अशा प्रकारची चूक निदर्शनास आल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सुध्दा तेवढीच जबाबदारी असते. दिनांक ३० मे २०११ संबंधित दवाखान्याचे काम पूर्ण झाले. परंतु ८ महिन्यानंतर दिनांक २७ जानेवारी, २०१२ रोजी कामाकरिता वापरण्यात आलेल्या साहित्याचे नमुने गुणवत्ता तपासणीकरिता पाठविण्यात आले. याचा अर्थ सदर काम कशा पध्दतीने पूर्ण केलेले आहे, हे दिसून येते. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करावा. साहित्य गुणवत्ता फी भरण्याकरिता दिनांक २५ मे, २०११ रोजी पत्र दिलेले आहे याचा अर्थ लेखी स्पष्टीकरणात फी भरणाच्या संदर्भात दिलेली २७ जानेवारी, २०१२ ही तारीख चुकीची आहे. ही बाब तपासून घेण्याची समितीने सूचना केली असता कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीला कबुल केले की, या संदर्भात चूक झाली आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक २८/६/२००८ व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक १२/३/२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार कोणत्याही बांधकामाचे नियोजित कार्यक्रम सर्वप्रथम उपलब्ध करुन घेऊन त्यानुसार काम करणे आवश्यक होते. तथापि, वलगांव पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चे बांधकाम दिनांक ३०/५/२०११ रोजी पूर्ण झाल्यानंतर, दिनांक २७/१/२०१२ रोजी म्हणजेच सुमारे ८ महिन्यांच्या विलंबानंतर चाचणी अहवाल सादर करण्यात येणे, इत्यादी झालेल्या अनियमितते संदर्भात तत्कालिन कार्यकारी अभियंता, उप अभियंता तसेच सेवानिवृत्त अधिकारी यांची समितीच्या निदेशानुसार विभागीय चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यानुसार त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा. समिती प्रमुख पंचायती राज समिती यांनी दिलेल्या निर्देशानुसार कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, अमरावती यांचे स्तरावर चौकशी करण्यात आली असून, याप्रकरणी चौकशी अहवालानुसार तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.पी.जी. भागवत, यांचेद्वारा समितीस चुकीची माहिती दिली असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्या अनुषंगाने श्री. पी.जी. भागवत, तत्कालीन कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, अमरावती यांचेवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याबाबतचा अहवाल दिनांक १८.५.२०१६ च्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** सार्वजनिक बांधकाम विभागाने अभिप्राय दिलेले आहेत.

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय :-** श्री. पी. जी. भागवत, कार्यकारी अभियंता (से.नि.) यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव (त्रुटींच्या पुर्ततेसह) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिनांक १८.०२.२०१७ च्या पत्रान्वये या विभागास सादर केला. या अनुषंगाने पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ मधील नियम २७ च्या पोटनियम (२) (बी) (एक) नुसार अपचारी अधिकारी, श्री.पी.जी.भागवत, कार्यकारी अभियंता (से.नि.) यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ खाली दिनांक १७.०५.२०१७ च्या ज्ञापनान्वये दोषारोप बजावून विभागीय चौकशी कार्यान्वित करण्यात आली आहे.

## चौकशी अहवाल

**वलगांव येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चे बांधकामातील अनियमितता.**

सदर काम सन २००९-१० या आर्थिक वर्षात २४०३ पशुसंवर्धन १०१ पशुवैद्यकिय सेवा व पशु आरोग्य या लेखाशिर्षाअंतर्गत मंजूर असून सदर कामास मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पत्र क्र./११९/२००९-२०१० दिनांक १३.१.२०१० अन्वये रक्कम रुपये १६,४८,०००/- प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्याअनुषंगाने सदर कामास कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, अमरावती यांनी क्र. ७२०/२००९-१०/ रु.१४,९९,१००/- तांत्रिक मंजुरी दिलेली आहे. सदर कामाचा करारनामा क्र. ब-१/२४३, दि.७.१२.२०१० ,अन्वये जा.क्र.७८४६ दि. ७.१२.२०१० अन्वये कार्यारंभ आदेश संबंधित कंत्राटदारास निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर कामाचे गुणवत्ता चाचणी बाबत संबंधित उपविभागामार्फत पत्र क्र. ३९२, दिनांक २५.५.२०११ अन्वये संबंधित कंत्राटदारास प्रयोग शाळेला अहवाल सादर करण्यास्तव देण्यात आलेले होते. परंतु संबंधित कंत्राटदाराने चाचणी शुल्काचा भरणा दिनांक २७.१.२०१२ ला केलेला आहे. त्या अनुषंगाने सदर कामाचे प्रयोग शाळेकडून दिनांक २७.३.२०१२ ला गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त झालेले आहेत सदर कामाचे गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर (दि. ३०.३.२०१२) सदर कामाचे अंतिम देयक प्रदान करण्यात आलेले आहे.

सदर कामाची मोजमापे नोंदविण्यात आलेली मोजमाप पुस्तिका क्रमांक ७७८२ ची पडताळणी केल्यानंतर अंतिम बाबीच्या मोजमापाची (काम पुर्णत्वाचे) दिनांक ३०.५.२०११ असल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने नमुना क्र.६५ वर दर्शविण्यात आलेली दि. ३०.५.२०११ ही योग्य तारीख असल्याचे दिसून येते. सदर इमारत सद्य:स्थितीत उपभोक्ता विभागास हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. याप्रकरणी उपलब्ध दस्ताऐवजावरुन कोणतीही अनियमितता झालेली नाही. तथापि सदर कामाचे गुणवत्ता चाचणी बाबत संबंधित उपविभागामार्फत पत्र क्र. ३९२/दि. २५.५.२०११ अन्वये संबंधित कंत्राटदारास प्रयोग शाळेत अहवाल सादर करण्यास्तव देण्यात आलेले होते. प्रत्यक्ष साक्षीचे दरम्यान श्री.पी.जी.भागवत, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी चाचणी शुल्काचा भरणा दिनांक २५.५.२०११ रोजी केल्याचे सांगितले. परंतु संबंधित कंत्राटदाराने चाचणी शुल्काचा भरणा दिनांक २७.१.२०१२ ला केलेला आहे. त्यामुळे साक्षी दरम्यान सांगण्यात आलेल्या दिनांकामध्ये तफावत असल्याचे दिसून येते. पर्यायाने श्री.पी.जी.भागवत, कार्यकारी अभियंता यांनी समितीला चुकीची माहिती दिलेली असल्याचे निदर्शनास येते. त्या अनुषंगाने श्री.पी.जी.भागवत, तत्कालीन कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, अमरावती यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., अमरावती यांचे पत्र क्र.६३३१, दिनांक १८/५/२०१६ अन्वये प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक २८ जून, २००८ व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक १२ मार्च, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार कोणत्याही बांधकामाचे नियोजित कार्यक्रम सर्व प्रथम उपलब्ध करुन घेऊन त्यानुसार बांधकाम करणे आवश्यक होते. तथापि वलगांव पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी -२ चे बांधकाम दिनांक ३० मे, २०११ रोजी पूर्ण झाल्यानंतर

दिनांक २७ जानेवारी, २०१२ रोजी म्हणजेच सुमारे ८ महिन्यांच्या विलंबानंतर चाचणी अहवाल सादर करण्यात येणे, इत्यादी झालेल्या अनियमिततेसंदर्भात तत्कालिन कार्यकारी अभियंता, उप अभियंता तसेच सेवानिवृत्त अधिकारी यांची समितीच्या निदेशानुसार विभागीय चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यानुसार त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली, सदर प्रकरण सन २०११ मधील आहे. यासंदर्भात २०१५ साली समिती गठीत करण्यात आली होती. जिल्हा परिषदेच्या माहितीनुसार २०१५ साली विभागीय चौकशी करण्यात आली आहे. समिती आल्यानंतर तात्काळ कारवाई करायला पाहिजे होती, परंतु २०१७ मध्ये कारवाई करण्यामध्ये नेमके कोण दोषी आहेत, तसेच विलंबाची कारणे काय आहेत, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, यामध्ये दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ रोजी अहवाल प्राप्त झाला होता. या प्रकरणी दोन वर्षे लागायला नको होते, परंतु संबंधित अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत व कार्यकारी अभियंता हे पद वर्ग एक असल्यामुळे या कामी थोडा विलंब झाला असावा. याबाबतची सविस्तर माहिती ग्रामविकास विभागातर्फे समितीला सादर करण्यात येईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर अधिकारी हे सेवानिवृत्त झाले आहेत. हे प्रकरण एवढे जुने असताना २ वर्षे कारवाई करण्यास विलंब करण्याची कारणे काय आहेत. या समितीच्या प्रश्नावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, याबाबतचा सविस्तर अहवाल प्राप्त झाला होता. त्यानंतर त्यांची विभागीय चौकशी सुरू केली. हे प्रकरण सन २०११ मधील असून सन २०१५ मध्ये यासाठी समिती गठीत केली व त्याबाबत विभागीय चौकशी सध्या सुरू आहे. संबंधित अधिकारी सेवानिवृत्त झाले त्याचा विभागीय चौकशीवर काहीही परिणाम होणार नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सुमारे ८ महिन्यांच्या विलंबानंतर चाचणी अहवाल सादर करण्यात आला. त्यामध्ये काय दोष आहेत हे समितीला माहिती नाही. सचिवांनी दोषारोपपत्र सादर केले. ज्याच्यावर कारवाई करायची आहे त्याच्याबद्दल प्राथमिक अहवालामध्ये त्याच्या कामामध्ये अनियमितता आढळून आली म्हणून तो अधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याचे सर्व सेवानिवृत्तीचे लाभ थांबविले का, हा पशुवैद्यकीय दवाखाना बांधताना कोणती अनियमितता आढळून आली व त्याबाबत कोणते आरोप आहेत, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, विभागीय चौकशी सरू केल्यानंतर नियमानुसार जे काही करणे आवश्यक आहे ते केले आहे, सर्वात मोठा आक्षेप म्हणजे त्यांनी आठ महिन्यांच्या विलंबानंतर चाचणी अहवाल सादर केला. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, कोणतेही बांधकाम करीत असताना त्याची चाचणी किंवा लेखापरीक्षण झाले पाहिजे. या प्रकरणामध्ये ही सर्व प्रक्रिया न करता मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे व त्यामुळे हे चुकीचे काम झालेले आहे. अगोदर बांधकामाच्या साहित्याची चाचणी करुनच बांधकाम झाले पाहिजे, अशा सूचना ग्रामविकास विभागामार्फत दिल्या जात नाहीत का, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ही बाब नियमाप्रमाणे नव्हती म्हणूनच त्यांच्यावर कारवाई सुरू केलेली आहे. हे काम नियमाला धरुन नसल्यामुळे त्याबाबत दोषारोप आहेत. याबाबत संबंधित अधिकाऱ्याचे बचावाचे निवेदन आलेले आहे. त्यांची विभागीय चौकशी होऊन अंतिमतः त्यांना कोणत्या प्रकारची शिक्षा करायची किंवा नाही याबाबतचा अहवाल सादर करण्यात येईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, विभागीय चौकशी ही कोणत्या परिस्थितीत सुरु केली जाते, विभागीय चौकशी करुनही संबंधित अधिकाऱ्याला मोकळे सोडण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याला आहेत. विभागीय चौकशीचा निकाल संबंधित अधिकाऱ्याच्या विरोधात गेला तरीही सक्षम प्राधिकारी त्याला वाचवू शकतो असे आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, जर काही गंभीर शिक्षा करायची असेल तर विभागीय चौकशी सुरु केली जाते, कोणालाही शिक्षा करण्यापूर्वी विभागीय चौकशी करावीच लागते. यावर समितीने अशी विचारणा केली की, विभागीय चौकशी झाल्यानंतर जो निर्णय होतो त्यावर कार्यवाही करायची किंवा नाही हे सक्षम प्राधिकारी ठरवितात. विभागीय सचिव समितीसमोर शासन म्हणून उत्तर देत असतात. सदर अधिका-याची विभागीय चौकशी करणे अपेक्षित होते काय, विभागीय सचिव, विभागीय चौकशी करीत आहेत याचा अर्थ त्यांच्या विरोधातील पुरावे सापडले आहेत. असे असतानाही त्यांना देय असलेले इतर लाभ का थांबविले नाही. याबाबतची कार्यवाही तात्काळ व्हावयास हवी होती. याबाबत सर्व माहिती असताना या प्रक्रिया तात्काळ करणे आवश्यक असतानाही याला विलंब झाला. सदर अधिका-याला पाठीशी घालण्याचे किंवा वाचविण्याचे काम होता कामा नये. या प्रकरणी कुठलीही कारवाई झाली नाही किंवा त्यांना देय असलेले इतर लाभ रोखले गेले नाहीत. तसेच समितीने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे असमाधानकारक आहेत. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की,एखाद्या अधिकाऱ्यावर विभागीय चौकशी सुरू केल्यानंतर तो सेवानिवृत्त होत असेल तर त्याच्या

निवृत्तीवेतनाबाबत नियमानुसार जी कार्यवाही असेल ती करण्यात येईल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, नियमानुसार ही सर्व कार्यवाही करण्यासाठी किती दिवसांचा कालावधी आवश्यक आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, ६ महिन्याच्या आत विभागीय चौकशी करणे अपेक्षित आहे. सदरहू प्रकरणी देखील सहा महिन्यांच्या आत विभागीय चौकशी शेवटच्या स्तरावर नेण्यात येईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, तपासणी अहवालामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाले का, या कामाकरिता वापरलेले साहित्य चांगले होते असे शासनामार्फत सांगण्यात येते का, विभागीय चौकशी सुरू केलेली आहे. मात्र खरे तर त्यांचे निवृत्तीवेतन थांबवावयास हवे होते. त्यांच्याकडून वसुली करावयाची असल्यास ती कशाच्या आधारे केली जाणार आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अधिक निधीचा वापर केलेला नाही, चाचणी अहवाल आधी प्राप्त व्हावयास हवा होता. चाचणी अहवाल पॉझिटीव्ह आहे. प्राथमिक चौकशीमध्ये असे आढळून आले आहे की, सदर साहित्य बांधकामाच्या जागी नव्हते. तसेच चाचणी अहवाल उशिरा प्राप्त झाला. चाचणी अहवाल चुकीचा असता तरी शासन काही करु शकले नसते, हा अहवाल पॉझिटीव्ह असून तो उशिरा प्राप्त झालेला आहे.

समितीने अशी विचारणा केली की, इमारतीचे आर्युमान किती वर्षे असते. यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) विभाग यांनी समितीस विदित केले की, आरसीसी इमारतीचे आयुष्य ५० वर्षे असते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, ज्या प्रयोगशाळेमधील प्रमाणपत्र सादर केलेले आहे. ती बंद असून केवळ तेथून प्रमाणपत्र दिले जाते. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सदर प्रकरणात अशी वस्तुस्थिती समोर आलेली नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्यांची विभागीय चौकशी पूर्ण होईपर्यंत निवृत्तीवेतन का थांबविण्यात आले नाही, चाचणी अहवाल त्याच मटेरियलचा होता किंवा ते सबस्टँडर्ड मटेरियल नव्हते समितीला जे रेकॉर्डवर दिसत आहे तेच समिती सांगू शकते. ज्या दिवशी वर्क ऑर्डर देण्यात आली. तेव्हा कामगारांचा विमा काढण्यात आला नाही. बिल काढताना चेक तयार करून तो देण्यात आला. या ठिकाणी अनियमितता दिसून येत आहे. साईटचे मटेरियलचे योग्य प्रकारे टेस्टींग झालेले नाही. चौकशी देखील बऱ्याच वर्षांपासून सुरू आहे. टाईम बाऊंड कालावधीत चौकशी पूर्ण झाली पाहिजे. गेल्या ५ वर्षांपासून चौकशी सुरू आहे. कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. ही चौकशी पूर्ण करण्यास एवढा कालावधी का लागला याचा अहवाल एक महिन्यात पूर्ण करावा असे समितीचे निदेश आहेत. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला आश्वासित केले की, लवकरात लवकर कार्यवाही करण्याचा प्रयत्न करून ६ महिन्यांच्या कालावधीत विभागीय चौकशी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. यावर समितीने सहमती दर्शविली.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत वलगांव ता.अमरावती येथे श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दवाखाना बांधकामासंदर्भात लेखा परिक्षकांनी प्रामुख्याने निविदा व अटी शर्तीनुसार कार्यारंभ आदेश पारीत झाल्यानंतर बांधकामाचा नियोजित कार्यक्रम प्राप्त करणे गरजेचे असताना कार्यक्रम पत्र विभागाने प्राप्त करून घेतले नाही, सिमेंटबाबत निकषानुसार अधिकृत दस्ताऐवज आढळून आले नाही, गौण खनिज कपातीचे दस्तऐवज सादर करण्यात आलेले नाही, सलग असलेल्या कामाचे तुकडे पाडण्यात आले, तसेच  वापरातील साहित्याच्या चाचणी व तपासणीबाबत आक्षेप उपस्थित केलेले होते. जिल्हा परिषदेने साक्षीच्या वेळी सादर केलेल्या माहितीमध्ये बांधकामाबाबत नियोजन कार्यक्रम प्राप्त केला असून सिमेंट कॉंक्रीट क्युबचा चाचणी अहवाल योग्य असल्याचे तसेच गौण खनिज वाहतूक परवाना देयकासोबत जोडला असून प्रयोगशाळेत सादर केलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल योग्य असल्याचा लेखी खुलासा समितीस प्राप्त झाला.

सदरहू प्रकरणामध्ये काम सुरू करण्यापूर्वी बांधकामाच्या साहित्याची चाचणी प्रयोगशाळेतून करणे आवश्यक होते. परंतू सदरहू चाचणी काम पूर्ण झाल्यावर आठ महिन्यांनी केल्याचे समितीला आढळून आले. जरी चाचणीचा अहवाल गुणवत्तेचा आला असला तरी चाचणी नियमानुसार वेळेवर घेणे आवश्यक होते ती झालेली नाही ही मोठी अनियमितता प्रस्तुत प्रकरणात समितीला आढळून आलेली होती. यासंदर्भात संबंधितांची चौकशी करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्याचे समितीने निदेश दिलेले होते. समितीच्या निदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी कर्मचारी/अधिकाऱ्यांनी समितीला चौकशी अहवाल सादर केला. सदरहू अहवालात तत्कालिन कार्यकारी अभियंता, श्री. पी. जी. भागवत यांनी प्रत्यक्ष साक्षीचे वेळी समितीला चाचणी शुल्क भरणा केल्याची तारीख २५ मे, २०११ अशी खोटी माहिती समितीला दिली असल्याचे स्पष्ट झाले. वस्तुतः चाचणी शुल्काचा भरणा दिनांक २७ जानेवारी, २०१२ रोजी करण्यात आलेला होता. समितीला चुकीची

माहिती दिल्याप्रकरणी श्री. पी. जी. भागवत, कार्यकारी अभियंता (से.नि.) यांचे विरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव (त्रुटींच्या पूर्ततेसह) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिनांक १८-०२-२०१७ च्या पत्रान्वये बांधकाम विभागास सादर केला. या अनुषंगाने समितीने दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ मधील नियम २७ च्या पोटनियम (२) (बी) (एक) नुसार अपचारी अधिकारी, श्री.पी.जी.भागवत, कार्यकारी अभियंता (से.नि.) यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ खाली दिनांक १७ मे, २०१७ च्या ज्ञापनान्वये दोषारोप बजावून विभागीय चौकशी कार्यान्वित करण्यात आली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली.

**प्रस्तुत प्रकरणी श्री. पी. जी. भागवत हे सेवानिवृत्त झालेले आहेत. विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केल्यानुसार संबंधितांवर सुरू केलेली विभागीय चौकशी विहित कालमर्यादेत पूर्ण करावी व त्यास अनुसरुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल समितीस विनाविलंब सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, अमरावती

### प्राथमिक आरोग्य केंद्र काटकुंभ, ता. चिखलदरा येथील वर्ग ३ च्या कर्मचारी निवासस्थान बांधकाम खर्चातील अनियमितेबाबत

**(परिच्छेद ३.२३१/५७) (सन २०११-२०१२)**

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्र.ZPA-१०९९/प्र.क्र.२०८९/ भाग २ दि. २७-०७-२००० **(परिशिष्ट ७.३)** नुसार कोणत्याही कामाचे विभाजन न करणे बंधनकारक असतांना या कामाचे अभिलेख्यानुसार विभाजन केल्याचे आढळून येते.

(२) प्रत्यक्ष प्रशासकीय मंजूरी, तांत्रिक मंजूरी, निविदा मंजूरी, दिनांक व कार्यारंभ आदेश यामध्ये विलंब झाल्याचे दिसून येत आहे. लांबलेल्या कालावधीमुळे अंदाजपत्रकीय रकमेत रू.२,६३,१३१ ची वाढ झाल्याचे दिसून येते. म्हणजेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४ चे नियम २१७ नुसार योग्य ती जबाबदारी बाळगण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रकल्प किंमतीत वाढ व अनुदानाच्या उद्दिष्ट कालावधीत विलंब झालेला आहे. त्यामुळे इमारतीच्या लोकोपयोगे विलंबाने झाला. शिवाय अधिक्षक अभियंता, अमरावती यांचे परिपत्रक ४/४/१०६१, दि.१२-०१-२०१० नुसार रूपये २५.०० लक्ष पेक्षा कमी किंमतीच्या कामांना बांधकामाची ६ महिने मुदत देणे आवश्यक असतांना कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांनी १२ महिन्याची मुदत आदेशीत केल्याचे दिसून येते.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५३ (१) व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय CST १२६८/५९३८२, दिनांक १४-३-१९७४ नुसार वाढीव बांधकामावर कोणतेही नियंत्रण न ठेवल्याने मुळ अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा बाब निहाय १२५ टक्के वाढीव परिणाम दिसून येत आहे. वाढ होत असलेल्या बाबी संदर्भात कंत्राटदार व कार्यालय यांच्या दरम्यान कोणत्याही प्रकारचे नियमानुसार होणारा पत्र व्यवहार मंजुरी आदीबाबत असणारी नस्ती अभिलेख्यात सादर केलेली नाही. त्यामुळे वाढीव परिमाणाकरीता करण्यात आलेला खर्च वसुली होणे आवश्यक आहे.

(४) गौण खनिजाची रक्कम देयकातून कपात करतांना ३५.२४/घ.मी. दराने रु. ५०९० ची कपात केली, प्रत्यक्षात कार्यारंभ आदेश दि. ३-३-२०१० रोजी देण्यात आलेले असतांना महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना क्रमांक/ गौखणी/ १०/१००९/प्र.क्र.३९, दिनांक ११-२-२०१० **(परिशिष्ट ७.१)** नुसार गौण खनिजाची कपात ७०.६७ घ.मी.दराने करणे आवश्यक होते. त्या शिवाय कंत्राटदाराने पुराव्या दाखल सादर केलेल्या पावत्या दिनांक १-३-२००८ दिनांक १५-४-२००८ कालावधीच्या असून त्या प्रमाणीत केलेल्या नाहीत. त्यामुळे एकूण सुधारीत दराने कपात करण्यायोग्य रक्कम रुपये १९,१९२-५०९० = १४,०३२ वसुली होणे आवश्यक आहे.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट २००९/प्र.क्र.११४/जल-७, दिनांक २७-४-२०११ नुसार इमारत बांधकामसाठी वापरण्यात येणाऱ्या सिमेंटच्या नियमानुसार कंत्राटदाराने सिमेंट वापरले अथवा नाही या बाबतचा पुरावा लेखा परिक्षणात सादर करण्यात आलेला नाही. शिवाय महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १६० अन्वये ठेवण्यात येणारी नमूना नोंदवही नं.५१ उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग निर्णय जीईएन ०४९९/प्र.क्र.१४३/ईमारती, दिनांक ०७-०७-२००० मध्ये शासकीय ईमारतीचे संकल्प तयार करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी नमूद आहेत, परंतू या बाबीनुसार सदरच्या बांधकामामध्ये कोणत्या प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या याची माहिती उपलब्ध नाही. त्याशिवाय संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे परिपत्रक क्र./संआसे/जिल्हास्तर/प्राथमिक आरोग्य केंद्र/बांधकाम/टे ७, दिनांक ११-०८-२०११ मधील मार्गदर्शक तत्वानुसार इमारती मध्ये कोणत्या सुधारणा प्रस्तावित केल्या तसेच इमारती हस्तांतरीत केव्हा झाल्या याबाबत दस्तऐवज उपलब्ध झाला नसल्याचे दिसून येते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकामध्ये वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे अंदाजपत्रकीय किंमतीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. परंतू निधीचे उपलब्धतेनुसार व उपभोक्ता खात्याच्या मागणीनुसार वर्ग-३ कर्मचाऱ्यांचे गाळे इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात आले त्यामुळे कामाचे विभाजन उपभोक्ता खात्याचे मागणीनुसार व मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती यांचे दिनांक ०६-०३-२०१० रोजीचे मंजूर प्रस्तावानुसार बांधकाम करण्यात आले.

(२) सदर योजनेतील बांधकामासाठी जिल्हा वार्षिक योजनेमार्फत होणे व कामाचे नियोजन व प्राधान्य आरोग्य खात्याकडून निश्चित झाल्यानंतर जिल्हा परिषद कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करते, तसेच प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर कामासाठी लागणारा निधी वेळेत उपलब्ध होत नसल्यामुळे कामाची तांत्रिक मंजूरी, निविदा मंजूरी व कार्यरंभ आदेश देण्यात विलंब होतो. सदर विलंब हा प्रकियेचा भाग असून निधीच्या उपलब्धतेनुसार कामास होणारा विलंब ग्राह्य आहे. कामाची मुदत ठरवितांना कामाचा कार्यरंभ आदेश देताना पावसाळ्याचा कालावधी गृहीत धरून १२ महिन्याची मुदत देण्यात आलेली आहे.

(३) बांधकामाचे आदेश पुस्तक अद्ययावत असून १२५ टक्के पेक्षा जादा आढळून आलेल्या परिणामाबाबत कार्यकारी अभियंता यांनी निर्देशित केल्यानुसार काम करण्यात आलेले आहे. कामाच्या वाढीव परिणामास संबंधीत कंत्राटदाराने करारनाम्यातील मंजूर दराप्रमाणे काम करण्याची लेखी संमती दिलेली आहे. तसेच वाढीव कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करून कामाचे देयक अदा करण्यात आले आहे.

(४) गौण खनिजाची सुधारीत दराने रक्कम रुपये १४,०३२, चलान क्रमांक ८४, दिनांक २२-०९-२०१५ अन्वये शासन खाती जमा करण्यात आलेली आहे.

(५) सदर काम भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले असून उपभोक्ता खात्यास हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. बांधकामावर वापरण्यात आलेल्या सिमेंटबाबत नमुना नोंदवही ५१ ची छायाप्रत या सोबत संलग्न करण्यात येत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम आरोग्य विभागाचे मंजूर नकाशाप्रमाणे घेण्यात आले आहे. या कामाचा कार्यरंभ आदेश ०३-०३-२०१० चा असून २०-०५-२०११ ला काम पुर्ण झाले आहे व सदर इमारत हस्तांतरीत केली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ ते ७ नोव्हेबर, २०१५ रोजी या कालावधीत साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.१७-७-२००० नुसार कामाचे विभाजन करण्यास मनाई असताना प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कामाचे विभाजन कोणत्या प्राधिकारान्वये केले, या अनियमिततेस कोण जबाबदार आहे, त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्यकेंद्र, काटकुंभ येथे वर्ग-३ कर्मचारी निवासस्थान बांधण्याच्या कामास दिनांक १-९-२००५ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना तांत्रिक मान्यता दिनांक ३-३-२०१० रोजी म्हणजे ५ वर्षे विलंबाने घेण्याचे कारण काय, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, सदर कामाचे विभाजन करण्यात आले असून निधीच्या उपलब्धतेनुसार आदेश देण्यात आले आहेत. काम पूर्ण करण्याचा कालावधी १२ महिन्यांचा होता. मेळघाट क्षेत्रातील हे काम आहे. काम करताना अनेक अडचणी येत होत्या. पाऊस व तेथील घाट परिसरचा विचार करून कामाची मुदत जास्त कालावधीची देण्यात आली होती. आरोग्य विभाग कामाचे नियोजन करीत असते, त्यांनी सूचविल्यानुसार बांधकाम विभागाकडून कामे केली जातात. बांधकाम विभागाकडून या कामास विलंब झालेला नाही. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीस विदित केले की, स्थायी समितीची मान्यता झाल्यानंतर दि.१२-११-२००८ रोजी सदर काम चालू झाले होते. विविध प्राथमिक आरोग्य केंद्र व वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या निवासस्थानाच्या बांधकामास मंजुरी देण्यात आली होती. या कामासाठी आता काही अनुदानित रक्कम प्राप्त झाली आहे. बांधकाम केले त्यावेळी २१ लाख ६० हजार रुपये प्राप्त झाले होते. या कामासाठी तांत्रिक मान्यता संचालक, आरोग्य विभाग कार्यालयाकडून घेण्यात येते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, कोणत्या स्तरावरुन या कामाला विलंब झालेला आहे, कामाची तांत्रिक मान्यता डायरेक्टर कसे काय देऊ शकतील. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी तांत्रिक मान्यता डायरेक्टर देत नाहीत असे सांगून आपली चूक मान्य केली. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता देत असतात, यासाठी पाच वर्षाचा कालावधी का लागला आहे. यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, तांत्रिक मान्यता २००८-२००९ मध्ये देण्यात आली असून प्रशासकीय मान्यता १-२-२०१२ रोजी देण्यात आली आहे. दिनांक १४-०८-२००९ रोजी निविदा मंजूर करण्यात आली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्रशासकीय मान्यता उशिरा का देण्यात आली, त्या अगोदर निविदा प्रक्रिया का करण्यात आली. या कामाचा कार्यारंभ आदेश दिलेला आहे काय, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, दिनांक १-२-२०१२ रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. तांत्रिक मान्यता सन २००८-२००९ मध्ये देण्यात आलेली आहे. त्या वर्षात निधी उपलब्ध नसल्यामुळे काम करता आले नाही. डीएसआर वाढल्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता घ्यावी लागली होती व त्यानंतर निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. ९० टक्के पेमेंट देण्याची तरतूद शासनाच्या परिपत्रकात आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, चाचणी अहवाल न घेता ९० टक्के पेमेंट कसे काय देण्यात आले आहे. ९० टक्के पेमेंट देण्याच्यासंदर्भात मुख्य अभियंता यांनी मान्यता दिली आहे काय, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, काम करताना भाग पाडण्यात आले आहेत. त्या कामाच्या संदर्भातील चाचणी अहवाल घेण्यात आला असून अंतिम देयक वितरीत केले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, मुख्य अभियंता यांनी छाननी अहवाल दिला होता काय, एकूण ९० टक्के पेमेंट देताना या परिपत्रकाचा आधार घेतला होता काय, पेमेंट कसे केले अशी विचारणा समितीने केली होती, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस सांगितले की, सिमेंट व डांबर या कामाचे भाग करण्यात आले आहे. समितीने निदेश दिले की, जी माहिती रेकॉर्डवर आहे ती समितीला द्यावी. बांधकाम विभागाचे रेकॉर्ड तपासून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भात चौकशी करावी जे दोषी असतील त्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी व एक महिन्याच्या आत केलेल्या कारवाईसह अहवाल समितीला सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामविकास विभागाच्या दिनांक १७-०७-२००० रोजीच्या शासन निर्णयानुसार कामाचे विभाजनास मनाई असतांनाही कामाचे विभाजन करणे, प्रशासकीय मान्यतेनंतर तब्बल ५ वर्ष विलंबाने तांत्रिक मान्यता घेणे, निधी उपलब्ध नसताना प्रशासकीय मान्यता घेणे, सर्व प्रकिया विलंबामुळे कामाच्या किंमतीत २५ टक्के वाढ होणे, ६ महिने मुदतीच्या कामास २० महिने कालावधी लागूनही त्यावर दंड न आकारणे, या नियमबाह्य बाबी व इतर आक्षेपांवर जिल्हा परिषद स्तरावर खरी व समाधानकारक उत्तरे प्राप्त न झाल्यामुळे समितीने या सर्व बाबींचा समावेश करून या प्रकरणी समितीचा विशेषाधिकाराचा भंग झाल्याने समितीने चौकशी करण्याचे निदेश दिले आहेत, त्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले.

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा. पंचायती राज समिती यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

सदर कामाचे नियोजन जि. प. आरोग्य विभागामार्फत सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात करण्यात आलेले आहे. आरोग्य अधिकारी यांचे पत्र क्र ६५५८ दिनांक ०४-१२-२००७ अन्वये जि.प.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२३ दिनांक ०७-०८-२००७ अन्वये सदर कामास रक्कम रूपये २१.४२ लक्षास स्वतंत्रपणे प्रशासकीय मान्यता देण्यात आली. प्रशासकीय मान्यतेमध्ये वर्ग-३ चे ४ कर्मचारी निवासस्थानाचा समावेश होता. या कामाचे प्राथमिक स्वरूपाचे प्राकलन सन २००५-२००६ च्या दर सूचीवर आधारीत असल्याने व प्रशासकीय मान्यता सन २००७-०८ या आर्थिक वर्षात प्रदान करण्यात आल्यामुळे २ वर्षाच्या कालावधी मधील दरवाढ लक्षात घेता एकूण ४ निवासस्थानाऐवजी २ निवासस्थानाचे बांधकामाकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रक्कम रू.१५.०० लक्ष प्रशासकीय मान्यता प्रदान केली. (प्र.मा.क्र.३९९/२००९/दि.०३/०३/२००९) सदर प्रस्तावित २ निवासस्थानाच्या बांधकामामुळे कामाची विभागणी झालेली आहे. मात्र या दोन निवासस्थानाची बांधकामे ही अपुरी तरतूद तथा ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत बांधकाम पुर्ण झालेले आहे, अशा ठिकाणी कर्मचारी

निवासस्थानाची बांधकामे प्राध्यानाने करावयाची असल्याकारणाने करण्यात आली. या कामाची निविदा प्रकिया पुर्ण करण्यात येवून दिनांक ०३/०३/२०१० रोजी कार्यरंभ आदेश कंत्राटदारास निर्गमित करण्यात आला. तांत्रिक मान्यता क्रमांक ३२६/२००८-२००९ नुसार देण्यात आली असून त्यास प्रत्यक्षात २ वर्षांचा विलंब झाला.

सदरचे कामाच्या ठिकाणी बांधकाम सामुग्री प्रत्यक्षात गोळा करण्यात आल्यानंतर साहित्याची चाचण्या प्रयोग शाळेतून प्राप्त करून घेण्याबाबत संबंधीत उपविभागाने संबंधीत कंत्राटदारास पत्र देण्यात आलेले होते. कंत्राटदाराने सामुग्रीचा चाचणी अहवाल प्रयोग शाळेतून प्राप्त करून घेणे आवश्यक होते. प्रत्यक्ष गोळा करण्यात आलेल्या सामुग्रीचा बांधकामामध्ये प्रत्यक्ष वापर करण्यापूर्वी योग्य त्या क्षेत्रीय चाचण्या घेऊन सामुग्री वापरण्यायोग्य असण्याची खात्री करून घेतल्यानंतरच सदर सामुग्रीचा बांधकामामध्ये वापर करण्यात आलेला आहे. परंतू चाचणी अहवाल प्राप्त न झाल्यामुळे १० टक्के रक्कम रोखून ठेवण्यात आलेली होती. कामाचा कार्यारंभ आदेश निर्गमित करताना (दि.०३/०३/२०१०) मेळघाटातील जास्त प्रमाणात होणारा पाऊस लक्षात घेता व त्यामुळे अतिदुर्गम भागात सामुग्री वाहतूकीस निर्माण होणारी अडचण लक्षात घेता काम पुर्ण करण्यास लागणारा कालावधी हा ६ महिन्याऐवजी १२ महिने निर्धारित करण्यात आला. प्रत्यक्षात काम करताना रेती घाटाचा लिलाव न झाल्याने रेतीची उपलब्धता वेळेवर न झाल्याने तथा दुर्गम भागात असणारे पाण्याचे दुर्भीक्ष इत्यादी कारणामुळे कंत्राटदारास काम पुर्ण करण्यासाठी दोन महिने विनादंड मुदतवाढ देण्यात आली. उक्त प्रकरणी कामाचे विभाजन करण्यात आल्याचे स्पष्ट झालेले आहे. याबाबत शासन परिपत्रकातील निर्णय व नियमातील तरतुदीचा भंग झालेला असल्याने श्री.पी.जी. भागवत, तत्कालीन कार्यकारी आभियंता (से.नि.दि.३०/११/२०१५) यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव पत्र क्र.६३३१ दिनांक १८.५.२०१६ अन्वये प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्रुटी पुर्ततेकरीता परत आलेला प्रस्तात त्रुटी पुर्तताकरून पत्र क्रमांक २०८० दिनांक १५.०२.२०१७ अन्वये पुनःश्च सादर केला आहे. तथापि सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्रमांक एस*९२/१४१६/प्र.क्र.४८/सेवा-६/(ब) दिनांक १७.०५.२०१७ अन्वये बजाविलेल्या ज्ञापनामध्ये जिल्हा परिषदेने सादर केलेल्या तीन दोषारोपांपैकी प्राथमिक आरोग्य केंद्र काटकुंभ कर्मचारी निवासस्थान याबाबतचा दोषारोप वगळून इतर दोन दोषारोपाबद्दल ज्ञापन बजावलेले आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सार्वजनिक आरोग्य विभागाने अभिप्राय दिलेले आहे.

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-**

राज्यातील ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय व ट्रामा केअर युनिट इत्यादी रुग्णालयांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत प्रशासकिय मान्यता देण्यात येऊन सदर रुग्णालयांच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

मात्र राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत, निवासस्थान व उपकेंद्र मुख्य इमारत व आरोग्य संस्थांचे बांधकाम व दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन विकास मंडळामार्फत निधी प्राप्त होतो. निधी प्राप्त झाल्यानंतर सदर कामास जिल्हा परिषद स्तरावर प्रशासकिय मान्यता देण्यात येते. प्रशासकिय मान्यता व कामाचे आदेश देणे (Work Order) इत्यादी बाबींची पूर्तता जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत केली जाते व त्यानंतर आरोग्य संस्थेचे बांधकाम विभागामार्फतच केले जाते. सदरचे बांधकाम विहीत मुदतीत पुर्ण न केल्यास त्यास दंड आकारणे, अनियमितता बाबत चौकशी करणे, कामास विलंब होणे या सर्व बाबी ग्राम विकास विभागाच्या अखत्यारीत येत असुन उपस्थित मुद्याच्या अनुषंगाने बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे कार्यवाही करण्यात येत आहे.

**चौकशी अहवाल**

सदर कामाचे नियोजन जि.प.आरोग्य विभागामार्फत सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात करण्यात आलेले आहे. या कामास आरोग्य अधिकारी यांचे पत्र क्र.६५५८/ दिनांक ०४/१२/२००७ अन्वये जि.प सर्वसाधारण सभा ठराव क्र.२३ दिनांक

०७/०८/२००७ अन्वये सदर कामास रक्कम रूपये २१.४२ लक्षास स्वतंत्रपणे प्रशासकीय मान्यता दिल्याबाबत कळविण्यात आले होते. सदर प्रशासकीय मान्यतेमध्ये वर्ग-३ चे ४ कर्मचारी यांच्या निवासस्थानाचा समावेश होता. या कामाचे प्राथमिक स्वरूपाचे प्राकलन सन २००५-२००६ च्या दरसुचीवर आधारीत असल्याने व प्रशासकीय मान्यता सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात प्रदान करण्यात आल्यामुळे २ वर्षाच्या कालावधी मधील दरवाढ लक्षात घेता एकूण ४ निवासस्थाना ऐवजी २ निवासस्थानाचे बांधकामाकरिता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रक्कम रूपये १५.०० लक्ष प्रशासकिय मान्यता प्रदान केली. (प्र.भा.क्र.३९९/ २००९/ दि.०३/०३/२००९) सदर प्रस्तावीत २ बांधकामामुळे कामाची विभागणी झालेली आहे. मात्र सदर दोन निवासस्थानाची बांधकामे ही अपूरी तरतूद तथा ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत बांधकाम पुर्ण झालेले आहे. अशा ठिकाणी कर्मचारी निवासस्थानाची बांधकाम प्राधान्याने करावयाची असल्याकारणाने करण्यात आली. या कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात येवून दिनांक ०३/०३/२०१० रोजी कार्यरंभ आदेश कंत्राटदारास निर्गमित करण्यात आला, त्यामुळे सदर कामास प्रत्यक्षात ५ वर्षांचा विलंब झालेला नाही.

सदरचे कामाच्या ठिकाणी बांधकाम सामुग्री प्रत्यक्षात गोळा करण्यात आल्यानंतर साहित्याची चाचण्या प्रयोग शाळेतून प्राप्त करून घेण्याबाबत संबंधित उपविभागाने संबंधित कंत्राटदारास पत्र देण्यात आलेले होते. सदर प्रकरणी कंत्राटदारातर्फे सदर सामुग्रीची चाचणी अहवाल प्रयोगशाळेतून प्राप्त करून घेणे आवश्यक ठरते. प्रत्यक्ष गोळा करण्यात आलेल्या सामुग्रीचा बांधकामामध्ये प्रत्यक्ष वापर करण्यापूर्वी योग्य त्या क्षेत्रीय चाचण्या घेऊन सामुग्री वापरण्या योग्य असण्याची खात्री करून घेतल्यानंतरच सदर सामुग्रीचा बांधकामामध्ये वापर करण्यात आलेला आहे, परंतू चाचणी अहवाल प्राप्त न झाल्यामुळे १० टक्के रक्कम रोखून ठेवण्यात आलेली होती.

सदर कामाचा कार्यरंभ आदेश निर्गमित करतांना (दि.०३/०३/२०१०) मेळघाटातील जास्त प्रमाणात होणारा पाऊस लक्षात घेता व त्यामुळे अतिदुर्गम भागात सामुग्री वाहतुकीस निर्माण होणारी अडचण लक्षात घेता काम पुर्ण करण्यास लागणारा कालावधी हा ६ महिन्या ऐवजी १२ महिने निर्धारित करण्यात आला. प्रत्यक्षात कामाचे कार्यान्वयन करतांना रेती घाटाचा हर्रास न झाल्याने रेतीची अनुपलब्धता तथा दुर्गम भागात असणारी पाण्याचे दुर्भीक्ष लक्षात घेता कंत्राटदारास काम पुर्ण करण्यासाठी दोन महिने विनादंड मुदतवाढ देण्यात आली.

सदर काम करीत असतांना प्राकलनातील मंजूर तरतूदी पेक्षा प्रत्यक्षात खोदकाम करतांना भुस्तर जास्त खोलीवर लागल्यामुळे कॉंक्रीटच्या बाबी तथा जोताभरणीस लागणारी सामुग्री जोता बांधणीचे विटकाम यामध्ये वाढ झाली आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष बांधकामाच्या ठिकाणी कामाच्या अनुषंगिक बाबीमध्ये तांत्रिकदृष्टया केलेल्या सुचनांमध्ये काही बाबींच्या परिणामात वाढ झालेली आहे. सदर निर्देशाची नोंद कामाच्या वर्क ऑर्डर नोंदवहीत घेण्यात आलेली आहे. तसेच या आधीक्यास अनुसरून सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास तांत्रिक अनुमती प्रदान केलेली आहे.

या बांधकामामध्ये गौण खनिज वसूली बाबतची देय रक्कम रू. १४०३२/-ची चालन क्र.२९६ दिनांक २२/०९/२०१५ अन्वये करण्यात आलेली आहे.

लेखापरीक्षणा दरम्यान आवश्यक दस्ताऐवज सादर न केल्यामुळे संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून रक्कम रू.२५,००० चा दंड चालन क्र.४३७/दिनांक १०/०५/२०१६ अन्वये वसूल करण्यात आला आहे. तसेच संबंधीतांची एक वेतनवाढ रोखण्याबाबत तथा त्यांची सेवापुस्तकेत नोंद घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर ईमारत सद्य:स्थितीत आरोग्य विभागास हस्तांतरीत करण्यात आलेली असून सुस्थितीत आहे व आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून सदर निवासस्थांनाचा वापर सुरू आहे. उक्त प्रकरणी कामाचे कार्यान्वयन करीत असतांना कामाचे विभाजन करण्यात आल्याचे स्पष्ट झालेले आहे. याबाबत शासन परिपत्रकातील निर्णय व नियमातील तरतूदीचा भंग झालेला असल्याने तात्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.पी.जी.भागवत (सेवा निवृत) याचेवर प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे पत्र क्रमांक ६३३१ दिनांक १८/०५/२०१६ अन्वये प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्र काटकुंभ, तालुका चिखलदरा येथे वर्ग ३ कर्मचारी निवासस्थान बांधकाम खर्चातील अनियमिततेसंदर्भात खुलासा करावा, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, तत्कालिन कार्यकारी अभियंता, श्री.पी.जी.भागवत यांचेवर दि. १७ मे, २०१७ रोजी ज्ञापन बजावण्यात आले असून विभागाला प्रस्ताव पाठविण्यात आला होता. जिल्हा परिषदेने ३ दोषारोप ठेवले होते.त्यापैकी २ दोषारोपांच्या संबंधीचे ज्ञापन बजावण्यात आले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या प्रकरणात देखील चौकशी पूर्ण होण्यास बराच कालावधी लागलेला आहे. श्री.भागवत यांच्या चौकशीस विलंब झालेला आहे. सन २०११-१२ मधील प्रकरण असून आता ५ वर्षे पूर्ण झाली आहेत. प्रशासकीय मान्यता नसताना तसेच निधी उपलब्ध नसताना कामे घेण्यात आली. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, चौकशी सुरु आहे. सदर प्रकरणाची विभागीय चौकशी देखील ६ महिन्यांत पूर्ण करण्यात येईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०१५-२०१६ च्या अहवालात काही त्रुटी आढळून आल्यामुळे तो पुन्हा पाठवला. त्यानंतर दि. १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी त्रुटींची पुर्तता करुन पुन्हा अहवाल देण्यात आला. अशा प्रकारे अहवालात त्रुटी ठेवून संबंधितांना वाचवण्याचा हा प्रकार सुरु आहे. यावर समितीने पुढे असे निदेश दिले की, संबंधित व्यक्तीवर ३ दोषारोप होते. जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीमध्ये नमूद केले आहे की, दिनांक १७ मे, २०१७ अन्वये बजविलेल्या ज्ञापनामध्ये जिल्हा परिषदेने सादर केलेल्या ३ दोषारोपांपैकी प्राथमिक आरोग्य केंद्र काटकुंभ कर्मचारी निवासस्थान बाबतचा दोषारोप वगळून इतर २ दोषारोपांबद्दल ज्ञापन बजावलेले आहे. हा दोषारोप वगळण्याचे कारण काय आहे, ३ दोषारोप असताना काटकुंभ संदर्भातील दोषारोप का वगळण्यात आला, यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) विभाग यांनी समितीस विदित केले की, ग्रामविकास विभागाकडून दोषारोपपत्र बजाविण्यात येते. सेवा नियमावलीत असे नमुद आहे की, ४ वर्षापूर्वीचे प्रकरण असेल तर दोषारोपपत्र निवृत्त कर्मचा-यांवर बजाविता येत नाही. त्यामुळे त्याच्यावर जे दोषारोपपत्र बजाविण्यात येते, त्याचा अभ्यास करुन, दोषारोपपत्र विभागामार्फत वगळण्यात येते. सामान्य प्रशासन विभागामार्फत या संदर्भात सांगण्यात आले आहे. यावर समितीने विचारणा केली की, ४ वर्षापूर्वीच्या प्रकरणाच्या संदर्भात दोषारोपत्र बजाविता येत नाही की कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर ४ वर्षानंतर दोषारोपपत्र बजाविता येत नाही. यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) यांनी समितीस विदित केले की, कर्मचारी सेवानिवृत्त झाला नसेल तर दोषारोपपत्र बजाविण्यात येतेच. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सन २०११-१२ चे प्रकरण आहे, विनाकारण ४-५ वर्षे विलंब करण्यात येतो हे काही योग्य नाही. संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहे हे माहित असतानाही असे केले जाते, हे योग्य नाही. जिल्हापरिषद तो कर्मचारी सेवानिवृत्त होण्याची वाट पहात होती का यामधुन असाच अर्थ निघत आहे. यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) विभाग यांनी समितीस विदित केले की प्रकरणाचे गांभीर्य पाहून सेक्शन ८ अन्वये चौकशीमध्ये पेन्शनमध्ये २५ टक्क्यांपर्यत कायम स्वरुपी कपात करण्यात येते. सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) यांनी ग्रामविकास विभागाच्या सांगण्याप्रमाणे अगोदरच चौकशी सुरु केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) लवकरात लवकर याचा निर्णय घेईल. यावर समितीने निदेश दिले की, सदर बाबतीतील निर्णय विहीत कालावधीत झाला पाहिजे. यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, समितीने ६ महिने कालावधी दिला आहे ६ महिन्यात निर्णय केला जाईल. यावर समितीने असे निदेश दिले की, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) विभाग यांनी लवकरात लवकर या संदर्भात संबंधितावर कारवाई करावी. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, अधिकारी बांधकाम विभागाचा आहे, म्हणून त्यांना सांगण्यात येईल यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) यांनी समितीस विदित केले की, दोषारोपपत्र सादर केले आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, विभाग त्यांच्यामार्फत कारवाई करेल. यावर समितीने पुढे असे निदेश दिले की, दोन्ही प्रकरणात ६ महिन्यात कारवाई करण्यात यावी. दोन्ही प्रकरणांतील व्यक्ती एकच आहे. प्रकरणे वेगवेगळी आहेत. दोन्ही प्रकरणातील कारवाई ६ महिन्यात करण्याच्या संदर्भात समितीने निदेश दिले आहे. पैशाची अनियमितता असेल तर दोन्ही प्रकरणांचा निकाल ६ महिन्यांत लावला पाहिजे. सदरहू प्रकरणात एकच व्यक्ती आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, तोपर्यंत निवृत्तीवेतन थांबविता येत नाही का, निवृत्तीवेतनासंदर्भात लवकरात लवकर कारवाई करावी. निवृत्त व्यक्तीच्या विरुध्द दोषारोप पत्र आहे. श्री. भागवत यांच्याविरुध्द सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निवृत्त होताना दोषारोपपत्र सादर केले आहे आणि त्यांना फक्त ७५ टक्केच निवृत्तीवेतन दिले जाते, २५ टक्के निवृत्तीवेतन रोखण्यात आली आहे अशी माहिती समितीला आहे. याचा अर्थ विभागाने शिक्षा झाली आहे, असे गृहीत धरले आहे का, तसेच सन २०१५ ला समितीने भेट दिली होती, त्यावेळी श्री.भागवत, कार्यकारी अभियंता यांना प्रश्नांच्या अनुषंगाने माहिती विचारल्यानंतर त्यांनी समितीला असत्य माहिती देऊन समितीची दिशाभूल केली. समितीला असत्य माहिती दिली आहे, त्यासंदर्भात त्यांच्यावर तात्काळ कारवाई झाली पाहिजे होती. समितीला असत्य माहिती देऊन समितीची दिशाभूल करणे, समितीचा वेळ वाया घालविणे, इतकी अक्षम्य चूक त्यांनी केली आहे. जिल्हा परिषदेकडून त्यांच्यावर तात्काळ कारवाई का करण्यात आली नाही, अहवाल देखील चुकीचा पाठविला आहे. जिल्हा परिषदेकडून त्यांच्यावर तात्काळ कारवाई झाली पाहिजे होती. सदर कारवाईला तरी विलंब लागण्याचे कारण नव्हते. यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) यांनी समितीला विदित केले की, समितीला असत्य माहिती देणे, हे दोषारोप पत्रातील मुख्य कलम केले आहे. पंचायती राज समितीला असत्य माहिती देण्यात आली, हे मुख्य कलम आहे आणि त्या अनुषंगाने देण्यात येणारी शिक्षा कठोरच असेल. यावर समितीने असे निदेश दिले की, कारवाई तात्काळ आणि विनाविलंब झाली पाहिजे, यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) यांनी समितीला विदित केले की, ते निवृत्त कर्मचारी आहेत, त्यांच्याविरुध्द जास्तीत जास्त कारवाई करण्यात येईल. चुकीचे मुद्दे, चुकीची माहिती देणे हा एक मुद्दा आहे, दोषारोपाचे मुद्दे वेगळे आहेत. लेखा आक्षेपातील मुद्दे वगळेच आहेत. चुकीची माहिती देणे, हा गंभीर गुन्हा आहे. या संदर्भात संबंधितांवर तात्काळ कारवाई केली जाईल. याबाबत सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस अश्वस्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत चिखलदरा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र काटकुंभ येथील कर्मचारी निवासस्थान बांधकाम करताना कोणत्याही कामाचे विभाजन न करणे बंधनकारक असतांना या कामाचे विभाजन केल्याचे आढळून आल्याच्या प्रमुख आक्षेपासोबत प्रशासकीय मंजूरी, निविदा मंजूरी दिनांक व कार्यारंभ आदेश यामध्ये विलंब झाल्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेत रूपये २,६३,१३१ ची वाढ होणे, वाढीव बांधकामावर कोणतेही नियंत्रण नसणे, गौण खनिजाची रक्कम देयकातून कपात करतांना ७०.६७ घ.मी.दराने करणे आवश्यक असताना ती न करणे, शासन निर्णय दिनांक २७/४/२०११ नुसार इमारत बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या सिमेंटच्या खरेदी नियमानुसार कंत्राटदाराने सिमेंट वापरले अथवा नाही या बाबतचा पुरावा लेखा परिक्षणात सादर करण्यात आलेला नसणे हे प्रमुख आक्षेप घेण्यात आलेले होते. सदर लेखा आक्षेपाच्या संदर्भात जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडून निधीचे उपलब्धतेनुसार व उपभोक्ता खात्याच्या मागणीनुसार वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांचे गाळे इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात आले, त्यामुळे कामाचे विभाजन उपभोक्ता खात्याचे मागणीनुसार केले, निधी वेळेत उपलब्ध होत नसल्यामुळे कामाची तांत्रिक मंजूरी, निविदा मंजूरी व कार्यरंभ आदेश देण्यात विलंब होतो, १२५ टक्के पेक्षा जादा आढळून आलेल्या परिणामाबाबत कार्यकारी अभियंता यांनी निर्देशित केल्यानुसार काम करण्यात आलेले आहे, गौण खनिजाची सुधारित दराने रक्कम शासन खाती जमा करण्यात आलेली आहे, सदर काम भौतिकदृष्टया पुर्ण झालेले असून उपभोक्ता खात्यास हस्तांतरीत करण्यात आलेली आहे अशा प्रकारची माहिती समितीस प्राप्त झाली.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, १९८४ च्या नियम २१७ मध्ये अशी तरतुद करण्यात आली आहे की, "निविदा स्वीकारण्यासंबंधीच्या प्रकरणांना, निविदा उघडण्यात आल्यानंतर, त्या कार्यकारी अभियंत्यांच्या, अधीक्षक अभियंत्यांच्या आणि मुख्य अभियंत्यांच्या पातळीवर अंतिमतः हाताळण्यात आल्यास, अनुक्रमे ३० दिवस, ६० दिवस व ९० दिवस यांहून अधिक कालावधी लागता कामा नये. ज्या प्रकरणांमध्ये हा कालावधी या ना त्या कारणामुळे अधिक झाला असेल, तर ज्यामुळे असा विलंब अपरिहार्य ठरला ती विशेष परिस्थिती नजिकच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्याला कळविण्यात आली पाहिजे. निविदा स्वीकारण्यासंबंधीच्या अधिकाऱ्यांच्या अधिकाराकरिता परिशिष्ट ४२ मधील अनुक्रमांक १६ पहावा. निविदा स्वीकारणे व कंत्राटाचे अभिकरण

निश्चित करणे, यासंबंधीची प्रकरणे हाताळतांना अनुसरावयाच्या कार्यपध्दतीसाठी परिशिष्ट २० पहावे." प्रस्तुत प्रकरणात नियमातील या तरतुदीनुसार योग्य ती खबरदारी घेण्यात आलेली नाही असे स्पष्ट होते. वस्तुतः काटकुंभ येथील वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या बांधकामाकरीता जिल्हा वार्षिक योजनेतून निधी प्राप्त झालेला होता. जिल्हा परिषद प्रशासनास सदरचा निधी विलंबाने प्राप्त झाल्यामुळे कामाची तांत्रिक मंजूरी, निविदा मंजूरी व कार्यारंभ आदेश देण्यामध्ये विलंब झाल्याचा खुलासा जिल्हा परिषदेने केलेला आहे. परंतू सदरचा निधी किती विलंबाने प्राप्त झाला याची माहिती दिलेली नसल्यामुळे तसेच ६ महिने मुदत असलेल्या कामास मेळघाटातील पाऊस व घाट परिसर याचा विचार करुन १२ महिन्यांची मुदत देण्यात आल्याचा खुलासा समिती मान्य करु शकत नाही. **जिल्हा वार्षिक योजनेमार्फत नियोजन करण्यात आलेल्या व जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण करावयाच्या कामांना वितरीत करावयाचा निधी वेळच्या वेळी मिळत नसल्याची तक्रार समितीला नेहमीच केली जाते असा विलंब केल्यामुळे लेखापरिक्षणाचे वेळी आक्षेप देखील घेतले जातात. अतः जिल्हा वार्षिक योजनेमार्फत जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन द्यावयाचा निधी वेळच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम १५३ (१) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, "मान्यता प्राप्त अंदाजात दिलेल्या विनिर्देशानुसार बांधकाम काटेकोरपणे पार पाडण्यात येईल, आणि प्रत्येक करारनाम्यातील अटी अंमलात येत आहेत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी परिषद कार्यकारी अभियंता आणि त्याच्या हाताखालील अधिकारी यांची राहील आणि कोणताही करारनामा शून्य करण्याकडे किंवा त्यास निष्फळ करण्याकडे कल असलेली कोणतीही कृती करु दिली जाणार नाही." असे असतानाही आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दिनांक १४ मार्च, १९७४ च्या शासन निर्णयानुसार वाढीव बांधकामावर कार्यकारी अभियंत्यांनी कोणतेही नियंत्रण ठेवलेल्याचे प्रस्तुत प्रकरणात दिसून येत नाही. परिणामी, अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा बाबनिहाय १२५ टक्के वाढीव परिमाण प्रस्तुत प्रकरणात दिसून आले आहे. एवढेच नव्हे तर वाढीव बाबीसंदर्भात कंत्राटदार व कार्यालय यांच्यादरम्यान नियमानुसार होणारा पत्रव्यवहार किंवा मंजूरी आदेश लेखा परिक्षणाचे वेळी दाखविण्यात आलेले नव्हते. जिल्हा परिषदेने अशा प्रकारची कार्योत्तर मान्यता दिलेली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली, परंतू ती देखील एक प्रकारची अनियमितताच होय.

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दिनांकित ११ फेब्रुवारी, २०१० नुसार गौण खनिजाची कपात वाढीव दराने करणे आवश्यक होते असा आक्षेप असूनही जिल्हा परिषदेने समितीच्या भेटीच्या वेळी म्हणजेच दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी सदर रक्कम विलंबाने शासन खाती जमा केलेली आहे. वस्तुतः लेखा आक्षेप आणि त्याबाबतचा अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाला सादर झाल्यानंतर पुढील तीन महिन्यांच्या आत अशी कारवाई करणे अपेक्षित असते. शासन निर्णय दिनांक २७ एप्रिल, २०११ अनुसार बांधकामासाठी वापरावयाचे सिमेंटच कंत्राटदाराने वापरल्याबाबतचा पुरावा लेखा परिक्षणाचेवेळी सादर करण्यात आलेला नव्हता. याबाबत जिल्हा परिषदेने सिमेंट बाबत नमुना वही ५१ ची प्रत समितीच्या अवलोकनार्थ सादर केलेली आहे. परंतू शासन निर्णयातील सिमेंटच्या चाचणी व त्याच्या अहवालाबाबत जिल्हा परिषदेने मौन बाळगले आहे. **अतः महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील तरतुदींचे उल्लंघन करणे, गौण खनिजाबाबतच्या सुधारीत दरानुसार देयकातून कपात न करणे, सिमेंटचे चाचणी अहवाल न घेणे अशा प्रकारच्या सकृतदर्शनी छोट्या-छोट्या चुका आणि अनियमितता यापुढील काळामध्ये जिल्हा परिषदांकडून होऊ नयेत यासाठी ग्रामविकास विभागाने वेळोवेळी आढावा घेऊन स्वयंस्पष्ट परिपत्रक निर्गमित करावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी अशीही समितीची शिफारस आहे.**

शासनाने जिल्हा परिषदांमधील "बांधकाम विभाग" व "लघुपाटबंधारे विभागात" कामाच्या विभागणीस केवळ अपवादात्मक परिस्थितीत अनुमती दिली होती ही अनुमती देताना कामाची विभागणी करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घ्यावी असे स्पष्ट निर्देश शासनाने दिनांक ८ फेब्रुवारी, १९९० व दिनांक १० डिसेंबर, १९९३ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेले होते. परंतू कोणतेही संयुक्तिक कारण नसताना कामाची विभागणी अयोग्य व नियमबाह्य पध्दतीने करण्यात येत असल्यामुळे समितीच्या आक्षेपावरुन शासनाने दिनांक २७ एप्रिल, २००० रोजी परिपत्रक निर्गमित करुन कोणत्याही परिस्थितीत कामाचे विभाजन

करण्यात येवू नये असे आदेशित केलेले आहे. असे असतानाही समितीसमोर वारंवार नियमबाह्यपणे कामाचे तुकडे पाडल्याचे आढळून येत आहे. प्रस्तुत प्रकरणात देखील समितीच्या निदेशानुसार केलेल्या चौकशीत कामाचे विभाजन करण्यात आल्याचे स्पष्ट झालेले आहे. **याबाबत शासनाच्या आदेशांचा भंग झाल्याप्रकरणी श्री.पी.जी.भागवत, तत्कालिन कार्यकारी अभियंता जे समितीच्या भेटीनंतर अवघ्या दोन महिन्यानंतर सेवानिवृत्त झाले त्यांच्यावरील प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबतचे ज्ञापन विभागीय सचिवांच्या साक्षीचे दरम्यान दिनांक १७ मे, २०१७ म्हणजेच सुमारे दोन वर्षानंतर निर्गमित करण्यात आले आहे, याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.**

**लेखा आक्षेपात शासन आदेशाचा भंग झाल्याचे निष्पन्न होऊन त्याचप्रमाणे समितीच्या भेटीच्या वेळी संबंधितांविरुध्द चौकशी करुन कारवाई करण्याचे निदेश देऊनही जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी दिरंगाई व कुचराई केली व संबंधित दोषी अधिकाऱ्यांना एकप्रकारे मदतच केली. या समितीच्या आक्षेपानुसार संबंधित कार्यपालन अधिकाऱ्यांविरुध्द कडक स्वरुपाची कारवाई करुन समितीला आश्वासित केल्याप्रमाणे संबंधित अभियंत्याविरुध्द प्रस्तावित असलेली विभागीय चौकशी तातडीने पूर्ण करुन तद्नुषंगाने कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यांत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, अमरावती

### अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना विलंबाने समायोजन करणेबाबत

**(परिच्छेद ३.१२१/१) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद, अमरावती सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक ३.१२१/१)

पट संख्येनुसार एकुण ३१७ जादा सहाय्यक शिक्षक अतिरिक्त असल्याने त्यांचे समायोजन विलंबाने झाले आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण शासन निर्णय क्र. जि.प./ब-५११/प्र.क्र.-५४/आ-१४ दिनांक १२/०५/२०११ **(परिशिष्ट ८.१)** मधील ८ अन्वये शिक्षकाचे समायोजनापुर्वी पदोन्नतीची कार्यवाही न केल्याने शिक्षकाचे समायोजन विलंबाने केले आहे.

(२) जिल्ह्यातील समायोजनाचे काम ३१ ऑक्टोबर पुर्वी करणे आवश्यक असतांना ५७ शिक्षकाचे समायोजन १० महिने १४ दिवस विलंबाने करण्यात आले. आचार संहिता माहे डिसेंबर, २०११ ला लागल्याने शिक्षक समायोजनास आचार संहितेमुळे समायोजनास विलंब झाल्याचे कारण चुकीचे असल्याचे दिसून येते.

(३) पंचायत समिती, चांदुर रेल्वे, अंजनगाव सुर्जी येथील पदवीधर शिक्षकाचे समायोजनाची प्रक्रिया पारदर्शकरित्या पार पाडली नसल्याचे दिसून येते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर आक्षेपाबाबत खालील प्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शा.नि.क्र. ५११/प्र.क्र.५४/आ-१४/ दिनांक १८/०५/२०११ मधील ८ अन्वये शिक्षकाचे समायोजनापूर्वी पदोन्नतीची कार्यवाही करणे अपेक्षित होते. या अनुषंगाने विभागामार्फत सन २०१०-११ चे पदनिर्धारण तथा प्रत्यक्षात रिक्त असलेली उच्च श्रेणी, मुख्याध्यापक तथा पदवीधर शिक्षकांची पदे पदोन्नती व्दारे भरण्यात आली होती. तत्कालीन परिस्थीतीत उच्च श्रेणी मुख्याध्यापकांची १०२ पदे रिक्त असतांना विहीत पदोन्नतीची प्रकिया राबविली असता त्यामधुन केवळ १६ सहाय्यक शिक्षकांनी पदोन्नती स्विकारली होती. सदर पदोन्नती बाबतचे आदेश दि.२६.०७.२०११ रोजी निर्गमित करण्यात आले होते. तसेच पदवीधर शिक्षकांची माहे नोव्हेंबर, २०१० अखेर १४२ रिक्त पदे विहीत पदोन्नतीच्या (श्रेणीवाढ) प्रकियेव्दारे भरण्याची कार्यवाही करून कार्यालयाचे आदेश क्र.८४ दि.०५.०१.२०११ अन्वये १२२ पदवीधरांची पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली होती.

(२) सन २०११-२०१२ चे संच मान्यतेनुसार दिनांक ३०.०९.२०११ चे पदनिर्धारणाप्रमाणे शिक्षकांचे समायोजन दिनांक ३०.१०.२०११ पर्यंत पुर्ण करावयाचे होते. त्याकरिता शिक्षण उप संचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी पत्र क्र.२९०९५/२०११ दिनांक ०२.११.२०११ अन्वये समायोजनाकरीता परवानगी दिली. आक्षेपामध्ये नमुद ३१७ पदे ही जास्तीची आहेत. परंतु रिक्त २६५ पदे आहेत. आक्षेपातील ३१७ ऐवजी तालुका स्तरावरील समायोजन झाल्यानंतर केवळ ५७ शिक्षक जिल्हास्तरावर अतिरिक्त ठरले होते. (सहाय्यक शिक्षक-५१, पदवीधर शिक्षक मराठी-४, पदवीधर शिक्षक उर्दू-२ एकूण ५७ शिक्षक) आणि या अतिरिक्त ठरलेल्या ५७ शिक्षकांचे समायोजन करण्यात आले होते.

दरम्यानचे कालावधीमध्ये महसुल विभागामार्फत दि.०३.१०.२०११ ते दिनांक ०५.१०.२०११ दरम्यान विशेष पट पडताळणी मोहिम राबविण्यात आली होती, तसेच अमरावती जिल्ह्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा (जिल्हा परिषद/नगर परिषद/ महानगर पालिका व्यवस्थापन) निवडणूक कार्यक्रम तसेच नगर परिषद निवडणूक आचार संहिता दिनांक ३०.११.२०११ ते १७.१२.२०११ महानगर पालिका निवडणूक आचार संहिता दिनांक २६.१२.२०११ ते १७.०२.२०१२ जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक आचार संहिता दिनांक ०३.०१.२०१२ ते १७.०२.२०१२ तसेच पंचायत समिती, धारणी निवडणूक आचार संहिता दिनांक १५.०३.२०१२ ते १६.०४.२०१२ या कालावधी मध्ये आचार संहिता असल्याने शिक्षकांचे समायोजन करता आले नाही.

तद्‌नंतर समायोजन प्रकिया दिनांक २६.०४.२०१२ रोजी सुरू करण्यात आली. त्याचप्रमाणे दिनांक २६.०४.२०१२ रोजी समायोजनाची समुपदेशन प्रकिया पार पाडत असताना मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दिनांक २६.०४.२०१२ रोजी समायोजन प्रकियेस स्थगनादेश दिल्याने समायोजन प्रकिया वेळेवर होवू शकली नाही. मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे आदेश दि.३०.०७.२०१२ ने स्थगनादेश रद्द ठरवून समायोजनास अनुमती दिली. त्यानुसार दि.१०.०९.२०१२ ला समायोजनाची कार्यवाही समुपदेशनाने केलेली आहे.

(३) पंचायत समिती, चांदूर रेल्वे येथे सन २०११-१२ च्या संच मान्यतेनुसार पदवीधर शिक्षकांची मंजूर पदे १८ होती व कार्यरत सुध्दा १८ पदे होती. सन २०११-१२ च्या संच मान्यतेनुसार पंचायत समिती, चांदूर रेल्वे येथील समायोजन राबविण्यात येत असतानाचे कालावधीमध्ये कु.उर्मीला धुमाळे पदवीधर शिक्षक यांचे प्रशासकीय बदलीबाबत वि.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे आदेशानुसार मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे सुरू असलेल्या अपिल प्रकरणी मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक ०४/११/२०११ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार श्रीमती उर्मीला धुमाळे यांची पदस्थापना पंचायत समिती, चांदूर रेल्वे मधील जिल्हा परिषद शाळा, चिरोडी येथे करण्यात आली होती. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीत श्री.नितीन कांबळे पदवीधर शिक्षक हे अतिरिक्त ठरल्याने त्यांचे समायोजन जिल्हास्तरावरून करण्यात आले होते.

पंचायत समिती, अंजनगांव सुर्जी येथे सन २०११-१२ चे संच मान्यतेनुसार २ पदवीधर शिक्षक अतिरिक्त ठरले होते आणि जे २ पदवीधर शिक्षक अतिरिक्त ठरले त्यांचे समायोजन पंचायत समिती, धारणी अंतर्गत जिल्हा परिषद शाळा, लवादा व दाभिया येथे नियमाप्रमाणे करण्यात आले आहे.

पंचायत समिती, दर्यापूर येथे सन २०११-१२ मध्ये ५ पदवीधर शिक्षक पंचायत समितीस्तरावर अतिरिक्त होते. त्यापैकी पंचायत समितीस्तरावर ३ पदवीधर शिक्षकांचे समायोजन नियमाप्रमाणे करण्यात आले व उर्वरित २ पदवीधर शिक्षकांचे नावे जिल्हास्तरावर समायोजनाकरीता पाठविण्यात आले होते. त्यापैकी जिल्हास्तरावरुन एका पदवीधर शिक्षकाचे समयोजन पंचायत समिती धारणी अंतर्गत रिक्त ठिकाणी करण्यात आले व उर्वरित एक पदवीधर शिक्षकाकडे गट समन्वयकाचा पदभार असल्याने त्यांना गट समन्वयक पदावरच पंचायत समिती, दर्यापूर येथे ठेवण्यात आले होते.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक १२ मे, २०११ नुसार शिक्षकांच्या समायोजनापूर्वी पदोन्नतीची कार्यवाही न केल्यामुळे शिक्षकांच्या समायोजनास झालेल्या विलंबास कोण जबाबदार आहे, शासन निर्णय दिनांक १२ मे, २०११ नुसार शिक्षकांच्या समायोजनाचे काम दिनांक ३१ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक आहे. तथापि, एकूण ५७ अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन दिनांक १४ सप्टेंबर, २०१२ रोजीच्या आदेशानुसार १० महिने १४ दिवस विलंबाने करण्याचे कारण काय आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, हा मुद्दा अनेक तालुक्यांच्या संदर्भात असल्यामुळे एकत्रित केला आहे. वेळेत समायोजन होणे आवश्यक होते. १४ तालुक्यांपैकी १० तालुक्यांमध्ये वेळेवर शिक्षकांचे समायोजन झाले होते. ४ तालुक्यांमध्ये शिक्षकांचे समायोजन न होण्याचे कारण वेगळे होते. दिनांक ३ ऑक्टोबर, २०११ रोजी विभागाकडून पडताळणी करण्यात आली होती. त्यामुळे किती शिक्षकांना कामावर ठेवायचे हा प्रश्न निर्माण झाला होता. अमरावती जिल्ह्यात दिनांक ३० नोव्हेंबर, २०११ ते १७ डिसेंबर, २०११ पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थेचा निवडूणक कार्यक्रम त्याचप्रमाणे नगरपरिषद निवडणूक आचारसंहिता होती. दिनांक २६ डिसेंबर, २०११ ते दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ पर्यंत महानगरपालिका निवडणूक आचार संहिता होती. दिनांक ३ जानेवारी, २०१२ ते १७ फेब्रुवारी, २०१२ पर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक आचारसंहिता होती. तसेच दिनांक १५ मार्च, २०१२ ते १६ एप्रिल, २०१२ पर्यंत पंचायत समिती धारणी निवडणूक आचारसंहिता होती. यामुळे सन २०१२ नंतर समायोजन प्रक्रिया सुरू झाली. ४ तालुक्यांमध्ये नंतर समायोजन झालेले आहे. सन २०१४-१५ मध्ये सुध्दा या संदर्भात विलंब झालेला आहे. ४ तालुक्यांमध्ये वेळेवर समायोजन न झाल्यामुळे विलंब झालेला आहे. यासंदर्भात एक महिन्याच्या कालावधीत कार्यवाही करण्यात येईल.

समितीने असे मत प्रतिपादन केले की, शिक्षक कर्मचाऱ्यांचे विलंबाने समायोजन केल्यामुळे जवळपास १ कोटी ८७ लाख रुपये शासनाचे वाया गेले आहेत. त्यामुळे याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. शिक्षण विभागावर शासन मोठ्या प्रमाणात खर्च करीत आहे, त्यामुळे यासाठी जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, चार तालुक्यातील हा विषय असल्यामुळे चार तालुक्यातील अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अहवाल वर्षात १ कोटी ९० लाख रुपयांचा निधी निष्फळ ठरला आहे. शिक्षकांनी काम केले नाही तरी त्यांना पगार देण्यात आलेला आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी. तसेच संबंधितांवर कारवाई करुन एक महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा असे निदेश दिले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, जी वस्तुस्थिती आहे, ती जिल्हा परिषद मान्य करते. शिक्षकांची आवश्यकता असताना सदर शिक्षक बसून राहिले आहेत. ज्या ठिकाणी शिक्षकांची आवश्यकता होती तेथे शिक्षक जावयास पाहिजे होते. समितीने पुढे अशी विचारणा केली की, शिक्षण विभागाचे प्रमुख कोण आहेत, शिक्षकांच्या समायोजनास विलंब करण्यास कोण अधिकारी जबाबदार आहेत याची माहिती त्यांनी द्यावी. यावर समितीस शिक्षणाधिकारी, प्राथमिक यांनी माहिती दिली की, लेखाधिकारी, तालुका स्तरावरील गट विकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी हे विलंबास जबाबदार आहेत. यावर समितीने असे निदेश दिले की, शासनाचा निधी निष्फळ ठरल्यामुळे यासंदर्भातील सविस्तर चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी. या रकमेची जबाबदारी निश्चित करण्यात यावी व एक महिन्यात समितीला अहवाल सादर करण्यात यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस निदेशानुसार कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) दिनांक १२ मे, २०११ रोजीच्या ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयान्वये शिक्षकांच्या समायोजनाचे काम ३१ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक असतांना अमरावती जिल्ह्याच्या ४ तालुक्यांतील शिक्षक कर्मचाऱ्यांचे समायोजन १० महिने १४ दिवस विलंबाने केल्यामुळे शासनाचे सुमारे १ कोटी ९० लाख रुपये निष्फळ गेले आहेत. याप्रकरणी साक्षीच्या वेळी समितीस दिलेल्या आश्वासनानुसार प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात दोषी आढळलेल्या विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

(२) अतिरिक्त शिक्षकांच्या वेतनावर झालेल्या सुमारे १ कोटी ९० लाख रुपयांच्या निष्फळ खर्चाची जबाबदारी शासनाने निश्चित केली आहे काय, असल्यास सदरहू खर्च वसूल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे ?

(३) जिल्ह्यातील एका तालुक्यातील समायोजन प्रक्रियेला आयुक्तांनी ४ दिवस स्थगिती दिल्याबाबत खुलासा करण्यात यावा ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शा. नि. क्र. ५११/प्र.क्र.५४/आ-१४ दि.१८/०५/२०११ अन्वये शिक्षकांच्या समायोजनाचे काम ३१ ऑक्टोबर पर्यंत करणे बंधनकारक होते. परंतु ४ तालुक्यांपैकी २ तालुक्यांनी तालुका (धारणी व चिखलदरा) विहित कालावधीत समायोजनाची प्रक्रिया पूर्ण केली नाही. उर्वरित तालुक्यांनी त्यांचे स्तरावरील समायोजनाची प्रक्रिया वेळेत पूर्ण केली. तथापि उपरोक्त २ तालुक्यांमुळे जिल्हा स्तरावरील समायोजन विलंबाने झाले. दोषी अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशीचे दोषारोप जोडपत्र १ ते ४ शासनाकडे पत्र क्र. ४९५१ व पत्र क्रमांक ४९५२ दिनांक १८/५/२०१६ रोजी पाठविलेले आहे.

(२) दोषी असणाऱ्या श्री.रमेश सोने, तत्का. गट शिक्षणाधीकारी चिखलदरा व श्री. एस. के. शेटे, तत्का. गट शिक्षणाधिकारी, धारणी यांचे प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्रमांक अनुक्रमे ४९५१ व ४९५२ दिनांक १८.०५.२०१६ अन्वये मा.आयुक्त (शिक्षण) पुणे यांचेकडे सादर करण्यात आला होता, त्यांचेकडून परत आलेला प्रस्ताव त्रुटीची पुर्तता करून पत्र क्र.११२१३ दिनांक २०.१२.२०१६ अन्वये फेरसादर करण्यात आलेला आहे. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक ८३१८ व ८३१९ दिनांक २२/९/२०१७ अन्वये अनुक्रमे मा. आयुक्त (शिक्षण) व मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांना चौकशी अनुषंगाने स्मरणपत्र देण्यात आलेले आहे.

(३) जिल्हास्तरावरील समायोजन प्रक्रिया दिनांक २६/४/२०१२ रोजी समुपदेशनाने सुरु करण्यात आली. सदर प्रक्रिया पार पाडत असतांना मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी त्याच दिनांकास रोजी समायोजन प्रक्रियेस स्थगनादेश दिल्याने समायोजन प्रक्रिया वेळेवर होऊ शकली नाही. मात्र, मा.विभागीय आयुक्तांनी सुनावणी व चौकशी अंती दिनांक ३०/७/२०१२ रोजी दिलेला स्थगनादेश रद्द ठरवून समायोजनास अनुमती दिली. त्यानुसार दिनांक १०/९/२०१२ ला जिल्हास्तरावरील समायोजनाची कार्यवाही समुपदेशनाने केलेली आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) व २) शिस्तभंग विषयक कार्यवाही हे अर्धन्यायिक कार्यवाही आहे. सबब संबंधित नियमाच्या तरतूदी अंतर्गत आयुक्त, शिक्षण यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यावर शासन स्तरावर नियमानुसार कार्यवाही सुरु करण्यात येईल.

(३) शासन निर्णय क्र. जिपब ५११/प्र.क्र.५४/आ १४, दिनांक १८/५/२०११ मुद्दा क्र. १० मधील तरतुदीनुसार विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी कार्यवाही केलेली आहे.

**चौकशी अहवाल**

उपरोक्त संदर्भिय क्रमांक १ मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अमरावती यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यालयीन पत्र क्र.जिप/शि/सूना/२३३/०१६ दिनांक ७/१/२०१६ अन्वये पंचायत समिती धारणी, चिखलदरा, अमरावती, वरुड व दर्यापूर यांना सन २०११-२०१२ तालुका स्तरीय शिक्षकांचे समायोजन बाबतचे रेकॉर्ड उपलब्ध करुन देवून गट शिक्षणाधिकारी यांची सुनावणी शिक्षण विभाग, जि.प. अमरावती येथे दिनांक १२/१/२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता ठेवण्यात आली असता पंचायत समिती चिखलदरा, दर्यापूर, वरुड, अमरावती व धारणी येथील गट शिक्षणाधिकारी सुनावणीस हजर होते. दिनांक १२/१/२०१६ रोजी पंचायत समिती चिखलदरा, अमरावती व दर्यापूर यांनी रेकॉर्ड उपलब्ध करुन दिलेत. पंचायत समिती वरुड व धारणी यांना विनाविलंब शिक्षक समायोजन रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देशीत करण्यात आले असता वरुड यांनी दिनांक २०/१/२०१६ व धारणी गटशिक्षणाधिकारी यांनी दिनांक २३/१/२०१६ रोजी रेकॉर्ड उपलब्ध करुन दिलेत. शिक्षक समायोजन २०११ बाबत रेकॉर्ड तपासणी केली असता खालील प्रमाणे स्थिती दिसून आली आहे.

१. पंचायत समिती अमरावती गटशिक्षणाधिकारी यांनी दिनांक २७/१२/२०११ रोजी शिक्षकांचे समायोजन केलेले दिसून आले असून सदर समायोजन विहित मुदतीत झाल्याचे दिसून येत आहे.

२. पंचायत समिती दर्यापूर गटशिक्षणाधिकारी यांनी दिनांक २८/१२/२०११ रोजी शिक्षकांचे समायोजन केलेले दिसून आले असून सदर समायोजन विहित मुदतीत झाल्याचे दिसून येत आहे.

३. पंचायत समिती, वरुड गटशिक्षणाधिकारी यांनी दिनांक २५/११/२०११ रोजी शिक्षकांचे समायोजन केलेले दिसून आले असून सदर समायोजन विहित मुदतीत झाल्याचे दिसून येत आहे.

४. पंचायत समिती, चिखलदरा येथील शिक्षक समायोजन रेकॉर्ड तपासले असता खालील स्थिती दिसून येते.

(अ) समायोजनाबाबत प्रथम टिप्पणी दिनांक १९/११/२०११ रोजी सादर केलेली दिसून येते.

(ब) समायोजन तारीख ६/१/२०१२ निश्चित केली असून प्रत्यक्षात समायोजन प्रक्रिया दिनांक ९/३/२०१२ रोजी विलंबाने राबविण्यात आल्याने दिसून आले.

५. पंचायत समिती धारणी गटशिक्षणाधिकारी यांनी दिनांक २३/१/२०१६ रोजी कार्यालयाला रेकॉर्ड उपलब्ध करुन दिल्याने रेकॉर्डची तपासणी केली असता खालील स्थिती दिसून आली.

(अ) समायोजनाबाबत प्रथम टिप्पणी दिनांक ३०/४/२०१२ रोजी सादर केल्याचे दिसून येते.

(ब) जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणूक आचारसंहिता दिनांक १३/३/२०१२ ते २१/४/२०१२ तसेच विधान परिषद निवडणूक आचार संहिता दिनांक २३/४/२०१२ ते ७/६/२०१२ पर्यंत असल्याची दिसून आले.

(क) दिनांक ८/६/२०१२ रोजी शिक्षकांचे समायोजन विलंबाने झाल्याचे दिसून येत आहे.

(अ) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, चिखलदरा यांनी तालुकास्तरीय शिक्षक समायोजन २०११ दिनांक ९/३/२०१२ रोजी केले असून सदर शिक्षक समायोजन ३ महिने विलंबाने झालेले दिसून आले.

(ब) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती धारणी यांनी तालुकास्तरीय शिक्षक समायोजन २०११ दिनांक ८/६/२०१२ रोजी केले असून सदर शिक्षक समायोजन ६ महिने विलंबाने झाल्याचे दिसून आले.

धारणी व चिखलदरा येथील तत्कालीन गटशिक्षणाधिकारी यांनी शिक्षक निर्धारणामध्ये जबाबदारीने विशेष लक्ष घालुन शिक्षक समायोजनाचे काम न केल्याने तसेच अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे तसेच कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून आल्याने तत्कालीन गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती धारणी व चिखलदरा यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम १९७९ अन्वये शिस्त भंग विषयक कार्यवाही करणे उचित होईल असे माझे स्पष्ट मत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक कर्मचा-यांचे विलंबाने समायोजन केल्यामुळे शासनाचे सुमारे १ कोटी ९० लाख रुपये निष्फळ गेले आहेत. या संदर्भातील कारवाईचा प्रस्ताव माननीय आयुक्त (शिक्षण) पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावातील कारवाईस पात्र असलेल्या दोषी अधिका-यांची नावे काय आहेत, यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, सदर प्रकरणी श्री. रमेश सोने, तत्कालीन गट शिक्षणाधिकारी, चिखलदरा व श्री. एस.के.शेटे, तत्कालीन गट शिक्षणधिकारी, धारणी दोषी आढळून आले आहेत. यांच्या कारवाईचा प्रस्ताव मा. शिक्षण आयुक्त, पुणे यांच्याकडे दिनांक १८ मे, २०१६ रोजी सादर करण्यात आला होता. या प्रस्तावामध्ये काही त्रुटी आढळून आल्यामुळे तो प्रस्ताव परत आला होता. सदर त्रुटीची पूर्तता करुन पत्र क्रमांक ११२१३ दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी फेर सादर करण्यात आलेला आहे. या प्रकरणी दोषी असलेले दोन्ही अधिकारी सन २०१५ मध्ये सेवा निवृत्त झालेले आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, या सेवानिवृत्त अधिका-यांवर जिल्हा परिषदेने व विभागाने काय कारवाई केली आहे. यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला विदित केले की, सदर प्रकरण सन २०११ मधील असून या प्रकरणास चार वर्षाचा कालावधी झालेला आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक कर्मचा-यांचे विलंबाने समायोजन प्रकरणामध्ये सुमारे १ कोटी ९० लाख रुपयांची अनियमितता झालेली आहे. या प्रकरणी आतापर्यंत चौकशी होणे आवश्यक होते. सदर प्रकरणी चौकशी करण्याची जबाबदारी सचिवांची आहे. त्यांनी जबाबदारी का पार पाडली नाही. सदर प्रकरण सन २०११ चे असून सन २०११ ते सन २०१७ पर्यंत दोषीअधिका-यांवर कोणतीच कारवाई झालेली नाही. या कालावधीमध्ये संबंधित अधिकारी सेवा निवृत्त झाले. त्यांच्यावर योग्य वेळी कोणतीही कारवाई केली नाही. या दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यास विलंब झालेल्या घटनेस जबाबदार कोण आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन योग्य प्रकारे झालेले नाही. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याचे नियम आहेत, त्या नियमानुसारच शिक्षकांचे समायोजनाची प्रक्रिया करावी लागते. जरी अतिरिक्त शिक्षक असले तरी कोणत्याही शिक्षकांस सेवेतून कमी करता येत नाही. समायोजन कालावधी मध्ये कोणत्याही नवीन शिक्षकांची भरती केली जात नाही. जेथे शिक्षकांची आवश्यकता आहे, अशा ठिकाणी अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केले जाते. अधिका-यांच्या चुकीमध्ये शिक्षकांचे समायोजन झालेले नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न केल्यामुळे शासनाचे सुमारे १ कोटी ९० लाख रुपये वाया गेले आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केल्यानंतरही हा निधी खर्च झाला असता फरक एवढाच आहे की, सदर शिक्षकांचे समायोजन योग्य वेळी झाले असते तर गरजू विद्यार्थ्यांना चांगले शिक्षक मिळाले असते. काही शाळेतील विद्यार्थी शिक्षकांअभावी वंचित राहिलेले आहेत. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, शासकीय अधिका-यांच्या ढिसाळ कारभारामुळे जे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिले आहेत तसेच संबंधित शिक्षकांना विनाकारण पगार द्यावा लागला यास कोण जबाबदार आहे, या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याची प्रक्रिया फारच गुंतागुंतीची असल्यामुळे अशा प्रकारच्या शिक्षकांचे समायोजन करण्यास केव्हाही ब-याच दिवसांचा कालावधी लागतो ही वस्तुस्थिती आहे. आता ही प्रक्रिया ऑनलाईन केलेली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषी अधिका-यांवर ३१ ऑक्टोबरपर्यंत कारवाई करणे बंधनकारक असतांना अमरावती जिल्हयातील ४ तालुक्यांतील शिक्षक कर्मचा-यांचे समायोजन १० महिने १४ दिवस विलंबाने केल्यामुळे शासनाचे सुमारे १ कोटी ९० लाख रुपये निष्फळ गेले आहेत. या प्रकरणी दोषी अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे, तसेच ही कारवाई किती दिवसांत पूर्ण करणार आहात, श्री. रमेश सोने, तत्कालीन गट शिक्षणाधिकारी चिखलदरा व श्री. एस.के. शेटे, तत्कालीन गट शिक्षणाधिकारी धारणी हे दोघे दोषी आहेत. समितीने आक्षेप घेतल्यानंतर यासंदर्भातील कार्यवाही तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावयास पाहिजे होती, परंतु त्यांना संरक्षण दिले आहे. त्यामुळे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी हे दोषी आहेत, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विहित कालावधीत त्यांची जबाबदारी पार पाडलेली नाही. या समितीच्या प्रश्नावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, या संदर्भातील कार्यवाही ग्रामविकास विभागाकडून करणे अपेक्षित आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांचा हा विषय आहे. हा विषय ग्रामविकास विभागाच्या अखत्यारित आहे. शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे यांचा देखील संबंध येतो. प्राथमिक शाळेचा विषय असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर कारवाई ग्रामविकास विभाग करु शकते. तद्नंतर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, यासंदर्भात ग्रामविकास विभागाच्या सचिवांना कळविण्यात येईल. यावर समितीने पुढे विचारणा केली की, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक कर्मचा-यांचे विलंबाने समायोजन करण्याचा हा विषय आहे. सामान्य प्रशासन विभाग व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भात वारंवार बैठका घ्यायला पाहिजे होत्या. शिक्षकांच्या आकृतिबंधानुसार तपासणी करुन अनुशेष भरणे आवश्यक होते. यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी दोषी असून त्यांचा उल्लेख कारवाईमध्ये करण्यात आलेला नाही. तपासणी अहवालात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा उल्लेख करण्यात आलेला नाही. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यामधील खरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, ज्या ठिकाणी शिक्षकांची गरज होती तेथे शिक्षकांची उपलब्धता वेळेत करुन न दिल्यामुळे तेथील मुले शिक्षणापासून वंचित राहिले आहेत काय, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना वेतन देण्याचे धोरण शासनाचे आहे. त्यामुळे १ कोटी ९० लाख रुपये त्यांना उशिराने दिले काय त्याचा काही फरक पडत नाही. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन किंवा त्यांच्या बदल्या तातडीने करणे आवश्यक होते. समायोजनास गट विकास अधिकारी यांनी मंजुरी दिली. त्यावेळी तातडीने शिक्षकांच्या बदल्या वेळेत न झाल्यामुळे काही शाळांना शिक्षक मिळाले किंवा नाही हा भाग अतिशय महत्वाचा आहे. त्या कालावधीत काही मुले शिक्षणापासुन वंचित राहिले आहेत काय याचा विचार करणे आवश्यक आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही संपूर्ण चौकशी वेळेत पूर्ण करावयास पाहिजे होती. तत्कालीन कार्यालय प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गट शिक्षणाधिकारी व गट विकास अधिकारी यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे होती. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गट विकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांना पाठीशी घातले आहे. चौकशी अहवालामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर दोषारोप केल्याचे दिसून येत नाही. यावर समितीने असे निदेश दिले की, हा विषय अत्यंत गांभीर्याने घेतला पाहिजे. गट शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही अनियमितता केलेली आहे. १ कोटी ९० लाख रुपयांचा हा विषय आहे. हा विषय अंतिम टप्प्यात असताना ही सर्व कार्यवाही आतापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. चौकशी करुन दोषीवर किती दिवसात कारवाई करण्यात येईल. त्याची माहिती समितीला देण्यात यावी. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये दोन विभाग व आयुक्त, शिक्षण पुणे यांचा संबंध आहे. ग्रामविकास विभाग व शिक्षण आयुक्त पुणे यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यावर दोन महिन्यात कारवाई करण्यात येईल. यावर समितीने असे निदेश दिले की, दोन्ही विभागांनी संपूर्ण कार्यवाही करुन एक महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीसमोर मागणी केली की, ३१ डिसेंबर पर्यंत अहवाल सादर करण्यास समितीला मुदत द्यावी. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, १ डिसेंबर पर्यंत समितीला अहवाल सादर करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०११-१२ मध्ये जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत पटसंख्येनुसार एकूण ३१७ शिक्षकांचे समायोजन विलंबाने झाले. त्यामुळे सुमारे १ कोटी ८७ लाख रुपये निष्फळ गेले असा प्रमुख आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला. एकूण १०२ मुख्याध्यापकांची पदे रिक्त असतांना पदोन्नतीच्या प्रक्रियेत केवळ १६ शिक्षकांनी पदोन्नती स्वीकारणे, तसेच निवडणुकीची आचारसंहिता असल्याने शिक्षकांचे समायोजन करता आले नाही असा खुलासा जिल्हा परिषद प्रशासनाने समितीकडे केला.

समितीने यासंदर्भात सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले होते. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन विलंबाने झाल्यामुळे शासनाचे १ कोटी ९० लाख रुपये वाया गेले नसून समायोजन वेळेवर झाले असते तरी या शिक्षकांना वेतन देणे भागच होते. विलंबाचा तोटा येवढाच की समायोजन वेळेवर झाले असते तर गरजू विद्यार्थ्यांना चांगले शिक्षक मिळाले असते, काही शाळांतील विद्यार्थी शिक्षकांअभावी वंचित राहीले. समायोजनाची प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय दिनांक १२ मे, २०११ मध्ये विहीत केल्याप्रमाणे पार पाडणे आवश्यक होते, त्याप्रमाणे ती पार पाडण्यात आलेली नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. समितीच्या निदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या चौकशीत धारणी व चिखलदरा येथील तत्कालिन गटशिक्षणाधिकारी यांनी यांच्यावर विलंबाची जबाबदारी निश्चित केलेली आहे. **सदरहू गटशिक्षणाधिकारी यांच्यावर विभागीय चौकशीचे दोषारोप दिनांक १८ मे, २०१६ रोजी आयुक्त (शिक्षण) यांच्याकडे पाठविण्यात आले. सदरहू दोषारोपात त्रुटी आढळून आल्यामुळे त्यांची पुर्तता करण्यास ७ महिन्यांचा विलंब झालेला आहे. दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी म्हणजे ७ महिन्यांच्या विलंबाने त्रुटींची पुर्तता करण्यास झालेल्या विलंबाची देखील विभागाने चौकशी करावी व या प्रकरणी जो विभाग अधिकारी जबाबदार असेल त्यांचेवर कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी कारवाई प्रस्तावित करावी व कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

शासन निर्णय दिनांक १२ मे, २०११ नुसार दरवर्षी दिनांक ३० सप्टेंबर अखेर जिल्हा परिषद शाळांतील पटसंख्या निश्चित केल्यानंतर त्या आधारे अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करणे आवश्यक असते. असे करताना जिल्हा स्तरीय शिक्षक संघटनांच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेवानिवृत्तीस ५ वर्ष शिल्लक कालावधी असलेल्या व्यक्तींना समायोजनांच्या प्रकियेतून वगळण्यात आलेले आहे. तसेच विधवा, अपंग इत्यादींचे तालुक्यातच समायोजन करणे आवश्यक आहे. समायोजनापूर्वी पदोन्नतीची कार्यवाही करणे आवश्यक असते. समायोजन करताना ३० सप्टेंबर ही तारीख विचारात घेऊन २० ऑक्टोबर पर्यंत विभागीय शिक्षक उपसंचालक यांनी मान्यतेची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक असते. त्यांनी २५ ऑक्टोबर पर्यंत निर्णय न घेतल्यास त्यांची मान्यता गृहित धरुन समायोजनेचे काम ३१ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करणे अनिवार्य आहे. यासंदर्भात काही तक्रारी असल्यास विभागीय आयुक्तांनी देखील त्या २५ नोव्हेंबर पर्यंत निकाली काढण्याचे सदर शासन निर्णयात नमुद करण्यात आलेले आहे. समायोजन करताना निवडणुक आचार संहितेचा भंग होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना शासन निर्णयात दिलेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणात ३० नोव्हेंबर ते १७ डिसेंबर, २०११ व २६ डिसेंबर, २०११ ते १७ फेब्रुवारी, २०१२ तसेच ३ जानेवारी ते १७ फेब्रुवारी, २०१२ व १५ मार्च ते १६ एप्रिल, २०१२ या कालावधीमध्ये अमरावती जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेचा जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगरपालिका व्यवस्थापन तसेच निवडणूक याबाबतची आचारसंहिता असल्यामुळे शिक्षकांचे समायोजन करता आले नाही हा जिल्हा प्रशासनाचा खुलासा समितीला तांत्रिकदृष्ट्या पटणारा नाही. वस्तुतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी निगडीत असलेल्या समायोजन प्रक्रियेत आचार संहितेचा प्रत्यवाय येण्याचे कारण नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. **त्यामुळे यापुढील काळात शिक्षकांचे समायोजन करते वेळी राज्यात कोठे ना कोठे एखादी आचारसंहिता असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, राज्य निवडणूक आयोगाकडे संदर्भ करुन शासनाने यासंदर्भातील स्पष्ट सूचना सुधारीत शासन निर्णयाद्वारे निर्गमित कराव्यात अशी समितीची शिफारस आहे. तसेच दिनांक १२ मे, २०११ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे जिल्ह्यातील मान्यता प्राप्त शिक्षक संघटनांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना समायोजनाच्या प्रक्रियेतून वगळण्याचा जो निर्णय घेतलेला आहे तो समायोजनाच्या प्रक्रियेस छेद देणारा असून त्यामुळे समायोजनाची संपूर्ण प्रक्रिया प्रभावित होते ही बाब टाळण्यासाठी समायोजनाच्या यादीत त्यांचा देखील समावेश करावा अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, अमरावती

### शालेय पोषण आहार खरेदी खर्चातील अनियमितताबाबत

**(परिच्छेद ३.१२४/२०) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद, अमरावती सन २०११-२०१२ (परिच्छेद क्र.२०)- जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत शालेय पोषण आहार खरेदीवर इयत्ता १ ली ते ५ वी रक्कम रुपये ११,१९,६७,००० व इयत्ता ६ वी ते ८ वी रक्कम रुपये ११,०४,८१,००० एकुण रुपये २२,२४,४८,००० खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) अन्न शिजवणा-या यंत्रणांनी आठवडयातून किमान एक दिवस विद्यार्थ्यांना पुरक आहार (उदा. फळे, सोया, बिस्किट, दुध, चिक्की, राजगिरा, लाडू, गुळ, शेंगदाणे, चुरमूरे) इत्यादी देणे आवश्यक असताना अशा प्रकारचा आहार दिल्याबाबत कोणत्याही शाळेचा पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

(२) महाराष्ट्र शासन, परिपत्रक प्राथमिक शिक्षण संचालनालय शापोआ/प्राशिअ/ब-३०३/२०१०-११/२१८२ दिनांक २५/०५/२०१० तील सूचना क्रमांक १० नुसार तांदुळ व इतर धान्य उतरवून घेताना मालाचा दर्जा, वजन योग्य असल्याबाबत तसेच भारतीय अन्न महामंडळाकडून FCT चा शिक्का असल्याची खात्री करुन प्रमाणित करण्यात यावे, असे असताना छापील रबरी शिक्क्यावर त्रोटक प्रमाणपत्र व दिनांकाशिवाय प्रमाणपत्र नोंदवून देयक अदा केल्याचे दिसून येते.

(३) शाळेला धान्य केव्हा प्राप्त झाले याबाबत प्राधिकृत अधिका-याने प्रमाणित केले नसल्याने मालाचा पुरवठा पुरवठाधारकाने केव्हा केला याबाबत स्पष्ट होत नसल्याचे दिसून येते.

(४) करारनाम्यानतील अट क्रमांक ११ नुसार पुरवठा धारकाने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांच्या कार्यालयात आलेल्या आहारसंबंधी पावत्या प्राप्त करुन घेईल व पिवळया रंगाची पावती पुरवठाधारकाने देयकासोबत जोडून ते देयक सादर करणे आवश्यक असताना अर्धसमास पत्र क्र.५ दिनांक ११/१०/२०१२ नुसार मागणी करुनही प्राप्त न झाल्याने धान्याच्या वजनाबाबत सत्यता पडताळता आली नसल्याचे दिसते. पावती सादर करणे आवश्यक आहे.

(५) योजनेच्या त्रैमासिक अहवालानुसार इयत्ता १ ली ते ५ वी व ६ वी ते ८ वी मध्ये तांदुळ शिल्लक निरंक असल्याचे आढळून आले, परंतु प्रत्यक्षात शाळा स्तरावर तांदुळ शिल्लक निरंक असल्याबाबत तपासणी करण्यात आल्याबाबतचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध नसल्याने पडताळणी करता आली नसल्याचे दिसते. अभिलेखे उपलब्ध करणे आवश्यक आहे.

(६) पंचायत समिती, धामणगाव रेल्वे अंतर्गत ( इ.१ ली ते ५ वी) शाळांना माल पुरविण्याची यादी जोडलेली नसताना रक्कम रुपये ३,१५,९९० अदा केल्याचे दिसून येते.

(७) प्राथमिक शिक्षण संचालनालय क्रमांक शापोआ/सुधायो/प्रशिस/३०३/११-१२, ७१७७ (अ) दिनांक ०१/११/२०११ मधील बाब क्रमांक ७ नुसार संबंधित पुरवठाधारकास धान्यादी मालाचा पुरवठा केलेल्या शासकीय प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल वेळेत आलेला नसतानाही पुरवठादाराला पूर्ण रक्कम अदा केल्याचे दिसून येते. तसेच शासकीय प्रयोगशाळेत पुरवठा केलेल्या मालाचे नमुने पाठविणे आवश्यक असताना डिस्ट्रीक हेल्थ लॅबोरेटरी अमरावतीचा चाचणी अहवाल देयकासोबत जोडलेला असल्याचे दिसून येते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर आक्षेपाबाबत खालील प्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

(१) अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांनी आठवड्यातून विद्यार्थ्यांना एक दिवस पुरक आहार नियमितपणे देणे बंधनकारक आहे. त्यानुसार शासनाकडून इंधन, भाजीपाला व पूरक आहार या तीनही खर्चाकरीता अनुदान प्रती लाभार्थी प्रती दिन वर्ग १ ते ५ करिता रुपये १/- व वर्ग ६ ते ८ करीता रु.१.३० पैसे या प्रमाणे ग्रामीण भागाकरीता देण्यात येते. त्यानुसार शाळा स्तरावर इंधन, भाजीपाला व पूरक आहाराच्या खर्चाची देयके ही शालेय पोषण आहाराच्या रोख पुस्तिकेला खर्च खतवण्यात येतो व त्यानुसार विद्यार्थ्यांना पूरक आहार दिल्याचे दिसते. सदरच्या खर्चाची मुळ देयके शाळा स्तरावर संग्रही आहेत.

(२) महाराष्ट्र शासन परिपत्रक प्राथमिक शिक्षण संचालनालय शापोआ/प्राशिस/३०३/२०१०-११/२१८२ दि.२५/०५/२०१० च्या परिपत्रकानुसार मुख्याध्यापक यांचेकडे पुरवठा दाराकडून धान्यादी व तांदुळाचा पुरवठा केला जातो, त्या डिलेव्हरी मेमोवर "वरील तपशिलप्रमाणे सर्व माल चांगल्या प्रतीचा प्रत्यक्ष मोजून माझ्या ताब्यात मिळाला, काही तक्रार नाही" अशा आशयाची पोच पावती प्रमाणित प्रमाणपत्र मुख्याध्यापक यांचे स्वाक्षरीचे असते त्याआधारे देयकाचे भुगतान संबंधित पुरवठादारास करण्यात येते. तसेच भारतीय अन्न महामंडळाकडून सिलबंद तांदूळाच्या पोत्याचा वजनानुसार पुरवठा होतो व सीलबंद तांदूळाच्या पोत्याचा पुरवठा शाळा स्तरावर करण्यात येतो.

(३) सद्यःस्थितीत स्वाक्षरी व दिनांक नमुद करण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत.

(४) करारनाम्यातील अट क्रमांक ११ नुसार आहारासंबंधीत पुरवठादार हे शाळा स्तरावर मालाचा पुरवठा करतो, त्यावेळेस चार रंगाच्या छापील पावत्या पुरवठादाराकडे असतात. सदरच्या पावत्या करारनाम्यानुसार गुलाबी रंगाची पावती ही मुख्याध्यापक यांचेकडे असते व पिवळ्या रंगाची पावती ही गट शिक्षणाधिकारी यांचेकडे देयक सादर करतांना पुरवठादार देतो. पांढऱ्या व निळ्या रंगाची पावती ही पुरवठादार स्वतःची प्रत म्हणून ठेवतो. सदर बाब करारनाम्यामध्ये नमुद असल्याने त्याप्रमाणे विभागाने गट शिक्षणाधिकारी पातळीवर करारनाम्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

(५) शासनाने ठरवून दिलेल्या मंजूर नियतनानुसार FCI कडून उपलब्ध तांदूळाची पुर्णतः उचल केली जाते व तालुक्याच्या मागणीनुसार तांदुळ पुरवठादारांकडून शाळा स्तरावर पाठविल्या गेल्यानंतर त्रैमासिक अहवालामध्ये तांदुळाचा साठा निरंक दर्शविण्यात येतो. लेखापरिक्षण अधिकारी यांनी लेखापरिक्षण जिल्हा स्तरावरील असल्याने जिल्हा स्तरावरील तांदुळाचा माहे मार्च अखेरपर्यंत साठा निरंक राहतो. याबाबत प्रत्यक्ष साठा मुळ नोंदवह्या अभिलेखे हे शाळास्तरावर उपलब्ध आहेत.

(६) पंचायत समिती धामणगांव रेल्वे अंतर्गत शाळांना माल पुरवठ्याची प्रमाणित यादी शिवाय देयक दिले गेले नाही.

(७) दिनांक २५/०५/२०१० च्या शासन निर्णयानुसार गट शिक्षणाधिकारी हे त्यांच्या स्तरावरील त्या त्या महिन्यामध्ये पुरवठा केलेल्या धान्यादी मालाचे नमुने घेवून जिल्हा प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येतात, त्यानुसार प्रयोगशाळेचा अहवाल योग्य असल्याचे प्रमाणित होते. तद्नंतरच देयकाचे भूगतान केले गेले आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहार योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना आठवड्यातून एक दिवस पूरक आहार दिल्याचे कोणते अभिलेख शाळांनी ठेवले आहेत, पूरक आहार दिल्याची खात्री कोणी व कशाच्या आधारे केली, तसेच तांदूळ व धान्यादी मालाच्या पुरवठ्याबाबत मालाचा दर्जा व वजन योग्य असल्याबाबतचे मुख्याध्यापकाकडून घेण्यात आलेले प्रमाणपत्र लेखापरीक्षणास का दाखविण्यात आले नाही, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस माहिती दिली की, इंधन व भाजीपाला या खर्चासाठी शाळेला इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत प्रती लाभार्थी १ रुपया अनुदान मिळते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, विद्यार्थ्यांना पूरक आहार दिल्याचे कोणते अभिलेख शाळांनी ठेवले आहेत, तसेच, तांदूळ व धान्यादी मालाच्या पुरवठ्याबाबत मालाचा दर्जा व वजन योग्य असल्याबाबतचे मुख्याध्यापकाकडून घेण्यात आलेले प्रमाणपत्र लेखापरीक्षणास का दाखविण्यात आले नाही, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस प्रतिपादित केले की, माल मिळाल्याचे रेकॉर्डवर दाखविले आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अहवालाची पाहणी केली असता त्यांना सन २०१३ चे रेकॉर्ड बघावयास मिळाले. परंतु, सन २०११-१२ चे रेकॉर्ड बघावयास मिळाले नाही. जो माल ताब्यात घेण्यात आला त्याबाबत तक्रार नाही असे पावतीवरुन दिसून येते. तसेच, जे शिक्के मारण्यात आलेले आहेत ते अस्पष्ट आहेत.

समितीने पुढे विचारणा केली की, विद्यार्थ्यांना फळे, राजगिऱ्याचे लाडू, चिक्की इत्यादी पूरक आहार देणे आवश्यक असताना अशा प्रकारचा आहार देण्यात आल्याचा कोणताही पुरावा सादर करण्यात आलेला नाही. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस माहिती दिली की, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी रेकॉर्ड बघितले असता त्यांना सन २०१३ चे रेकॉर्ड बघावयास मिळाले. परंतु, सन २०११-१२ चे रेकॉर्ड बघावयास मिळाले नाही. त्यावेळी श्री. सोनारकर, लेखाधिकारी आणि श्री. अभ्यंकर शिक्षणाधिकारी होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, माल मिळाल्याची तारीख नमूद करण्यात

आलेली नाही, तसेच, जे शिक्के मारण्यात आलेले आहेत ते अस्पष्ट आहेत. माल मिळाल्याची नोंद नसेल तर ती गंभीर बाब नाही काय, अशी विचारणा केली असता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी होकारार्थी उत्तर दिले ही गंभीर बाब आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, माल प्राप्त झाल्याची तारीख नमूद केलेली नसेल तर माल कोणत्या तारखेला प्राप्त झाला हे कसे काय कळेल, या समितीच्या प्रश्नावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस अशी माहिती दिली की, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पावत्या तपासल्या असता त्यांना त्यावर तारीख नमूद केलेली नसल्याचे आढळून आले. तसेच, जे शिक्के मारण्यात आलेले आहेत ते अस्पष्ट स्वरुपाचे आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, माल प्राप्त झाला तर मग तो कोठे गेला, हे सर्व संदिग्ध स्वरुपाचे आहे, आपल्याकडे विद्यार्थ्यांना पूरक पोषण आहार दिल्याची नोंद आहे काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस नकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागात कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. शालेय पोषण आहाराचा माल प्राप्त झाल्याची नोंद नसेल तर ती गंभीर बाब आहे. समितीने इतर जिल्ह्यातील शाळांना भेट दिल्यानंतर शाळेत जेवणाच्या संदर्भातील रजिस्टर ठेवले नसेल तर संबंधितांवर दंडात्मक कारवाई केलेली आहे, अमरावती जिल्ह्यातील कुपोषणाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले आहे. परंतु, अमरावती जिल्ह्यात शालेय पोषण आहार आणि पूरक पोषण आहाराबाबत अशा प्रकारे उदासिनता असेल तर यापेक्षा दुसरी गंभीर बाब कोणतीच असू शकत नाही असे मत मांडून समितीने अशी विचारणा केली की, मालाचा पुरवठा कोणाकडून झालेला आहे, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस सांगितले की, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग लिमिटेड यांच्याकडून मालाचा पुरवठा केला जातो. पूरक पोषण आहारासाठी शाळा स्तरावर रक्कम दिली जाते. त्यातून ते खरेदी करतात. महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड यांच्याकडून पूरक पोषण आहाराचा पुरवठा होत नाही.

समितीने पुढे विचारणा केली की, २२ कोटी २४ लाख रुपये खर्च झालेले आहेत. जो तांदूळ प्राप्त झाला तो मोजून घेतलेला नाही. हे सर्व जाणीवपूर्वक केलेले आहे असे दिसते. तसेच, लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्रे दाखविण्यात आलेली नाहीत, शाळेला धान्य केव्हा प्राप्त झाले याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणपत्र केव्हा दिले, याबाबत साठा नोंदवहीमध्ये दिनांकित नोंदी घेण्यात आल्या आहेत काय, तसेच, शाळांना धान्य पुरवठ्याच्या देयकासोबत देण्यात आलेल्या पिवळ्या पावत्या व शाळेतील तांदूळ साठा निरंक असल्याचा तपासणी अहवाल हे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत, या अनियमिततेस कोण जबाबदार आहे, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस सांगितले की, गुलाबी रंगाच्या पावत्या मुख्याध्यापकांकडे असतात आणि पिवळ्या रंगाच्या पावत्या गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे असतात. गट शिक्षणाधिकारी बिल तयार करून पाठवितात. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे पावत्या उपलब्ध आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अर्धसमास पत्र क्र.५, दिनांक ११-१०-२०१२ नुसार मागणी करूनही पिवळ्या रंगाच्या पावत्या सादर करण्यात आलेल्या नाहीत. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी नस्ती बघितली असता ती उपलब्ध आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांनी समितीस आश्वासित केले की, तत्कालीन अधिकाऱ्यांनी पावत्यांचे रेकॉर्ड ठेवलेले नाही. जे काही चुकीचे झालेले आहे त्या संदर्भात निदेशानुसार जिल्हा परिषदेकडून कार्यवाही करण्यात येईल. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, श्री.सोनारकर तत्कालीन अधिकारी आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, इयत्ता पहिली ते पाचवीच्या शाळांना माल पुरविल्याची यादी देयकासोबत जोडलेली नसताना रु.३,१५,९९० चे प्रदान कोणत्या प्राधिकारात केले, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस माहिती दिली की, पंचायत समिती, धामणगांव रेल्वे अंतर्गत शाळांना माल पुरविल्याची यादी प्रमाणित केलेली नाही, असे लेखा परिक्षकांचे म्हणणे आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, त्यावेळी शाळांना माल पुरविल्याची यादी देयकासोबत जोडलेली नसताना धनादेश कसा काय काढण्यात आला, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस प्रतिपादीत केले की, यादी जोडलेली आहे त्यावेळी यादी उपलब्ध करुन दिली नाही म्हणून जिल्हा परिषद तत्कालीन अधिकाऱ्यांवर कारवाई करेल. जिल्हा परिषद त्यांची वेतनवाढ थांबवू शकते किंवा त्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करु शकते. जे दोषी आहेत त्यांना जिल्हा परिषदेने कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. दंडात्मक कारवाई केलेली नाही.

समितीने पुढे विचारणा केली की, धान्य मालाचा नमुना तपासणी अहवाल प्रयोग शाळेकडून कोणत्या दिनांकास प्राप्त झाला व पुरवठ्याचे देयक कोणत्या दिनांकास अदा केले, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस माहिती दिली की, प्रयोगशाळेकडे धान्य मालाचे नमुने पाठविण्यात आले होते. प्रयोगशाळेकडून दिनांक १-३-२०१२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे. दिनांक ५-३-२०१२, १५-३-२०१२ रोजी काही अहवाल प्राप्त झालेले आहेत.

समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड यांच्यावर काही कारवाई करण्यात आलेली आहे का, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस नकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्रयोग शाळेकडून चाचणी अहवाल कोणत्या तारखेला प्राप्त झाला आणि पुरवठ्याचे देयक कोणत्या तारखेला दिले, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस प्रतिपादित केले की, पुरवठ्याचे देयक कोणत्या तारखेला दिले याबाबतची माहिती आता उपलब्ध नाही.

यावर समितीने अशी पृच्छा केली की, शासन परिपत्रक दिनांक १-११-२००१ नुसार व करारनाम्यातील अट क्र.११ नुसार पुरवठाधारक शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्या कार्यालयात आलेल्या आहारासंबंधी पावत्या प्राप्त करुन देईल व पिवळ्या रंगाची पावती तो देयकासोबत जोडून सदर देयक गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर करील असे असताना विभागाने कोणतीही कारवाई केलेली नाही, या प्रकरणाची नस्ती समितीला दाखवावी. समितीला नस्ती दाखविण्यात आली असता समितीने अशी विचारणा केली की, तत्कालीन अधिकारी बैठकीस उपस्थित आहेत काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस माहिती दिली की, दोन्ही तत्कालीन अधिकाऱ्यांची प्रकृती ठीक नसल्याचा निरोप आलेला आहे. ते बैठकीकरिता आले नव्हते हॉस्पिटलमध्ये गेल्याचे सांगण्यात आले आहे. त्यातील एक अधिकारी परिक्षामंडळामध्ये आहे आणि एक अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सदरहू बाब गंभीर आहे. संबंधितांवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी, नस्ती तपासली असताना, त्यामध्ये असे निदर्शनास आले आहे की, आठवड्यातून किमान एक दिवस विद्यार्थ्यांना पुरक आहार दिला पाहीजे. त्यामध्ये सोयाबीन, चिक्की, राजगिरा इत्यादी आहार येतो. परंतु हा आहार देणे आवश्यक असताना त्यांनी तो दिलेला नाही, अशी नोंद या परिक्षणामध्ये आढळून आलेली आहे. अमरावती जिल्ह्यामधील मेळघाट तालुक्यात कुपोषीत बालकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे महाराष्ट्रात अमरावती जिल्ह्याकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाते. कुपोषणातून बाहेर येण्यासाठी शासन शेकडो कोटी रुपये खर्च करीत असते. असे असताना देखील विद्यार्थ्यांना पुरक आहार दिला गेला नसेल, तर ही बाब गंभीर आहे. या परिच्छेदामध्ये असे दिलेले आहे की, कुठलाही पुरावा सादर केलेला नाही. याचाच अर्थ विद्यार्थ्यांना पुरक पोषण आहार दिलेला नाही. त्यामुळे संबंधितांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. कुपोषणाची बाब गंभीर असताना देखील त्यांच्या पर्यंत पोषण आहार, धान्य पोहोचले नाही. त्याच्या पावत्या उपलब्ध नाही. आजच्या बैठकीत पावत्या उपलब्ध नसेल तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. ही बाब एका वर्षाची असून यापूर्वी देखील असे प्रकार घडले असतील. सदरहू रक्कम देखील मोठी आहे. या संदर्भात निर्णय न दिल्यास भविष्यातही असेच सुरु राहील. त्यामुळे सदरहू बाब गांभीर्याने घेतली पाहिजे. याबाबतची नस्ती समितीला उपलब्ध करुन द्यावी. तसेच लेखा परिक्षक यांनी पूर्वी याबाबतची तपासणी केलेली आहे. समितीचा मुद्दा आणि जिल्हा परिषदेचा मुद्दा एकत्रित तपासणी करण्यात यावी. या चौकशीत पुरवठादार किंवा गट शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी, मुख्याध्यापक किंवा पुरवठादार किंवा इतर यांनी अनियमितता केल्याचे आढळून आल्यास त्यांचा निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा व या चौकशीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा. तसेच दोषींवर निलंबनाच्या प्रस्तावासह जिल्हा परिषदेच्या वतीने एफआयआर दाखल करण्यात यावा, असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दिलेल्या पुरक आहाराचे सन २०११-२०१२ चे लेखे भेटीच्या वेळी दाखविण्यात आलेले नसणे, साहित्य प्राप्तीचा दिनांक नमुद केलेला नसणे, तसेच मारलेले शिक्के अस्पष्ट असणे, साहित्य खरेदीसाठी २२ कोटी २४ लाख रुपये खर्च झाला. तथापि देयकासोबत माल पुरविल्याची यादी नसतांनाही रुपये ३ लाख १५ हजार एवढ्या रक्कमेचा चेक काढण्यात आला होता, सबब याप्रकरणी चौकशीअंती दोषी असलेले पुरवठादार/ गट शिक्षणाधिकारी/ गट विकास अधिकारी/ मुख्याध्यापक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, असे निदेश समितीने दिले असुन त्यानुसार सदरहू प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये इ. १ ते ५ साठी एकुण रक्कम रु. ११,१९,६७,००० व इयत्ता ६ ते ८ साठी रु. ११,०४,८१,००० अशी दोन्ही मिळुन एकुण खर्च रुपये २२,२४,४८,००० एवढा खर्च झालेला आहे. सदर प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | इयत्ता | प्राप्त तरतूद (रु.) | धान्यादी मालाच्या खरेदीसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च रक्कम (रु.) | अन्न शिजविणे (इंधन/भाजी-पाला) पं.स वर वितरीत केलेले अनुदान रक्कम (रु.) | एकूण खर्च (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ ते ५ | १११९.६७ लक्ष | ५,८०,०४,८३९ | ५,३९,६२,१६१ | १११९.६७ लक्ष |
| २ | ६ ते ८ | ११०४.८१ लक्ष | ४,९३,६४,५१६ | ६,११,१६,४८४ | ११०४.८१ लक्ष |

जिल्हा परिषद अमरावती मार्फत सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून चौकशीचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

शासनाकडून इंधन व भाजीपाला यावरील खर्चाकरिता प्रति लाभार्थी प्रती दिन वर्ग १ ते ५ करिता रू.१ व वर्ग ६ ते ८ करिता रू.१.३० प्रमाणे ग्रामीण भागाकरीता अनुदान देण्यात येत होते. शासन निर्णय दिनांक २-२-२०११ प्रमाणे अन्न शिजवणाऱ्या यंत्रणांनी आठवडयातून एक दिवस विद्यार्थ्यांना पुरक आहार देण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे शाळांनी सादर केलेल्या दस्ताऐवजावरून व दुकानदाराच्या देयकावरून पुरक आहार दिल्याचे दिसून आले. शाळा स्तरावर पुरक आहार खरेदीचे व वाटपाबाबत उपप्रमाणके दप्तरी जमा असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. यात आर्थिक गैरव्यवहार झालेला नाही. पुरक आहाराबाबत नमुद करण्यात येते की, शासनाकडून अतिरिक्त निधी अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांना देण्यात येत नाही. इंधन व भाजीपाला यासाठी उपलब्ध अनुदानातून सदर खर्च भागविणे आवश्यक आहे पुरवठादार यांनी धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर गटशिक्षणाधिकारी यांनी शासकीय प्रयोग शाळेत तपासणी अहवाल देयकासोबत जोडलेला असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यानुसार देयकाचे शोधन झाले असल्याची प्रमाणकावरून खात्री झालेली आहे. शालेय पोषण आहाराच्या पोचपावतीवर पावती क्रमांक व दिनांक नमुद करण्यात येतो. तसेच देयकावर मारलेले शिक्के स्पष्ट असल्याचे दिसून आले.

प्रमाणक क्र.३८९७ दिनांक २९-३-२०१२ अन्वये एकूण रक्कम रुपये ५३,४०,९०१ पैकी पंचायत समिती धामणगाव अंतर्गत धान्य पुरवठा केल्याबाबत दि महाराष्ट्र स्टेट को. मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई ला अदा केलेली रक्कम रुपये ३,१५,९९० या देयकाची रक्कम माल पुरविल्याची यादी सोबत नसतांना वितरीत केल्याचा आक्षेप घेण्यात आलेला आहे.

वस्तुतः प्रमाणक क्रमांक ३८९७ दिनांक २९.०३.२०१२ मधील रक्कम रूपये ५३,४०,९०१ जिल्ह्यातील सर्व तालुक्यांसाठी वितरीत केलेली होती त्यापैकी पंचायत समिती धामणगाव साठी अदा केलेले देयक रक्कम रूपये ३,१५,९९० चे नसून देयकाची प्रत्यक्ष रक्कम रूपये ३,१४,८९० अशी आहे सदर रक्कम दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई यांना Tax invoice bill No. १६५ दिनांक ५-११-२०११ नुसार रुपये २,७५,७३५ + ३९,१५५ असे एकुण रुपये ३,१४,८९० एवढी रक्कम प्रत्यक्ष अदा केली. सदर देयकासोबत माल पुरविल्याची यादी उपलब्ध आहे.

चौकशी मध्ये सर्व प्रमाणक आवश्यक याद्या, अभिलेखे उपलब्ध असून देयके निकषानुसार असल्याचे आढळून आले. मात्र धान्यादि माल पुरविल्याची यादी सादर केली नसल्याने प्रशासकीय अनियमिततेबाबत कार्यालय प्रमुख म्हणून तत्कालीन शिक्षणाधिकारी, श्री. सुधाकर अभ्यंकर यांचेवर सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने शिस्तभंग विषयक कार्यवाहीचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.जिप/शिक्षण/शापोआ/४७०४, दि.७-५-२०१६ अन्वये मा.आयुक्त (शिक्षण) पुणे यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. तथापी श्री. सुधाकर अभ्यंकर हे दिनांक २५.०७.२०१६ रोजी मयत झालेले आहेत त्याच प्रमाणे यामध्ये श्रीमती सोनारकर, तत्कालीन लेखाधिकारी व श्री. सुजित पेठे, तत्कालीन वरीष्ठ सहायक, शालेय पोषण आहार यांनी वेळेत लेखा परिक्षणास प्रमाणके व अभिलेखे उपलब्ध करून न दिल्यामुळे त्यांचेकडून मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षण अधिनियम १९३० च्या कलम ७ अन्वये रूपये २५,००० दंडाची रक्कम चलान क्रमांक ४१५ दिनांक २२-१२-२०१६ अन्वये वसूल करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

याबाबत जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दिलेल्या पुरक आहाराचे सन २०११-२०१२ चे लेखे भेटीच्या वेळी दाखविण्यात आलेले नसणे, साहित्य प्राप्तीचा दिनांक नमुद केलेला नसणे, तसेच मारलेले शिक्के अस्पष्ट असणे, साहित्य खरेदीसाठी २२ कोटी २४ लाख रुपये खर्च झाला तथापि देयकासोबत माल पुरविल्याची यादी नसतांनाही रुपये ३ लाख १५ हजार एवढ्या रक्कमेचा धनादेश काढण्यात आला होता. सबब, याप्रकरणी चौकशीअंती दोषी असलेले पुरवठादार/गट शिक्षणाधिकारी/ गट विकास अधिकारी/ मुख्याध्यापक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, असे निदेश समितीने दिले असुन त्यानुसार सदरहू प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे.यावर विभागाकडून कोणतीही कारवाई अद्यापपर्यंत झालेली नसल्याने समितीने असे निदेश दिले की, नागपूर अधिवेशनात हा अहवाल समितीला सादर करावयाचा आहे. दोन्ही विभागांनी संपूर्ण कार्यवाही करुन एक महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीसमोर मागणी केली की, ३१ डिसेंबर पर्यंत अहवाल सादर करण्यास समितीला मुदत द्यावी. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, नागपूर अधिवेशनात अहवाल सादर करावयाचा आहे. त्यामुळे विभागाने ३१ डिसेंबरला अहवाल सादर करुन फायदा होणार नाही. यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीसमोर मागणी केली की, शालेय शिक्षण विभागाला एक महिन्याचा कालावधी देण्यात यावा. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, १ डिसेंबर पर्यंत समितीला अहवाल सादर करण्यात येईल. यावर समितीने असे निदेश दिले की, १ डिसेंबर पर्यंत सर्वसमावेशक अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

### अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत सन २०११-२०१२ या वर्षात शालेय पोषण आहार खरेदीवर इयत्ता १ ली ते ८ वी साठी एकूण रुपये २२,२४,४८,००० खर्च करण्यात आला. यासंदर्भात लेखा परिक्षकांनी प्रामुख्याने आक्षेप घेतला की, यंत्रणांनी विद्यार्थ्यांना पूरक आहार दिल्याबाबत पूरावा सादर केला नाही, प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे परिपत्रक दिनांक २५ मे, २०१० तील सूचना क्रमांक १० नुसार मालाचा दर्जा योग्य असल्याबाबत खात्री करुन प्रमाणित करणे आवश्यक असताना दिनांकाशिवाय प्रमाणपत्र नोंदविणे, शाळेला धान्य केव्हा प्राप्त झाले हे अधिका-याने प्रमाणित केले नसल्यामुळे स्पष्ट होत नाही. लेखापरिक्षकाने मागणी करुनही धान्याच्या वजनाबाबत सत्यता पडताळता आली नाही, योजनेच्या त्रैमासिक अहवालानुसार तांदूळ निरंक असल्याचे कोणतेही अभिलेख लेखापरिक्षकांस उपलब्ध झाले नाहीत, पंचायत समिती, धामणगांव रेल्वे अंतर्गत माल पुरविल्याची यादी जोडलेली नसताना पैसे अदा करणे, पुरवठा केलेल्या धान्यादी मालाचा शासकीय प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल वेळेत आलेला नसताना पुरवठादाराला पूर्ण रक्कम अदा करणे याप्रकारचे आक्षेप लेखा परिक्षकांनी घेतले. उपरोक्त आक्षेपासंदर्भात विद्यार्थ्यांना पूरक आहार दिल्याची मूळ देयके असल्याचे, भारतीय अन्न महामंडळाकडून सिलबंद वजनानुसार पुरवठा होत असल्याचे तसेच परिपत्रकानुसार पोच पावतीवर मुख्याध्यापक प्रमाणित करीत असल्याचे, तसेच साठा, मूळ नोंदवह्या, अभिलेखे शासनस्तरावर उपलब्ध असल्याचे आणि धान्यादी मालाचे नमूने जिल्हा प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येत असल्याचा जिल्हा परिषदेने लेखी खुलासा समितीकडे केला.

समितीने अमरावती जिल्हा परिषद येथे प्रत्यक्ष भेट देवून मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीस समाधानकारक माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे समितीने उक्त प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दिलेल्या पुरक आहाराचे सन २०११-२०१२ चे लेखे भेटीच्या वेळी दाखविण्यात आलेले नसणे, साहित्य प्राप्तीचा दिनांक नमुद केलेला नसणे, तसेच मारलेले शिक्के अस्पष्ट असणे, साहित्य खरेदीसाठी २२ कोटी २४ लाख रुपये खर्च होऊन देयकासोबत माल पुरविल्याची यादी नसतांनाही रुपये ३ लाख १५ हजार एवढ्या रक्कमेचा धनादेश काढण्यात आल्याप्रकरणी चौकशीअंती दोषी असलेले पुरवठादार/गट शिक्षणाधिकारी/ गट विकास अधिकारी/ मुख्याध्यापक यांच्यावर कोणती कारवाई केली याची माहिती मागविली.

समितीच्या निदेशानुसार केलेल्या चौकशीत शाळांनी सादर केलेल्या दस्तऐवज व दुकानाच्या देयकावरुन पूरक आहार दिल्याचे दिसून आले. यासंदर्भात गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही, असे चौकशी अहवालात सांगितले असले तरीही सर्व प्रमाणके, आवश्यक याद्या, अभिलेख लेखापरिक्षकांस उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. तसेच धान्यादी माल पुरविल्याची यादीच सादर केलेली नाही ही मोठी गंभीर बाब चौकशी दरम्यान उघडकीस आलेली आहे. तत्कालिन शिक्षणाधिकारी मयत झाल्यामुळे त्यांच्यावर विभागाने कारवाई केलेली नसली तरी संबंधित लेखाधिकारी, अधिक्षक, शालेय पोषण आहार वरिष्ठ सहाय्यकांची देयक सादर करण्यामध्ये व ते अदा करण्यामध्ये जबाबदारी निश्चित करणे आवश्यक होते ती न करता त्यांचेवर केवळ महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा संहिता अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार २५००० रुपये दंडाची कारवाई केली असून त्यांची वेतनवाढ थोपवून त्याबाबत सेवापुस्तकात नोंद घेतलेली नाही, याबाबत समिती खेद व्यक्त करते. **अत: धान्यादी माल पुरविण्याची यादी सादर करणे, त्याबाबतचे देयक सादर करणे व देयक अदा करणे याबाबतच्या गैरव्यवहारात जबाबदार असणाऱ्या व मयत झालेले शिक्षणाधिकारी, श्री. अभ्यंकर यांचे विभागात कार्यरत असणाऱ्या तत्कालिन सर्व संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व तत्संबंधीत अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, अमरावती

### साठवण तलाव जामुननाला, ता.चिखलदरा कामावर झालेल्या खर्चातील अनियमितता.

**(परिच्छेद ३.३२६/५) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद, अमरावती सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक ५) सदर कामास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी रक्कम रु.७,२६,२५२ प्रशासकीय मान्यता दिलेली असून कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सिंचन विभाग, अमरावती यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली. सदर काम नागसेन मजूर सहकारी संस्था दर्यापूर यांना मंजूर केले असून या कामावर रक्कम रू ५,७९,२३१ खर्च झालेला आहे व काम दि.२०/१२/२००९ रोजी पुर्ण करण्यात आले, या बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) सदर कामाची करारनामा धारिकेची तपासणी केली असता कंत्राटदारास दि.२१/०२/२००९ रोजी कार्यारंभ आदेश दिले आहेत. त्यामध्ये मुदत १० महिने नमूद आहे व दि.२१/०२/२००९ रोजी दिलेला कार्यारंभ आदेशात कामाची मुदत ६ महिने नमूद आहे. दोन आदेश दिल्याचे दिसून येते याबाबत पुर्तता होणे आवश्यक आहे.

(२) निविदेतील अट क्र.३८(१) नुसार २५ टक्के पर्यंत परिणामामध्ये वाढ झाल्याबाबत कार्यकारी अभियंता यांचे मंजुरीचे आदेश नसल्यामुळे रक्कम रू.८५,८६९ नियमबाह्य प्रदान झाल्याचे दिसून येते.

(३) करारनाम्यानुसार सदर कामास १२१ दिवस विलंब झाल्यामुळे व मुदतवाढ मंजूर नसल्यामुळे प्रति दिवस १०० रू. प्रमाणे १२,१००/- दंडनिय आकारणी करून रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

(४) कंत्राटदारानी साठवण बंधाऱ्याचे सांडव्याचे काम अपुर्ण असतांना काम सोडून दिले. करारनाम्यातील शर्ती व अटी ४ (क) नुसार कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते.

(५) मोजमाप पुस्तकात नमूद केल्यानुसार एकूण १५१३ ब्रास गौण खनिज बाबत रॉयल्टी पासेस व तहसिलदार यांचा गौण खनिज परवाना नसल्यामुळे एकूण रक्कम रू.१,५४,४२५ देयकातून कपात केले नसल्याने कपात करणे आवश्यक आहे, तसेच सदर कामाचे साहित्याचा तपासणी अहवाल आवश्यक असतांना तो घेतलेला नसल्याने १० टक्के रक्कम रोखून ठेवणे आवश्यक होते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर आक्षेपाबाबत खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

(१) करारनामा पुस्तिका पृष्ठ क्र.४ मध्ये काम पुर्ण करण्याचा कालावधी १० महिने दर्शविला आहे. तसेच कार्यारंभ आदेश पत्र क्र ६८४ दि. २१.२.२००९ मध्ये कामाची मुदत (दि.२१.२.२००९ ते २०.१२.२००९) अशी १० महिने दर्शविली आहे.

(२) करारनाम्यातील पृष्ठ क्र.सी.सी.१८ मुद्दा ३८(१) नुसार परिमाणामध्ये २५ % पर्यंत घट/वाढ मान्य आहे. देयकामध्ये कोणत्याही बाबीचे परिमाणात २५ % पेक्षा जास्त वाढ झालेली नाही. त्यामुळे कोठलेही अतिप्रदान झालेले नाही व कार्यकारी अभियंता यांचे अधिकारात देयक अदा करण्यात आले.

(३) मुद्दा क्र.१ नुसार करारनामा कालावधीमध्ये बिलाचे शोधन करण्यात आले आहे, त्यामुळे दंडनिय आकारणी करावयाची आवश्यकता नाही.

(४) सांडव्याचे ठिकाणी कठीण खडक लागल्यामुळे सांडवा बांधकामाची आवश्यकता नव्हती त्यामुळे सदर कामाची आवश्यकता नव्हती. तांत्रिकदृष्टया आवश्यक नसल्यामुळे काम आहे. त्यास्थितीतच अंतिम करण्यात आले, त्यामुळे करारनाम्यात बचत झाली.

(५) मोजमाप पुस्तिका क्र. २९५७ पृष्ठ क्र. ००००२० दुसरे चालू देयकामध्ये साहित्याची तपासणी अहवालाकरिता रु. २२,३९७ रोखून ठेवण्यात आले होते. सदर देयकाचे भूगतान दि. ३१.३.२०१० ला करण्यात आले होते. दुस-या चालू देयकातील मोजमापानुसार अंतिम देयक दि. ३१.३.२०१२ ला अदा करण्यात आले. मध्यंतरीचे दोन वर्षाचे कालावधीत तलावामध्ये पाणी साठा निर्माण झाला. कामाचे गुणवत्तेबाबत कुठलीही समस्या उद्‌भवली नाही. त्यामुळे सुरक्षा ठेव सोबत तपासणी अहवालाकरिता राखून ठेवण्यात आलेली रक्कम परत करण्यात आली.

कार्यकारी अभियंता यांनी गौण खनिजाच्या पासेस विभागीय कार्यालयात सादर केल्याचे मोजमाप पुस्तिका क्र. २९५७/ पृष्ठ क्र. ०००००३१ प्रमाणित केले आहे, त्यामुळे स्वामित्व धनाची रक्कम कपात करण्यात आली नाही. वरील प्रमाणे खुलासा मान्य करावा. ही विनंती.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ नाव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, साठवण तलाव, जामुननाला या कामाचे आदेशात व करारनाम्यामध्ये कामाच्या मुदतीमध्ये तफावत असल्याचे कारण काय आहे, बंधाऱ्याच्या कामावरील बाब क्र.७, ८ व ९ (१), (३) मधील परिमाणात वाढ होण्याची कारणे काय आहेत, या वाढीव परिमाणास सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्व मंजुरी का घेण्यात आली नाही, यावर कार्यकारी अभियंता, (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, करारनामा पुस्तिका पृष्ठ क्र.४ मध्ये काम पूर्ण करण्याचा कालावधी १० महिने दर्शविला आहे. तसेच कार्यारंभ आदेश पत्र क्र.६८४, दि.२१.२.२००९ मध्ये कामाची मुदत (दि.२१.०२.२००९ ते २०.१२.२००९) अशी १० महिने दर्शविली आहे. टेन्डर पुस्तिकेमध्ये १० महिन्याचा कालावधी दाखविलेला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, यामधील एक पत्र दि. २१.०२.२००९ चे आहे आणि त्यामध्ये १० असा उल्लेख आहे. तसेच दुसरे ६४२ क्रमांकाचे पत्र त्याच तारखेचे म्हणजे दि. २१.०२.२००९ रोजीचे असून त्याला सहा महिने होतात. ही दोन वेगवेगळी पत्रे आहेत. यावर कार्यकारी अभियंता, (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, दिनांक २१.०२.२००९ रोजी कार्यारंभ आदेश पत्र क्र.६८४ मध्ये कामाची मुदत १० महिने दर्शविली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, दोन आदेश का देण्यात आले, यावर कार्यकारी अभियंता, (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, दिनांक २१.०२.२००९ रोजी पत्र क्र.६८४ नुसार वर्क ऑर्डर देण्यात आली होती. त्याची मुदत १० महिने होती. यावर समितीने अशी विचारणा केली की, होय. परंतु पत्र क्र.६४२ देखील देण्यात आलेले होते. दोन-दोन पत्र देण्याचे काय कारण होते, तसेच सांडव्याचे काम पूर्ण झाले आहे काय, यावर कार्यकारी अभियंता, (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, सांडव्याचे काम झालेले आहे. सांडव्याच्या खालच्या भागामध्ये कठीण खडक असल्यामुळे त्याची आवश्यकता नव्हती. यावर समितीने आक्षेप घेऊन पुढे अशी विचारणा केली की, तयार केलेले अंदाजपत्रक स्थळ पाहणी करुन करण्यात आले की, ऑफीसमध्ये बसून तयार केले आहे, यावर समितीस कोणतेही उत्तर देण्यात आले नाही. परंतु कार्यकारी अभियंता, (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, त्या ठिकाणी खडक लागला होता. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सांडव्याचे काम अपूर्ण सोडण्यात आलेले आहे, काम न करता अंतिम देयक कसे देण्यात आले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या कामाची प्रशासकीय मान्यता ७ लाख २६ हजार रुपयांची आहे. अंतिम देण्यात आलेली रक्कम ५ लाख ७९ हजार रुपये आहे. जी कामे केली नाही, त्याचे पैसे दिलेले नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, परिमाणात वाढ झाल्यामुळे ८५ हजार ८६९ रुपयांचे जादा प्रदान झाले आहे, पाच परिमाणे आहेत. मुळ परिमाणामध्ये वाढ झालेली आहेत. सर्व पाच परिमाणांची वाढ झालेली किंमत ८५ हजार ८६९ आहे. यामध्ये वाढ झालेली आहे. यावर कार्यकारी अभियंता, (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, होय, त्यामध्ये वाढ झालेली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, वाढीच्या रकमेस मान्यता घेणे आवश्यक होते. यावर कार्यकारी अभियंता, (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, कार्यकारी अभियंता यांनी तत्काळ मंजुरी द्यायला पाहिजे होती. त्यांच्याच अधिकारात देयक मंजूर झालेले आहे. परंतु कार्यकारी अभियंता यांनी तत्काळ मंजुरी देणे आवश्यक असतानाही, त्यांनी मंजुरी दिली नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, कामासाठी वापरलेल्या गौण खनिजाच्या वाहतुकीचा परवाना सादर केल्यास गौण खनिज रक्कम वसूल करु नये या बाबतचे प्राधिकार कोणते, गौण खनिज रक्कम वसूल न केल्यामुळे रक्कम रु.१,५४,४२५ इतक्या रकमेच्या झालेल्या शासनाच्या नुकसानास कोण जबाबदार आहे, बांधकामाकरिता वापरलेल्या साहित्याचा तपासणी अहवाल का घेण्यात आला नाही, यावर कार्यकारी अभियंता, (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, चालू देयकामध्ये साहित्य तपासणीकरिता रक्कम रु.२२,३९७ इतकी रक्कम राखून ठेवण्यात आली होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, चाचणी अहवाल कोणत्या तारखेला प्राप्त झाला होता, यावर कार्यकारी अभियंता, (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, अद्याप चाचणी अहवाल आलेला नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की,

चाचणी अहवालाशिवाय कामे चांगले झाल्याचे आपण कसे सांगू शकता, या संदर्भात समितीला तांत्रिक मत मिळाले पाहिजे. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, श्री.राणे तत्कालीन कार्यकारी अभियंता होते. त्यांना समितीच्या बैठकीला उपस्थित राहण्याबाबत पत्राद्वारे कळविण्यात आले होते. परंतु ते अनुपस्थित आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०११-१२ च्या अहवालाच्या अनुषंगाने २८ तत्कालीन अधिकारी संबंधित आहेत. त्यापैकी आज फक्त १५ अधिकारी उपस्थित आहेत. समितीच्या बैठकीला उपस्थित राहण्याबाबत तत्कालीन अधिकाऱ्यांना कळविल्यानंतर सुध्दा ते आज अनुपस्थित राहिले आहेत. अशा सर्व अधिकाऱ्यांची यादी तयार करुन त्यांना नोटीस काढावी. आज सकाळी समितीने दिलेल्या निदेशानुसार या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची एक वेतनवाढ रोखावी व त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेण्यात यावी. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

समितीने पुढे आखणी अशी विचारणा केली की, गौण खनिज रक्कम वसूल न केल्यामुळे रक्कम रु.१,५४,४२५ इतक्या रकमेच्या वसुली संदर्भात कोणती कारवाई करण्यात आली, यावर कार्यकारी अभियंता, (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, लेखी अहवालातील पृष्ठ क्रमांक ३१ मध्ये वाहतूक परवाना सोबत जोडलेला असल्यामुळे रॉयल्टीची रक्कम वसूल करण्याची आवश्यकता नाही असे नमूद केलेले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, रॉयल्टी पासेस सादर केल्यामुळे रॉयल्टी वसूल करु नये, ही बाब कशाच्या आधारावर निश्चित करण्यात आली आहे, यावर समितीस उत्तर आले नाही. समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, या प्रकरणी चौकशी करुन व्याजासह रॉयल्टीची रक्कम वसूल करणे आवश्यक होते. यावर कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) यांनी समितीच्या सूचनेचे पालन केले जाईल असे समितीस विदित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सदरहू प्रकरणी कामाचे आदेश आणि करारनामा यांच्या मुदतीमध्ये तफावत असणे, वाढीव परिणामास मान्यता न घेणे, अंतिम देयक देण्याकरिता २ वर्ष ३ महीने एवढा विलंब होणे, गौण खनिजाच्या रक्कमा वसूल न करणे, बांधकाम साहित्याचा तपासणी अहवाल घेण्यात न येणे, ई आक्षेपावर जिल्हा परिषद स्तरावर समितीस समाधानकारक माहिती प्राप्त होऊ शकली नसल्यामुळे समितीने प्रस्तुत कामाची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे ?

(२) तसेच समितीने अमरावती जिल्हा परिषदेला भेट देवुन मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान काही तत्कालीन अधिकारी पुर्व परवानगीशिवाय अनुपस्थित राहिलेले आढळून आले. परिणामी समितीस योग्य ती माहिती उपलब्ध होऊ शकली नाही, यावर समितीने ग्रामविकास विभागाचे दिनांक १० सप्टेंबर, २००७ **(परिशिष्ट १०.१)** रोजीचे परिपत्रक व इतर संबंधित सूचनाप्रमाणे अनुपस्थित अधिका-यांवर कार्यवाही करुन त्यांची एक वेतन वाढ तात्पुरत्या स्वरुपात रोखावी व त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी, तसेच निवृत्त झालेल्या अधिका-यांविरुध्द नियमानुसार कारवाई करावी, असे निर्देश समितीने दिले आहेत. त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) सदर प्रकरणात चौकशी पथक स्थापन करण्यात आले होते. पथकाने करारनामा नस्ती, मोजमाप पुस्तिका यांची तपासणी करुन पुढीलप्रमाणे आपला निष्कर्ष नोंदविला.

**(अ) करारनामा मुदत :-** दर्शविलेला कालावधी १० महिने बरोबर आहे.

**(ब) वाढीव परिमाणास मान्यता न घेणे :-**

सदर कामावरील वाढीव परिमाणाबाबत करारनामा कलम ३८ (१) नुसार संबंधित बाबीस स्थानिक परिस्थितीजन्य कारणामुळे (करारनाम्याच्या दराने) १२५ % पर्यंत वाढलेल्या परिमाणाचे भूगतान करण्यास कार्यकारी अभियंता हे सक्षम प्राधिकारी असून त्यांनी वाढीव परिमाणाप्रमाणे भूगतान केलेले आहे.

सर्व वाढीव परिमाणे १२५ % चे आत असल्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी करारनामा कलम ३८ (१) नुसार वेगळा आदेश काढणे अभिप्रेत होते, परंतु त्यांनी मंजुरी आदेश काढलेले नाहीत.

उपरोक्त बाबी करिता तत्कालीन प्रभारी कार्यकारी अभियंता श्री. आर.के.भगत हे प्रथमदर्शी दोषी आढळल्याचे चौकशी पथकाने आपल्या अहवालात निष्कर्ष काढलेला आहे. श्री. आर.के.भगत, तत्कालीन प्रभारी कार्यकारी अभियंता यांचे विरुध्द एकत्रित खाते चौकशी प्रस्ताव पत्र क्र. १७४०, दिनांक २४.०५.२०१६ जलसंधारण विभागाला सादर केला आहे.

**(क) अंतिम देयकास विलंब करणे व (ड) स्वामीत्व धनाची वसुली न करणे :-**

तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. अ.ना.राणे (सेवा निवृत्त) प्रथमदर्शनी दोषी आढळल्याचे अहवालात नमुद केले आहे. श्री. अ. ना. राणे (से.नि) कार्यकारी अभियंता यांचेविरुध्द पत्र क्रमांक १७३९, दिनांक २४.०५.२०१६ अन्वये खाते चौकशी प्रस्ताव जलसंपदा विभागास सादर केला आहे.

**(इ) तपासणी अहवाल न घेणे :-** सदर काम हे पुर्णपणे मातीकाम होते. माती कामाची चाचणी म्हणजे घनता चाचणी आहे. ती प्रत्यक्ष मोक्यावर घ्यावी लागते. चाचणी न घेतल्यामुळे तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री. अ.ना.राणे (सेवानिवृत्त) यांचेविरुध्दचा खाते चौकशी प्रस्ताव उपरोक्तप्रमाणे जलसंधारण विभागास सादर केला आहे.

(२) पंचायती राज समितीचे दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर २०१५ चे भेटी दरम्यान सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल तथा सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाला संदर्भात पंचायती राज समितीचे साक्षी करीता संबंधित अधिका-यांना उपस्थित राहणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक जिप/साप्रवि/पंरास/ ९६६२/२०१५, दिनांक २३.१०.२०१५ अन्वये कळविण्यात आले होते. सदर साक्षीकरीता ०९ अधिकारी अनुपस्थित होते. त्यांवर तपशील खालीलप्रमाणे.

(१) श्री. एस. के. पवार शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(२) श्री. आर. जी. पराते, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)

(३) श्री. संजस जोल्हे, गटविकास अधिकारी, पं. स., मोर्शी

(४) श्री. प्रशांत रूमाले, गटविकास अधिकारी, पं. स., नांदगाव खंडेश्वर

(५) श्री. किशोर काळे, गटविकास अधिकारी, पं. स., तिवसा

(६) श्री. पी. जे. राठोड, गटविकास अधिकारी, पं. स., चिखलदरा

(७) श्री. पी. आर. राठोड, (प्रभारी) गटविकास अधिकारी, पं. स., अंजनगाव व धामणगाव रेल्वे

(८) श्री. पद्ममाकर मडावी, (प्रभारी) गटविकास अधिकारी, पं. स., मोर्शी

(९) श्री. जयंत बाबरे, गटविकास अधिकारी, पं. स., मोर्शी

वरील सर्व अधिकारी हे गट-अ व गट-ब दर्जाचे असून त्यांचेवर शासन स्तरावरून पुढील कार्यवाही करीता दिनांक २१.११.२०१५ रोजी वरील अधिकाऱ्यांचे पत्र त्यांच्या मंत्रालयीन विभागांना सादर करण्यात आले आहेत, वर नमुद पैकी अ. क्र.१ ते ४ संदर्भात त्यांचे संबंधित मंत्रालयीन विभागांना स्मरणपत्राव्दारे कार्यवाहीबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

अ. क्र.५ नुसार श्री.काळे यांचे विरुध्द शासनाने दिनांक २७/०४/२०१७ अन्वये ज्ञापन बजाविण्यात आले आहे.

अ. क्र. ६ नुसार श्री.राठोड यांचा मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्रमांक ३२२, दिनांक ०६/०३/२०१७ अन्वये विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

अ. क्र. ७ नुसार श्री.राठोड, यांना मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक २९.११.२०१६ अन्वये ज्ञापन बजाविण्यात आले आहे.

अ. क्र. ८ वे ९ च्या अधिकाऱ्यांचे शासनाच्या निर्देशानुसार जोडपत्र १ ते ४ मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे सादर करण्यात आले होते. सदर प्रकरणी मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांनी घेतलेल्या सुनावणीच्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र.४०२५ व ४०२६ दिनांक १२.०५.२०१७ अन्वये अहवाल मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषदेकडून सदर प्रकरणाबाबत दोषी अधिकारी श्री. अ. ना. राणे (से.नि.) व श्री. आर. के. भगत, तत्कालीन प्रभारी कार्यकारी अभियंता यांचा प्राप्त झालेला विभागीय चौकशीचा प्रस्ताव जलसंपदा विभागास पाठविण्यात आला आहे व जलसंपदा विभागाने दिनांक २७/०१/२०१७ रोजी संबंधित दोन्ही अधिकाऱ्यांविरुध्द ज्ञापन बजाविले आहे.

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-**

पंचायत राज समितीचे साक्षी करीता अनुपस्थित असलेल्या ०९ अधिकाऱ्यांपैकी सर्वश्री किशोर काळे, पी.जे.राठोड, जयंत बाबरे, पी.आर.राठोड, पद्माकर मडावी हे अधिकारी ग्राम विकास विभागांतर्गत कार्यरत आहेत. या अधिकाऱ्यांविरुध्दचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक १५.१२.२०१५ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, अमरावती यांना कळविण्यात आले आहे. त्याबाबतची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

(१) श्री. पद्माकर मडावी, सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कळंब जि.प.यवतमाळ तथा तत्का.प्रभारी ग.वि.अ.पं.स.मोर्शी, हे वर्ग-२ चे अधिकारी असल्याने त्यांचे प्रकरणात विभागीय चौकशीची कार्यवाही विभागीय आयुक्त स्तरावर करण्यात येत आहे.

(२) श्री. पी. आर. राठोड, सहायक गट विकास अधिकारी, तथा तत्कालीन प्रभारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंजनगाव सुर्जी व धामणगाव रेल्वे, जिल्हा परिषद, अमरावती हे वर्ग २ चे अधिकारी असल्याने त्यांचेविरुध्द विभागीय आयुक्त यांनी क्र. विकास/आस्था/ मविसे/प्र.क्र.९/१६, दिनांक २९.११.२०१६ अन्वये नियम १० खाली विभागीय चौकशी सुरु केली आहे.

(३) श्री. किशोर काळे, तत्का. ग. वि. अ. पं. स., तिवसा यांचे विरुध्दचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव मा.मंत्री (ग्रामविकास) यांना मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(४) श्री .पी.जे. राठोड, तत्का.ग.वि.अ.पं.स., चिखलदरा यांच्या विरुध्द दिनांक १४.०६.२०१७ अन्वये ज्ञापन बजावण्यात आले आहे.

(५) श्री. जे. पी. बाबरे, तत्का.ग.वि.अ.पं.स., मोर्शी यांचेविरुध्द दिनांक २५.०९.२०१७ अन्वये ज्ञापन बजावण्यात आले आहे.

**चौकशी अहवाल**

**(अ) करारनामा मुदती मधील तफावत :-**

करारनामा नस्तीची तपासणी केली असता खालील बाबी आढळल्यात.

(१) निविदा बोलविण्याकरिता तयार करण्यात पुस्तिका (Tender papers) तपासली असता पृष्ठ ४ मध्ये कालावधी १० कॅलेंडर महीने दर्शविलेला आहे. पुस्तिकेमध्ये कंत्राटदाराच्या सहया आहे. कार्यकारी अभियंता यांची सही नाही.

(२) मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचा निविदा स्विकृती आदेश जिप/पाबं/निविदा/६४५/दि. १८/२/२००९ नुसार निर्गमीत करण्यात आला आहे.

(३) कार्यकारी अभियंता यांचा कार्यारंभ आदेश क्र. ६४२, दि.२१.२.२००९ यामध्ये ६ महीने कालावधी दर्शविला आहे.

सदर आदेशामध्ये, निविदा स्विकृती आदेशाचा क्र. व दिनांक दर्शविलेला नाही.

आदेशातील कालावधी ६ महिने यास गोल करुन १० महिने दर्शविला आहे. सदर आदेशातील शाईने लिहीलेली माहीती स्पष्ट असून कुठेही खोडतोड नाही. आदेशामध्ये सर्वात खाली रद्द असे लिहीलेले आहे.

याबाबत निरिक्षण नोंदविण्यात येते की, मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निविदा स्विकृती आदेशाचा क्र. ६४५ असल्यामुळे, कार्यारंभ आदेश तत्पूर्वी देणे शक्य नाही. त्यामुळे चुक लक्षात येताच सदर आदेश रद्द करण्यात आला असावा.

(४) कार्यकारी अभियंता यांचा कार्यारंभ आदेश क्र.६८४, सदर आदेशामध्ये निविदा स्विकृती क्र. ६४५, दि. १८.२.२००९ स्पष्टपणे लिहिलेले आहे. कामाची मुदत दहा महिने दर्शविलेली आहे. ती सुध्दा स्पष्ट आहे. परंतु दि. २०.१२.२००९ पर्यंत या मधील अंकामध्ये खोडतोड स्पष्टपणे दिसते.

(५) स्टॅम्प पेपरवरील जो करारनामा आहे त्यामध्ये काम पुर्ण करण्याचा कालावधी हा रकाना कोरा ठेवण्यात आला आहे. यावर कार्यकारी अभियंता यांची सही नाही.

ही तत्कालीन कार्यकारी अभियंता यांची चुक आहे. त्यावेळेस श्री. आर.के.भगत हे प्रभारी कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. प्रथम दर्शनी श्री.आर.के.भगत हे दोषी आढळतात.

**(ब) परिमाणात वाढ झाल्याबाबत :-**

| अ. क्र. (१) | बाब (२) | करारनाम्यानुसार परिमाण (३) | १२५ % मर्यादे पर्यंत परिमाण (४) | मोजमाप पुस्तीके नुसार परिमाण (५) | वाढीव परिमाणाची रक्कम (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सि.ओ.टी.भरणे | ४२१.५६ घ.मी. | ५२६.९५ घ.मी | ५२६.९५ घ.मी. (२५% वाढ) | १३२५६९.०० |
| २ | गाभा क्षेत्र भराव | १३६१.५५ | १७०१.९४ | १५३५.७५ (१२.८० %) | २३००३.०० |
| ३ | आवरणक्षेत्र भराव | ६७७.६२ घ.मी. | ८४७.०२ घ.मी. | ८४७.०२ घ.मी. | १०९३५.००<br>३८३६५.०० |
| | (अ) उपलब्ध | १२६१.९२ घ. मी. | १५७७.४० घ. मी. | (२५% वाढ) | |
| | (ब) स्वामीत्व धन | | | १५१०.८८ घ. मी. (१९.७३%) वाढ | |
| | | | | एकूण | ८५८६९.०० |

सदर वाढीव परिमाणाबाबत कार्यकारी अभियंता यांनी कलम ३८(१) नुसार मंजुरी आदेश काढलेला नाही.

उपरोक्त परिमाणाचे मो.पु.क्र.२९५७, पृष्ठ क्र. १२ ते २० व्हाऊचर क्र ४४२७, दि.३१ मार्च, २०१० नुसार भूगतान केलेले आहे. सर्व परिमाणे १२५% चे मर्यादेत आहे. देयक कार्यकारी अभियंता यांनी मंजूर केले म्हणजे देयकातील मोजमापे सुध्दा कार्यकारी अभियंता यांनी मंजूर केली असे अभिप्रेत होते. परंतु कलम ३८(१) अंतर्गत वेगळा मंजुरी आदेश न काढणे ही चुक होय. तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.भगत यांनी ही चूक केलेली आहे.

**(क) अंतीम देयकाकरिता दोन वर्ष तीन महिने एवढा विलंब होणे :-**

मोजमाप पुस्तिका क्र. २९५७, पृष्ठ क्र. २१ ते ३२ नुसार अंतीम देयक अदा करण्यात आले आहे. देयक व्हाऊचर क्र. ४३३५, दि. ३१ मार्च, २०१२ ला अदा केलेले आहे.

मोजमाप पुस्तिका क्र. २९५७, पृष्ठ क्र. २१ व २७ मध्ये काम पुर्ण केल्याचा दिनांक २०.१२.२००९ दर्शविलेला आहे. देयक प्रपत्रासोबतचा फॉर्म नं. ६५, पुर्णत्वाच्या दाखल्यामध्ये सुध्दा काम पुर्ण केल्याचा दिनांक २०.१२.२००९ दर्शविलेला आहे. अंतीम देयकाची मोजमाप पुस्तीकेची तपासणी केली असता देयकाची रक्कम रु.१९८३९ आहे. बहुतांश मोजमापे दुसरे चालू देयकातून Reproduce केलेली आहे. त्यामुळे देयक अदा करण्यात दोन वर्ष विलंब केल्याचे स्पष्ट होते. याबाबत तत्कालीन कार्यकारी अभियंता प्रथमदर्शनी दोषी आढळून येतात.

**(ड) गौण खनीजाच्या रक्कमा वसुल न करणे :-**

मोजमाप पुस्तीका क्र. २९५७ पृष्ठ क्र.३१ वर गौण खनीजाचे स्वामित्व धनाची रक्कम रु. १,५४,५२५/- इतकी संशोधीत केलेली आहे.

कार्यकारी अभियंता यांनी मो.पु.क्र. २९५७ पृष्ठ क्र. ३१ वर गौण खनीजाच्या पासेस विभागीय कार्यालयात जमा केल्याचे प्रमाणीत केले आहे. त्यामुळे स्वामीत्व धनाची वसुली निरंक दर्शविलेली आहे.

सन २०१० दरम्यान स्वामीत्व धनाचे पासेसबाबत, कार्यपध्दतीबाबत तहसिल कार्यालयाकडे विचारणा करणे आवश्यक वाटते.

**(इ) तपासणी अहवाल न घेणे :-**

सदर बांधकामामध्ये तपासणी अहवाल सादर करण्यात आलेला नाही. चाचणी अहवालासाठी दुसरे चालु देयका मधुन (देयकाची रक्कम रु. २,२३,९७०/-) पृष्ठ क्र. २० वर रु. २२३९७/- राखुन ठेवल्याचे निदर्शनास येते.

प्रथम चालु देयक, दुसरे चालु देयक व तिसरे अंतीम देयकाची मोजमाप पृ.क्र.२९५७ ची तपासणी केली असता, निदर्शनास येते की, संपुर्ण कामे ही माती कामे आहेत. तलावाचे बांधाचे माती कामामध्ये घनता (Density) चाचणी घ्यावयाची असते, सदर चाचणी ही मोक्यावर घ्यावी लागते. या करिता स्वतंत्र यंत्रणा नसल्यामुळे चाचणी करिता रक्कम राखुन ठेवणे योग्य वाटते.

**निष्कर्ष :-**

उपरोक्त निरिक्षणावरुन खालील निष्कर्ष निघतात.

(१) करारनामा दस्ताऐवज/पत्रव्यवहारा मध्ये खाडाखोड असणे, माहिती पुर्णपणे न भरणे, दस्ताऐवजावर स्वाक्षरी न करणे या बाबीकरीता तत्कालीन कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. आर. के. भगत हे जबाबदार दिसुन येतात.

(२) वाढीव परिमाणाकरीता कलम ३८(१) नुसार मंजुरी आदेश काढलेला नाही. ही तांत्रिक चुक आहे. याकरिता श्री.भगत हे जबाबदार आहे.

(३) अंतीम देयकाचे भुगतान दोन वर्ष विलंबाने करण्यात आले त्याकरिता श्री. अ. ना. राणे, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता हे जबाबदार आहे.

(४) गौण खनीजाचे स्वामीत्व धनाचे वसुलीस श्री. अ. ना. राणे, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता हे जबाबदार आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, साठवण तलाव जामुननाला ता. चिखलदरा या कामावरील झालेल्या खर्चातील अनियमितता याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, श्री. अ. ना. राणे, सेवानिवृत्त व श्री. आर. के. भगत, तत्कालीन प्रभारी कार्यकारी अभियंता यांच्या विभागीय चौकशीचा अहवाल जलसंपदा विभागास सादर केलेला आहे. दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी त्यांच्या विरुध्द ज्ञापन बजाविण्यात आले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०११ मधील हे प्रकरण आहे, सन २०१७ वर्षे सुरु आहे. कारवाई करण्यास किती विलंब होत आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, संबंधितांविरुध्दची विभागीय चौकशी पूर्ण करुन अहवाल प्राप्त झाल्यानंतर ज्ञापन बजावण्यात आले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अशा प्रकरणात विलंब करण्याचे काय कारण आहे, चौकशी सुरु आहे. अहवाल प्राप्त झाला, कार्यवाही सुरु आहे, अशी उत्तरे वारंवार समितीसमोर येत आहेत. आता ठोस कारवाई करण्याची वेळ आलेली आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, जलसंपदा विभागाकडून विभागीय चौकशी करुन कारवाई करण्यात येत आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, अमरावती येथे समितीने भेट दिली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली त्यावेळी ९ अधिकारी पूर्व परवानगी न घेता गैरहजर राहिले. या अधिका-यांवर विभागीय चौकशी करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे असे आपण स्पष्टीकरणात नमूद केले आहे, ९ अधिकारी गैरहजर असल्यामुळे त्या सर्व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. ९ अधिकारी गैरहजर असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करुन त्यासंदर्भातील अनुपालन अहवाल १ डिसेंबर पर्यंत सादर करण्यात येईल काय अशी समितीने विचारणा केली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, ९ अधिकारी बैठकीला अनुपस्थित होते. ते वेगवेगळया विभागातील आहेत, वेगवेगळया कार्यालयात ते कार्यरत आहेत. काही अधिका-यांची चौकशी विभागीय आयुक्त स्तरावरुन करण्याबाबत कळविण्यात आले आहे. काही अधिकारी गट " अ " व गट " ब " दर्जाचे असल्यामुळे त्यांच्यावरील विभागीय चौकशी शासन स्तरावरुन करण्यासाठी कळविण्यात आले आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, यासंदर्भातील अनुपालन अहवालानुसार कारवाई करणे आवश्यक आहे. यावर, सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला होकारार्थी आश्वासित केले.

यावर समितीने असे निदेश दिले की, समितीच्या बैठकीला ९ अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांच्या संदर्भातील सविस्तर तपासणी करुन त्यांच्यावर कारवाई करुन कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करावा. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, कॅडर नुसार विभागीय चौकशी सुरु आहे.

ग्रामविकास विभाग यांनी समितीला माहिती दिली की, समितीने साक्षीकरिता अनुपस्थित राहणा-या अधिका-यांवर १ वेतनवाढ तात्पुरती रोखण्याची कारवाई प्रस्तावित केली आहे असे सांगितले सचिवांच्या मते ही सौम्य शिक्षा आहे. त्याकरिता संबंधितांची विभागीय चौकशी करावी लागत नाही. तसेच डिसेंबर महिन्यापूर्वी त्यांच्यावर १०० टक्के कारवाई होऊ शकते.

**अभिप्राय व शिफारशी**

साठवण तलाव जामुननाला, ता.चिखलदरा या कामास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी रक्कम रुपये ७,२६,२५२/- ची प्रशासकीय मान्यता दिलेली असून सदर काम नागसेन मजूर सहकारी संस्था, दर्यापूर यांना मंजूर केले आहे. सदरहू कामावर रुपये ५,७९,२३१/- एवढा खर्च झाल्याप्रकरणी लेखा परिक्षकांनी संचिकेमध्ये दोन कार्यारंभ आदेश दिलेले आढळून येणे, २५ टक्के परिमाणातील वाढीबाबत कार्यकारी अभियंता यांचे मंजूरी आदेश नसणे, १२१ दिवस झालेल्या विलंबाबाबत दंड न आकारणे, सांडव्याचे काम अपूर्ण असताना काम सोडून देणे, गौण खनिजाची रॉयल्टी वसूल न करणे हे प्रमुख आक्षेप उपस्थित केलेले होते. सदर लेखा आक्षेपाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस सादर केलेल्या लेखी माहितीत कामाची मुदत ही १० महिने एवढीच असल्याचे, देयकामध्ये कोणत्याही बाबतीत २५% पेक्षा वाढ झाली नसल्याचे, करारनामा कालावधीत बिलाचे शोधन केल्यामुळे विलंबाबाबत दंड आकारण्याची आवश्यकता नसल्याचे, सांडव्याचे ठिकाणी कठीण खडक लागल्यामुळे सांडवा बांधकाम करण्याची आवश्यकता नव्हती, तसेच गौण खनिजाच्या पासेस कार्यकारी अभियंता यांनी कार्यालयास सादर केल्यामुळे गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम कपात केली नसल्याचा लेखी खुलासा समितीस प्राप्त झाला.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली होती. सदर साक्षीदरम्यान परिमाणात वाढ झाल्याची तसेच त्यास कार्यकारी अभियंता यांची मान्यता घेतली नसल्याची बाब स्पष्ट झाली. कामासाठी वापरलेल्या गौण खनिजाच्या स्वामित्व धनाची वसुली करण्यासंबंधी गौण खनिजाच्या वाहतुकीचा परवाना सादर केल्यास गौण खनिज वसुल करु नये याबाबतचे नियम काय आहेत अशा मुद्यांवर समितीला समाधानकारक उत्तर प्राप्त होवू शकले नव्हते त्यामुळे सदर मुद्यावर समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

जामुननाला साठवण तलावाच्या कामामध्ये कार्यारंभाचे दोन आदेश आणि दोन्ही आदेशामध्ये कामाच्या कालावधीमध्ये ६ महिने व १० महिने असा फरक आढळून आला त्याबाबत चौकशी अहवालात निविदा स्वीकृतीचा आदेश क्रमांक ६४५ असून कार्यारंभ आदेश त्यापूर्वी देणे शक्य नाही. त्यामुळे चुक लक्षात येताच सदर आदेश रद्द केला असावा असे अभिप्राय दिलेले आहेत. समिती या अभिप्रायाशी सहमती व्यक्त करते. करारनाम्यावर कामाच्या कालावधीचा रकाना रिकामा ठेवणे, करारनाम्यावर कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी न करणे, वाढीव परिमाणाबाबत कलम ३८ (१) अनुसार वेगळा मंजूरी आदेश

न काढणे आदी बाबींसंबंधात तत्कालिन कार्यकारी अभियंता, श्री. आर. के. भगत यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. त्याच बरोबर देयक अंतिम करण्याकरीता तत्कालिन कार्यकारी अभियंता यांनी दोन वर्ष तीन महिने विलंब केला त्यास श्री.अ.ना.राणे, सेवानिवृत्त तत्कालिन अधिकारी जबाबदार आढळून आले आहेत. **सदरहू दोन्ही तत्कालिन कार्यकारी अभियंता यांचेवर खाते चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २४ मे, २०१६ रोजी सादर करण्यात आल्याचे समितीला कळविण्यात आले आहे. सदरहू चौकशी अंतिम करुन संबंधितांवर त्वरेने कारवाई झालेली नाही. समितीच्या भेटीत सुमारे २-२ वर्षांचा कालावधी उलटूनही अशी चौकशीची प्रकरणे निकाली न निघणे ही बाब गंभीर आहे. सबब, दोन्ही तत्कालिन कार्यकारी अभियंता यांचेवरील विभागीय चौकशीची कारवाई तातडीने निकाली काढून दोषी असल्यास त्यांचेवर जबाबदारी निश्चित करावी व त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा, त्याचप्रमाणे सदरचे प्रकरण उघडकीस येऊनही व त्याबाबत समितीने भेटीच्या वेळी निदेश देऊनही ज्या अधिका-यांनी प्रकरण तातडीने हाताळले नाही अथवा ज्या अधिका-यांनी दिरंगाई केली अशा सर्व संबंधित अधिका-यांची चौकशी करुन नियमानुसार त्यांचेवर देखील कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठवावा अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रस्तुत प्रकरणातील चर्चेदरम्यान काही तत्कालिन अधिकारी समितीच्या बैठकीस उपस्थित नसल्याचेही समितीस आढळून आले. परिणामी समितीस योग्य ती माहिती उपलब्ध होवू शकली नाही. समितीने यावर ग्रामविकास विभागाचे परिपत्रक दिनांक १० सप्टेंबर, २००७ व इतर सूचनांप्रमाणे अनुपस्थित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन त्यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात रोखावी व त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तकात घ्यावी तसेच निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्याचे निदेश दिलेले होते. यासंदर्भात नऊ अनुपस्थित अधिकाऱ्यांवर जे गट-अ व गट-ब दर्जाचे आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याकरीता प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ रोजी त्यांचेशी संबंधित मंत्रालयीन विभागांना पाठविण्यात आल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. **परंतू खेदाची बाब अशी की, माहे नोव्हेंबर, २०१५ ते माहे ऑक्टोबर, २०१७ या दोन वर्षांच्या कालावधीत ग्रामविकास विभागाच्या काही प्रकरणांत विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे तर काही प्रकरणात अद्यापही त्रुटींची पूर्तता, मंत्री महोदयांची मान्यता आदी कागदोपत्री विलंब झाल्याचेही समितीच्या निदर्शनास आले आहे. शालेय शिक्षण, लघुसिंचन इत्यादी विभागाच्या अनुपस्थित अधिकाऱ्यांबाबत कारवाई कोणत्या टप्प्यावर आहे याचीही माहिती समितीस प्राप्त होवू शकली नाही. समितीने याबाबत नापसंती व्यक्त केली असता माहे डिसेंबर, २०१७ अखेर सर्व तत्कालिन अनुपस्थित अधिकाऱ्यांवर समितीच्या निदेशानुसार कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे सचिव, ग्रामविकास विभाग यांनी आश्वस्त केलेले आहे. त्यानुसार त्यांनी तातडीने सर्व अनुपस्थित अधिकाऱ्यांची एक वेतनवाढ रोखून तशी संबंधितातांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेवून कारवाईबाबतचा अहवाल समितीस एक महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण अकरा

# जिल्हा परिषद, अमरावती

## जिल्हा निधीतून करण्यात आलेल्या बांधकामातील अनियमितता

**(परिच्छेद ३.२२३) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद अमरावती सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक २) सन २०११-१२ या वित्तीय वर्षाकरिता अंदाजपत्रकीय तरतुदीच्या आधारे करण्यात आलेले प्रस्तावित १६ बांधकामाची करारनामे तसेच पूर्ण झालेल्या बांधकामाची नस्ती तपासली असता झालेल्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

(१) ग्रामपंचायतीकडून कोणत्याही प्रकारचे प्रस्ताव न स्विकारता सदर बांधकामे जिल्हा निधीतुन प्रस्तावित करण्यात आलेले आहे. उदा. ग्रामपंचायत शिंदोळी तालुका धामणगाव रेल्वे यासह करारनामा अनुक्रमांक ३,७,८,९,११,१२,१४,१६ संबंधीत ग्रामपंचायतीकडून चालू लेखापरिक्षणा दरम्यान निर्माण झालेल्या भत्ता नियमानुसार हस्तांतरीत करुन नमुना २६ वर नोंदी घेतल्याबाबत कोणताही पुरावा लेखापरिक्षणास आढळून आलेला नाही व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम २०१०/प्र.क्र.१५६, दि. ५ जुलै, २०१० अन्वये ग्रामपंचायतींनी कंत्राटदार म्हणुन केलेला खर्च ग्रामसभेमध्ये मंजुर करुन घेतल्याबाबत कोणताही ठराव वरील ग्रामपंचायतीकडून प्राप्त करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

(२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांचे परिपत्रक क्र. ४/१०६१, दि. १२/३/२०१० तथा महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९ दि. २०/६/२००८ तरतुदीच्या अनुषंगाने कामाचे नियोजन तथा कामांची हमी दिल्याबाबत व करारातील अटी व शर्तीच्या अनुषंगाने कंत्राटदार ग्रामपंचायतीकडून अपेक्षित दस्तऐवज बांधकाम विभाग सादर करू शकले नसल्याने विहित मुदतीत काम पुर्ण झाल्याची खात्री पटू शकत नाही. ग्रामपंचायत शिंदोळीने दि.१५/०२/२०१० रोजी काम पुर्ण केले असतांना कामातील बाबीची प्रयोगशाळा तपासणी अहवाल २०११ पर्यंत सादर केल्याचे आढळून येत नाही. याशिवाय महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग अधिसुचना क्र.गौखनि/१०/१००९/प्र.क्र.३०९/ख (१), दि.११/०२/२०१० नुसार निर्धारीत केलेल्या गौणखनिजाच्या किंमतीनुसार ग्रामपंचायतीने गौणखनिजाचा भरणा शासनास केल्याबाबत अभिलेख्याअभावी खात्री पटू शकली नाही.

(३) कंत्राटदार ग्रामपंचायतीनी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.२००९/प्र.क्र ११४, दि.२०/०४/२०११ नुसार बांधकामाप्रती वापरण्यात येणा-या सिंमेटचे निकष नमुद केलेले आहे. त्या निकषानुसार सदर बांधकामांमध्ये सिमेंट वापरल्या गेले अथवा नाही याची अभिलेख्याअभावी खात्री पटू शकली नाही.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४७२, दि.०९/०२/ २००९ च्या निर्देशानुसार ग्रामपंचायतीला कामे देत असतांना पाळावयाची कार्यालयीन कार्यपध्दती दिसून येत नाही. तसेच महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.अल्पंस १०९३/(२६३५), दि.१६/०७/१९९३ नुसार ५०,००० रुपयापेक्षा जास्त किंमतीच्या कामांसाठी जाहीरात देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही बांधकाम विभागाने केल्याचे आढळत नाही.

(५) ग्रामपंचायतीने बांधकाम पूर्ण केल्यानंतर त्यांच्या कार्यक्षेत्रातील मालमत्तेची देखभाल दुरुस्ती करणे ग्रामपंचायतीस बंधनकारक असल्याने देखभाल दुरुस्ती करण्यास तयार असल्याबद्दलचे संमतीपत्र ग्रामपंचायतीने देणे आवश्यक असताना सदर प्रमाणपत्र नस्तीमध्ये आढळून आलेले नाही.

(६) आयकर अधिनियम १९६१ चे कलम १९४ क नुसार ग्रामपंचायतीने २% आयकर व आयकराच्या येणाऱ्या रकमेवर ३% शिक्षण शुल्क वसूल करुन शासन खाती भरणा केले नसल्याचे दिसून येते.

(७) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. बिडीजी-२००५/प्र.क्र.३२४/इमारती-२, दि.३/३/२००६ नुसार नोंदणीकृत कंत्राटदाराकडून २% व बिगर नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ४% विक्रीकर रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

(८) महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे अनुसूची एक बाब क्र. ५० ते ५५ मधील बाबी संबंधित तरतूद बाह्य खर्चाचे प्रदान प्रमाणक क्रमांक ४१४६, दि.३०/३/२०१२ रु. १,९९,५२१ अन्वये केलेले असल्याने सदर रक्कम वसूलीस पात्र आहे. ग्रामपंचायत शिंदोळी येथील करारनामा प्रशासकीय मंजूरात व प्रत्यक्ष खर्च यामध्ये ६,७२२ रुपये जादा खर्च झाला असल्याने सदर खर्च वसूल होणे आवश्यक आहे. याशिवाय सदर ग्रामपंचायत स्तरावरील गौण खनिज रक्कम रु. १०,४०४, विमा रक्कम रु. ४,६०२ व उपकर रक्कम रु.६,४०२ असे एकूण रु. २८,१३० होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर आक्षेपाबाबत खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

(१) जिल्हा निधीतून प्रस्तावित कामाचे संबंधित ग्रामपंचायतने घेतलेल्या ठरावानुसार कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच काम पुर्ण झाल्यानंतर ग्रामपंचायतने नमुना २६ वर नोंदी घेतलेल्या आहेत. तसेच देयक अदा केल्यानंतर ग्रामसभेत खर्चास मंजुरी दिलेली आहे. (नमुना २६ ग्रामसभेचा ठराव उपलब्ध आहे)

(२) शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत यंत्रणा म्हणून नेमतांना संबंधित ग्रामपंचायत कडून कामाची मागणी आल्यास ग्राम पंचायतची आर्थिक मर्यादेनुसार व वार्षिक उत्पन्नाचा ताळेबंद तपासून ग्रामपंचायती यंत्रणा म्हणून कामे विना निविदा देण्यात येतात. ग्रामपंचायतीला कामे देतांना वृत्त पत्रामध्ये जाहीर निविदा प्रसिध्द करायची गरज नाही. शासन निर्णयानुसार सदर कामे ग्रामपंचायतला देण्यात आली. त्यानुसार ग्रामपंचायतकडून प्राप्त कागदपत्रानुसार निविदेतील अटी व शर्तीनुसार कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. बांधकामासाठी वापरलेले साहीत्याचे नमुने प्रयोग शाळेमध्ये चाचणीसाठी पाठविले असून चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, संबंधित ग्रामपंचायतने गौणखनिजाचा भरणा बाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(३) ग्रामपंचायतने केलेल्या बांधकामासाठी वापरलेले सिमेंट योग्य दर्जाचे असल्याबाबत खात्री करुनच सिमेंट वापरण्यात येते. तसेच सिमेंटचा दर्जा योग्य असल्याबाबत आवश्यक त्या चाचण्या घेण्यात येतात. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सुचनानुसार निर्देशित केल्याप्रमाणे वारंवारीतानुसार चाचण्या घेण्यात येतात. चाचणी अहवालानुसार वापरलेले साहित्याच्या दर्जाबाबत खात्री करुनच देयक अदा करण्यात येतात.

(४) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय दि.९/२/२००९ नुसार ग्रामपंचायतीकडून कामाची मागणी आल्यानंतर त्याच्याकडून आवश्यक ते कागदपत्राची पुर्तता करुन घेवून त्यांना विना निवीदा कामे देण्याबाबत शासन निर्णयामध्ये नमुद असल्याने त्यांना कामे देण्यात आली आहेत.

(५) काम पूर्ण झाल्यानंतर मालमत्तेची नोंद घेण्याची जबाबदारी व देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे. त्यासंबंधित दस्तऐवज ग्रामपंचायत स्तरावर ठेवण्यात येतात.

(६) संबंधित ग्रामपंचायतीकडून आयकर व आयकराच्या रकमेवरील ३ % व शिक्षण शुल्क वसुली बाबत उप कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचे दरमहा तपासणीमध्ये कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

(७) संबधित ग्रामपंचायतीकडून नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन २ % व बिगर नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ४ % वसुली ग्रामपंचायत स्तरावर कपात होणे अभिप्रेत आहे. याबाबीचे गट विकास अधिकारी स्तरावरुन दरमहा ग्रामपंचायत तपासणी मध्ये कार्यवाही करणे अपेक्षित आहे सदर मुद्दा या विभागाशी संबंधित नाही.

(८) ग्रामसचिव, शिंदोळी यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ९५९७ दिनांक १५/९/२०१५ रुपये २८,१३०/- वसुली करणेसंबंधी कळविण्यात आले आहे. सदर प्रकरणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचे मार्फत कार्यवाही होणे अभिप्रेत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायत शिंदोळीची गौण खनिजाची रक्कम रुपये १०,४०४ रुपये वसूल करुन शासन खाती भरणा का करण्यात आली नाही, इतर कामासंदर्भात सुद्धा गौण खनिजाची रक्कम त्याचवेळी देयकातून कपात करण्याची कार्यपद्धती का डावलण्यात आली, यामुळे शासनाच्या झालेल्या महसुलाच्या नुकसानीस कोण जबाबदार आहे, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, गौण खनिजासंदर्भात ग्रामपंचायतीने १०,४०४ रुपयांच्या पावत्या सादर केल्या असल्यामुळे ती वसुली करण्यात आलेली नाही. तसेच कामासाठी वापरण्यात आलेल्या सिमेंटचा दर्जा यांची चाचणी अहवाल जिल्हा परिषदेकडे आलेला आहे. यावर संचालक स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, सिमेंटच्या योग्यतेबाबत कोणत्या प्रयोगशाळेतून चाचणी केली आणि चाचणी तपासणी अहवाल कोणत्या तारखेचा आहे. यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, चाचणी तपासणी अहवाल दिनांक ३०.०१.२०१२ रोजीचा आहे. सिमेंटचा चाचणी रिपोर्ट देखील दिनांक ३०.०१.२०१२ रोजीचा आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, याचे देयक अदा केव्हा करण्यात आले, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की,सदरहू काम दिनांक ०३.०६.२०१२ रोजी पूर्ण करुन हस्तांतर केलेले आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की,चाचणी अहवाल येण्यापूर्वी किती देयके अदा करण्यात आली, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, १०% रक्कम रोखून इतर पेमेंट देण्यात आलेले आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, १ कोटी रुपयांचे काम असेल तर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी ९० लाख रुपये अदा केले. काम चांगले झाले नसेल तर देण्यात आलेले ९० लाख रुपये वसूल केले जातात काय, चाचणी अहवाल चुकीचा (निगेटीव्ह) आल्यास देण्यात आलेल्या ९० लाख रुपये परत मिळतील काय, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, कोणते साहित्य वापरले पाहिजे, याबाबत कंत्राटदाराची देखील जबाबदारी असते. सिमेंटची चाचणी घेतली जाते. ३० % चाचणी क्षेत्रीय पातळीवर घेतली जाते आणि इतर प्रयोगशाळेला पाठविली जाते.

संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, ग्रामपंचायतीने केलेल्या १६ कामांची एकूण किंमत किती होती व त्याकरिता अंतिम देयक अदा किती करण्यात आले, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, १६ कामे साधारणपणे ७० ते ८० लाख रुपयांपर्यंतची होती. त्या बाबतची माहिती असलेला तपशिलवार तक्ता उपलब्ध आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, कामाची किंमत व त्याकरिता अदा केलेले अंतिम देयक अशा २-३ कामांची समितीला माहिती द्यावी. यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, कामांची अंतिम देय रक्कम अदा केलेल्या देयकांची माहिती जिल्हापरिषदेकडे उपलब्ध नाही. प्रत्येक कामाकरिता वेगवेगळ्या रकमेचे देयक अदा केलेले आहे. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, ९० टक्के कामाचे देयक अदा केलेले आहे. सदर कामांची मोजमाप पुस्तिका (एम.बी.) रेकॉर्ड केली आहे का, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, कामांची मोजमाप पुस्तिका एम.बी. रेकॉर्ड केल्यानंतरच देयक अदा केले जाते. चाचणी रिपोर्टच्या निकषात काम बसत नसल्यास ते नाकारले जाते.

समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणी चौकशी करुन समितीकडे अहवाल सादर करावा. तसेच लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध करुन न दिल्यास महाराष्ट्र लेखा संहिता १९३० च्या कलम ७ नुसार संबंधितांकडून २५ हजार रुपयांचा दंड वसूल करुन शासन खाती जमा करावा अशी तरतूद आहे. या संदर्भात सन २०११ मध्ये सुधारणा करण्यात आली. तसेच अशा प्रकरणांमध्ये संबंधितांची एक वेतनवाढ रोखून संबंधितांच्या सेवापुस्तकात नोंद घेण्यात यावी असा निर्णय समितीने यापूर्वी ५ जिल्हा परिषदांच्या संदर्भात घेतलेला आहे. समितीची बैठक सुरु झाल्यानंतर अनेक परिच्छेदांच्या संदर्भात लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध करुन न दिल्याचे आढळून आले आहे. सदर परिच्छेदांच्या बाबतीत तसेच यानंतर येणाऱ्या अशा प्रकारच्या सर्व परिच्छेदांच्या संदर्भात अशी त्रुटी आढळून आल्यास संबंधितांविरुध्द वरील प्रमाणे शासन निर्णयानुसार दंडात्मक कारवाई प्रस्तावित करावी. लेखा परिक्षणाच्या वेळी कोणकोणत्या परिच्छेदांमध्ये कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली नव्हती, या बाबत आपण लेखापरिक्षण विभागाचे संचालक यांच्याशी समन्वय साधावा, ते बाबतची सर्व माहिती उपलब्ध करुन देतील. त्यानुसार समितीकडे अहवाल सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सन २०११-१२ व सन २००८-०९ वर्षातील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांमध्ये लेखा परिक्षणाचे वेळी अभिलेखे उपलब्ध केलेले नाहीत अशा सर्व आक्षेपांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये २५००० रुपये दंडाची वसुली करुन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची एक वेतनवाढ रोखून त्यांच्या सेवापुस्तकात तत्संबंधीत नोंद घेण्यात यावी व त्यासंदर्भातील प्रकरण निहाय अहवाल समितीस सादर करण्याचे निदेश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही केली आहे काय ?

(२) सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात यावी व तत्संबंधीत अहवाल सादर करण्यात यावा असे निदेश समितीने दिलेले आहेत त्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा. पंचायती राज समिती प्रमुख यांनी दिलेल्या निर्देशानुसार लेखापरिक्षणास दस्तऐवज उपलब्ध करुन न दिलेल्या संबंधित कर्मचाऱ्यावर महाराष्ट्र राज्य शासन राजपत्र, असाधारण भाग-४ क्रमांक, ९ दिनांक १० मार्च, २०११ नुसार मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० नुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.-

पंचायती राज समिती लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल सन २००८-२००९ मध्ये लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न करणे संदर्भात एकूण ३६ परिच्छेद असून प्रत्येकी १०० प्रमाणे एकूण रूपये १७,७०० (१७७ बाबी) दंड स्वरूपात वसूल करण्यात आलेला आहे.

तसेच पंचायती राज समिती लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल सन २०११-२०१२ मध्ये लेखा परिक्षणास अभिलेखे सादर न करणे संदर्भात एकूण १६ परिच्छेद असून प्रत्येकी रु. २५००० प्रमाणे एकूण रु. ४,००,००० दंड वसूल करून चलानव्दारे भरणा करण्यात आला आहे. तसेच खालील दोषी असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात थांबविण्यात आली आहे.

(१) श्री. पी. बी. पोफळे, सहायक अभियंता (विद्युत)

(२) श्री. पी. टी. वानखडे, शाखा अभियंता

(३) श्री. ए. एच. मुधोळकर, शाखा अभियंता

(४) श्री. डी. बी. कदम, शाखा अभियंता

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दोषी अधिकारी, श्री. पी.व्ही.गांवडे, तत्कालिन शाखा अभियंता यांची वेतनवाढ त्यांचे स्तरावर थोपविण्यात आली आहे.

**(२) लेखा परिक्षण आक्षेपासंबंधातील परिच्छेद क्रमांक ३.२२३**

मा. पंचायत राज समिती प्रमुख यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी चौकशी केली असून चौकशीचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.-

लेखा आक्षेपामध्ये जिल्हा निधी मधून करण्यात आलेल्या कामांच्या एकुण ८ ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कामांचा उल्लेख केलेला आहे. सदर ८ कामांपैकी ५ कामांचे करारनामे सरपंच/सचिव यांचे नावे करण्यात आलेले असुन उर्वरित दोन कामांचे करारनामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे नावे व एक मजुर सहकारी संस्थांच्या नावे करण्यात आलेले आहेत. सचिव/सरपंच ग्राम पंचायतीच्या नावाने करण्यात आलेल्या ५ कामांच्या आक्षेपाबाबतची माहीती पुढील प्रमाणे आहे.

**१. कावली येथील दामोजी नेवारे ते भोळे डोमाजी चेहळे यांचे घरा समोरील कॉंक्रीट रस्ता बांधकाम करणे :-** हे काम ग्रामपंचायत कावली यांचे मार्फत करण्यात आले आहे. या कामामधील गौण खनिज वसुली रक्कम रुपये ८८०८/- चलान क्रमांक ४२ दिनांक १९.५.२०१६ अन्वये शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. तसेच गुणवत्ता चाचणी अहवाल उपलब्ध आहेत.

**२. कोठोडा येथे जिवनराव कोहरे ते धनराज सपुह यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकाम करणे :-** हे काम ग्राम पंचायत, कोठोडा यांचे मार्फत करण्यात आले आहे. या कामामधील गौण खनिज वसुली रु. १६१८ कपात करण्यात आलेली आहे.

**३. सालोड येथे उकंडराव नेवारे ते मेन रस्त्यापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकाम करणे :-** हे काम ग्राम पंचायत, सालोड यांचेमार्फत करण्यात आले आहे. या कामामधील गौण खनिज वसुली रु. १७१८ प्रमाणक क्र. १२५७ दिनांक २३/२/२०१२ अन्वये कपात करण्यात आलेली आहे.

**४. सोनगाव येथे मेनरोड ते अशोक हजारे यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकाम करणे :-** हे काम ग्राम पंचायत, सोनगाव यांचे मार्फत करण्यात आलेले आहे. या कामामधील गौण खनिज वसुली क्र. ६३५३ चलान क्रमांक ४२ दिनांक १९.५.२०१६ अन्वये शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे.

**५. शिंदोडी येथे मनोहर निस्ताने ते विलास पांडे यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकाम करणे :-** हे काम ग्राम पंचायत, शिंदोडी मार्फत केले आहे. उक्त कामाच्या ठिकाणी बांधकाम सामुग्री प्रत्यक्षात गोळा करण्यात आली असुन सदर सामुग्रीची चाचणी प्रयोग शाळेतुन करण्याबाबतचे पत्र संबंधीत उप विभागाने ग्रामपंचायतीला दिलेले होते. ग्राम पंचायतीने सदर सामुग्रीचे चाचणी अहवाल प्रयोग शाळेतुन प्राप्त करणे आवश्यक होते. सदर कामाचे देयकामध्ये चाचणी अहवाल उपलब्ध न झाल्यामुळे १० टक्के रक्कम रोखुन ठेवण्यात आली. सदर कामाचे चाचणी अहवाल दिनांक २९/१/२०११ ला प्राप्त झालेले आहे. गौण खनिज वसुली नियमाप्रमाणे करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत या रस्त्याचा पृष्ठभाग सुस्थतीत तथा वाहतुकीस योग्य आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

(१) लेखापरिक्षणाचे वेळीस कागदपत्रे उपलब्ध करुन देणा-या अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करण्याबाबतचे सुधारित परिपत्रक पंरास २०१५/प्र.क्र.२८/वित्त-७ दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकातील तरतुदीनुसार जिल्हा परिषद, अमरावती कार्यालयाने कार्यवाही केलेली आहे.

(२) जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**चौकशी अहवाल**

मा. अध्यक्ष, पंचायती राज समिती यांनी दिलेल्या निर्देशानुसार, सदर कामाची चौकशीमध्ये मुळ दस्तऐवजांची तपासणी केली असता सदर कामाचा खालीलप्रमाणे चौकशी अहवाल सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग ४ क्रमांक ९, दिनांक १० मार्च, २०११ नुसार मुंबई स्थानिक लेखा परीक्षा अधिनियम लेखा परीक्षा अधिनियम १९३० कलम ८ नुसार रु. शंभर ऐवजी रु. पंचविस हजार दंड आकारण्यात आला आहे. तेव्हा सन २००८-०९ करीता रु. १०० व सन २०११-१२ करीता रु. २५००० वसुली करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी बैठकीमध्ये कामाच्या चाचणी अहवालाबद्दल श्री. पी. जी. भागवत, कार्यकारी अभियंता यांनी “ चाचणी अहवाल येण्यापूर्वी पार्ट टाईप करुन पेमेंन्ट करता येते असा नियम आहे. रु. १०० पैकी १० % रक्कम ठेवुन असे करता येते असे नमुद केले व तसे मुख्य अभियंता यांचे सर्क्युलर आहे.” असे सांगितले यावर पंचायती राज समिती प्रमुख यांनी श्री. भागवत यांनी सांगितले की तशा प्रकारचे सर्क्युलर असुन ती विभागाची प्रक्रीया आहे. समितीसमोर सदरहू सर्क्युलर तातडीने सादर करण्यात यावे. तशा प्रकारचे सर्क्युलर नसेल किंवा सदरहू सर्क्युलरमध्ये तशी बाब नसेल, तर समितीला चुकीची माहिती दिली म्हणून आपलेवर कार्यवाही प्रस्तवित करण्यात येईल, असे निर्देश दिले आहेत. प्रत्यक्षात या प्रकारचे परिपत्रक उपलब्ध नसल्याचे दिसुन येते. पर्यायाने श्री. पी. जी. भागवत, कार्यकारी अभियंता यांनी समितीला चुकीची माहीती दिलेली असल्याचे निदर्शनास येते. त्यांचेवर प्रशासकिय कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अमरावती यांचे पत्र क्र. ६३३१ दिनांक १८.५.२०१६ अन्वये प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०११-१२ व सन २००८-०९ वर्षातील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांमध्ये "लेखा परिक्षणाचे वेळी अभिलेखे उपलब्ध केलेले नाहीत" अशा सर्व आक्षेपांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० च्या कलम ७ अन्वये २५,०००/- रुपये दंडाची वसुली करुन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची एक वेतनवाढ रोखून त्यांच्या सेवापुस्तकात तत्संबंधित नोंद घेण्यात यावी व त्यासंदर्भातील प्रकरण निहाय अहवाल समितीस सादर करण्याचे निदेश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही केली आहे काय, या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीला विदित केले की, ज्यांनी लेखापरिक्षणाचे वेळी अभिलेखे सादर केले नाहीत अशा सन २००८-२००९ च्या प्रकरणांमध्ये १०० रुपये दंड वसूल केलेला आहे. तर सन २०११-२०१२ च्या प्रकरणांमध्ये रुपये २५,००० दंड वसूल केलेला आहे.

समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, पूर्वी अभिलेखे सादर केले नाही म्हणून १०० रुपये दंड आकारण्यात येत होता. कर्मचारी अफरातफर करुन अभिलेखे उपलब्ध न करता १०० रुपये दंड भरत होते. त्यानंतर हा दंड रुपये २५००० करण्यात आला. परंतु या दंडामध्ये देखील सुधारणा करण्याची गरज आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विदित केले की, २५ हजार रुपयांऐवजी ५० हजार रुपये किंवा ज्या कामाचे अभिलेखे दाखविले नाहीत त्या कामांच्या किंमतीच्या पाच टक्के यापैकी जी जास्तीची रक्कम असेल ती आकारण्यात यावी असे सुचविले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ज्या कर्मचा-यांनी/अधिका-यांनी लेखापरिक्षणाचे वेळी अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत, त्यांच्यावर दंडात्मक तर काही जणांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई केल्याचे स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे. हे अभिलेखे कोणाच्या ताब्यात असतात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, संबंधित अभियंत्यांचे ते काम आहे. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, जर पंचायत समिती कार्यालयातील काम असेल तर अभिलेख्यांची जबाबदारी गट विकास अधिका-यांची असते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कनिष्ठ अभियंत्याकडे काम असेल तर उप अभियंता याच्याकडे ताबा असतो. विभागीय काम असेल तर कार्यकारी अभियंत्यांकडे ही जबाबदारी जाते. ज्यांच्याकडे ताबा नाही त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केलेली दिसते. जिल्हा परिषदेकडून चुकीची कारवाई झालेली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समितीने मागील कालखंडात केलेल्या दौऱ्यात अधिका-यांना ज्या काही सूचना केल्या त्याची अंमलबजावणी होत नाही. लेखापरिक्षणाच्या वेळी अभिलेखे न दाखविणे यासंबंधी जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर नियमानुसार कारवाई केली पाहिजे. समितीच्या मते दुस-याच व्यक्तीवर कारवाई केलेली आहे. सचिवांनी सर्व गोष्टींची पाहणी केली आहे काय, यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला माहिती दिली की, कोणाकडे ताबा आहे हे पाहणे आवश्यक आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, अभिलेखे सादर न करणे प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी, परंतु जे दोषी नसताना ज्यांच्यावर कारवाई झालेली आहे, ज्यांची एक वेतनवाढ रोखली असेल त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने देण्यात यावी. समितीने भेट दिली, त्यानंतर जे लेखापरिक्षण झाले, त्या लेखापरिक्षणाच्या मुद्दयांच्या आधारे ज्या अधिका-यांना शिक्षा झाली, त्यांची खरे तर ही जबाबदारी नव्हती. नियमाच्या आधारावर या कारवाईची पुन्हा एकदा तपासणी होणे आवश्यक आहे, ज्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली, त्याच्या अखत्यारित ते लेखे नव्हते, तरीही त्याच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. यामध्ये जे दोषी आहे, त्याच्यावर कारवाई होणे अत्यावश्यक आहे. याबाबत तात्काळ आठ-दहा दिवसांच्या कालावधीत चौकशी झाली पाहिजे. चौकशीनंतर कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. संबंधित कर्मचा-यांची वेतनवाढ रोखलेली आहे, ही कारवाई रद्द करण्यात यावी. त्याच्याकडून नाहक दंडही वसूल करण्यात आलेला आहे, हा दंडही त्याला परत करण्यात यावा. ही कारवाई आठ दिवसाच्या आत करुन अहवाल समितीला सादर करावा असे निदेश समितीने दिले. यासंबंधीचा नियम वाचण्याकरिता एक दिवस पुरेसा आहे. तपासणी अधिकारी सक्षम असल्याशिवाय असे घडत नाही. तरीही जर काही अनियमितता झाल्यास खरोखर त्यास जो अधिकारी जबाबदार आहे, ज्याच्या अखत्यारित सर्व रेकॉर्ड होता, त्याला याकरिता जबाबदार धरण्यात यावे. नाहक इतर अधिका-यांना त्यामध्ये गोवून त्यांच्यावर कारवाई करणे योग्य नाही. संबधित सक्षम अधिकारी दैनंदिन कामांमध्ये इतर अधिका-यांची मदत घेत असतात, परंतु एखाद्या संबंधित गोष्टीची जबाबदारी संबधित सक्षम

अधिकाऱ्याचीच असते, त्याप्रमाणे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. लेखापरिक्षणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले नव्हते, अशी नोंद झालेली आहे. यास जो जबाबदार अधिकारी होता त्याला शिक्षा न देता दुस-या व्यक्तीला शिक्षा दिलेली आहे. अहवाल योग्य मार्गाने सादर होणे आवश्यक होते, असे समितीचे म्हणणे आहे. या संदर्भात जो अभिलेख्यांचा ख-या अर्थाने कस्टेडियन जबाबदार असेल त्याला दोषी निश्चित करुन त्याच्यावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. शासनातील तज्ञ मंडळींना यासंदर्भातील नियम बघण्यास सांगून त्यानुसार योग्य माणसावर ताबडतोब कारवाई झाली आहे की नाही याची तपासणी केली पाहिजे. याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत म्हणजे आठ दिवसांच्या आत समितीसमोर सादर करण्यात यावा.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाकरीता जिल्हा निधीतून करण्यात आलेल्या १६ बांधकामांच्या बाबी तपासल्या असता लेखापरिक्षकांनी पुढील प्रमाणे आक्षेप घेतले; जसे, ग्रामपंचायतीकडून कामांचे प्रस्ताव न स्वीकारता बांधकामे प्रस्तावित केली, ग्रामपंचायतींनी ठेकेदार म्हणून केलेला खर्च ग्रामसभेमध्ये मंजूर केल्याचे कोणतेही ठराव प्राप्त झालेले दिसून येत नाहीत. कामातील बाबींची प्रयोगशाळेत तपासणी केल्याचे आढळून आले नाही, गौणखनिजाचा भरणा केल्याबाबत अभिलेख नाहीत, कंत्राटदार ग्रामपंचायतींनी सिमेंट निकषानुसार वाटप केले किंवा कसे हे समजून येत नसणे, ग्रामपंचायतींना कामे देण्याबाबत पाळावयाची कार्यपध्दती अनुसरलेली दिसून आली नाही. काम पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्ती करण्यास ग्रामपंचायती तयार असल्याबाबतचे संमतीपत्र आढळून आले नाही. ग्रामपंचायतींनी आयकर, विक्रीकर, शिक्षण शुल्क गौणखनिज रक्कम वसूल केल्याचे दिसून येत नाही, तरतूद वाटप खर्चाचे रुपये १,९९,५६१ चे प्रमाणकावरील रक्कम वसूल पात्र असल्याबाबत आक्षेप लेखापरिक्षकांनी प्रस्तुत प्रकरणात घेतलेले आहेत.

उक्त लेखा आक्षेपासंबंधात समितीने अमरावती जिल्हा परिषद येथे प्रत्यक्ष भेट देवून मुख्य कार्यकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीस जिल्हा परिषद प्रशासनाने लेखी खुलासा केला की, जिल्हा निधीतील प्रस्तावित कामे ग्रामपंचायतीचे ठरावानुसार घेण्यात आलेली आहेत, बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याचे नमुने प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविण्यात आले असून गौण खनिजाची रक्कम भरण्याबाबत कारवाई सुरु आहे, तसेच सर्व पूर्ण झालेल्या कामांच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीचीच आहे तर सर्व शासकीय रक्कमा, आयकर विक्रीकर, शिक्षण शुल्क इत्यादी वसूल करण्याची जबाबदारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व गटविकास अधिकारी यांची होती.

समितीला मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांच्या साक्षीच्या वेळी ग्रामपंचायतीने १०,००० रुपयांच्या गौण खनिजाच्या पावत्या सादर केल्या असल्यामुळे गौण खनिजाची वसुली करण्यात आली नसल्याची माहिती मिळाली. सदर ७० ते ८० लक्ष रुपये किंमतीच्या १६ कामांवर वापरण्यात आलेल्या बांधकाम साहित्याची चाचणी प्रयोगशाळेतून वेळेवर करण्यात आली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. चाचणीचा अहवाल येईपर्यंत केवळ १०% देयक रोखून ठेवण्यात येते अशीही माहिती समितीस प्राप्त झाली. परंतू एखाद्या कामाची एकूण किंमत किती, त्याकरीता अग्रीम देयक किती अदा केले आदी प्रश्नांवर समितीला समाधानकारक उत्तरे प्राप्त झाली नाहीत. **तसेच लेखापरिक्षणाकरीता अभिलेख उपलब्ध करुन दिले नसल्याप्रकरणी समितीने दंडात्मक कारवाई करण्याचे भेटीच्या वेळी निदेश देऊनही मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये संबंधित कोणत्याही अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई समितीच्या भेटीपर्यंत जिल्हा परिषद प्रशासनाने केलेली नाही. याबाबत समिती अतिव खेद व्यक्त करते. प्रशासन दोषींना पाठिशी घालत असून याप्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी समितीने निदेश देऊनही दंडात्मक कारवाई करण्यात दिरंगाई केली अशा सर्व संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन दोषी विरुध्द कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.**

सामान्यत: स्थानिक निधी लेखा परिक्षकांकडून जिल्हा परिषदांचे १२ महिन्यांचे लेखापरिक्षण केले जात नाही. मार्च महिन्यासह वर्षातल्या एखाद्या महिन्याचे हे टेस्ट ऑडीट असते. एखाद्या जिल्हा परिषदेला भेट देवून तिचे लेखापरिक्षण करण्याबाबत लेखापरिक्षा सुमारे २ महिने आधी पुर्व सुचना देतात असे असताना लेखा परिक्षकास एखाद्या प्रकरणी आवश्यक असलेले अभिलेख परिक्षणाकरीता मागितले तरी ते उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत तर ते अर्धसमास पत्राद्वारे त्याची मागणी करतात. तीन वेळा अर्धसमास पत्राद्वारे मागणी करुनही ते अभिलेख उपलब्ध झाले नाहीत तेव्हा मेमोरेंडींगच्या वेळी देखील अभिलेख उपलब्ध करुन देण्याची संधी असते. अशा वेळोवेळी संधी प्राप्त होवूनही अभिलेख उपलब्ध

झाले नसल्यास लेखापरिक्षक असा आक्षेप त्यांच्या अहवालात समाविष्ट करतात आणि तरीही अभिलेख दाखविलेच नाही तर सदरहू आक्षेप पंचायती राज समितीच्या अहवालाकरीता अंतिम केला जातो. एवढ्या संधी देवूनही लेखापरिक्षकांच्या आक्षेपात मोठ्या प्रमाणात **"लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध करुन दिले नाहीत असे आक्षेप" लेखा परिक्षणाचे वेळी उपस्थित झाले आहे. संबंधित अधिनियमाच्या नियम ७ अन्वये सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर अद्यापपर्यंत कारवाई केली नसल्यास ती तातडीने करावी व तसेच एक तात्पुरती वेतनवाढ रोखण्यात यावी आणि दोषींच्या सेवा पुस्तिकेत तशी नोंद घेण्यात यावी, याबाबत केलेली कार्यवाही समितीस दोन महिन्यात पाठविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध न करुन दिल्याप्रकरणी १०० रुपये दंडाची तरतूद करण्यात आली होती. सन २०11 मध्ये सदरहू अधिनियमात सुधारणा करण्यात येऊन उक्त १०० रुपये दंड वाढवून २५००० करण्यात आलेला आहे. असे असतानाही जिल्हा परिषदांच्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये अभिलेख उपलब्ध केले नसल्याबाबतचे आक्षेपांची संख्या चढत्या क्रमाने वाढतच आहे. समितीने बऱ्याच जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता समितीच्या लक्षात आले की, कोट्यावधी रुपयांच्या कामातील महत्वाचे दस्तऐवज लेखा परिक्षणाकरीता उपलब्ध करुन दिले जात नाहीत. परंतू २५००० रुपये दंड मात्र तातडीने भरला जातो. यावरुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमाच्या कलम ७ मधील २५००० रुपये दंड भरुन सुटण्याची/नामानिराळे राहण्याची किंवा जबाबदारी झटकण्याची प्रवृत्ती प्रशासनामध्ये वाढीला लागली आहे.

**सदरची बाब विचारात घेता संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांनी २५००० रुपये दंडाच्या तदतुदीमध्ये रुपये "२५००० ऐवजी ५०००० रुपये किंवा ज्या कामाचे अभिलेख दर्शविले नाहीत त्या कामाच्या ५% यापैकी जी रक्कम अधिक आहे ती दंड म्हणून आकारण्यात यावी" अशी सुधारणा करण्याबाबतचा संचालनालयाचा प्रस्ताव वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे विचारार्थ प्रलंबित असल्याचे विदीत केले आहे. संचालकांच्या प्रस्तावावरील विचार पूर्ण झाला असेल तर शासनाने तत्संबंधीत सुधारणा महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा संहीता अधिनियम १९३० च्या कलम ७ मध्ये तातडीने करुन अध्यादेश निर्गमित करावा व नजिकच्या अधिवेशनात तत्संबंधीत विधेयक आणून संमत करण्यासंदर्भात कार्यवाही करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

अमरावती जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील ३६ परिच्छेदातील १७० बाबी संबंधातील कर्मचारी/अधिकाऱ्यांकडून १७,७०० रुपयांचा तर सन २०११-२०१२ मधील १६ परिच्छेदांत ४,००,००० रुपये दंड वसुल करण्यात आला आहे ही खचितच समाधानाची बाब आहे. **परंतू यापैकी शाखा अभियंता या पदाच्या अधिकाऱ्यांवर देखील २५००० रुपये दंड आकारण्यात येवून त्याची नोंद सेवापुस्तकात घेतली व त्यांची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आल्याची माहिती समितीला प्राप्त झाली. याबाबत खरोखर पुर्नविचार करण्याची आवश्यकता आहे असे समितीला वाटते याचे कारण असे की, शाखा अभियंता या पदाच्या अधिकाऱ्यांकडे स्वत:चे कार्यालय किंवा अभिलेख ठेवण्याकरीता साधन उपलब्ध नसते. शाखा अभियंते बहुत करुन फिल्डवर कार्यरत असतात.** लेखापरिक्षेच्या वेळी त्यांचेकडे अभिलेख अभिरक्षेत असतात किंवा कसे, तसेच संबंधित अभिलेखे लेखापरिक्षणास आलेले व उपलब्ध करुन न देण्याबाबत त्यांस जबाबदार धरणे कितपत योग्य राहिल म्हणून याची पुन्हा नव्याने तपासणी करावी. **अमरावती जिल्हा परिषदेमधील ज्या शाखा अभियंत्यांवर रुपये २५,००० दंडाची कारवाई केली आहे, ती नैसर्गिक न्याय तत्वाचा उपयोग करुन कारवाई केली की, समितीने निदेश दिले म्हणून केली, संबंधित अभियंता अभिलेखे उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असेल तरच त्यांचेवर जबाबदारी निश्चित करावी, अन्यथा ती तातडीने मागे घेऊन त्यांच्या वेतनवाढी पुर्वलक्षी प्रभावाने सुरु करण्यात याव्यात व त्याबाबतचा अहवाल समितीला ३ महिन्यांच्या आत सादर करावा अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, अमरावती

### ग्रामपंचायतीस बांधकामे देतेवेळी आर्थिक स्थितीचा आढावा न घेता व शासन निर्देशाचा अवलंब न करणेबाबत

**(परिच्छेद ३.२२५/१६) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद, अमरावती सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक १६)

सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये एकुण १२५ ग्रामपंचायतींना कंत्राटदार म्हणुन कामे देण्यात आलेले आहे. सदर बांधकामा संदर्भात अर्धसमास पत्र क्र. ४ दिनांक ३१/८/२०१२ च्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. ६०१२ दिनांक १/९/२०१२ अन्वये संबंधीत गटविकास अधिकारी व सरपंच, सचिव यांना अभिलेखे सादर करण्याचे आदेशीत केले असे असतांना केवळ ग्रामपंचायत वायगाव, अंजनगाव बारी, कंझरा यांचे अभिलेखे प्राप्त झाले. एकुण १२५ ग्रामपंचायतींना २,६१,८१,६१६ रूपये केलेल्या कामासंबधी अदा केलेले आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांचे परिपत्रक क्र. ४/४/१०६१, दि. १२/०३/२०१० व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए / २००८ /प्र.क्र ४४६ / वित्त-९ दि.२० जून, २००८ व निविदेतील अटी व शर्ती नुसार संबधीत कंत्राटदार ग्रामपंचायतीने बांधकाम विहित मुदतीत पुर्ण करण्याकरिता सोपविलेल्या कामाचा नियोजित कार्यक्रम प्रथमतः सादर करून त्यानुसार काम करणे बंधनकारक असतांना असे कोठलेही नियोजनात्मक अभिलेख लेखापरिक्षणास संबंधीत विभाग सादर करू न शकल्याने उक्त शासन निर्णय तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कार्यवाही झाल्याचे आढळून आलेले नाही.

(२) शासकीय महसूलाच्या संदर्भात ग्रामपंचायतीने कंत्राटदार म्हणून खरेदी केलेल्या गौणखनिजाच्या रकमा या शासन महसूलात जमा झाल्या अथवा नाही तसेच आयकर व उपकराच्या रकमा या योग्य शिर्षाखाली भरणा करण्यात आल्या किंवा नाही याची पडताळणी ग्रामपंचायतीनी अभिलेखे सादर न केल्यामुळे करता आलेली नाही. वरील ज्या ग्रामपंचायतींनी अभिलेख सादर केला त्यांच्या अभिलेख्यांची या मुद्याच्या अनुषंगाने पडताळणी केली असता गौण खनिजा संबंधीच्या रकमा रोख पुस्तकात खतविल्या गेल्याची नोंद नसल्याचे दिसून येत आहे.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय सिमेंट ००९/प्र.क्र.११४/जल-७ दि.२०/०४/२०११ नुसार बांधकामासाठी आवश्यक असणाऱ्या सिमेंटच्या वापराचे निकष नमूद केलेले आहेत. परंतू या निकषानुसार कंत्राटदार ग्रामपंचायतीनी बांधकामाकरिता वापरलेले सिमेंट दर्जेदारच होते याची अभिलेख्याअभावी खात्री करता आली नाही.

(४) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.अल्पंस १०९३/(२६३५) / उद्योग-६ दि. १६/०७/१९९३ नुसार ५०००० पेक्षा जास्त किंमतीची बांधकामे करावयाची झाल्यास वर्तमानपत्रात जाहीरात देवून निविदा पध्दतीने बांधकामे पार पाडणे अनिवार्य असतांनी अशी कार्यवाही न करता १२५ ग्रामपंचायतीना कोणत्याही प्रकारचे पत्र व सुचना न देता बांधकामे देण्यात आलेली आहे. म्हणजेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.ग्रायसो २००७/प्र.क्र.-९/यो-९ दि.८/५/२००७ ला अनुसरून जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली नाही.

(५) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय परिपत्रक क्र.व्हीपीएम २०१०/प्र.क्र.१५६/पंरा/-३/ मंत्रालय मुंबई दि. ५ जुलै, २०१० अन्वये कंत्राटदार पंचायतीने केलेल्या कामावरील खर्च ग्रामसभेत मंजूर करून घेणे आवश्यक आहे. नियमाप्रमाणे अशी कार्यवाही त्यांनी केल्याबाबत अंतिम देयकासोबत सदरचा ठराव जोडणे आवश्यक असतांना असे अभिलेख नस्तीला उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. या शिवाय ग्रामपंचायतीनी अभिलेख सादर न केल्यामुळे निर्माण झालेल्या मत्तेच्या नोंदी योग्य त्या नोंदवहीत घेतल्याची खात्री होऊन शकली नाही. त्याप्रमाणे पंचायतीनी स्वतः केलेल्या कामांची देखभाल व दुरुस्ती करण्यास तयार असण्याबाबत संमतीपत्र विभागाने सादर केलेल्या अभिलेखामध्ये आढळून आलेले नाही.

(६) कंत्राटदार ग्रामपंचायतींनी निविदा खरेदी करतांना केलेल्या खर्चाची नोंद त्यांच्या रोखपुस्तकात नोंदविलेली नाही ही बाब ग्रामपंचायत अंजनगाव, बारी, वायगांव, कंझरा या ग्रामपंचायतींनी सादर केलेल्या रोखपुस्तकाची पडताळणी अंती आढळून आलेली नाही. याशिवाय महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए-२००८/ प्र.क्र.४७२/वित्त-९/३३, दि. ९/२००९ व परिपत्रक क्र. व्हीपीएम-२०१०/ प्र.क्र.१५६, दि. ५-७-२०१० मधील परि क्र. ८ नुसार सक्षम प्राधिकरणाकडून आवश्यक ती कार्यवाही झालेली नसल्याचे आढळून येत आहे.

(७) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.२०१०/प्र.क्र.६८/कोषा.दि.२८-०४-२०११ अन्वये सर्व प्रदान ही रोखीत/धनादेशाद्वारे/ईसीएम/एनईएफटी मार्फत होणे बंधनकारक असताना त्याप्रमाणे कार्यवाही न होता रोखीने रक्कमा अदा केल्याचे दिसून येते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर आक्षेपाबाबत खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

(१) शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत यंत्रणा म्हणून नेमतांना संबंधित ग्रामपंचायतकडून कामाची मागणी आल्यास ग्रामपंचायतीची आर्थिक मर्यादेनुसार व वार्षिक उत्पन्नाचा ताळेबंद तपासून ग्रामपंचायतीला यंत्रणा म्हणून कामे विना निविदा देण्यात येतात. ग्रामपंचायतला कामे देतांना वृत्तपत्रांमध्ये जाहीर निविदा प्रसिध्द करण्याची गरज नाही. शासन निर्णय क्रमांक महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए/२००८/प्रक्र-४७२/वित्त-९ (३३)/ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक ९ फेब्रुवारी, २००९ चे शासन निर्णयानुसार सदर कामे ग्रामपंचायतला देण्यात आली त्यानुसार ग्रामपंचायतकडून प्राप्त कागदपत्रानुसार निविदेतील अटी व शर्तीनुसार कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. (शासन निर्णयाची प्रत उपलब्ध आहे)

(२) संबंधित ग्रामंचायतकडून गौण खनिजाची वसूली बाबतची कार्यवाहीबाबत ग्रामपंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचे अधिनस्त पंचायत समिती स्तरावरील विस्तार अधिकारी, पंचायत यांचेकडून संबंधित ग्राम पंचायतीची दरमहा तपासणी कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. सदर मुद्दा या विभागाशी संबंधित नाही.

(३) ग्रामपंचायतने केलेल्या बांधकामासाठी वापरलेले सिमेंट योग्य दर्जाचे असल्याबाबत खात्री करुनच सिमेंट वापरण्यात येते. तसेच सिमेंटचा दर्जा योग्य असल्याबाबत आवश्यक त्या चाचण्या घेण्यात येतात. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे निदेशित केल्याप्रमाणे वारंवारीतानुसार चाचण्या घेण्यात येतात. चाचणी अहवालानुसार वापरलेले साहीत्याच्या दर्जाबाबत खात्री करुनच देयके अदा करण्यात येतात.

(४) शासन निर्णय क्रमांक महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/२००८ प्र.क्र -४७२/वित्त-९ (३३)/मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ९ फेब्रुवारी, २००९ चे शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतीकडून कामाची मागणी आल्यानंतर त्यांचेकडून आवश्यक ते कागदपत्राची पुर्तता करुन घेऊन त्यांना विना निविदा कामे देण्याबाबत शासन निर्णयामध्ये नमुद असल्याने त्यांना कामे देण्यात आली आहे.

(५) ग्रामपंचायतीला यंत्रणा म्हणून कार्यारंभ आदेश देतांना ग्रामपंचायतचा ठराव बंधनकारक आहे. ग्रामपंचायतीने केलेल्या कामाच्या देयकाचा धनादेश दिल्यानंतर ग्रामपंचायत स्तरावर झालेल्या खर्चास ग्रामसभेमध्ये मंजूरी घेतल्या जाते व त्याची नोंद ग्रामपंचायत स्तरावर घेण्यात येते. सदरची नोंद ही ग्रामपंचायत स्तरावर घेण्यात येत असल्याने त्याबाबतचे दस्ताऐवज ग्रामपंचायत स्तरावर ठेवण्यात येतात.

(६) ग्रामपंचायतींनी निविदा खरेदी करताना त्यांना विभागीय स्तरावरुन पावती देण्यात येते व त्याची नोंद निविदा पुस्तकात घेण्यात येते व त्याची उपप्रत संबंधित ग्रामपंचायतला देण्यात येऊन त्याच्या नोंदी ग्रामपंचायत स्तरावर घेण्यात येते. त्याबाबतची नोंदवही ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध असते.

(७) संबंधितांना धनादेशाद्वारे रकमेची अदायगी करण्यात आलेली आहेत.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अर्धसमास पत्र देऊनही एकूण १२५ पैकी २० ग्रामपंचायतींनी ठेकेदार म्हणून केलेल्या कामाचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न करुन देण्याची कारणे काय आहेत, सदर अनियमिततेस कोण जबाबदार आहे, संबंधितांवर याबाबत काय कारवाई करण्यात आली, त्याचप्रमाणे महिला व बालकल्याण, शासन निर्णय दि.१२-३-२०१० व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दि. २०/६/२००८ नुसार ग्रामपंचायतीकडील कामे विहित मुदतीत करण्यासाठी आवश्यक नियोजन का करण्यात आले नाही, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, लेखा परीक्षणाच्यावेळी सदर अभिलेखे उपलब्ध नव्हते. त्यानंतर ते उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. समितीने यावर असे निदेश दिले की, ऑडिट पॅरा आल्यावर लेखा परीक्षणाच्यावेळी अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले नाही असे असेल त्या ठिकाणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमाच्या कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई करुन संबंधितांचे सेवापुस्तिकेत नोंद घ्यावी त्यांची एक वेतनवाढ रोखण्याची कार्यवाही करण्यात यावी.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, आता अभिलेखे उपलब्ध आहेत काय, या कामावर किती रक्कम खर्च करण्यात आलेली आहे, यावर कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी समितीस माहिती दिली की, १२५ ग्रामपंचायतींनी केलेल्या कामाबाबत २,६१,८१,६१६ रुपये इतकी रक्कम त्यांना अदा करण्यात आलेली आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, धनादेश दिल्यानंतर नमुना क्रमांक ७ च्या पावत्या घेण्यात आल्या आहेत काय, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, धनादेश दिल्यावर नमुना क्रमांक ७ च्या पावत्या घेण्यात आल्या आहेत. त्या पावत्या आता माझ्याकडे नाहीत. यावर समितीने मत व्यक्त केले की, एखाद्या कामाबाबत आपणास माहिती नसेल तर तसे आपण स्पष्ट सांगावे असत्य माहिती समितीला देण्यात येऊ नये. माहिती आता नसेल तर नंतर उपलब्ध करुन देतो असे सांगावे. समितीची दिशाभूल करण्यात येऊ नये. यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, सदर पावत्या आता उपलब्ध नसल्यामुळे त्या नंतर समितीस उपलब्ध करुन देण्यात येतील.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, गौणखनिजाची वसूली ही देयकातून करणे अनिवार्य असताना या वसुलीच्या कार्यवाहीबाबत तपासणी करण्याची जबाबदारी विस्तार अधिकारी पंचायत यांची असल्याचा खुलासा केला आहे. देयकातून होणाऱ्या वैधानिक वजावटी तपासण्याची कार्यकक्षा विस्तार अधिकाऱ्यांची आहे याबाबतचा प्राधिकार कोणता आहे, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, गौणखनिजाची वसूली ग्रामपंचायत स्तरावरुन करण्यात येते, त्यासंदर्भात पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०११-२०१२ मध्ये २,६१,८१,६१६ रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यामुळे ही कामे होऊन आता तीन वर्षे झाली आहेत. त्यामुळे आता गौणखनिजाची वसुली कशी काय करण्यात येणार आहे. यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, गौणखनिजाच्या वसुलीबाबत ग्रामपंचायतीला पत्र देण्यात आले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, गौणखनिजाची देयके कोणी दिली आहेत. संबंधित कार्यकारी अभियंता कोण होता त्याचे नाव सांगावे. सदर अधिकारी सेवानिवृत्त झाले म्हणजे ते सुटले नाहीत, १२५ कामे करण्यात आली आहेत या संदर्भातील रोख पुस्तिका उपलब्ध आहे काय, अनामत रक्कम भरण्याचा उल्लेख रोख पुस्तिकेत करण्यात आला आहे काय, रोख पुस्तिका मागविण्यात यावी. यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.सी.बी.भागवत होते ते आता सेवानिवृत्त झाले आहेत. यासंदर्भातील कॅश बुक कॅफो कार्यालयात आहे. निविदा प्रक्रिया करताना अनामत रक्कम भरुन घेण्यात आली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, गौण खनिजाच्या वसुलीबाबतचा हा विषय आहे. अहवालाच्या पान क्रमांक २१ वर असे नमूद केले आहे की, "संबंधित ग्रामपंचायतकडून गौण खनिजाची वसुलीबाबतची कार्यवाही ग्रामपंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचे अधिनस्त पंचायत समिती स्तरावरील विस्तार अधिकारी पंचायत यांचेकडून संबंधित ग्रामपंचायतीची दरमहा तपासणीची कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. सदर मुद्दा या विभागाशी संबंधित नाही" त्यामुळे सदर निधी वसूल करण्याची जबाबदारी कोणाची आहे, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, या विषयाची जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची आहे. यावर समितीने मत व्यक्त केले की, या ठिकाणी सदर जबाबदारी ढकलण्यात आली आहे. अशा प्रकारे लेखी उत्तर देणे बरोबर नाही. यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, अनामत रक्कम संबंधित ग्रामपंचायतीकडून वसूल करावी असे धोरण होते.

समितीने पुढे विचारणा केली की, १२५ कामांमध्ये निंबोळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत अद्यापपर्यंत का अपूर्ण राहिलेली आहे यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, एजन्सीकडून सदर काम सोडून देण्यात आले होते. सदर कामाचे फेरवाटप करण्यात आले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, या कामाबाबत किती रकमेचे देयक देण्यात आले आहे.यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, याबाबत माहिती घेऊन समितीला अवगत करण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या कामाबाबत आतापर्यंत माहिती का घेतली नाही या कामासाठी ठेकेदाराला ९ लाख रुपये दिले आहेत. सदर काम अर्धवट झाले आहे. चार वर्षे पूर्ण झाले असून त्या कामाबाबत आता समितीला माहिती घेऊन सांगण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हा विषय अतिशय गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. या ठिकाणी ठेकेदाराचे हित जपण्याचे काम होत आहे असे यातून दिसून येते. नियमबाह्य कामे देण्यात आली आहेत. ग्रामपंचायतीची आर्थिक क्षमता पाहून काम देणे आवश्यक आहे. या जिल्हा परिषदेमध्ये ठेकेदाराचे हित जपण्याचे काम होत आहे असे मत समितीने व्यक्त केले. तद्नंतर कार्यकारी अभियंता यांनी याबाबत तपासणी करणे आवश्यक होते. हा विषय अतिशय महत्वाचा आहे. या विषयाबाबत सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. तत्कालीन अधिकारी व ठेकेदार यांची एक साखळी निर्माण झाल्याचा संशय येतो. संबंधित कार्यकारी अभियंता, ज्युनिअर अभियंता, शाखा अभियंता यामध्ये यांचा रोल असावा असे वाटते, या संपूर्ण प्रकरणाची सखोल तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एक महिन्यात करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

प्रस्तुत प्रकरणी ठेकेदाराचे हित जोपासण्यात येत असल्याचे मत व्यक्त करुन सदरहू आक्षेपातील कामाची चौकशी करण्यात यावी व चौकशीचा संपूर्ण अहवाल सादर करावा असे निदेश समितीने दिले आहे. त्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यात त्यात काय आढळून आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

समितीने दिलेल्या निर्देशानुसार, सदर कामाची चौकशी कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी केली असुन चौकशीचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४७२/वित्त-९(३३) दिनांक ९-२-२००९ अन्वये लोकसंख्येनुसार ग्रामपंचायत १५ लाखापर्यंत कामे प्राधान्याने देणे बाबत नमुद आहे. त्यानुसार ग्रामपंचायतींना कामे देण्यात आलेली होती व दिलेली सर्व कामे रु. १५.०० लक्ष पेक्षा कमी रकमेची आहेत. उक्त शासन निर्णयाप्रमाणेच ग्राम पंचायतींची नमूना ३ व ४ नूसार आर्थिक स्थिती तपासून कामे देण्यात आलेली असुन ठेकेदाराचे कोणतेही हित जोपासण्यात आले नाही.

२. सदर ग्रामपंचायत अंतर्गत काम सुरु असतांना बांधकाम विभागाकडून संबंधीत उप अभियंता तसेच शाखा अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली कामे करण्यात आली असल्याने अंदाजपत्रकातील निकषाप्रमाणे कामे करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे कामाचे मुल्यांकन झालेले आहे व कामांचे चाचणी अहवाल तपासले असता योग्य असल्याचे आढळून आले.

३. एकूण ५९ ग्रामपंचायती मध्ये ७८ कामे घेतलेली होती. याबाबत ग्राम पंचायतकडून करण्यात आलेल्या प्रत्यक्ष कामाच्या देयकाचे धनादेश कामाच्या सुरक्षा ठेव रक्कम, ग्रामनिधीचे धनादेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर धनादेशाबाबत ग्रामपंचायत स्तरावर पोच पावत्या नमुना नं. ७ मध्ये ठेवण्यात आलेल्या आहेत.

४. ग्राम पंचायतींनी ग्रामसभेचा ठराव घेवुन काम केलेले असुन संबंधीत ग्रामपंचायत देखभाल दुरुस्ती करण्यास तयार असल्याचे ठरावात नमूद आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कडुन स्वतंत्र दाखला घेण्यात आलेला नाही. सदर मालमत्तेची नोंद ग्रामपंचायतच्या नोंदवहीत घेतल्याची खात्री गट विकास अधिकारी यांच्याकडुन घेण्यात आली आहे.

५. ग्राम पंचायतने निविदा करतेवेळी खर्चाची नोंद त्यांच्या रोख पुस्तकात नोंदविण्याबाबत सबंधित गट विकास अधिकारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

## चौकशी अहवाल

**कामाचे नाव : ग्रामपंचायतीस बांधकामे देतेवेळी आर्थिक स्थितीचा आढावा न घेता व शासन निर्देशाचा अवलंब न करणेबाबत.**

मा. अध्यक्ष, पंचायती राज समिती यांनी दिलेल्या निर्देशानुसार, सदर कामाची चौकशी मध्ये मुळ दस्तऐवजांची तपासणी केली असता सदर कामाचा खालीलप्रमाणे चौकशी अहवाल सादर करण्यात येत आहे.

स्थानिक लेखा परिक्षणातील मुळ परि. सन २०११-१२ परि.क्र.१६ नुसार शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग जिप/२००८/दिनांक ०१-०२-२००९ अन्वये ग्राम पंचायतीने ठरावाव्दारे केलेल्या मागणीनुसार प्रथम प्राधान्य देवुन विना निविदा कामे देण्यात आलेली आहेत. ग्रामपंचायतीच्या सचिव व सरपंच यांनी प्रमाणीत केलेल्या ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती दर्शक विवरणपत्र विचारात घेवुनच कामाचे वाटप करण्यात आल्याचे उपलब्ध अभिलेख्यावरुन आढळून आले आहे. तांत्रिक दृष्टीकोनातुन कामाचा दर्जा वेळोवेळी तपासण्यात आलेला असुन त्यानंतरच ग्राम पंचायतीला देयकाचे प्रदान करण्यात आलेले आहे. या संदर्भात कोणतेही तक्रार प्राप्त झालेली नव्हती. लेखा आक्षेपात एकुण १२५ ग्रामपंचायती नमूद करण्यात आलेली आहे. तथापि प्रत्यक्षात एकुण ५९ ग्रामपंचायती असुन त्यात ७८ कामे आहेत. या कामांना ग्रामपंचायत कडून करण्यात आलेल्या प्रत्यक्ष कामाच्या देयकाचे धनादेश (७८), कामाच्या सुरक्षा ठेव रक्कम, ग्रामनिधीचे धनादेश (४७) निर्गमित करण्यात आलेले आहेत. असे एकुण १२५ धनादेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. धनादेशाच्या पोचपावत्या नमुना नं.७ ग्रामपंचायत कडुन घेण्यात आलेल्या आहेत. लेखा परिक्षणा दरम्यान अभिलेखे सादर न केलेल्या २० ग्रामपंचायतीकडून अभिलेखे उपलब्ध झालेले नसल्याबाबतचे अभिलेख्याची तपासणी केली असता संबंधित ग्रामपंचायतीकडून अभिलेखे मागवुन घेण्यास जबाबदार असलेल्या कनिष्ठ सहाय्यक यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करणे उचित राहील असे मत आहे. एकुण ७८ कामांची प्रत्यक्षात रक्कम रुपये ६४,४७२ ची कपात देयकातुन करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कम रुपये १,९९,३८१ भरणा चलान क्र. ४३ दिनांक १९-५-२०१६ अन्वये शासन खाती जमा करण्यात आलेला आहे.

संबंधित पंचायत समितीकडून याबाबतीत अहवाल खालीलप्रमाणे :-

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४७२/वित्त-९(३३) दिनांक ९.२.२००९ अन्वये लोकसंख्येनुसार ग्रामपंचायत १५ लाखापर्यंत कामे प्राधान्याने देणे बाबत सुचित केलेले आहे. यामध्ये सबंधित ग्रामपंचायतच्या स्वउत्पन्नात वाढ होवून ग्रामपंचायतींना सक्षम करणे हा शासनाचा उद्देश आहे. त्याप्रमाणे १४ वा वित्त आयोग व इतर योजनाअतंर्गत प्राप्त निधी भेट ग्रामपंचायतच्या खात्यात जमा करुन ग्रामपंचायत स्तरावरच कामे करणे बाबत शासनाचे धोरणात्मक निर्णय घेतले आहे. उलट कंत्राटदाराचे हित जोपासले जाऊ नये या उद्देशाने ग्रामपंचायतला कामे देण्यात आलेली आहे.

२. सदर ग्रामपंचायत अंतर्गत काम सुरु असतांना बांधकाम विभागाकडून संबंधित शाखा अभियंता तसेच उप अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली कामे करण्यात आली असल्याने अंदाजपत्रकातील निकषाप्रमाणे कामे करण्यात आलेली आहे. त्या प्रमाणे कामाचे मुल्यांकन झालेले आहे व ग्रामपंचायतीचे चाचणी अहवाल तपासले असता योग्य असल्याचे आढळून आले.

३. एकूण १२५ कामांना ग्रामपंचायत ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए-२००८/प्र.क्र.४७२/ वित्त-९ (३३) दिनांक ९-२-२००९ च्या अधीन राहुन सदर काम देण्यात आलेली आहे. तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. ग्रासयो२००७/प्र.क्र.१/यो-९/दिनांक ८-५-२००७ च्या शासन निर्णयातील ३.२.८ मध्ये नमूद केल्या प्रमाणे ग्राम पंचायतींना प्राधान्याने कामे देण्याबाबत सुचित केले आहे. संबंधीत ग्रामपंचायतीने असमर्थता दर्शविल्यास त्या कामाचे वाटप नियमाप्रमाणे इतर कंत्राटदारास देण्याचे सूचित केले आहे. त्यामुळे उपरोक्त दिनांक ८-५-२००७ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायतीस बांधकाम देतेवेळी आर्थिक स्थितीचा आढावा न घेता व शासन

निर्देशाचा अवलंब न करण्याबाबत माहिती सादर करण्यात यावी. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, बऱ्याच लहान लहान ग्रामपंचायतींचा अनेक बाबी संदर्भातील तपशील उपलब्ध नाही. ग्रामपंचायतीने निविदा करतेवेळी खर्चाची नोंद त्यांच्या रोख पुस्तकात नोंदविण्याबाबत संबंधित गट विकास अधिकारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ग्रामपंचायतींना आगाऊ देयक अदा केले जात नाही. जिल्हा परिषदांना चौदाव्या वित्त आयोगानुसार निधी पुरविला जातो. काही कालखंडानंतर वित्त आयोगानुसार जिल्हापरिषदांना देण्यात येणाऱ्या निधीच्या विनियोगाबाबतची तपासणी केली पाहिजे.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, चौदाव्या वित्त आयोगामध्ये सर्व निधी, ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक यांच्या नावे वर्ग केला जातो. या निधीअंतर्गत कचेरी, रस्ते, दुरस्ती व इतर विकासाची कामे केली जातात, परंतु या कामांच्या खर्चामध्ये काही घोळ असल्यास तो तपासणीकरिता लेखे उपलब्ध होत नाहीत. ग्रामपंचायतींनी ग्रामसभेचा ठराव घेऊन काम केलेले असून संबंधित ग्रामपंचायत देखभाल दुरुस्ती करण्यास तयार असल्याचे ठरावात नमूद आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कडून स्वतंत्र दाखला घेण्यात आलेला नाही. सदर मालमत्तेची नोंद ग्रामपंचायतच्या नोंदवहीत घेतल्याची खात्री गट विकास अधिकारी यांच्याकडून घेण्यात आलेली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ग्रामपंचायतीपेक्षाही ग्रामसभेला जास्त अधिकारी आहेत. ग्रामसभेत मान्य झालेल्या ठरावानुसारच गावातील विकास कामांना व इतर कामांना सुरुवात केली जाते. या कामांकरिता असलेल्या निधीचे नियोजन करण्याचे अधिकारही ग्रामसभेला प्रदान केलेले असतात. चौदाव्या वित्त आयोगानुसार जिल्हा परिषदांना मिळालेले पैसे खर्च करण्याचे निकष ठरलेले आहेत.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षामध्ये एकूण १२५ ग्रामपंचायतींना कंत्राटदार म्हणून कामे देण्यात आली. सदर कामाबाबत अर्धसमास पत्रे देवून गट विकास अधिकारी, सरपंच व सचिवांना अभिलेख सादर करण्याचे निदेश देवूनही त्यांनी अभिलेख सादर न करणे तसेच, शासन निर्णय दिनांक २० जून, २००८ नुसार अटी व शर्तीनुसार कंत्राटदार ग्रामपंचायतींनी कामाचे नियोजनात्मक अभिलेख लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक होते. गौण खनिजांच्या रक्कमांबाबत अभिलेख प्राप्त न होणे, निकषानुसार सिमेंट वापरले किंवा कसे, निविदा खरेदी खर्चाची नोंद रोख पुस्तकात दिली नसणे, निविदेची वर्तमानपत्रात जाहीरात दिलेली नसणे इत्यादी लेखा आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आले. समितीने या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी लेखी माहितीत असा खुलासा केला की, शासन निर्णय दिनांक ९ फेब्रुवारी, २००९ नुसार ग्रामपंचायतींना कामे देण्यात आली असून त्यासाठी वृत्तपत्रांमध्ये जाहिराती देवून निविदा प्रसिध्द करण्याची आवश्यकता नाही. कार्यारंभ देताना ग्रामपंचायतीचा ठराव बंधनकारक असल्याचेही माहितीत नमूद आहे. तसेच सुमारे ९ लक्ष रुपयांचा निधी खर्च होवूनही निंबोळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे काम अपूर्ण राहिलेले आहे, यावर समितीस समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही. समितीने यासंदर्भात संपूर्ण चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश देवून प्रस्तुत प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान प्राप्त झालेल्या अहवालानुसार लेखा परिक्षणादरम्यान अभिलेखे सादर न केलेल्या ग्रामपंचायतीकडून अभिलेखे उपलब्ध न झाल्याप्रकरणी जबाबदार कनिष्ठ सहाय्यकांवर दंडाची कारवाई करण्यात यावी. याशिवाय कोणतेही स्पष्ट अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत. **तसेच तत्कालिन कार्यकारी अभियंता, श्री. भागवत या प्रकरणात दोषी आढळून आले असून त्यांचेवर प्रस्तावित केलेली शिस्तभंग विषयक कारवाई शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यात यावी व त्यांचेवर तद्‌नुषंगाने केलेल्या कारवाईची माहिती समितीला पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**लेखा परिक्षणास अभिलेख सादर न केलेल्या २० ग्रामपंचायतींच्या संदर्भात ग्रामसेवकांवर देखील महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये रूपये २५००० (पंचवीस हजार) रुपयांचा दंड करणे संदर्भात निदेश देऊनही संबंधितांनी या प्रकारणी कोणतीही कार्यवाही केली नाही, याबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करते. समितीने निदेश देऊनही संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही करुन संबंधित ग्रामसेवकांकडून स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंडाची रक्कम वसुल करणे आवश्यक असताना ती न करता संबंधित ग्रामसेवकांना संरक्षण देऊन त्यांनी कर्तव्यात कसूर केली असल्यामुळे त्यांची चौकशी करुन कारवाई करावी तसेच दोषी ग्रामसेवकांकडून दंडाची रक्कम वसूल करुन संबंधितांची एक तात्पुरती वेतनवाढ रोखावी व तशी त्यांच्या सेवा पुस्तिकेत नोंद घ्यावी व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तेरा

## जिल्हा परिषद, अमरावती

### थकीत आगाऊ रकमा (थकीत अग्रिम)

**परिच्छेद ३.८१४ (१८)**

जिल्हा परिषदांमध्ये निरनिराळ्या योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यन्वित करण्यासाठी संबंधीत ठेकेदार, विभाग प्रमुख अगर कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात येतात. अशाप्रकारे दिलेल्या रकमांचे संबंधीत वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशेब देऊन समायोजन / वसूली करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन / वसूली झाल्यावर नविन आगाऊ रक्कमा देता येतात. परंतू जिल्हा परिषदांकडील आगाऊ रक्कमांच्या नोंदवहया पाहता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रक्कमांचे समायोजन /वसूली होत नसल्याचे आढळून येते. अशा थकीत आगाऊ रकमांमध्ये फार जुन्या म्हणजेच १९६२ पासूनच्या आगाऊ रकमांचे समायोजन / वसूली थकीत असल्याचे दिसून येते. उदाहरणादाखल, पुढील जिल्हा परिषदांमध्ये सन २०११-१२ अखेर खाली दिल्याप्रमाणे आगाऊ रकमा समायोजन / वसूली अभावी थकीत होत्या.

| अ.क्र | जिल्हा परिषदेचे नांव | जिल्हा परिषदेचे विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १८ | अमरावती | वित्त | ७ | १,७५,९४,५४८ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर आक्षेपाबाबत खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

विविध विभागांतर्गत सन १९८२-८३ ते सन २०१०-११ पर्यंत रुपये १,२७,५०,४७६ इतक्या रकमेचे अग्रीम प्रलंबित होते. आक्षेपामध्ये सन २०११-१२ मध्ये रू. ४८,४४,०७२ अग्रीम देण्यात आले असे नमुद आहे परंतू वस्तुस्थितीमध्ये रू. २३,२९,०७२ अग्रीम देण्यात आले होते. अशाप्रकारे सन १९८२-८३ ते सन २०११-१२ एकूण रू. १,७५,९४,५४८ अग्रीम ऐवजी रू. १,५०,७९,५४८ इतके अग्रीम समायोजन होणे आवश्यक होते. त्यापैकी आजतागायत रू. ५४,०५,०२४ अग्रीमांचे समायोजन झाले आहे व उर्वरित रू. ९६,७४,५२४ अग्रीम समायोजनाची कार्यवाही चालू आहे. प्रलंबित अग्रीमाबाबतचे विवरणपत्र उपलब्ध आहे. वरीलप्रमाणे खुलासा मान्य करावा, ही विनंती.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेतील विविध विभागांतर्गत देण्यात आलेले रु.१,२७,५०,४७६ इतक्या रकमेची अग्रिमे सन १९८२-८३ पासून प्रलंबित आहेत. अग्रिम दिर्घकाळ प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, सदर अग्रिमे वेळीच वसूल होण्याकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत, तसेच, पूर्वीचे अग्रिम प्रलंबित असताना पुढील अग्रिम देण्यात येऊ नये असे असतानाही सन २०११-१२ मधील रु. ४८,४४,०७२ इतके अग्रिम का देण्यात आले, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, थकित आगाऊ रकमा सन १९६२ पासूनच्या आहेत. जवळपास १,७५,९४,५४८ रुपये थकित आहेत. यापैकी आता पर्यंत ८२,२०,०२४ रुपये समायोजित झालेले आहेत. सद्य:स्थितीत ९३,७४,५२४ रुपये थकित आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, कोणकोणत्या विभागांकडे रक्कम थकित आहे, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सामान्य प्रशासन विभाग १३,७९,८४७ रुपये, आरोग्य विभाग २५,३५८ रुपये, बांधकाम विभाग १०,२२,९८० रुपये, भुजल सर्व्हेक्षण विभाग १०,००० रुपये, वित्त विभाग २८,३८० रुपये, महिला व बाल कल्याण विभाग १,३८,८२५ रुपये, पाटबंधारे विभाग २२,९९,९५५ रुपये, शिक्षण विभाग २१,००० रुपये, पंचायत विभाग ३४,१९,९८९ रुपये आणि ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे १३,२८,१९० रुपये थकीत आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन १९६२ पासून रक्कमा थकित आहेत. या थकित रकमांची वसुली कशी करणार आहात, सन १९९५-९६ पर्यंतच्या थकित अग्रिमाची रक्कम १ कोटी २७ लाख रुपये आहे. सन १९९६-९७ पासूनची रक्कम वसूल करु शकतील. प्रत्येक विभागाकडे थकित आगाऊ रकमा आहेत. मुख्य लेखा व वित्त अधिकारी त्याचे समन्वयक असतात. सन १९९६-९७ म्हणजे जवळपास २० वर्षे झालेली आहेत. कोणत्या विभागाकडे जास्त रक्कम थकित आहे, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांच्याकडे जास्त रक्कम थकित आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, निधी कसा वसूल करणार आहात, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, १५ दिवसात समायोजनाची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल आणि जेथे समायोजन होणार नाही तेथे संबंधितांवर कारवाई केली जाईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, थकित रकमा वसूल करण्यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी कोणते प्रयत्न केले, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, संबंधित विभागांना ३० पत्रे दिलेली आहेत. सद्य:स्थितीत ८२,२०,०२४ रुपये वसूल झालेले आहेत आणि ९३,७४,५२४ रुपये थकित आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांच्याकडे थकित असलेल्या रकमांचा तपशील मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे असतो. ज्या विभागाकडून अग्रिम वसूल करावयाचा आहे त्या विभागाचे प्रमुख उत्तर देण्यास टाळाटाळ करतात. सामान्य प्रशासन विभाग, सिंचन विभाग आणि पंचायत विभागाकडे मोठ्या प्रमाणावर रकमा थकित आहेत. ज्या खाते प्रमुखांकडे रक्कमा प्रलंबित आहेत, त्यांच्याकडून व्याजासह रक्कम वसूल करुन त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. यावर कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, विभागाकडे २२,७६,४४५ रुपये थकित आहेत. हिंगलासपूर पाझर तलावासाठी ३०९ रुपये, विशेष प्रकल्प वरखेड यासाठी ९७,७७५ रुपये, माणिकपूर पाझर तलावासाठी १,०२,११० रुपये, लोखंड खरेदीसाठी ९,२५,२५१ रुपये इत्यादी कामांसाठी निधी दिलेला आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ९ लाख रुपये कोणत्या विभागाला, ठेकेदाराला, पुरवठादाराला दिलेले आहेत, यावर कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) यांनी समितीस विदित केले की, सद्य:स्थितीत माहिती उपलब्ध नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, वित्त विभागाने सिंचन विभागाला कळविले होते काय, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले यावर समितीने असे मत व्यक्त केले की, वित्त विभागाने थकित रकमा वसूल करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. परंतु, संबंधित विभागाकडून थकित रकमा वसूल करण्यासाठी प्रयत्न करण्यात आलेले नाहीत. हा शासनाचा निधी आहे. वेगवेगळ्या विभागांकडे मोठ्या प्रमाणावर निधी थकित आहे. संबंधित विभागाला निधी वसूल करण्यासाठी बंधन घालून द्यावे. संबंधित विभागांकडून थकित रकमांची वसुली झाली नाही तर संबंधितांच्या सेवा पुस्तकात नोंद घ्यावी आणि समितीला अहवाल सादर करावा असे निदेश देऊन समितीने विचारणा केली की, वित्त विभागाकडून थकित रकमांची वसुली करण्याबाबत योग्य ती कार्यवाही झाली असती तर २० वर्षे रक्कमा थकित राहिल्या नसत्या. मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखील याकडे लक्ष दिलेले नाही. त्यांनी याबाबत कार्यवाही केलेली आहे काय, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधितांना नोटीस दिलेली आहे काय, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, संबंधित विभागांना ३० पत्रे दिलेली आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, संबंधित विभागाकडून वसुली होत नसेल तर संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, एफआयआर दाखल करावा. समितीने नागपूर जिल्ह्याचा दौरा करण्यापूर्वी त्यांनी वसुली केली होती. रक्कम वसूल होत नसेल तर आपण संबंधितांवर एफआयआर दाखल करावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

अमरावती जिल्हा परिषदेअंतर्गत विविध विभागांना देण्यात आलेल्या अग्रिम रक्कम रु.१,२७,५०,४७६ एवढया मोठया प्रमाणावर असुन अद्याप थकित अग्रिमांची वसुली/ समायोजन होवु शकलेले नाही. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर थकित आगावु रक्कमांच्या वसुली आणि यथास्थिती समायोजनाबाबत बंधन घालुन द्यावे. याउपरही जिल्हा परिषदेच्या विभागांनी कार्यवाही न केल्यास संबंधीत अधिका-यांच्या सेवा पुस्तकात त्याबाबतची नोंद घेण्यात यावी व त्याबाबत या अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार आक्षेपाधीन थकित रक्कमेचे समायोजन/ वसुली झाली आहे काय?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटी नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांचे स्तरावरुन जिल्हा परिषदेतील सर्व खाते प्रमुखांना दि. ९.११.२०१५ च्या पत्राने अग्रीम राशीचे समायोजन त्वरेने करण्याबाबत सूचित करुन अग्रीमाचे समायोजन झाल्याशिवाय पुढील अग्रीम न देण्याबाबत सूचित केलेले आहे.

अग्रीमाचे समायोजन/वसुलीबाबत विभाग प्रमुखांना पत्र देऊन समायोजन करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

थकित अग्रीम रकमेच्या समायोजन/वसुली यासंबंधीची वस्तुस्थिती थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत सन २०१०-११ पर्यंत विविध विभागाकडे रु. १,२७,५०,२७६ थकित अग्रिम होते. सन २०११-१२ मध्ये रु. ४८,४४,०७२ एवढे अग्रिम देण्यात आले अशा प्रकारे एकूण रु. १,७५,९४,३४८ इतके अग्रिम समायोजन होणे बाकी होते. त्यापैकी आज पर्यंत रु. १,४६,७०,२३६ इतके अग्रिम समायोजित झाले असून याबाबत तपशीलवार माहीती प्रपत्र "अ" मध्ये सादर करण्यात आली आहे.

उर्वरित रक्कम रु.२९,२४,११२ बाबत वसुलीची कार्यवाही सुरु असून त्याबाबत विभागनिहाय सद्य:स्थिती प्रपत्र च्अछ मध्ये दिलेली आहे.

**प्रपत्र-अ**

| अ. क्र. | विभागाचे नाव | सन २०११-१२ मध्ये थकीत अग्रीम रु. | समायोजित/ वसुल झालेले अग्रीम रु. | एकूण प्रलंबित अग्रीम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | आरोग्य विभाग | २,२७,३५८ | २,२७,३५८ | ० | |
| २ | वित्त विभाग | २८,३८० | २८,३८० | ० | |
| ३ | शिक्षण विभाग | ६,३०,४३५ | ६,३०,४३५ | ० | |
| ४ | पशुसंवर्धन विभाग | ६,००,००० | ६,००,००० | ० | |
| ५ | भूजल सर्व्हेक्षण विभाग | १०,००० | १०,००० | ० | |
| ६ | सामान्य प्रशासन विभाग | ६९,३४,२७४ | ६९,३४,२७४ | ० | |
| ७ | महिला व बाल कल्याण | १,३८,८२५ | १,०८,८२५ | ३०,००० | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे आदेश क्रमांक ८४९/२०१७, दिनांक ११.०५.२०१७ नुसार श्रीमती शेजे, से.नि., गटविकास अधिकारी यांच्या कडे प्रलंबित असलेल्या रक्कम रु. ४०,००० अग्रीमापैकी रु.१०,००० तात्पुरत्या निवृत्ती वेतनातून वसुल करण्यात आले असून उर्वरित रक्कम ३०,००० ची दरमहा २५०० प्रमाणे एकूण १२ हप्त्यांमध्ये वसुली बाबतची कार्यवाही सुरु आहे. |
| ८ | बांधकाम विभाग | १८,०१,९४२ | १०,२४,७९५ | ७,७७,१४७ | यापैकी अग्रिम रक्कम रु. ५,५५,१४७ प्रकरणी आदेश क्रमांक ४०००/२०१७ दिनांक १६.०५.२०१७ नुसार तत्कालिन |

**प्रपत्र अ---** चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग श्री. पी.जी.भागवत व तत्कालिन मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी श्री. एम. एच. हुसेन यांच्याकडून प्रत्येकी ५०% प्रमाणे वसुलीबाबत आदेश काढण्यात आला आहे. तसेच उर्वरित रक्कम रुपये २,२२,००० प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे आदेश क्रमांक ६३४९/१७ दिनांक २२.०९.२०१७ नुसार श्री. वा.पा.भावे, तत्कालिन कार्यकारी अभियंता, जि. प.बांधकाम विभाग, जि.प.अमरावती यांच्याकडून रस्ते बांधकामाची चौकशी / तपासणी खर्चाच्या देयकाचे भुगतान करण्यासाठी घेतलेल्या अग्रीमांचे वसुलीबाबत त्यांच्या वेतनातून दरमाह रु. २०,२०० प्रमाणे समान १० हप्त्यामध्ये वसुली करण्या-बाबत आदेश निर्गमित करण्यात आले. |
| ९ | ग्रा.पा.पु.विभाग | १३,३३,१९० | ६०,००० | १२,७३,१९० | उर्वरित रक्कम रु.१२,७३,१९० चे समायोजन बाकी आहे. सदरहू अग्रीमांचे समायोजन न झाल्याने मु.का.अ. यांचे पत्र क्रमांक १७३९ दिनांक २४.५.२०१६ अन्वये तत्कालिन कार्यकारी अभियंता, लघुसिंचन श्री. अ.ना.राणे (से.नि) व पत्र क्रमांक १७४० दिनांक २४.५.२०१६ अन्वये तत्कालिन प्रभारी कार्यकारी अभियंता लघुसिंचन श्री. आर. के. भगत यांचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव जल-संधारण विभाग, मंत्रालय यांचेकडे सादर करण्यात आला. त्यानुसार दोन्ही अधिकाऱ्यांविरुध्द सामाईक विभागीय चौकशी प्रस्तावित करण्या-स्तव शासनाचे आदेश डिएलइ ३०१७/(१०/०११७) / दक्षता दिनांक २७.०१.२०१७ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. |

**प्रपत्र अ---** चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १० | सिंचन विभाग | २४,५९,९५५ | १६,६२,१८० | ७,९७,७७५ | यापैकी अग्रिम रक्कम रु. ७,००,००० संदर्भात श्री.दुबे, तत्कालिन शाखा अभियंता (यांत्रिकी) यांच्या विरुध्द एफआयआर क्र.३३८/ दि.४.८.२००६ अन्वये पोलीस स्टेशन, गाडगेनगर, अमरावती येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर कर्मचाऱ्यास सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच उर्वरित अग्रीम रक्कम रु.९७,७७५ प्रकरणी कार्यकारी अभियंता, विशेष मार्ग प्रकल्प विभाग, अमरावती यांना वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तथापि अद्यापही संबंधित विभागाकडून रक्कम रु.९७,७७५ चे देयक प्राप्त झालेले नाही. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे पत्र क्र.२९७६/ २०१७ दिनांक २२.०९.२०१७ नुसार अग्रीम समायोजनासाठी देयके त्वरीत सादर करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. |
| ११ | पंचायत विभाग | ३४,२९,९८९ | ३३,८३,९८९ | ४६,००० | सदर प्रलंबित अग्रिम प्रकरणे जुनी असल्याने अग्रीम समायोजनासाठी आवश्यक असलेले दस्ताऐवज आढळून आले नाही. सदर प्रकरणी दिनांक २६.१२.२०१६ रोजी पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. |
| | **एकूण** | **१,७५,९४,३४८** | **१,४६,७०,२३६** | **२९,२४,११२** | |

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** थकित अग्रिम वसुलीबाबत ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.झेडपीए-२००९/प्र.क्र.५२२/वित्त-९, दिनांक १० डिसेंबर, २०१० अन्वये सर्व जिल्हा परिषदांना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अमरावती जिल्हा परिषदेअंतर्गत विविध विभागांना देण्यात आलेल्या अग्रिम रक्कम रु. १,२७,५०,४७६ एवढ्या मोठ्या प्रमाणावर असुन अद्याप थकित अग्रिमांची वसुली/समायोजन होऊ शकलेले नाही. सबब,

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर थकित आगाऊ रक्कमांच्या वसुली आणि यथास्थिती समायोजनाबाबत बंधन घालुन द्यावे. याउपरही जिल्हा परिषदेच्या विभागांनी कार्यवाही न केल्यास संबंधीत अधिका-यांच्या सेवा पुस्तकात त्याबाबतची नोंद घेण्यात यावी व त्याबाबत या अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार आक्षेपाधीन थकित रक्कमेचे समायोजन/वसुली झाली आहे काय, या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी समितीस विदित केले की, १,७५,९४,३४८ पैकी १,४६,७०,२३६ रुपये वसूल होऊन ते समायोजित करण्यात आलेले आहेत. २,९१,४१,१८६ रुपये वसूली होणे बाकी आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे. संबंधितांवर विभागीय चौकशीची कारवाई सुरु आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, यापुढील कालखंडामध्ये वेळेत ही वसुलीची कामे होणे आवश्यक आहेत. सर्व गोष्टी तात्काळ निकाली काढणे आवश्यक आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, याबाबत विभागीय पातळीवर संबंधितांना दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी परिपत्रक काढून कळविले होते. आता नवीन कार्यप्रणाली नुसार निधी थेट जिल्हा परिषदा, नगरपंचायती, पंचायत समिती यांच्या खात्यात जमा केला जातो. यावर समितीने अशी विचारणा केली की, कार्यप्रणाली जरी नवीन असली तरीही निधी हे त्या विशिष्ट योजनेअंतर्गत मंजूर असून संबंधितांना विहित मुदतीत मिळणे आवश्यक आहे. दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाचा निधी आगाऊ देण्यात येईल असे सांगितले गेले होते. या संदर्भात अपहाराच्या रक्कमांची तपासणी करुन त्याची माहिती घेऊन त्याबाबत योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. निधी आगाऊ देण्यासंदर्भात योग्य तो धोरणात्मक निर्णय घेऊन समर्पक कार्यक्रम ठरवून काटेकोरपणे राबविण्यात यावा. यामध्ये जर अपहार झाला असेल तर त्या रक्कमांची माहिती घेऊन त्याबाबत चौकशी करणे आवश्यक आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, वित्त आयोगान्वये व अंदाजपत्रकाच्या माध्यमातून आलेला निधी हा विभागाकडून गट विकास अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना जिल्हा पातळीवर विकास कामांकरिता वितरित केला जातो.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हापरिषद पातळीवरील अखर्चित निधी विकास कामांवर खर्च करावयाचा असेल तर तो कोणत्या नियमानुसार पुनरुज्जीवित करता येईल, तो पैसा कोठे गेला. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, समजा एखाद्या कार्यालयात एखादी झेरॉक्स मशिन घ्यावयाची आहे तर ती पंचायत समिती जिल्हापरिषद कार्यालयात गटविकास अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या अटी व शर्तीप्रमाणे, विशिष्ट आराखडयाप्रमाणे ते खर्च करावयाचे असतात. कागदांच्या रिम करिताही स्टेशनरी खरेदीची जी प्रोसिजर असते ती फॉलो करावी लागते. यावर समितीने असे निदेश दिले की, जी वसूली बाकी आहे, ती लवकरात लवकर पूर्ण करुन त्याबाबत समिताला अहवाल सादर करण्यात यावा. तसेच इतर दंडात्मक कारवाईही नियमाला अनुसरुन करण्यात यावी. यामध्ये चुकीची कारवाई झाली असेल तर ती ताबोडतोब दुरुस्त करण्यात यावी. राज्यामध्ये अग्रीम रक्कमेसंदर्भात प्रकरणे प्रलंबित आहेत किंवा जी अफरातफरीची प्रकरणे आहेत तसेच अपहार किंवा अनियमीतता झालेली आहे. यातील किती प्रकरणामध्ये कारवाई केलेली आहे, आणि किती प्रकरणे शिल्लक राहिलेली आहेत, हे तपासावे कारण अग्रीम रक्कमेच्या संदर्भात पूर्ण आढावा घेण्यात यावा.

समितीने असे निदेश दिले की, या विषयामध्ये प्रत्येक गोष्टीसाठी कायद्याला पोटकलम आहेत. त्या कलमानुसार हे सर्व होत आहे. यासंदर्भात पुढच्या कालखंडात असे प्रकार होणार नाहीत. तसेच ती यंत्रणा कायद्याच्या आधारावर कशा प्रकारे दुरुस्त करता येईल त्यासाठी शासनाने अधिकचा वेळ देऊन व्यवस्थित वसुली करावी. आगामी काळात अशी प्रकरणे होणार नाहीत आणि झालेली प्रकरणे तात्काळ निकाली निघतील यासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. जी वसूली करावयाची आहे ती तात्काळ करावी आणि ही सर्व प्रकरणे संपुष्टात आणण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे अशी समितीने सूचना केली.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत निरनिराळ्या योजना, बांधकामे इत्यादी बाबी कार्यान्वित करण्यासाठी ठेकेदार, विभाग प्रमुख किंवा कर्मचारी यांना सन १९६२ पासून वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात आल्या आहेत. अशाप्रकारे देण्यात आलेल्या रकमांचे संबंधित वर्ष अखेर खर्चाची प्रमाणके व हिशोब देवून नियमितरित्या समायोजन/वसुली करणे आवश्यक होते. सन २०११-१२ अखेर सुमारे १ कोटी ७५ लक्ष रुपयांच्या रकमांपैकी ९२,७४,५२४ चे समायोजन/ वसुली अद्यापी प्रलंबित होती. पंचायती राज समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली असता

सदरहू प्रकरणी समितीने दिलेल्या निदेशानुसार १,१७,६४,२६५ रुपयांच्या रकमांचे समायोजन होवू शकले. जिल्हा परिषदेने उर्वरित सुमारे ५३,३०,०८३ रुपये अग्रिमांच्या बाबतीत न्यायालयात प्रलंबित प्रकरणात दिलेल्या अग्रिमामध्ये गुंतलेली रक्कम रुपये १५,०७,९६७ व इतर कारणांमुळे प्रलंबित असलेली रुपये १,९९,८८५ एवढी रक्कम असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. एकूण रुपये १,७५,९४,५४९ रुपयांच्या थकित अग्रिमांपैकी विभागीय सचिवांच्या साक्षीपर्यंत रुपये १,१७,६४,२६५ चे समायोजन करण्यात आलेले होते. सद्यस्थितीत रुपये ५९,३०,०९३ रुपयांच्या अग्रिमांचे समायोजन/वसुली प्रलंबित आहे.

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्रलंबित अग्रिमांचे समायोजन करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे जरी सांगण्यात येत असले तरी दिनांक १० डिसेंबर, २०१० च्या परिपत्रकात विशेष योजनाबध्द मोहिमेचे आयोजन करुन सदर अग्रिमे वसूल करण्याच्या सूचना असूनही जिल्हा परिषदेकडे तब्बल रुपये ५८,३०,०८३ या रकमेचे समायोजन/वसुली होणे बाकी होते. जिल्हापरिषदेचा कोणताही कर्मचारी/अधिकारी सेवानिवृत्त होत असताना त्याच्या येणे/देणे ना देय प्रमाणपत्र दाखविल्याशिवाय सेवानिवृत्ती वेतन दिले जात नाही ही कार्यपध्दती आहे. तरीही कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन अदा केलेली असून आता त्या कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून अग्रिमांची वसूली करण्यात येत आहे. उक्त नमूद परिपत्रक हे केवळ वैयक्तिक अग्रिमांच्या वसुलीबाबत असून त्यामध्ये खातेनिहाय अग्रिमांबाबत उल्लेख नाही असे समितीचे मत आहे. **त्यामुळे एखादा कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी जे "ना देय" प्रमाणपत्र घेणे आवश्यक असते ते "ना देय" प्रमाणपत्र संबंधितांनी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून घेतले नाही व अग्रीम घेणाऱ्या कर्मचाऱ्यास सेवानिवृत्त होऊ देण्यास मदतच केली या प्रकरणी "ना देय" प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात अग्रीम रकमेची वसुली केल्यानंतरच निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास/व्यक्तीस "ना देय" प्रमाणपत्र देण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.** सदरहू आक्षेपात अग्रिमांच्या समायोजन/वसुलीबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. संबंधित कर्मचारी/ अधिकाऱ्यांने विभागांतर्गत अग्रिमांचा विनियोग त्यांच्या कामासाठी करुन खर्चाची प्रमाणके व हिशोब देवून त्याच्या नोंदी नोंदवहीमध्ये अचूक ठेवल्या असत्या व त्या त्या वर्षाची अग्रिमे त्या त्या वर्षी वेळेवर समायोजित झाली असती, तसेच लेखासंहितेतील नियमाप्रमाणे पूर्वीच्या अग्रिमांचे समायोजन/वसुली झाल्याखेरीज दुसऱ्यांदा अग्रिम देवू नये या नियमाचे पालन झाले असते तर अशा प्रकारचा लेखा आक्षेप समितीसमोर आला नसता. **एका जिल्हापरिषदेचा जवळपास १ कोटी ७५ लक्ष रुपयांचा निधी नाहक थकित अग्रिमात गुंतला नसता असे समितीचे ठाम मत आहे. त्यामुळे प्रकरण निहाय थकीत अग्रिमांच्या प्रकरणी सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचेवर नियमानुसार कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती तीन महिन्यांत समितीस पाठविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**


# परिशिष्ट “अ”

## शासनाचे आदेश व परिपत्रके

**(परिशिष्ट १.१)**

महाराष्ट्र शासन

# प्रशिक्षकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका



## महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन

२८, राणीचा बाग, जुने सर्किट हाऊस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

*क. जर तुमच्याकडे सर्व कुटुंबांची माहिती गोळा करण्यासाठी वापरलेले सर्व्हे रजिस्टर यापूर्वीपासूनच असेल तर:*

पुढील गोष्टी करा:

१. तुमच्या भागाचा नकाशा तयार करा किंवा आधीपासून असल्यास तो वरील पद्धतीनुसार अद्ययावत करा.

२. अद्ययावत केलेला नकाशा व तुमच्याकडील जुने सर्व्हे रजिस्टर घेऊन, जुन्या सर्व्हे रजिस्टरमध्ये प्रत्येक कुटुंबाला नकाशात दिलेला अनुक्रमांक द्या.

३. आता तुमचे नवीन कौटुंबिक माहिती रजिस्टर भरायला सुरुवात करा :

- कुटुंबाची माहिती पहिल्या पानावर नवीन कुटुंब अनुक्रमांक १ पासून भरण्यास सुरुवात करा. या कुटुंबाची सर्व माहिती जुन्या रजिस्टरमधून नवीन रजिस्टरमध्ये लिहा.
- जर नवीन रजिस्टरमध्ये आवश्यक असलेली काही माहिती उपलब्ध नसेल तर तो रकाना मोकळा सोडा.
- जर जुन्या रजिस्टरमध्ये नोंदलेली काही माहिती नवीन रजिस्टरमध्ये आवश्यक नसेल तर ती सोडून द्या.
- त्यानंतर, अनुक्रमांक २ च्या कुटुंबाची माहिती नवीन पानावर लिहा. अशा रीतीने, तुमच्याकडील जुन्या रजिस्टरमधील माहिती नवीन रजिस्टरमध्ये, नवीन अनुक्रमांकांनुसार लिहा.

४. त्यानंतर, नवीन कौटुंबिक माहिती रजिस्टर घ्या आणि तुमच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घरी भेट द्या. प्रत्येक घरात, एखाद्या जबाबदार व्यक्तीबरोबर बोलून रजिस्टरमध्ये नोंदलेली सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री करून घ्या. अशा पद्धतीने नवीन रजिस्टर संपूर्णपणे भरले जाईल.

| हे लक्षात ठेवा : तुम्ही नकाशा व रजिस्टर भरताना पेन्सिलचा उपयोग करा, म्हणजे जर नंतर आवश्यक वाटले तर तुम्ही ही माहिती खोडून दुरूस्त करू शकाल. |
|---|

============================================================

फॅसिलिटेटर नोट १.३

याला आणखी एक पर्याय म्हणजे घरोघरी भेट देताना जुने व नवे रजिस्टर बरोबर घ्यायचे, आणि सर्व गोष्टी एकाच वेळेस करायच्या : कच्चा नकाशा तयार करणे, माहिती जुन्या रजिस्टरमधून नवीन रजिस्टरमध्ये घालणे, प्रत्येक कुटुंबाची मुलाखत घेऊन माहिती अद्ययावत करणे.

============================================================

## १.४ कौटुंबिक माहिती रजिस्टरच्या प्रत्येक रकान्यात (कॉलममध्ये) काय माहिती भरायची?

(परिशिष्ट १.१)

179

(परिशिष्ट १.१)

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

मॅनेजमेंट इन्फर्मेशन सिस्टम (MIS)

# अंगणवाडी सेविकांसाठी MIS मार्गदर्शिका

अंगणवाडी केंद्रातील रजिस्टरे / रिपोर्ट तयार करण्यासाठी व
अंगणवाडी सेविकांनी साधनांचा उपयोग करण्यासाठी

महिला व बाल विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

१. तुमच्या भागाचा नकाशा तयार करा किंवा आधीपासून असल्यास तो वरील पद्धतीनुसार अद्ययावत करा.

२. अद्ययावत केलेला नकाशा व तुमच्याकडील जुने सर्व्हे रजिस्टर घेऊन, जुन्या सर्व्हे रजिस्टरमध्ये प्रत्येक कुटुंबाला नकाशात दिलेला अनुक्रमांक द्या.

३. आता तुमचे नवीन कौटुंबिक माहिती रजिस्टर भरायला सुरुवात करा :

- कुटुंबाची माहिती पहिल्या पानावर नवीन कुटुंब अनुक्रमांक १ पासून भरण्यास सुरुवात करा. या कुटुंबाची सर्व माहिती जुन्या रजिस्टरमधून नवीन रजिस्टरमध्ये लिहा.
- जर नवीन रजिस्टरमध्ये आवश्यक असलेली काही माहिती उपलब्ध नसेल तर तो रकाना मोकळा सोडा.
- जर जुन्या रजिस्टरमध्ये नोंदलेली काही माहिती नवीन रजिस्टरमध्ये आवश्यक नसेल तर ती सोडून द्या.
- त्यानंतर, अनुक्रमांक २ च्या कुटुंबाची माहिती नवीन पानावर लिहा. अशा रीतीने, तुमच्याकडील जुन्या रजिस्टरमधील माहिती नवीन रजिस्टरमध्ये, नवीन अनुक्रमांकांनुसार लिहा.

४. त्यानंतर, नवीन कौटुंबिक माहिती रजिस्टर घ्या आणि तुमच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घरी भेट द्या. प्रत्येक घरात, एखाद्या जबाबदार व्यक्तीबरोबर बोलून रजिस्टरमध्ये नोंदलेली सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री करून घ्या. अशा पद्धतीने नवीन रजिस्टर संपूर्णपणे भरले जाईल.

हे लक्षात ठेवा : तुम्ही नकाशा व रजिस्टर भरताना पेन्सिलचा उपयोग करा, म्हणजे जर नंतर आवश्यक वाटले तर तुम्ही ही माहिती खोडून दुरुस्त करू शकाल.

## १.४ कौटुंबिक माहिती रजिस्टरच्या प्रत्येक रकान्यात (कॉलममध्ये) काय माहिती भरायची ?

हे लक्षात ठेवा :
तुम्ही जी माहिती रजिस्टरमध्ये भरता ती तुमच्याच उपयोगासाठी असते, त्यामुळे तुम्ही काय माहिती भरत आहात ती नीट समजून घ्या आणि ती अशा रीतीने भरा की ती तुम्हाला नंतर समजू शकेल. तुम्ही सर्व माहिती अचूक भरणे आवश्यक आहे, कारण तुम्ही त्या माहितीचा उपयोग नंतर इतर रजिस्टरांमध्ये त्या व्यक्तींची नोंद करण्यासाठी वापरणार आहात.

सर्वप्रथम त्या कुटुंबाबद्दलची काही माहिती पानाच्या वरच्या बाजूला लिहा :
कुटुंबाचा अनुक्रमांक : हा त्या कुटुंबाचा अनुक्रमांक असतो, जो तुमच्याकडील नकाशात दिलेला असतो.

**(परिशिष्ट १.२)**

# महिला व बालकल्याण विभाग

जिल्हा परिषद,अमरावती
जिल्हा न्यायालयासमोर,कॅम्प अमरावती पिन-४४४६०१
E-mail-dyceobalkalyan@gmail.com दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६११३४

जा.क्र.जिप /मबाक/बाविसे/२२७५/२०१५ दिनांक: १०/१२/२०१५

## परिपत्रक

**विषय :-पंचायती राज समितीची अमरावती जिल्हापरिषदेला भेट दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर २०१५ आहार साठा रजिस्टर मधील माहीती पेन्सीलने भरून खाडाखोड बाबत.**

पंचायती राज समितीने अमरावती जिल्हा परिषदेला दिनांक ५,६ व ७ नोव्हेंबर २०१५ या कालावधीमध्ये भेट दिली होती.सदर भेटीअंतर्गत दिनांक ६ नोव्हेंबर २०१५ रोजी पंचायती राज समितीने जिल्हयातील पंचायत समिती,प्राथमिक स्वास्थ केंद्र,शाळा,ग्रामपंचायत व अंगणवाडी केंद्रांना भेटी दिल्या. अंगणवाडी केंद्रांना दिलेल्या भेटीचे वेळी पंचायत राज समितीला अंगणवाडी केंद्रामधील आहार साठा रजिस्टर मधील नोंदी हया पेन्सीलने घेतलेल्या असून त्यामध्ये खाडाखोड असल्याचे आढळून आले.

अमरावती जिल्हयामध्ये नवीन एम.आय.एस.रजिस्टर अंगणवाडी केंद्रांना प्राप्त झाले होते व हे रजिस्टर माहे एप्रील २०१५ पासुन भरावयास सुरूवात झाली होती.सुरूवातीला रजिस्टर भरतांना चुका होऊ नये याकरिता रजिस्टर वरील नोंदी पेन्सीलने भरण्यात याव्यात अश्या प्रकारच्या सुचना मास्टर प्रशिक्षक यांनी प्रशिक्षणामध्ये दिल्या होत्या.व त्याप्रमाणे सर्व अंगणवाडी केंद्रामध्ये कार्यवाही सुरू होती.

परंतु रजिस्टर भरणे सुरू करण्यास ८ महिन्याचे वर कालावधी होऊन गेला असल्यामुळे तसेच पेन्सीलनी नोंदी घेतल्यास आहार साठा रजिस्टरमध्ये खाडाखोड होत असल्याचे निदर्शनास येत आहे या कारणास्तव या परिपत्रकाव्दारे अशा सुचना देण्यात येत आहे की सर्व अंगणवाडी केंद्रामधील आहार साठा रजिस्टर मधील नोंदी हया पेनाने भरण्यात याव्यात तसेच आहार साठा मध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तरी सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी यांना कळविण्यात येते की,वरील प्रकारच्या सुचना सर्व पर्यवेक्षिकांमार्फत अंगणवाडी सेविका यांना तात्काळ कळविण्यात याव्यात व कार्यवाही करण्यात यावी.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
जिल्हा परिषद, अमरावती

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर**

१)मा.जिल्हाधिकारी,अमरावती
२)मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,अमरावती
३)मा.विभागीय उप आयुक्त,महिला व बालविकास,अमरावती विभाग,अमरावती

**प्रत कार्यवाहीस्तव अग्रेषित**

१)बालविकास प्रकल्प अधिकारी,एकात्मिक बालविकास सेवा योजना-----------------(सर्व)

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
जिल्हा परिषद, अमरावती

**(परिशिष्ट १.३**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरक पोषण आहार पुरवठा कार्यपध्दतीत सुधारणा करणेबाबत ...

## महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक एबावि २००४/प्रक्र २३३/का - ५
नवीन प्रशासन भवन , ३ रा माळा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : - २८ ऑक्टोबर, २००५

**वाचा:-** (१) महिला व बाल कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसएनपी २११४/ प्र.क्र. २२६८/ ४५ दि.८.३.१९९४
(२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसएनपी १०९८/ प्र.क्र. ६६९/ का - ५ दि.२९.५.१९९९
(३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसएनपी २०००/ प्र.क्र. १३१/ का - ५ दि.१९.६.२००० आणि शुध्दीपत्रक दिनांक १६.१०.२००० व दिनांक १७.७.२००१
(४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एबावि २०००/ प्र.क्र. २७९/ का - ५ दि.३०.१२.२०००
(५)महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: ८०/२००१/संकीर्ण २०००/ प्र.क्र. १५५/ का - ५ दि.२४.५.२००१ आणि दिनांक २२.१०.२००२
(६) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एबावि २००१/ प्र.क्र. १९/ का - ५ दि.१२.१२.२००२
(७) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एबावि २००२/ प्र.क्र. २५५/ का - ५ दि.२९.४.२००३
(८) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एबावि २००३/ प्र.क्र. १२९/ का - ५ दि. १३.६.२००३
(९) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एबावि २००१/ प्र.क्र. ११२/ का - ५ दि.१९.५.२००४
(१०) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एबावि २००४/ प्र.क्र. १४८/ का - ५ दि.२४.८.२००४
(११) मा. सर्वोच्च न्यायालयाचे रिट याचिका क्रमांक १९६/२००१ मध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेसंदर्भात दिनांक ७.१०.२००४ रोजी दिलेले आदेश
(१२) महिला व बाल विकास विभाग, शासन पत्र क्रमांक : एबावि २००४/ प्र.क्र. २३३/ का - ५ दि.१७.१.२००५
(१३) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: व्हीपीएम २००५ / प्र.क्र.१७२/ पंरा-३ दिनांक २५.५.२००५

**प्रस्तावना :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यामध्ये ग्रामीण, आदिवासी आणि नागरी भागामध्ये अंगणवाडयांमार्फत राबविण्यात येते. या योजनेंतर्गत ६ वर्षे वयोगटाखालील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना पुरक पोषण आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भ आरोग्य सेवा, अनौपचारिक पूर्व शालेय शिक्षण आणि आरोग्य व सकस आहार या विषयी शिक्षण इ. विविध सेवा देण्यात येतात.

या योजनेची अंमलबजावणी राज्यातील ग्रामीण, आदिवासी आणि नागरी प्रकल्पामार्फत सुरु असून पुरक पोषण आहार पुरवठयाची कार्यपध्दती ग्रामीण / आदिवासी आणि नागरी प्रकल्पात वेगवेगळया पध्दतीने करण्यात येते. ग्रामीण / आदिवासी प्रकल्पामध्ये जिल्हास्तरीय समितीमार्फत नियुक्त केलेल्या पुरवठेदारामार्फत धान्यादि मालाचा पुरवठा अंगणवाडीमध्ये करण्यात येऊन त्यापासून अंगणवाडीमध्ये अन्न शिजवून पुरक पोषण आहाराचे वाटप योजनेच्या लाभार्थ्यांना करण्यात येते , तर नागरी प्रकल्पातील अंगणवाडयामध्ये जागेअभावी अन्न शिजविण्याची

प्रक्रीया करता येत नसल्याने तयार खाद्यान्न स्वरुपातील आहाराचा (Ready to eat ) पुरवठा अंगणवाडीमध्ये पुरवठेदारामार्फत करण्यात येऊन लाभार्थ्यांना आहार वाटप करण्यात येते.

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक १९६/२००१ मध्ये दिनांक ७ ऑक्टोबर, २००४ रोजी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्गत पुरक पोषण आहाराचा पुरवठा कंत्रटदारांमार्फत करण्यात येऊ नये, पुरक पोषण आहार पुरवठयाचे आणि आहार शिजविण्याचे काम ग्राम समुदाय, स्वयंसहाय्यता बचत गट आणि महिला मंडळ यांच्यामार्फत करण्यात यावे, असे आदेश दिलेले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाचे वरील आदेश विचारात घेऊन उपरोक्त संदर्भीय दिनांक १७.०१.२००५ च्या पत्रान्वये पुरक पोषण आहार पुरवठयासाठी नवीन पुरवठेदाराची नियुक्ती करण्यात येऊ नये असा निर्णय शासनाने घेतला होता आणि पुरक पोषण आहार पुरवठयाची योजना मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार राबविण्यासाठी जिल्हास्तरावरुन प्रस्ताव मागविण्यात आले होते , त्यानुसार काही जिल्हयाकडून प्रस्ताव प्राप्त झाले होते. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात राज्यस्तरावरील तांत्रिक गटाची बैठक घेण्यात येऊन तसेच जिल्हा स्तरावरील अधिकारी / कर्मचारी , काही महिला मंडळांचे आणि बचत गटांचे प्रतिनिधी यांचेसमवेत बैठक घेण्यात येऊन पूरक पोषण आहार पुरवठयाची योजना राबविण्याबाबत कार्यपध्दती ठरविण्यात आली.

मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुरक पोषण आहाराचा पुरवठा स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळ यांचेमार्फत करण्यासाठी पुर्वतयारी म्हणून ग्राम विकास विभागाचे शासन परिपत्रक दिनांक २५ मे २००५ अन्वये ग्रामीण आणि आदिवासी प्रकल्पामध्ये स्थानिक पातळीवर योग्य बचत गट अथवा महिला मंडळ यांची निवड करण्याकरिता तातडीने महिला ग्रामसभा अथवा ग्रामसभा आयोजित करुन त्यामार्फत बचत गट / महिला मंडळ यांची निवड करण्याबाबत आगावू आदेश देण्यात आले आहेत.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरक पोषण आहार योजनेखाली २ वर्षाखालील मुलांना आणि २ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना खाण्यास आणि पचण्यास हलका ( Easily Swallowed & Digested ) असा वेगवेगळया पाककृतीतून आहार देणे आवश्यक आहे. तसेच कुपोषित मुलांची पचनशक्ती कमी झाल्यामुळे त्यांना पचण्यास हलका व जास्त सत्वयुक्त आहार देण्याची आवश्यकता आहे. वरील सर्व बाबी विचारात घेऊन एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरक पोषण आहार पुरवठयाची योजना स्वंयसहाय्यता बचत गट आणि महिला मंडळ यांचेमार्फत राबविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार शासनाने निर्णय घेऊन वरील संदर्भीय अनुक्रमांक १ आणि ७ ते ९ येथील शासन आदेश अधिक्रमीत करुन , पुरक पोषण आहार पुरवठयासंदर्भात खालील प्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण / आदिवासी आणि नागरी प्रकल्पातील सर्व अंगणवाडी केंद्रामध्ये स्वयंसहाय्यता बचत गट / महिला मंडळ यांचेमार्फत शिजवून तयार खाद्यान्न स्वरुपात (Ready to eat) पुरक पोषण आहार पुरविण्यात यावा.

२. स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळ यांचेमार्फत शिजवून तयार आहार (ready to eat) पुरवठा करण्यासाठी प्रत्येक अंगणवाडी केंद्रासाठी स्वतंत्र बचत गट किंवा महिला मंडळ निवडण्यात यावे. अंगणवाडींच्या प्रमाणात स्वयं सहाय्यता बचत गट किंवा महिला मंडळ कमी असतील, तर एका बचत गटाला किंवा महिला मंडळाला त्या गावातील जास्तीत जास्त ५ अंगणवाडी केंद्रामध्ये तयार आहार पुरवठा करण्याचे काम देण्यात यावे. मात्र त्यासाठी बचत गटाची / महिला मंडळाची आर्थिक क्षमता विचारात घेण्यात यावी. याउलट अंगणवाडीच्या प्रमाणात स्वयं सहाय्यता बचत गटांची / महिला मंडळांची संख्या जास्त असतील, अशा गावात योग्य स्वयं सहाय्यता बचत गटाची किंवा महिला मंडळाची निवड करावी.

३. ग्रामीण आणि आदिवासी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रामध्ये स्वयं सहाय्यता बचत गट किंवा महिला मंडळ यांचेमार्फत आहार पुरवठा करण्यासंदर्भात स्वयं सहायता बचत गटाला प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

४. नागरी प्रकल्पामध्ये आहार पुरवठा करण्यासाठी स्वयं सहायता बचत गट आणि महिला मंडळ यांच्याकडुन प्रकल्पनिहाय अर्ज मागविण्यात यावेत आणि त्यानुसार पात्र ठरणाऱ्या स्वयं सहायता बचत गट आणि महिला मंडळ यांना त्या प्रकल्पातील अंगणवाडया समप्रमाणात विभागून देण्यात याव्यात. नागरी प्रकल्पामध्ये अंगणवाडी संख्येपेक्षा स्वयं सहाय्यता बचत गट आणि महिला मंडळ यांची संख्या जास्त असेल, अशा प्रकल्पात जिल्हा समितीने स्वयं सहाय्यता बचत गट आणि महिला मंडळ यांची आर्थिक क्षमता आणि पुरक पोषण आहार पुरवठ्याचा पूर्वानुभव (महिला मंडळांच्या बाबतीत) विचारात घेऊन आहार पुरवठयासाठी स्वयं सहाय्यता बचत गट आणि महिला मंडळ यांची निवड करावी. नागरी प्रकल्पामध्ये स्वयं सहायता बचत गट आणि महिला मंडळ यांच्यामध्ये प्राधान्यक्रम ठेवण्यात येऊ नये.

५. या योजनेंतर्गत पूरक पोषण आहार पुरवठा करण्यासाठी (राज्यातील ग्रामीण / आदिवासी आणि नागरी अशा सर्व प्रकल्पात ) स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळे यांची निवड करण्याची बाब ग्रामीण / आदिवासी आणि नागरी प्रकल्पासाठी अनुक्रमे दि. १९.६.२००० आणि दि.३०.१२.२००० च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हासमितीच्या अधिकारात राहील. ग्रामीण / आदिवासी प्रकल्पामध्ये पुरक पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी योग्य स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळे यांची निवड करण्याबाबत ग्राम विकास आणि जलसंधारण विभागाचे दिनांक २५.५.२००५ चे शासन परिपत्रकानुसार दिलेल्या आदेशानुसार ग्राम सभा / महिला ग्रामसभा यांचे मदतीने करावी. ग्राम सभा / महिला ग्राम सभेने ठराव घेऊन निवड केलेल्या बचत गट / महिला मंडळाची नावे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावीत, त्यानुसार

बाल विकास प्रकल्प अधिका-यांनी त्या प्रकल्पातील अंगणवाडयासाठी बचत गट / महिला मंडळ यांची यादी तयार करुन जिल्हा समितीला सादर करावी व जिल्हा समितीने यादी अंतिम करावी.

६. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण - आदिवासी आणि नागरी प्रकल्पामध्ये स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळ यांचेमार्फत सुरळीतपणे आणि विनाखंडीत आहार पुरवठा होण्यासाठी सक्षम बचत गट / महिला मंडळाची निवड करण्यात यावी, त्यासाठी खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात.

६.१) तयार आहार पुरवठा करण्यासाठी स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळ स्थानिक असावे.

६.२) आर्थिक क्षमता तपासण्यासाठी बचत गट / महिला मंडळ यांचे बँक बॅलन्स प्रमाणपत्र तपासावे.

६.३) बचत गट स्थापन झाल्यापासूनचा कालावधी (दुस-या श्रेणीतील गट असावा)

६.४) बचत गटाचे सर्व सदस्य महिला असणे आवश्यक आहे.

६.५) महिला मंडळांचे बाबतीत अशा प्रकारचे कामाचा अनुभव

६.६) जिल्हा समितीने निश्चित केलेल्या पाककृती प्रमाणे अनुज्ञेय दराने आहार पुरवठा करण्यास तयार असल्याचे संमतीपत्र.

७. या योजनेंतर्गत आहार पुरवठा करण्यासाठी महिला मंडळ म्हणजे महिला संस्था असून सदर संस्थेचे सर्व संचालक /विश्वस्त / सदस्य हे महिला असणे आवश्यक असून, तिची सार्वजनीक विश्वस्त कायदा - १९५०, संस्था नोंदणी अधिनियम -१८६० , महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम - १९६० किंवा कंपनी अधिनियम - १९५६ यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणी झालेली असावी.

**८. पूरक पोषण आहाराचे प्रकार , प्रमाण आणि पाककृती :-**

८.१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरक पोषण आहाराचा पुरवठा करतांना २ वर्षाखालील मुलांना आणि २ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना खाण्यास आणि पचण्यास हलका ( Easily Swallowed & Digested ) असा वेगवेगळया पाककृतीतून आहार देणे आवश्यक असल्याने तसेच कुपोषित मुलांची पचनशक्ती कमी झाल्यामुळे त्यांना पचण्यास हलका व जास्त सत्वयुक्त आहार देण्याची आवश्यकता असल्याने ६ महिने ते २ वर्षे वयोगटातील मुलांना पेज (Paste) स्वरुपात ३०० उष्मांक आणि ८ ते १० ग्रॅम प्रथिनेयुक्त युक्त पौष्टिक आहार (Nutritious Food) आणि २ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना ३०० उष्मांक आणि ८ ते १० ग्रॅम प्रथिनेयुक्त स्थानिक आहाराच्या ( Local Food ) पाककृतीमधून तयार पूरक पोषण आहार देण्यात यावा. त्याचप्रमाणे कुपोषित मुलांना ( ६ महिने ६ वर्षे वयोगटातील श्रेणी ३ व ४ ची मुले ) द्यावयाचा अतिरीक्त आहार ३०० उष्मांक आणि ८ ते १० ग्रॅम प्रथिनेयुक्त युक्त पौष्टिक आहाराच्या पाककृतीमधून देण्यात यावा.

या योजनेंतर्गत विविध प्रकारच्या लाभार्थ्यांना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आहार देण्यात यावा.

| अ.क्र | लाभार्थ्यांचा प्रकार | पुरक पोषण आहाराचा प्रकार व प्रमाण | आहाराचे एकक (Unit) |
|---|---|---|---|
| १ | ६ महिने ते २ वर्षे वयोगटातील मुले | ३०० उष्मांक आणि ८ ते १० ग्रॅम प्रथिनेयुक्त पौष्टीक आहार | १ एकक |
| २ | २ ते ६ वर्षे वयोगटातील मुले | ३०० उष्मांक आणि ८ ते १० ग्रॅम प्रथिनेयुक्त स्थानिक आहार | १ एकक |
| ३ | ६ महिने ते २ वर्षे वयोगटातील अतिकुपोषित श्रेणी ३ व ४ ची मुले | ६०० उष्मांकयुक्त आणि १६ ते २० ग्रॅम प्रथिनेयुक्त पोष्टीक आहार (दिवसातून २ वेळा विभागून ) | २ एकक |
| ४ | २ ते ६ वर्षे वयोगटातील अतिकुपोषित श्रेणी ३ व ४ ची मुले | ३०० उष्मांक आणि ८ ते १० ग्रॅम प्रथिने युक्त स्थानिक आहार आणि ३०० उष्मांक आणि ८ ते १० ग्रॅम प्रथिनेयुक्त पौष्टीक आहार (दिवसातुन २ वेळा विभागून) | २ एकक |
| ५ | गरोदर स्त्रिया व स्तनदा माता | ५०० उष्मांक आणि २० ते २५ ग्रॅम प्रथिने युक्त स्थानिक आहार | २ एकक |

८.२) राज्यामध्ये विविध जिल्हयामध्ये तयार होणारा /उपलब्ध होणारा शेतीमाल विचारात घेवून तयार करता येणाऱ्या स्थानिक आहाराच्या आणि पौष्टिक आहाराच्या पाककृती **परिशिष्ट अ** मध्ये दर्शविण्यात आल्या आहेत. या योजनेअंतर्गत जिल्हास्तरावर पुरक पोषण आहार पुरवठयाची योजना राबविताना भौगोलीक भागानुसार आणि त्या भागातील खाण्याच्या सवयीनुसार (Geographical Area and eating habit) परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या पाककृतीमधून जिल्हा स्तरीय समितीने योग्य पाककृती निश्चित कराव्यात व या निश्चित केलेल्या पाककृतीमधून अंगणवाडीमध्ये आलटून पालटून आहार देण्यात यावा.

८.३) एखाद्या जिल्हा समितीला आवश्यक वाटल्यास अन्न व पोषण आहार मंडळ, मुंबई यांच्या किंवा संबंधित भागातील विद्यापीठामधील गृहविज्ञान विभागाच्या मदतीने किंवा या विषयाशी संबंधित मान्यताप्राप्त संस्थांच्या मदतीने त्या भागातील खाण्याच्या सवयीनुसार त्या जिल्हयासाठी आणखी काही नवीन पाककृतीचा समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी सदर पाककृतीमधून बालकांना किमान ८ ते १० ग्रॅम प्रथिने आणि ३०० उष्मांक तर गर्भवती स्त्रिया आणि स्तनदा माता यांना किमान २० ते २५ ग्रॅम प्रथिने आणि ५०० उष्मांक आणि कुपोषित बालकांना

१६ ते २० ग्रॅम प्रथिने आणि ६०० उष्मांक मिळणे आवश्यक राहील आणि सदर पाककृती स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळ यांना विहित दर मर्यादेत (cost effective) पुरविणे शक्य होणारी असावी.

९. **आहार पुरवठयाची देयके अदा करण्याची सुधारित कार्यपध्दती -**

९.१) सद्याच्या प्रचलीत पध्दतीप्रमाणे नागरी प्रकल्पामध्ये पुरक पोषण आहार पुरवठयाची देयके बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या स्तरावर अदा करण्यात येतात. ग्रामीण / आदिवासी प्रकल्पात आहार पुरवठयाची देयके मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद यांच्या स्तरावर अदा करण्यात येतात. मात्र ग्रामीण / आदिवासी प्रकल्पातील वेतन व कार्यालयीन खर्चाची तसेच अंगणवाडी कर्मचा-यांचे मानधन आणि वाढीव मानधनाची देयके वित्तप्रेषण मार्फत (Remittance) प्रकल्प स्तरावर (पंचायत समिती स्तरावर) अदा करण्यात येतात. म्हणजे ग्रामीण- आदिवासी प्रकल्पाच्या बाबतीत एकाच लेखाशिर्षाखालील (उदा.२२३६००२७ आणि २२३६००६३) खर्च जिल्हापरिषदेमार्फत जिल्हा स्तरावर आणि पंचायत समिती स्तरावर करण्यात येतो. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुरक पोषण आहाराची योजना स्वयं सहाय्यता बचत गट आणि महिला मंडळ यांचेमार्फत राबविताना आहार पुरवठयाची देयके तातडीने अदा करणे आवश्यक आहे. कारण स्वयं सहाय्यता बचत गट आणि महिला मंडळ यांची आर्थिक क्षमता विचारात घेता त्यांनी केलेल्या आहार पुरवठयाची देयके जास्त दिवस प्रलंबित राहीली तर निधी अभावी आहार पुरवठयात खंड पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुरक पोषण आहार पुरवठयाची देयके प्रकल्प स्तरावर अदा करण्यात यावीत. त्यासाठी अंगणवाडी कर्मचा-यांच्या मानधनासाठी ज्याप्रमाणे वित्तप्रेषणामार्फत निधी पाठविण्यात येतो, त्याप्रमाणे पुरक पोषण आहार खर्चासाठी प्रकल्प स्तरावर (पंचायत समिती स्तरावर ) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वित्तप्रेषण (Remittance) मार्फत निधी पाठविण्यात यावा. अंगणवाडीमध्ये स्वयं सहाय्यता बचत गट आणि महिला मंडळ यांनी केलेल्या आहार पुरवठयाची देयके आहार पुरवठा झालेल्या महिन्यानंतर पुढील महिन्याच्या जास्तीत जास्त १० तारखेपर्यंत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी देयके अदा करावीत.

९.२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण/आदिवासी प्रकल्पातील पुरक पोषण आहारावरील तसेच अंगणवाडी कर्मचा-यांना राज्यशासनाचे वाढीव मानधनावरील खर्च (२२३६ ००२७) या लेखा शिर्षाखालील मंजूर तरतुदीमधून करण्यात येतो. सदर लेखाशिर्ष ग्राम विकास विभागाचे अर्थोपायमधील (ways & means grants) तरतुदीचे असल्याने या लेखाशिर्षाखालील तरतूद ग्राम विकास आणि वित्त विभागाच्या मान्यतेने रोख स्वरुपात अनुदान वितरीत करण्यात येते. मात्र सदर मान्यता प्राप्त होण्यासही विलंब होत असल्याने यापुढे या लेखाशिर्षाखालील तरतुद कायमस्वरुपी रोख स्वरुपात अदा करण्यात याव्यात.

९.३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १०० आणि १२३ अन्वये जिल्हा परिषदेला अभिकरण तत्वावर (Agency basis) चालविण्यासाठी हस्तांतरीत करण्यात आलेली असल्याने या योजनेचा सर्व खर्च , त्यासाठी कर्मचारी व अनुषंगीक कार्यालयीन खर्च या

विभागाकडून करण्यात येत असला तरी जिल्हा परिषदांना अभिकरण शुल्क (Agencies Charges ) मिळत असल्यामुळे, या योजने अंतर्गत पुरक पोषण आहाराच्या खर्चासाठी शासनाकडून निधी वितरणास अपवादात्मक परिस्थितीत काही कारणामुळे विलंब झाल्यास जिल्हा परिषदेने जिल्हा निधीतून आगावू खर्च (Advance) करण्यात यावा आणि महिला बचत गट / महिला मंडळ यांनी केलेल्या आहार पुरवठयाची देयके अदा करावीत. या योजनेच्या खर्चासाठी शासनाकडून निधी वितरणास अपवादात्मक परिस्थितीत काही कारणामुळे विलंब झाल्यास जिल्हा परिषदेने अशा अपवादात्मक परिस्थितीत जास्तीत जास्त दोन महिन्याचा आगावू खर्च (Advance) करावा, आणि शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर त्यामधून सदर खर्चाची प्रतिपूर्ती करावी.

१०. स्वयं सहायता बचत गट / महिला मंडळ यांनी तयार आहाराचा पुरवठा करावयाचा असल्याने त्यांनी अंगणवाडीमध्ये आहार पुरवठा केल्यानंतर या आहाराच्या नमुन्यांची स्थानिक प्रयोगशाळेकडून वर्षातून २ वेळा अचानक तपासणी करण्यात यावी. या तपासणीसाठी प्रयोगशाळेचा खर्च संबंधित पुरवठेदार स्वयं सहाय्यता बचत गट /महिला मंडळे यांनी करणे आवश्यक राहील.

११. या योजनेंतर्गत पुरक पोषण आहार पुरवठयासाठी एकदा स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळ यांची अंगणवाडीसाठी नियुक्ती केल्यानंतर (काही तक्रार नसल्यास) पुढील वर्षभर त्यांचेकडून तयार आहाराचा पुरवठा करण्यात यावा. त्यानंतर पुढील वर्षासाठी स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळ यांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया एक महिना अगोदर पूर्ण करण्यात यावी.

१२. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरक पोषण आहार योजनेखाली ग्रामीण / आदिवासी आणि नागरी प्रकल्पातील अंगणवाडयांना तयार आहाराचा पुरवठा करण्यात यावा. अंगणवाडीमधील लाभार्थ्यांना आहार पुरविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेले स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळ हे अंगणवाडीमध्ये किंवा त्यांना सोयीचे होईल अशा त्यांच्या स्वत:च्या पाकगृहात आहार शिजवतील आणि त्यांच्याकडून योजनेच्या लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणारा आहार ताजा आणि गरम असणे आवश्यक राहील.

१३. या योजनेमध्ये सहाय्यता बचत गट / महिला मंडळ यांच्यामार्फत आहार शिजवून तयार आहाराचा (Ready to Eat ) अंगणवाडयांना पुरवठा करण्यात येणार असल्याने सध्या देण्यात येणारा इंधन खर्च भत्ता रद्द करण्यात येत आहे.

१४. या योजनेंतर्गत कुपोषित श्रेणी ३ व ४ मधील मुलांना आहार देताना त्यांना निश्चित करण्यात आलेला आहार दिवसातून दोन वेळा विभागून देण्यात यावा. त्याचप्रमाणे कुपोषित मुलांना दिवसातून दोनपेक्षा जास्त वेळा आहार विभागून द्यावयाचा असल्यास याबाबत जिल्हा समितीला निर्णय घेण्याचे अधिकार राहतील.

१५. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरक पोषण आहाराचे खाद्यपदार्थ महिला मंडळे व महिला सहकारी संस्था यांचेमार्फत तयार करून त्याचे वाटप करण्यासाठी यापुर्वी दिनांक ८.३.१९९४ च्या शासन निर्णयान्वये अन्नपूर्णा

योजना सुरु करण्यात आली होती. मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार आता आहाराचा पुरवठा आणि आहार तयार करणे या दोन्ही बाबी स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळ यांचेमार्फत करण्यात येणार असून त्याव्दारे तयार पूरक पोषण आहार पुरवठा होणार असल्याने, अन्नपूर्णा योजनेतील तरतूदी आता निकामी झालेल्या आहेत. त्यामुळे अन्नपूर्णा योजना बंद करण्यात येत आहे.

१६. केंद्र शासनाच्या योजनेनुसार अंगणवाडयामध्ये तयार खाद्यान्न (Ready to eat ) स्वरुपात आहार पुरवठा होण्यासाठी केंद्र शासनाने दिलेल्या अनुदानामधून महिला आर्थिक विकास महामंडळाने महिला मंडळाच्या मार्फत मुंबई शहरात दोन उत्पादन केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. केंद्र शासनाच्या अनुदानामधून महिला मंडळामार्फत सुरु करण्यात आलेली उत्पादन केंद्रे सुरु राहण्यासाठी , या उत्पादन केंद्रामधून तयार केलेला तयार आहार मुंबई / ठाणे शहरातील काही नागरी प्रकल्पात / अंगणवाडयात पुरविण्यास मान्यता देण्यात येत आहे. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी अशा अंगणवाडया / प्रकल्प निश्चित करावेत.

१७. **तयार आहार पुरवठयाचा दर -** सद्या पुरक पोषण आहार योजनेअंतर्गत दि.२९.५.१९९९ नुसार ग्रामीण / आदिवासी क्षेत्रातील तसेच नागरी प्रकल्पातील अंगणवाडयातील लाभाधारकांना देण्यात येणा-या ३०० उष्मांक आणि ८ ते १० प्रथिनेयुक्त आहारासाठी प्रति लाभार्थी प्रति दिन रु.१.५०/- असा दर तुर्तास कायम ठेवण्यात येत असून , त्यानुसार ३०० उष्मांकयुक्त पाककृतीचा आहार म्हणजे एक एकक (One Unit) पूरक पोषण आहार असल्याने या योजनेंतर्गत कुपोषित (श्रेणी ३ व ४ मधील ) बालकांना आणि गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना तयार आहाराचे विहित प्रमाण मिळण्यासाठी आणि स्वयं सहायता बचत गट यांना आहाराचा खर्च देण्यासाठी दोन एकक आहार याप्रमाणे परिगणना करण्यात यावी. या योजनेतर्गत ३०० उष्मांकयुक्त आहारासाठी प्रतिदिन प्रति लाभार्थी रु.१.५० /- या खर्चामध्ये २ पैसे अंगणवाडीसाठी साहित्य खर्च निधीचा समावेश असल्याने तयार आहाराचा पुरवठा करणा-या पुरवठेदारांना ३०० उष्मांक आणि ८ ते १० प्रथिनेयुक्त म्हणजे एक एकक ( one unit ) आहारासाठी फक्त रु.१.४८ याप्रमाणे दर देण्यात यावा.

१८. पुरक पोषण आहार पुरवठयासंदर्भात सुधारित कार्यपध्दतीत तयार खाद्यान्न स्वरुपात आहार पुरवठा होणार असल्याने जिल्हा समितीमार्फत निश्चित करण्यात येणा-या पाककृती साठी आवश्यक सर्व वस्तू महिला स्वयंसहाय्यता बचत गट / महिला मंडळे यांनी त्यांच्या सोयीप्रमाणे खरेदी कराव्यात. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून बोपीएल दराने मिळणारा तांदूळ / गहू सार्वजनीक वितरण व्यवस्थेमार्फत स्वस्त धान्य दुकानामधून खरेदी पध्दतीने उपलब्ध करुन देण्याबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

१९. **नवसंजीवन योजनेंतर्गत वाढीव आहार -**

१९.१) नवसंजीवन योजनेंतर्गत ५ आदिवासी जिल्हयातील १५ अतिसंवेदनाशील प्रकल्पामधील लाभार्थ्यांना वाढीव आहार देण्यात येत असून वाढीव आहाराचे मानक आर्थिक प्रमाणात निश्चित करण्यात आलेले आहे. आहाराचे मानक

उष्मांक आणि प्रथिने यामध्ये निश्चित करणे आवश्यक असल्याने नवसंजिवन योजनेंतर्गत वाढीव आहाराचे मानक, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या पुरक पोषण आहाराच्या दीडपट आहार याप्रमाणे ठेवण्यात येत आहे. नवसंजिवन योजनेंतर्गत वाढीव पुरक पोषण आहार पुरवठयाचे मानक आणि त्यासाठी अनुज्ञेय खर्च **परिशिष्ट ब** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील. नवसंजीवन योजनेंतर्गत ३०० उष्मांकयुक्त आहारासाठी प्रतिदिन प्रतिलाभार्थी दर मर्यादा रु.१.५० या दरामध्ये २ पैसे अंगणवाडीतील साहित्य खरेदीसाठी याप्रमाणात साहित्य खरेदी निधी राहणार असून प्रति ३०० उष्मांक युक्त म्हणजे एक एकक तयार आहारासाठी पुरवठेदारांना फक्त रु.१.४८ या प्रमाणात दर मिळेल.

१९.२) नवसंजीवन योजनेंतर्गत ५ आदिवासी जिल्हयातील १५ अतिसंवेदनाशील प्रकल्पामध्ये वाढीव आहाराची योजना पुढील पाच वर्षे ) राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**२०. पुरक पोषण पुरवठयाची पर्यायी व्यवस्था -** मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक २९.४.२००४ च्या आदेशानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत योजनेच्या लाभार्थ्यांना वर्षभर नियमितपणे आहार पुरवठा होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक ७.१०.२००४ रोजीच्या आदेशानुसार आहार पुरवठयाची योजना स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळे यांचे मार्फत राबविणे आवश्यक असल्याने, शासनाने वरील प्रमाणे निर्णय घेतलेला असून त्यानुसार आहार पुरवठयाची योजना अंगणवाडयामधून स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळे यांचे मार्फत विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे राबविण्यात यावी. मात्र काही आदिवासी / ग्रामीण भागामध्ये स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळे यांचेमार्फत पुरक पोषण आहार पुरवठयाची योजना राबविण्यास अडचणी आल्यास (उदा. आहार पुरवठा करण्यास आर्थिक दृष्टया सक्षम संस्था उपलब्ध न होणे किंवा तयार नसणे ) या योजनेचे लाभार्थी पुरक पोषण आहारापासून वंचित राहू नये म्हणून खालीलप्रमाणे पर्यायी व्यवस्थे मार्फत आहार पुरवठा करण्यात यावा.

२०.१) या योजनेंतर्गत ग्रामीण - आदिवासी भागामधील ज्या अंगणवाडयामध्ये स्थानिक स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळे यांचे मार्फत आहार पुरवठा होणार नाही, अशाच अंगणवाडयात पर्यायी व्यवस्थेचा अवलंब करण्यात यावा.

२०.२) अशा अंगणवाडयांमध्ये आहार पुरवठा करण्यासाठी जिल्हा समितीने संबंधित जिल्ह्यासाठी निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे आवश्यक असणा-या धान्यादी - खाद्यावस्तू निश्चित कराव्यात आणि अशा चांगल्या प्रतिच्या वस्तुंचा पुरवठा या क्षेत्रातील पाच वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेल्या महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि. या राज्यस्तरीय सहकारी ग्राहक शिखर संस्थेकडून वाजवी दराने करण्यात यावा. त्यासाठी जिल्हा समितीने कृषी उत्पन्न बाजार समितीचे दर, स्थानिक बाजार पेठेतील घाऊक बाजाराचे दर, जिल्हा सांख्यिकी अधिकारी यांचे दर विचारात घेऊन अशा वस्तू खरेदी करण्याचे वाजवी दर निश्चित करावेत.

२०.३) अशा अंगणवाडयामध्ये जुन्या पध्दतीप्रमाणे धान्यादी - खाद्यवस्तू मालाचा (उदा. धान्ये, कडधान्ये, डाळी, तेल, मीठ, इ. ) पुरवठा करण्यात यावा आणि त्यापासून अंगणवाडीमार्फत अन्न शिजवून लाभार्थ्यांना आहाराचे वाटप करण्यात यावे.

२०.४) वरील प्रमाणे पर्यायी व्यवस्थेमार्फत जुन्या पध्दतीप्रमाणे आहार पुरवठा होणार असल्याने या आहार पुरवठ्याची देयके जुन्या पध्दतीने अदा करावीत तसेच आहार शिजविण्यासाठी अंगणवाडी कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेला इंधनभत्ता खर्च देण्यात यावा.

२१. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुरक पोषण आहार पुरवठ्यासाठी येणारा खर्च मागणी क्रमांक एक्स-१, २२३६, पोषण आहार , पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार , (०१)(०१), पोषण आहार कार्यक्रम (२२३६०१८१);पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - (०१)(०४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (२२३६०५४६) ; (०३)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १२३ व २६१ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदान (पोषण व मानधन) (२२३६००२७) ; राज्य योजनांतर्गत योजना, (०५)(०३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (२२३६००६३) या लेखा शिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

हया शासन आदेशास ग्राम विकास विभाग आणि नियोजन विभागाची तसेच वित्त विभागाची त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २५५/०५ / व्यय - ६ दिनांक ७.६.२००५ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार आणि नावाने.

सही/-
(वंदना कृष्णा )
सचिव

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन,मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई.
मा.मंत्री,महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
मा.राज्यमंत्री,महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
मा.मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई.
मा. अपर मुख्य सचिव,वित्त विभाग,मंत्रालय,मंबई
मा.प्रधान सचिव,नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई.
मा.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
मा. सचिव,[वित्त] वित्त विभाग,मंत्रालय,मंबई
मा.सचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,कोकण भवन,नवी मुंबई.

महासंचालक, राजमाता जिजाऊ माता- बाल आरोग्य व पोषण मिशन, औरंगाबाद
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,
महालेखापाल,महाराष्ट्र १ [लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा] मुंबई.
महालेखापाल,महाराष्ट्र २ [लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा] नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी [बाल कल्याण] जिल्हा परिषद
मुख्यलेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा,कोकण भवन,नवी मुंबई.
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण, आदिवासी आणि नागरी प्रकल्प)
सर्व उप सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती कार्यासन - ५

परिशिष्ट "अ"

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक - एबावि २००४ / प्रक्र २३३/ का-५ दिनांक २८.१०.२००५ चे परिशिष्ट

बचत गट / महिला मंडळे यांच्यामार्फत तयार आहार पुरविण्यासाठी विविध पाककृती

स्थानिक आहाराच्या पाककृती

पाककृती क्र. १ - गव्हाची लापशी

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १. | तुकडा गहू (तांबडा रवा) | ७५ ग्रॅम | ८.३६ ग्रॅम | २७८ |
| २. | गुळ | २० ग्रॅम | -- | ८० |
| ३. | आयोडिनयुक्त मीठ | चवीनुसार | -- | -- |
| ५. | तेल | ३ ग्रॅम | -- | २७ |
| | एकुण | ९८ ग्रॅम | ८.३६ ग्रॅम | ३८५ |

पाककृती क्र. २ - कडधान्याची उसळ

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १. | कडधान्य (मटकी, मुग, चवळी, चणा आणि वाटाणा यापैकी कोणतेही एक) | ७० ग्रॅम | १४ ते १६ ग्रॅम | २४० |
| २. | हळद चवीनुसार | -- | -- | -- |
| ३. | गोडेतेल | ७ ग्रॅम | -- | ६३ |
| ४. | आयोडिनयुक्त मीठ | चवीनुसार | -- | -- |
| | एकुण | ७७ ग्रॅम | १४ ते १६ ग्रॅम | ३०३ |

पाककृती क्र. ३ - डाळ तांदूळाची खिचडी

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १. | तांदूळ | ६० ग्रॅम | ४.२ ग्रॅम | २०७ |
| २. | मुगडाळ | २० ग्रॅम | ५.० ग्रॅम | ६८ |
| ३. | गोडेतेल | ३ ग्रॅम | -- | २७ |
| ४. | आयोडिनयुक्त मीठ, हळद | चवीनुसार | -- | -- |
| | एकुण | ८३ ग्रॅम | ९.२ ग्रॅम | ३०२ |

पाककृती क्र. ४ - खिर

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १. | दुध (गाय किंवा म्हैस ) | १५० मि.ली. | ४.८ ग्रॅम | १०० |
| २. | तांदुळ / शेवया | ५० ग्रॅम | ३.७५ ग्रॅम | १७३ |
| ३. | गुळ /साखर | २० ग्रॅम | -- | ८० |
| | एकुण | ८३ ग्रॅम | ८.५५ग्रॅम | ३५३ |

पाककृती क्र. ५ - मुगडाळ हलवा

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १ | मुगडाळ | ६० ग्रॅम | १४.७ | २०४ |
| २ | गुळ/साखर | १३ ग्रॅम | - | ५२ |
| ३ | तेल | ५ ग्रॅम | | ४५ |
| | एकुण | | १४.७ | ३०१ |

पाककृती क्र.६- पुरण

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १ | चणाडाळ | ६० ग्रॅम | १२.५ | २०० |
| २ | गुळ/साखर | १५ ग्रॅम | - | ६० |
| ३ | तेल | ५ ग्रॅम | | ४५ |
| ४ | हळद | चवीनुसार | | |
| | एकुण | | १२.५ | ३०५ |

पाककृती क्र. ७ - गोड भात

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १ | तांदुळ | ६० ग्रॅम | ४.१ | २०७ |
| २ | मुगडाळ | २५ ग्रॅम | ६.१ | ८५ |
| ३ | साखर/गुळ | १५ ग्रॅम | - | ६० |
| ४ | तेल | ५ ग्रॅम | - | ४५ |
| | एकुण | | १०.२ | ३९७ |

पाककृती क्र.८- गोड खिचडी

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १ | तांदुळ | ४० ग्रॅम | २.३ | १३८ |
| २ | मुगडाळ/मोड आलेले कडधान्य | २५ ग्रॅम | ६.१ | ८५ |
| ३ | साखर/गुळ | १० ग्रॅम | - | ४० |
| ४ | तेल | ५ ग्रॅम | - | ४५ |
| | एकुण | | ८.९ | ३०८ |

पाककृती क्र. ९- भाताची गोड लापशी

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १ | तांदुळ | ४० ग्रॅम | २.७ | १५८ |
| २ | मुग | ३० ग्रॅम | ७४ | १०२ |
| ३ | गुळ | १० ग्रॅम | - | ४० |
| ४ | तेल | ५ ग्रॅम | - | ४५ |
| | एकुण | | १०.१ | ३४५ |

पाककृती क्र. १०- फोडणीचा भात

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १ | तांदूळ | ५० ग्रॅम | ३.४ | १७३ |
| २ | मुगडाळ | १५ ग्रॅम | ३.७ | ५२ |
| ३ | चणाडाळ | १० ग्रॅम | २.१ | ३३ |
| ४ | तेल | ५ ग्रॅम | - | ४५ |
| ५ | मीठ/हळद चवीनुसार | | | |
| | एकूण | | ९.२ | ३०३ |

पाककृती क्र. ११ बनपाव (for Urban Projects)

| अ.क्र. | घटक | परिणाम (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १ | मैदा | ५५ ग्रॅम | | |
| २ | सोयाफ्लोअर | १० ग्रॅम | | |
| ३ | तेल | ४ ग्रॅम | | |
| ४ | दुध पावडर | २ ग्रॅम | | |
| ५ | साखर | १० ग्रॅम | | |
| ६ | मीठ | १ ग्रॅम | | |
| ७ | यीस्ट | ०.५० ग्रॅम | | |
| ८ | पाणी (५० ते ५५ मि.ली.) | ५५ मि.ली. | | |
| | एकूण | १०० ग्रॅम | १० | ३०० |

वरील पाककृतीनुसार तयार गोड बनपावाचे वजन १०० ग्रॅम राहील व त्यामध्ये ३०० उष्मांक आणि १० ग्रॅम प्रथिने असतील.

पौष्टीक आहाराच्या पाककृती

(१) गहू आधारित पोषक आहार

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १ | गहू | १००० ग्रॅम | ११८ | ३४६० |
| २ | मुगडाळ | ५०० ग्रॅम | १२५ | १७०० |
| ३ | शेंगदाणे | २५० ग्रॅम | १२० | १४१० |
| | एकूण | १७५० | ३६३ | ६५४० |

**सुका पोषक आहार बनविण्याची पध्दत -** गहू, मुगडाळ आणि शेंगदाणे वेगवेगळे भाजून घ्यावेत. शेंगदाण्याची साल काढून घ्यावी आणि वेगवेगळे बारीक दळून घ्यावे. त्यानंतर व्यवस्थीत प्रकारे एकत्रित करुन कोरडया व हवाबंद डब्यामध्ये ठेवावे.

**तयार पोषक आहार बनविण्याची पध्दत -** हवाबंद उब्यामध्ये ठेवलेला सुका आहार मोठे तीन चमचे (अंदाजित ३० ग्रॅम) घेऊन गरम दुधामध्ये किंवा पाण्यात मिसळावा. त्यामध्ये साखर किंत्रा गुळ (१० ग्रॅम )घालून चवदार पेज तयार करण्यात यावी.

अशा प्रकारे तयार पोषक आहारामध्ये साधारणता १५० उष्मांक आणि ५ ग्रॅम प्रथिनेयुक्त असल्याने हा आहार अर्धा एकक पुरक पोषण आहार राहील. ६ महिने ते २ वर्षे वयोगटातील सर्वसाधारण मुलांना ३०० उष्मांक युक्त पुरक पोषण आहार देण्यासाठी तयार पोषक आहार दोन वेळा देण्यात यावा. त्याप्रमाणे कुपोषित मुलांना जादा ३०० उष्मांक देण्यासाठी याप्रमाणात आहार देण्यात यावा.

(२) नाचणी सत्व

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | प्रथिने (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) |
|---|---|---|---|---|
| १ | नाचणी | ९०० ग्रॅम | ६९ | ३०६९ |
| २ | मूगडाळ | ४०० ग्रॅम | १२५ | १३६० |
| ३ | शेंगदाणे | २५० ग्रॅम | १२० | १४१० |
| ४ | तीळ | १०० ग्रॅम | ४८* | ५६४* |
| | **एकूण** | **१७५०** | **३६२** | **६४०३** |

**सुका पौष्टीक आहार बनविण्याची पध्दत -**

१. नाचणी एक रात्रभर पाण्यामध्ये भिजवत ठेवावी.
२. दुस-या दिवशी एका फडक्यामध्ये नाचणीला मोड आणण्यासाठी पूर्ण दिवसभर बांधून ठेवावी.
३. नंतर मोड आलेली नाचणी उन्हामध्ये वाळवावी.
४. त्यानंतर मोड येऊन उन्हामध्ये वाळविलेली नाचणी, मूगडाळ , शेंगदाणे आणि तिळ वेगवेगळे भाजण्यात यावे.
५. भाजलेले धान्य बारीक दळून घ्यावे.
६. त्यानंतर व्यवस्थीत प्रकारे एकत्रित करुन कोरडया व हवाबंद उब्यामध्ये ठेवावे.

**तयार पौष्टीक आहार बनविण्याची पध्दत -** हवाबंद उब्यामध्ये ठेवलेला सुका आहार मोठे तीन चमचे (अंदाजित ३० ग्रॅम) घेऊन गरम दुधामध्ये किंवा पाण्यात मिसळावा. त्यामध्ये साखर किंवा गुळ (१० ग्रॅम )घालून चवदार पेज तयार करण्यात यावी.

अशा प्रकारे तयार पोषक आहारामध्ये साधारणता १५० उष्मांक आणि ५ ग्रॅम प्रथिनेयुक्त असल्याने हा आहार अर्धा एकक पुरक पोषण आहार राहील. ६ महिने ते २ वर्षे वयोगटातील सर्वसाधारण मुलांना ३०० उष्मांक युक्त पुरक पोषण आहार देण्यासाठी तयार पोषक आहार दोन वेळा देण्यात यावा. त्याप्रमाणे कुपोषित मुलांना जादा ३०० उष्मांक देण्यासाठी याप्रमाणात आहार देण्यात यावा.

पौष्टीक आहाराच्या इतर आणखी पाककृती

पाककृती क्र.३- सातूचे पिठ (सोयाबीन युक्त)

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) | प्रथिने (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|
| १ | गहू | ३५ | १२१ | ४.१३ |
| २ | मुगदाळ | १५ | ५१ | ३.६९ |
| ३ | सोयाबीन | १५ | ६४.८ | ६.५ |
| ४ | गुळ | ३० | ११५ | ०.१२ |
| ५ | तुप | ५ | ४५ | -- |
| | एकूण | १०० ग्रॅम | ३९७ | १४ |

पाककृती क्र.४- सातूचे पिठ (नाचणी युक्त)

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) | प्रथिने (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|
| १ | गहु | १० | ३५ | १.२ |
| २ | मुगदाळ | २५ | ८७ | ६.१५ |
| ३ | नाचणी | ३० | १०२ | २.३ |
| ४ | गुळ | ३० | ११५ | ०.१२ |
| ५ | तुप | ५ | ४५ | -- |
| | एकूण | १०० ग्रॅम | ३८४ | ९.७७ |

पाककृती क्र.५- नाचणी खिर

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) | प्रथिने (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|
| १ | नाचणी | ६५ | २२२ | ५ |
| २ | गुळ | ३० | ११५ | ०.१२ |
| ३ | तुप | ५ | ४५ | -- |
| | एकूण | १०० ग्रॅम | ३८२ | ५.१२ |

पाककृती क्र.६- मुगाच्या डाळीचे गोड वरण

| अ.क्र. | घटक | परिमाण (ग्रॅम) | उर्जा (कॅलरीज) | प्रथिने (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|
| १ | मुगडाळ | ६५ | २२५ | १५.९ |
| २ | गुळ | ३० | ११५ | ०.१२ |
| ३ | तूप | ५ | ४५ | -- |
| | एकूण | १०० ग्रॅम | ३८५ | १६.०२ |

परिशिष्ट "ब"

महिला व बाल विकास विभाग , शासन निर्णय क्रमांक - एबावि २००४ / प्रक्र २३३/ का-५ दिनांक २८.१०.२००५ चे परिशिष्ट

नवसंजीवन योजनेंतर्गत वाढीव आहाराची योजना

भाग (१)वाढीव आहार योजना राबविण्यात येणारे १५ प्रकल्पांची नावे

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | प्रकल्पाचे नाव |
|---|---|---|
| १. | अमरावती | १. धारणी २. चिखलदरा |
| २. | नासिक | १. नासिक २. हरसूल |
| ३. | गडचिरोली | १.एटापल्ली |
| ४. | ठाणे | १. मोखाडा २. शहापूर ३. जव्हार ४.मुरबाड ५. वाडा ६. तलासरी ७.डहाणू |
| ५. | नंदुरबार | १. अक्कलकुवा २. तळोदा ३. धडगांव |

भाग (२) नवसंजीवन योजनेंतर्गत वाढीव आहाराचे सुधारित प्रमाण

| अ.क्र | लाभार्थी | दर मर्यादा | आहाराचे स्वरुप | उष्मांक व प्रथिने |
|---|---|---|---|---|
| १. | ६ महिने ते २ वर्ष मुले | रु. २.२५ | ४५० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने युक्त पौष्टिक आहार | ४५० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने |
| २. | २ वर्ष ते ६ वर्ष मुले | रु. २.२५ | ४५० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने स्थानिक आहार | ४५० कॅलरीज १४ ग्रॅम प्रथिने |
| ३. | ६ महिने ते २ वर्ष कुपोषित मुले (ग्रेड III व IV) | रु. ४.५० | ९०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने युक्त पौष्टिक आहार (दिवसातून दोन वेळा समान प्रमाणात विभागून देण्यात यावा) | ९०० कॅलरीज २४ ते ३० ग्रॅम प्रथिने |
| ४. | २ वर्ष ते ६ वर्ष कुपोषित मुले (ग्रेड III व IV) | रु. ४.५० | रु. ४५० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिनेयुक्त पौष्टिक आहार + ४५० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने स्थानिक आहार (दिवसातून दोन वेळा विभागून देण्यात यावा) | ९०० उष्मांक आणि २४ ते ३० ग्रॅम प्रथिने |
| ५. | गरोदर व स्तनदा माता | रु. ४.५० | ७५० उष्मांक आणि २४ ते ३० ग्रॅम प्रथिने युक्त स्थानिक आहार | ७५० उष्मांक आणि ३० ते ३५ ग्रॅम प्रथिने |

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारा गरम ताजा आहाराच्या (Ready to eat) देयकांसंदर्भात स्थानिक मात्रा समितीचा अहवाल सादर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : एबाविं-२०१२/प्र.क्र.२८८/का-५,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,

दिनांक :- ३१ ऑक्टोबर, २०१२

**वाचा:-** १) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.एबाविं-२००४/प्र.क्र.२३३/का-५, दि.२८.१०.२००५

२) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.एबाविं-२००४/प्र.क्र.२३३/का-५, दि.१८.७.२००६

३) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक एबाविसेयो/का-२/२०२०/२००६, दिनांक १८.९.२००६

४) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक एबाविसेयो/का-२/४६८/२००८, दिनांक ८.२.२००८

५) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.एबाविं-२००९/प्र.क्र.५९/का-५, दि.२४.८.२००९

**प्रस्तावना** :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रांना दिनांक २८.१०.२००५ च्या शासन निर्णयानुसार महिला बचत गट/ महिला मंडळ यांच्याकडून गरम ताजा आहार पुरवठा केला जात आहे. या शासन निर्णयातील परि.१० नुसार तयार आहाराचे नमुने स्थानिक प्रयोगशाळेकडून वर्षातून २ वेळा तपासून घ्यावेत, आवश्यक करण्यात आले आहे. त्यानंतर यासंदर्भात दिनांक २४.८.२००९ च्या शासन निर्णयातील परि.३ (३.१०) मध्ये अंगणवाडी सेविकांनी प्रत्येक दिवसाच्या आहाराचा नमुना (sample) त्याचे वाटप झाल्यानंतर २४ तासांसाठी तपासणी करिता जतन (preserve) करून ठेवावा. संबंधित अधिकाऱ्यांनी अचानकपणे आहाराची तपासणी ३ महिन्यातून करावी. सलग तीन वेळेस आहार निकृष्ट असल्यास सदर महिला मंडळ / स्वयंसहाय्यता महिला बचत गटाची तक्रार संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी / उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीकडे सादर करावी. अंगणवाडीत देण्यात येणाऱ्या आहारातील उष्मांक व प्रथिने व घरी नेण्याकरिता देण्यात येणाऱ्या (Take Home Ration) सूक्ष्मपोषकयुक्त आहारात आवश्यक विहित केलेले [illegible] तपासणीसाठी येणारा प्रयोगशाळेचा खर्च संबंधित महिला मंडळ / स्वयंसहाय्यता बचत गट यांच्या आहाराच्या देय रकमेतून वजा करून अदा करण्यात यावा अशी तरतूद आहे.

राज्यात प्रत्येक जिल्ह्यात सरासरी ३००० याप्रमाणे एकूण ९५,००० अंगणवाडी केंद्र सध्या कार्यरत आहेत. कार्यरत अंगणवाडी केंद्रांच्या संख्येच्या प्रमाणात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय प्रयोगशाळा उपलब्ध नाहीत. तसेच गरम ताजा आहार हा काही कालावधीत नाशवंत होत असल्यामुळे त्याची साठवणूक करण्याची सोय अंगणवाडी केंद्रात [illegible]

जिल्हास्तरावर नाही. या परिस्थितीत प्रत्येक पुरवठाधारकाच्या गरम ताजा आहाराची नमुन्यातून दोन वेळा प्रयोग शाळेतून तपासणी करून घेणे व्यवहार्य नाही. त्यामुळे सदर तरतुदींमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

गरम ताजा आहाराच्या नमुन्याची प्रयोगशाळेतून तपासून घेण्याच्या अडचणी लक्षात घेऊन दिनांक २८.१०.२००८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१० आणि दिनांक २४.८.२००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ मधील (३.९७) तरतूद रद्द करून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे आदेश देण्यात येत आहेत.

२. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणात पुरक पोषण आहार अंगणवाड्यांतील लाभार्थ्यांना मिळतो किंवा नाही. तसेच आहाराचा दर्जा व प्रमाण योग्य आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी आणि आहार पुरवठा वाटप व दर्जामध्ये सुधारणा व सुसूत्रता यावी, त्यामध्ये पारदर्शकता रहावी यासाठी ग्राम पातळीवर व नागरी विभागातील अंगणवाडी परिसरातील ०७ सदस्यांची माता समिती संदर्भ क्र.३ व ४ येथील परिपत्रकानुसार गठीत करण्यात आलेली आहे. (सोबत असलेल्या विवरणपत्र अ मध्ये सदस्यांची यादी व त्यांची कार्ये स्पष्ट केली आहेत) माता समिती गठीत करण्यामागे अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना पुरविण्यात येणारा पुरक पोषण आहार योग्य प्रमाणात व चांगल्या दर्जाचा असावा याची देखरेख व नियंत्रण स्थानिक स्तरावर असावे हा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे यापुढे पुरक पोषण आहाराच्या तपासणीबाबत आणि आहार देयकांच्या अदायगीबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(अ) अंगणवाडी केंद्रातील स्वयंसहाय्यता महिला बचतगट / महिला मंडळ इत्यादींमार्फत शिजवून तयार खाद्य स्वरूपातील (Ready to eat) आहाराची महिन्यातून किमान एक वेळ माता समितीने तपासणी करावी व तो पत्रकात प्रमाणे आहे किंवा नाही याबाबतची खात्री करावी.

(ब) वरील (अ) प्रमाणे माता समितीने तपासणी करून खालील बाबी संदर्भात आपला अहवाल सोबत असलेल्या परिशिष्ट अ खालील विवरणपत्र-१ व २ मध्ये सादर करावा.

वरीलप्रमाणे माता-समितीचा अहवाल, मासिक आहाराचे देयक सादर करताना त्यासोबत जोडण्यात यावा. माता समितीच्या संबंधित महिन्याच्या अहवालाशिवाय सादर केलेले मासिक देयक अपूर्ण समजण्यात यावे. अशी अपूर्ण देयके कोषागारात दाखल केली जाणार नाही. याची खबरदारी संबंधित अंगणवाडी सेविका, मुख्य सेविका (पर्यवेक्षिका) व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी घ्यावी. जर प्रकल्प कार्यालयातून माता समितीच्या अहवालाशिवाय मासिक आहाराचे देयक कोषागारात सादर केले तरी ते कोषागार अधिकारी यांनी पारीत करू नये.

(क) माता समितीच्या भेटीच्या वेळी, समितीतील ०७ अशासकीय सदस्यांपैकी कमीत कमी ०३ अशासकीय सदस्यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

(ड) लाभार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या आहाराचा दर्जा चांगला असावा व हे सातत्य टिकून रहावे यासाठी एका मुख्य सेविका / पर्यवेक्षिका (एक बीट) यांच्या नियंत्रणाखाली दोन अंगणवाडी केंद्रातील पुरक पोषण आहाराची अचानकपणे प्रयोगशाळेतून तपासणी करून घ्यावी. तसेच पुरविण्यात येणाऱ्या पोषण आहारामुळे लाभार्थ्यांना विषबाधा, उलटया किंवा मळमळ होणे, इत्यादी सारख्या गंभीर घटना घडल्यास तसेच आहारामध्ये अळया, किडे इ. आढळून आल्यास अशावेळी त्या पोषण आहाराचे नमुने जवळच्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत तपासून घेण्यात यावेत.

(ड) ज्या पुरवठाधारकांनी कमी पुरवठा किंवा निकषानुसार आहाराचा पुरवठा केला नाही, अशा पुरवठाध

शासन निर्णय दिनांक २४.८.२००९ मधील परिच्छेद क्र ३.११ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(इ) ज्या पुरवठाधारकाच्या बाबतीत अशा प्रकारची दंडात्मक कार्यवाही तीन वेळा होईल अशा पुरवठाध

पोषण आहाराचा पुरवठा करण्यास कायमचे अपात्र ठरविण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळाव त्याचा संगणक सांकेतांक 201210291606356420 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(उज्ज्वल उके)

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.

मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.

सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.

मा.मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई.

अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव , सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

आयुक्त, महिला व बाल विकास , पुणे

महासंचालक, राजमाता जिजाऊ माता- बाल आरोग्य व पोषण मिशन, नवी मुंबई

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी

सर्व विभागीय उप आयुक्त , महिला व बाल विकास (आयुक्त महिला व बाल विकास , पुणे यांचे मार्फत)

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण ) जिल्हा परिषद

सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (आयुक्त महिला व बाल विकास, पुणे यांचे मार्फत)

ग्रंथालय, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई

निवड नस्ती , का-५

हिला व बाल विकास क्र.एबावि-२०१२/प्र.क्र.३८८/का-५, दि. ३१ ऑक्टोबर,२०१२ सोबतचे

परिशिष्ट "अ"

ध्ये खालील सदस्य असणे आवश्यक आहे.

ता

ा

तील १ ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांची माता

तील ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांची माता

कार्यकर्ता

उपलब्ध असल्यास)

ता (असल्यास)

वाभावी संस्थेची स्त्री सदस्य (असल्यास)

जातीच्या मुलाची / मुलीची माता

जमातीच्या मुलाची / मुलीची माता

**कार्य खालीलप्रमाणे राहील.**

ळ/ बचत गट यांचेमार्फत तयार आहार पुरवठा मागणी केलेल्या प्रमाणात आहे किंवा नाही ते तपासावे. फत पुरवठा होत असल्यास अंगणवाड्यांना मदतनीस मार्फत लाभार्थ्यांना आहार पुरवठा चांगल्या ो किंवा नाही ते तपासावे.

ा आहाराचा दर्जा, मुलांना खाण्यायोग्य आहार तसेच शासनाने ठरवून दिलेले निकषाप्रमाणे र आहार मिळतो किंवा नाही ते तपासावे.

चलित दि.२४/८/२००९ च्या शासन निर्णयातील पाककृती माता समितीच्या सर्व सदस्यांच्या प्रथम म्हणून दयाव्यात. त्यानंतर अंगणवाडी केंद्रात देण्यात येणारा सकाळचा नास्ता व गरम ताज्या सनाने निश्चित केलेल्या पाककृतीतील निकषाप्रमाणे/ त्यातील घटक योग्य त्या प्रमाणात आहेत , हे तपासावे.

करताना किंवा बचत गट/ महिला मंडळ इत्यादी कडून अंगणवाडी केंद्रावर प्राप्त झाल्यानंतर ककृतीत नमूद केल्याप्रमाणे पदार्थांचा वापर त्या त्या विहित प्रमाणात केला आहे की, नाही याची

आहार हा अंगणवाडीच्या वेळेत व नेमून दिलेल्या वेळेत येतो किंवा नाही हे तपासावे.

त्या निकषाप्रमाणे नसल्यास, निकृष्ट दर्जाचा व भेसळयुक्त असल्यास तात्काळ संबधित जिल्हयाचे कार्यकारी अधिकारी किंवा बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांचेकडे बदल घडवून अहवाल सादर करणे.

ववून माता समितीने आपला अहवाल सोबत असलेल्या विवरणपत्र व २ मध्ये सादर करावा.

## विवरणपत्र - १
## (समितीच्या अंगणवाडी भेटीच्या वृत्तांत)

१) भेटीची तारीख :-

२) अंगणवाडी केंद्र क्रमांक व पत्ता :-

३) आहार पुरवठा करणाऱ्या स्वयं सहाय्यता बचत गट / महिला मंडळाचे नांव :-

४) आहाराचा प्रकार :-

५) ठरविलेल्या पाककृती नुसार आहार होता काय ? :- होय / नाही

६) निर्धारीत वजनानुसार आहार प्राप्त होता काय :- होय / नाही

७) निर्धारीत वजनानुसार आहार नसल्यास :- निर्धारीत वजन प्राप्त वजन कमी वजन

८) आहार व्यवस्थित शिजविण्यात आला होता काय ? :- होय / नाही

९) आहाराची चव कशी होती ? :- निकृष्ट / साधारण / चांगली

१०) आहार खाण्यास योग्य होता काय ? :- होय / नाही

११) मुले आवडीने आहार खाते होत काय ? :- होय / नाही

१२) आहारात बदल अपेक्षित आहे काय ? :- होय / नाही

१३) असल्यास काय बदल अपेक्षित आहे :-

१४) मुलांना अंगणवाडीत आहार किती वेळेस खायला दिला जातो. :- एकदा / दोनदा

१५) आहार नियमित येतो काय ? :- होय / नाही

१६) आहार ठरवून दिलेल्या वेळेत येतो काय ? :- होय / नाही

१७) इतर शेरे :- (असल्यास)

भेटीच्या वेळी उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांची नावे व पदनाम, स्वाक्षरी (अशासकीय ०७ सदस्य कमीत कमी ०३ अशासकीय सदस्य भेटीच्या वेळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.)

## विवरणपत्र - २
## (समितीची बचत गट स्वयंपाकघर आणि गोदाम भेटीचा वृत्तात)

भेटीची तारीख :-

स्वयं सहाय्यता बचत गट/ महिला मंडळांचे नांव व पत्ता :-

अध्यक्ष किंवा सचिवाचे नांव व पत्ता :-

कोणता आहार शिजवत होते ? :-

आहार कशावर शिजवत होते ? :- गॅस / शेगडी / चूल

आहारात कोण कोणते पदार्थ वापरत होते ? :- डाळ :- होय/ नाही, तेल: - होय/ नाही,

साखर :- होय/ नाही, भाजी / पाले भाजी :- होय/ नाही.

मीठ कोणते वापरत होते : - आयोडीन युक्त / साधे

स्वयंपाकघर स्वच्छ होते काय : - होय/ नाही

वापरण्यात येणारे पाणी स्वच्छ होते काय ? :-

व्यवस्थीत ठेवले होते काय ? :- होय/ नाही

गोदामात कोण कोणती सामुग्री ठेवली होती ? :-

गोदामात वस्तु बंद डब्यात किंवा बंद गोणीत होत्या की उघड्यावर होत्या :-

गोदामाचे छत ठिक होते की गळत होते :-

आहार साठा ओलसर जमीनीवर होता की कोरड्या जमीनीवर होता :-

इतर शेरे :- (असल्यास)

या वेळी उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांची नांवे व पदनाम, स्वाक्षरी (अशासकीय ०७ सदस्यांपैकी कमीत कमी ... कीय सदस्य भेटीच्या वेळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.)

**(परिशिष्ट**

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम
(MRDWP) राज्यभरात राबविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
**शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: ०७ मे, २०१६.

वाचा :

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापापु-१०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७, दिनांक २७ जुलै, २०००
२) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापापु-१००१/प्र.क्र.११०/पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर, २००१
३) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापापु-१००५/प्र.क्र.७४(१)/पापु-०७, दिनांक ३० एप्रिल, २००५
४) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दिनांक १७ मार्च, २०१०
५) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक १८ नोव्हेंबर, २०११
६) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३
७) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक २२ जानेवारी, २०१४
८) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१६७/पापु-०७, दिनांक ४ जून, २०१४
९) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-०७, दिनांक ९ जुलै, २०१४
१०) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१६७/पापु-०७, दिनांक १ ऑगस्ट, २०१४
११) **शासन निर्णय क्रमांकः** निशायो-१४१३/प्र.क्र.८८/पापु-०७, दिनांक ११ सप्टेंबर, २०१४
१२) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४
१३) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५८/पापु-०७, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४
१४) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२२/पापु-०७, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५
१५) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-११११/प्र.क्र.१३४/पापु-०७, दिनांक २० फेब्रुवारी, २०१५
१६) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११४/प्र.क्र.७७/पापु-०७, दिनांक २ मार्च, २०१५
१७) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२३/पापु-०७, दिनांक ३ मार्च, २०१५
१८) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक १० मार्च, २०१५
१९) **शासन शुध्दिपत्र क्रमांकः** ग्रापाधो-१११४/प्र.क्र.८१/पापु-०७, दिनांक २७ मार्च, २०१५
२०) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दिनांक १५ जून, २०१५
२१) संचालक (पाणी), पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांकः W-11042/01/2015-Water-1, Dated 11th May, 2015.

२२) सह सचिव, पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांकः D.O.No.W-11041/9/2015-Water-I, Dated 29th June, 2015

२३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांकः पापुशा/प्र.क्र.१६६/२०१५/वासो-०१, दिनांक ३० जून, २०१५

२४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांकः पापुशा/प्र.क्र.१६६/२०१५/वासो-०१, दिनांक १३ जुलै, २०१५

प्रस्तावना :

राज्याच्या ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्यात केंद्र आणि राज्य शासनाच्या मागणी आधारीत धोरणातंर्गत अनेक पाणी पुरवठा योजना राबविण्यात आलेल्या आहेत. याव्यतिरिक्त बाह्य अर्थसहाय्यीत जलस्वराज्य प्रकल्प, आपलं पाणी प्रकल्प यासारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून नळपाणी पुरवठा योजना, लघु नळपाणी पुरवठा योजना, विंधन विहिरींवरील योजना यासारख्या उपाययोजना राबविल्या जात आहेत. ग्रामीण पाणी पुरवठ्याचे स्त्रोत बळकटीकरणासाठी शिवकालीन पाणी साठवण योजना तसेच महाराष्ट्र भूजल अधिनियमांतर्गत भूजल संवर्धनाच्या उपाययोजना केल्या जात आहेत. या माध्यमातून राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर सोडविण्यात आलेले आहेत. तरीही, भूजलाची घटती पातळी, पावसाचे कमी होत असलेले प्रमाण, वाढती लोकसंख्या, पाण्याची वाढती मागणी यासारख्या कारणांमुळे ग्रामीण पाणी पुरवठ्यावर प्रचंड ताण येत आहे. यावर उपाययोजना म्हणून केंद्र शासनामार्फत सन २००९-१० मध्ये वर्धीत वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे रुपांतर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (National Rural Drinking Water Programme - NRDWP) असे करण्यात आले आहे.

भारत निर्माण कार्यक्रमाचा दुसरा टप्पा म्हणून केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम राज्यात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिनांक १ एप्रिल, २००९ पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी केंद्र व राज्य शासन यांच्यामार्फत समप्रमाणात ५०:५० टक्के निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत गावाचे, जिल्ह्याचे तसेच राज्याचे जलसुरक्षा आराखडे व वार्षिक कृती आराखडे तयार करणे बंधनकारक करण्यात आले असून या कार्यक्रमामध्ये भूजल व भूपृष्ठीय पाण्याचा संयुक्त व शाश्वत वापर, भूजल संवर्धन आणि पाण्याची गुणवत्ता या बाबींवर भर देण्यात आला आहे. पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी व व्यवस्थापन स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राज्यातील एकूण १,००,६३९ गावे/वाड्यांपैकी दिनांक १ एप्रिल, २०१५ पर्यंत ८९,४०४ गावे/वाड्या पूर्णत: हाताळण्यात आल्या असून, उर्वरित ११,२३५ अंशत: हाताळलेल्या गावे/वाड्यांचा समावेश सन २०१५-१६ च्या वार्षिक कृती आराखड्यात करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाने संदर्भाधीन क्रमांक २१ येथील दिनांक ११ मे, २०१५ च्या पत्रान्वये प्रगतीपथावरील ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यास प्राधान्य देण्याचे सूचित केले असून संदर्भाधीन क्रमांक २२ येथील दिनांक २९ जून, २०१५ च्या पत्रान्वये जास्त कालावधीसाठी रखडलेल्या पाणी पुरवठा योजनांची बाब राज्य शासनाच्या निदर्शनास आणली आहे. त्यानुसार (१) फ्लोराईड व आर्सेनिक बाधित गावे/वाड्यांसाठी कायमस्वरुपी व तात्पुरती उपाययोजना (२) संसद आदर्श ग्राम योजनेअंतर्गत समाविष्ट गावे/वाड्या व (३) राज्यामध्ये प्रगतीपथावर योजना नसल्यासच नवीन योजना घेणे या वर्गवारीतील गावे/वाड्यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही नवीन योजना घेण्यात येऊ नयेत अशा सूचना केंद्र शासनाने दिल्या आहेत.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सद्य:स्थितीत राज्यातील केवळ प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यावरच भर देण्यात आला असून, राज्याची माहे मार्च, २०१५ अखेरची प्रत्यक्षात प्रगती विचारात घेता ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी सन २०१५-१६ मध्ये रक्कम रुपये २०५१.७० कोटी व सन २०१६-१७ मध्ये रक्कम रुपये २२९८.३० कोटी एवढा आर्थिक भार अपेक्षित आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हाताळण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा एकमेव कार्यक्रम राबविण्यात येत असून पाणी पुरवठा या मूलभूत बाबीसाठी राज्यास पूर्णपणे केंद्र शासनावर अवलंबून रहावे लागत आहे. केंद्र शासनाकडून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधून तूर्त बंद केलेले निधी वितरण व राज्याचे केंद्र शासनावर असलेले अवलंबित्व या बाबींचा विचार करता ग्रामीण भागात पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्यासाठी राज्य शासनाचा स्वत:चा महत्वाकांक्षी कार्यक्रम असणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

वरील परिस्थिती विचारात घेऊन मंत्रीमंडळाच्या दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार राज्यातील ग्रामीण भागातील पाणी पुरवठा क्षेत्रात सुधारणा करण्याच्या उद्देशाने व ग्रामीण जनतेस स्वच्छ आणि पुरसे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाचा स्वत:चा सर्वसमावेशक असा ग्रामीण पाणी पुरवठ्याचा कार्यक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याविषयी सर्वकष विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय :-

राज्यातील ग्रामीण भागांतील दीर्घकालीन गरजांचा व आरोग्याचा विचार करुन ग्रामीण जनतेस पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (Mukhyamantri Rural Drinking Water Programme-MRDWP)" या नावाखाली एक सर्वसमावेशक कार्यक्रम राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राज्यभरात सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षासाठी राबविण्यात येणार असून या कार्यक्रमाचे तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाची उद्दिष्टे, व्याप्ती, कार्यक्रमाचे वर्गीकरण, कार्यक्रमातील घटक, दरडोई पाणी पुरवठ्याचे प्रमाण, गाव निवडीचे निकष, प्राधान्यक्रम, योजनांची तांत्रिक, प्रशासकीय मान्यता, योजनांची अंमलबजावणी, देखभाल दुरुस्ती, त्रयस्थ तांत्रिक परीक्षण, मानके, योजनांचे नियोजन, अटी शर्ती, योजनांची आखणी, निधीची तरतूद, अंमलबजावणीसाठी वेळापत्रक, प्रशासकीय यंत्रणा इत्यादि बाबी पुढीलप्रमाणे राहतील:-

## १) कार्यक्रमाची उद्दिष्टे :-

अ) राज्यातील ग्रामीण जनतेस पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे.

आ) राज्यातील ग्रामीण भागात (गावे/वाड्या/वस्त्या) पाणी पुरवठा योजना राबविणे.

**या कार्यक्रमांतर्गत राज्यातील ग्रामीण भागात पिण्याचा पाणी पुरवठा करण्यासाठी शासनमान्य मानकांप्रमाणे दर्जा वाढ करण्यासाठी पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात येतील.**

## २) कार्यक्रमाची व्याप्ती :-

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या धर्तीवर राबविण्यात येत असलेला **"मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP)"** हा राज्यातील सर्व ग्रामीण भागास लागू राहील. नव्याने निर्माण होत असलेल्या अथवा निर्माण झालेल्या नगरपंचायती/नगर पालिका/ नागरी क्षेत्रासाठी हा कार्यक्रम लागू राहणार नाही.

३) **कार्यक्रमाचे वर्गीकरण :-** मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचे प्रामुख्याने खालील तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात येत आहे.

(अ) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना

(ब) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन.

(क) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती.

## (अ) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा तपशील शासन निर्णयातील <u>परिशिष्ट-अ</u> येथे जोडला आहे.

परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या पाणी पुरवठा योजनांची व्यवहार्यता तपासण्यासाठी (अस्तित्वातील जुन्या पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करणे, अस्तित्वातील योजनेतील योग्य उपांगे नवीन योजनेसाठी उपयोगात आणणे किंवा पूर्णत:

नवीन योजना घेणे हे तपासण्यासाठी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती जिल्हा स्तरावर कार्यरत राहील:-

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | **अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ** | - | अध्यक्ष |
| (२) | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| (३) | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | - | सदस्य |

अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांच्या अध्यक्षतेखालील उपरोक्त समिती परिशिष्ट-अ मधील नमूद योजनांची व्यवहार्यता तपासून आपला अहवाल मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांना सादर करतील. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखालील समितीस या परिशिष्ट-अ मधील योजना काही कारणास्तव रद्द झाल्यास अन्य योजना घेण्याचे अधिकार असल्यामुळे शासनाकडून परिशिष्ट-अ बाबत स्वतंत्रपणे निर्देश प्राप्त झाल्याशिवाय परिशिष्ट-अ मध्ये नमुद केलेल्या कोणत्याही पाणी पुरवठा योजना मंजूरीसाठी (प्रशासकीय मान्यतेसाठी) विचारात घेण्यात येणार नाहीत. शासनाकडून परिशिष्ट-अ बाबत स्वतंत्रपणे निर्देश देण्यात आल्यानंतरच संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यांनी पाणी पुरवठा योजना मंजूरीबाबत या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

## (ब) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन :-

राज्यात बंद असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांपैकी पुनरुज्जीवित करावयाच्या योजनांचा तपशील **परिशिष्ट-ब** मध्ये जोडला आहे.

परिशिष्ट-ब मध्ये नमुद करण्यात आलेल्या जिल्हा परिषदेकडील व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील पाणी पुरवठा योजनांसाठी लागणारा रुपये १३०.८६ कोटींचा निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला थेट वितरीत करण्यात येईल. या निधीतून परिशिष्ट-ब मधील पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन करण्यात येईल. या योजनांच्या पुनरुज्जीवनाची, पुढील देखभाल दुरुस्तीची, संचलन व सनियंत्रणाची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहील. हे काम करीत असतांना "संबंधीत ग्रामपंचायतींकडून पाणीपट्टीची वसुली दरमहा किमान ७० टक्के इतकी करण्यात येईल व ही वसुली न झाल्यास पाणी पुरवठा बंद करण्यात येईल आणि आम्हाला या योजनेतून वगळण्यात येईल" अशा प्रकारचा ठराव संबंधीत ग्रामपंचायतींकडून/ ग्रामसभेकडून मंजूर करुन घेण्यात येईल. ही सर्व कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येतील. तसेच पाणी पुरवठा करण्यासाठी प्रत्येक गावासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी,

जेणेकरुन पाणीपट्टीची रक्कम न भरल्यामुळे एखाद्या गावाचा पाणी पुरवठा बंद करावयाचा झाल्यास कोणतीही अडचण येणार नाही. यासाठी लागणाऱ्या वाढीव खर्चाची तरतूद पुनरुज्जीवीत करण्यात येणाऱ्या सर्व पाणी पुरवठा योजनांच्या आराखड्यामध्ये करण्यात यावी.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना सर्वप्रथम परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन हाती घेण्यात येईल.

## (क) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती :-

देखभाल दुरुस्ती करावयाच्या प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची माहिती **परिशिष्ट- क** मध्ये जोडली आहे.

## ४) कार्यक्रमातील घटक व त्यांचे प्रमाण :-

| अ.क्र. | घटक | प्रमाण (टक्केवारी) | निधी वितरणाचा हिस्सा (टक्केवारी) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | राज्य शासन | अंमलबजावणी यंत्रणा | एकुण |
| १ | व्याप्ती | ८० | १०० | ०० | १०० |
| २ | देखभाल व दुरुस्ती | १० | १०० | ०० | १०० |
| ३ | सहाय्यकृत बाबी | ०५ | १०० | ०० | १०० |
| ४ | पाणी गुणवत्ता | ०५ | १०० | ०० | १०० |
| एकुण | | १०० | १०० | ०० | १०० |

## ५) कार्यक्रमांतर्गत दरडोई पाणी पुरवठ्याचे प्रमाण : -

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम या कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी दरडोई दरदिवशी ४० लिटर हे पाणी पुरवठ्याचे प्रमाण विचारात घेऊन योजनांची आखणी करण्यात यावी. या कार्यक्रमांतर्गत शहरालगतच्या ग्रामपंचायती/ वाड्या/ वस्त्यांसाठी संदर्भाधीन क्रमांक ११ येथील दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजना अनुज्ञेय राहतील. या कार्यक्रमांतर्गत मंजूर करावयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी संदर्भाधीन क्रमांक ६ येथील दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयाप्रमाणे व संदर्भाधीन क्रमांक १९ येथील दिनांक २७ मार्च, २०१५ च्या शासन शुध्दिपत्राप्रमाणे दरडोई खर्चाचे निकष लागू राहतील.

## ६) कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजना हाती घेण्यासाठी महत्वाची अट

राज्यातील बहुतांश पाणी पुरवठा योजना ह्या बंद पडलेल्या असून त्यांची उपांगे (उद्भव, जलकुंभ, पाईपलाईन इ.) अस्तित्वात आहेत. त्यामुळे नवीन योजना घेणे आवश्यक असेल तेव्हा त्या गावात जुनी पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत होती का, हे पाहणे अनिवार्य राहील. जुनी पाणी पुरवठा योजना असल्यास, त्या योजनेची उपांगे नव्या योजनेसाठी उपयोगात आणता येतील का, यासाठी जिल्हा पातळीवर अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांच्या अध्यक्षतेखालील परिच्छेद क्र.३(अ) मध्ये दर्शविल्याप्रमाणे समिती कार्यरत राहील.

## ७) कार्यक्रमांतर्गत योजनांची तांत्रिक मान्यता :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तांत्रिक मान्यता घेणे बंधनकारक राहील.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | तांत्रिक मान्यतेचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रुपये २.०० कोटीपर्यंत | रुपये २.०० कोटी ते ७.५० कोटीपर्यंत | रुपये ७.५० कोटीहून अधिक |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रुपये २.०० कोटीपर्यंत | रुपये २.०० कोटी ते ७.५० कोटीपर्यंत | रुपये ७.५० कोटीहून अधिक |

## ८) कार्यक्रमांतर्गत योजनेची प्रशासकीय मान्यता :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्रशासकीय मान्यता घेणे बंधनकारक राहील.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | प्रशासकीय मान्यतेचे अधिकार (दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या योजनांसाठी) | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामसभा | जिल्हा जलव्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (शासन) |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | --- | रुपये ५.०० कोटी पर्यंत | रुपये ५.०० कोटीहून अधिक |

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | प्रशासकीय मान्यतेचे अधिकार (दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या योजनांसाठी) | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामसभा | जिल्हा जलव्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (शासन) |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | --- | रुपये ५.०० कोटी पर्यंत | रुपये ५.०० कोटीहून अधिक |

(१) या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे कोणतेही अधिकार ग्रामसभा/ग्रामपंचायतीस/ग्रामसमितीस नाहीत.

(२) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना निधीच्या उपलब्धतेनुसार संबंधित यंत्रणेने शासनाकडून निर्देश प्राप्त झाल्यानंतरच प्रशासकीय मान्यतेबाबत कार्यवाही करावी.

(३) या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या योजनाच मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधून राबविण्यात येतील. या कार्यक्रमासाठी मंजूर एकूण वित्तीय मर्यादेत परिशिष्ट-अ मध्ये नमुद योजनांव्यतिरिक्त अन्य योजना घेण्याचे अधिकार मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखालील समितीस राहतील.

(४) या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या योजना अन्य कार्यक्रमांमध्ये समाविष्ट झालेल्या असतील (उदा.जलस्वराज्य टप्पा-२ इ.) तर या योजना परिशिष्ट-अ मधून वगळण्यास पात्र राहतील. या वगळलेल्या योजनांऐवजी अन्य योजना घेण्याचे अधिकार मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखालील समितीस राहतील.

(५) या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या ज्या योजनांना यापुर्वी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधून मान्यता देण्यात आलेली आहे व ज्या योजनांची निविदा प्रक्रिया पुर्ण होवून कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत, अशा योजनांचे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधील प्रशासकीय मान्यतेचे आदेश रद्द करुन मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधून नव्याने प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

(६) जिल्हा जल व्यवस्थापन समितीने प्रशासकीय मान्यता दिलेल्या योजनांच्या बाबतीत प्रशासकीय मान्यतेचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी निर्गमित करावेत.

(७) परिशिष्ट-अ मधील योजनांना जिल्हा परिषद स्तरावर प्रशासकीय मान्यता देण्यापुर्वी या योजनांची व्यवहार्यता तपासण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावरील रुपये ५.०० कोटीपेक्षा कमी किंमतीच्या योजना शासन स्तरावर पाठविण्यात याव्यात.

(८) दरडोई खर्चाच्या निकषात न बसणाऱ्या व रुपये ५.०० कोटीपेक्षा अधिक रक्कमेच्या सर्व योजनांचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अभिप्रायांसह प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात यावेत.

(९) या कार्यक्रमांतर्गत दरडोई खर्चाच्या निकषांकरिता संदर्भाधीन क्र.६ येथील दि.९ ऑक्टोबर,२०१३ च्या शासन निर्णयातील तरतुदी लागु राहतील. तसेच दरडोई खर्चाच्या निकषाबाहेरील योजनांना मान्यता देण्यासाठी संदर्भाधीन क्र.१० येथील दि.१ ऑगस्ट,२०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

(१०) या कार्यक्रमातंर्गत हाती घ्यावयाच्या योजना अन्य कोणत्याही कार्यक्रमामध्ये समाविष्ट नाहीत, याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय यंत्रणांची राहील.

(११) या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतरच प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतांना योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेच्या आदेशाची प्रत सादर करणे अनिवार्य राहील.

(१२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (शासन) स्तरावर प्रशासकीय मंजुरीसाठी प्राप्त होणाऱ्या योजनांना मंजुरी देण्यासाठी मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| **मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता)** | - | अध्यक्ष |
| प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) | - | सदस्य |
| सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई | - | सदस्य |
| उप सचिव तथा प्रकल्प संचालक, पा.पु.व स्व.वि. | - | सदस्य |
| संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे | - | सदस्य |
| मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई | - | सदस्य |
| उप सचिव (अर्थसंकल्प), पा.पु.व स्व.वि., मुंबई | - | सदस्य |
| उप सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई | - | सदस्य |

उप सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई - सदस्य
संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई - सदस्य
मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पा.पु.व स्व.वि.- सदस्य
उप सचिव, कार्यक्रमाशी संबंधीत कक्ष, पा.पु.व स्व.वि., मुंबई- सदस्य सचिव

(१३) जिल्हा परिषद स्तरावर प्राप्त होणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची तपासणी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती कार्यान्वीत राहील:-

**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - अध्यक्ष**
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) - सदस्य
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण - सदस्य
वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा - सदस्य
कार्यकारी अभियंता, ग्रापापुवि, जिल्हा परिषद - सदस्य सचिव

सदर समितीच्या तपासणीनंतर जिल्हा स्तरावरील ग्रामीण पाणी पुरवठा योजना मंजुरीसाठी (प्रशासकीय मान्यतेसाठी) शासनाच्या निर्देशानंतर जिल्हा जलव्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात येतील.

या कार्यक्रमांतर्गत मंजुर केल्या जाणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे परिच्छेद क्र.२१ मध्ये दिलेल्या वेळापत्रकानुसार करणे बंधनकारक राहील.

## ९) कार्यक्रमांतर्गत योजनांची अंमलबजावणी :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीचे अधिकार पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यांना राहतील.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | योजनेच्या अंमलबजावणीचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती | जिल्हा परिषद | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | -- | रुपये ५.०० कोटी पर्यंत | रुपये ५.०० कोटीहून अधिक |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | -- | रुपये ५.०० कोटी पर्यंत | रुपये ५.०० कोटीहून अधिक |

(१) या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीचे कोणतेही अधिकार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला राहणार नाहीत.

(२) या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करतांना प्रचलित शासन धोरणानुसार ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करणे अनिवार्य राहील.

(३) जिल्हा परिषदेस मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधील रुपये ५.०० कोटी पेक्षा कमी किंमतीच्या योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करावयाची असल्यास जिल्हा जलव्यवस्थापन समितीने याबाबतचा ठराव करणे आवश्यक राहील.

(४) योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार शासनास प्राप्त झाल्यास व तक्रारीमध्ये तथ्य आढळून आल्यास संपूर्ण योजना रद्द करण्याचे अधिकार राज्य शासनास राहतील. तसेच अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत केलेला निधी व्याजासह परत घेण्याचे अधिकार देखील राज्य शासनास राहतील. याशिवाय योजनेतील अनियमिततेस जबाबदार संबंधित अधिकारी/ कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र राहतील.

## १०) कार्यक्रमांतर्गत योजनांची देखभाल दुरुस्ती :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेल्या स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती करण्याची संपूर्ण जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची राहील. योजनांची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर किमान तीन वर्षे ही योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. स्वतंत्र योजना पूर्णत्वानंतर ती ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस/ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील. परिशिष्ट-क मध्ये दर्शविलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहील. कंत्राटदारामार्फत योजना पूर्णत्वानंतर करावयाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये तसेच योजनेच्या भांडवली खर्चामध्ये समाविष्ट करता येणार नाही. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी या समित्या संदर्भाधीन क्र.१२ येथील दि.१७ ऑक्टोबर,२०१४ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करु शकतात. अथवा त्यांची स्वत:ची देखभाल दुरुस्तीची प्रक्रिया राबवू शकतात.

## ११) कार्यक्रमांतर्गत योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे अनिवार्य राहील. त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्याची कार्यवाही संदर्भाधीन क्र.२० येथील दि.१५ जून,२०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहील. परंतु, या कार्यक्रमामधील योजनांकरिता करावयाच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाचा खर्च पुढीलप्रमाणे अनुज्ञेय राहील :

| अ.क्र. | योजनांची किंमत | त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी अनुज्ञेय खर्च |
|---|---|---|
| (१) | रुपये ७.५० कोटीपर्यंतच्या स्वतंत्र व प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | योजनेच्या ढोबळ किंमतीच्या १ टक्के |
| (२) | रुपये ७.५० कोटी वरील स्वतंत्र व प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना. | योजनेच्या ढोबळ किंमतीच्या १ टक्के अथवा रुपये १०.०० लक्ष यापैकी जे कमी असेल ते. |

वरील तक्त्यात नमुद अनुज्ञेय खर्चाच्या अटीव्यतिरिक्त संदर्भाधीन क्र.२० येथील दि.१५ जून,२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील इतर सर्व अटी व शर्ती या कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी लागू राहतील.

## १२) कार्यक्रमांतर्गत राबवावयाच्या योजनांकरिता प्रशासकीय निधीची तरतूद:-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची प्राकलने व आराखडे तयार करण्यासाठी, योजनेच्या प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्ल्यासाठी आणि योजनेच्या प्रशासकीय खर्चासाठी ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या एकूण प्रत्यक्ष कामाच्या खर्चाच्या अधिकतम ४ टक्के मर्यादेपर्यंतचा खर्च प्रशासकीय खर्च म्हणून अंदाजपत्रकात तरतूद करण्यास मान्यता राहील. या ४ टक्के प्रशासकीय निधीमधून खालील बाबींवर खर्च अनुज्ञेय राहील. प्रशासकीय निधीची ही तरतूद जिल्हा परिषदांसाठी लागू राहील. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी प्रशासकीय निधीचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

(१) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची प्राकलने व आराखडे तयार करणे.

(२) योजनेच्या प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्ल्यासाठी खर्च करणे.

(३) पाणी पुरवठा योजनांसाठी आवश्यक साधनसामुग्री/मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे.

(४) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी खर्च करणे.

(५) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची प्राकलने व आराखडे तयार करण्यासाठी आवश्यक असलेली स्टेशनरी, टंकलेखन, बायडींग व झेरॉक्स इ.वर खर्च करणे.

(६) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची सनदी लेखापालांकडून लेखा परीक्षण करणे.

**उपरोक्त बाबीं व्यतिरिक्त अन्य बाबींवर खर्च करणेसाठी शासनाची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक राहील.**

## १३) कार्यक्रमांतर्गत राबवावयाच्या योजनांकरीता विहित केलेली मानके :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरिता पुढील मानके पूर्ण करणे बंधनकारक राहील.

| अ.क्र. | सेवा | एकक | विहित मानक |
|---|---|---|---|
| (१) | दरडोई दरदिवशी पाणी पुरवठा | (अ) शहरालगतच्या ग्रामपंचायती/ वाड्या व वस्त्यांसाठी<br>(ब) इतर ग्रामपंचायती/वाड्या व वस्त्यांसाठी | ७० LPCD<br>४० LPCD |
| (२) | पाणी पुरवठा नळ जोडणी | टक्केवारी | १०० टक्के (किमान ८० टक्के) |
| (३) | मीटर नळजोडणी | टक्केवारी | १०० टक्के (मीटरचा खर्च अंदाजपत्रकात समाविष्ट करता येणार नाही. ही जबाबदारी लाभार्थ्यांची राहील.) |
| (४) | बिगर महसुली पाण्याचे प्रमाण | टक्केवारी | १५ टक्के |
| (५) | पाणी पुरवठ्याचे सातत्य | (अ) शहरालगतच्या ग्रामपंचायती/ वाड्या व वस्त्यांसाठी (७०LPCD)<br>(ब) इतर ग्रामपंचायती/वाड्या व वस्त्यांसाठी (४० LPCD) | किमान ८ तास/दरडोई निकषानुसार<br>किमान २ तास/दरडोई निकषानुसार |
| (६) | तक्रारी निराकरणाचे प्रमाण | टक्केवारी | १०० टक्के |
| (७) | पाणी पुरवठ्याचा दर्जा | टक्केवारी | १०० टक्के शुध्द |

| अ.क्र. | सेवा | एकक | विहित मानक |
|---|---|---|---|
| (८) | पाणी पुरवठ्याकरिता होणाऱ्या खर्चाची वसुली | टक्केवारी | १०० टक्के |
| (९) | पाणी पुरवठ्याशी निगडीत शुल्क वसुलीची कार्यक्षमता | टक्केवारी | १०० टक्के |

## १४) कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीकरिता भूसंपादन व आवश्यक परवानग्या :-

या कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित योजनांसाठी अंदाजपत्रक सादर करण्यापूर्वी आवश्यक भूसंपादन व इतर परवानग्या प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील. अशा परवानग्या व भूसंपादन योजना सादर करण्यापूर्वी प्राप्त झाल्याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करणे बंधनकारक राहील. योजना मंजुरीनंतर भूसंपादनाची कार्यवाही वा इतर आवश्यक परवानग्या या बाबी ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. या बाबींमुळे योजना अंमलबजावणीस विलंब झाल्यास, अथवा योजना रखडल्यास अथवा योजनेची किंमत वाढल्यास त्यास राज्य शासन जबाबदार राहणार नाही, व अशा योजना कोणत्याही टप्प्यावर रद्द होण्यास पात्र राहतील.

या कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित योजनांसाठी महसूल व वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, रेल्वे वा इतर विभागांच्या आवश्यक त्या परवानग्या घेण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/अंमलबजावणी यंत्रणा यांची राहील. याकरिता जिल्हा परिषदेने आवश्यक ती प्रशासकीय मदत ग्रामपंचायती, वाडया, वस्त्यांना करावी. नियोजन व पूर्वतयारीच्या कामांसाठी लागणारा निधी अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांच्या उत्पन्नातून उपलब्ध करावा. त्यासाठी राज्य शासन कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा आर्थिक सहाय्य करणार नाही.

१५) **कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीचा टप्पा (Execution Phase):-** मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित पाणी पुरवठा योजनांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची कार्यवाही पुढीलप्रमाणे राहील .

**(अ) निविदा प्रक्रिया -**

या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर योजनेच्या खालील तीनही उपांगांची एकत्रित निविदा प्रक्रिया विहित कालावधीत पूर्ण करावी.

(१) <u>उपांग १</u> - स्त्रोतांचा विकास.

(२) <u>उपांग २</u> - पंपगृह, पंपिंग मशिनरी, उर्ध्व नलिका, गुरुत्व वाहिनी, व आवश्यक असल्यास, जलशुद्धिकरण केंद्र.

(३) <u>उपांग ३</u> - साठवण टाकी व घरगुती नळजोडण्यांसह वितरण व्यवस्था.

निविदा प्रक्रिया तीनही उपांगांकरिता एकत्रितपणे पूर्ण करण्यात आली असली तरी कामाचे आदेश मात्र सुरुवातीस उपांग १ च्या कामाकरिताच देण्यात यावेत. उपांग १ ची कामे पुर्ण झाल्यावर स्त्रोत योग्य व पुरेसा असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घ्यावे. उपांग १ चे काम पुर्ण झाल्यानंतरच उपांग २ चे कार्यादेश देण्यात यावेत आणि उपांग २ चे काम पुर्ण झाल्यानंतरच उपांग ३ च्या कामाचे कार्यादेश देण्यात यावेत. ही बाब निविदा प्रक्रियेत व करारपत्रात स्पष्टपणे नमूद करण्यात यावी.

**(ब) स्त्रोतांचा विकास -**

सर्वप्रथम योजनेच्या स्त्रोतांची (भूपृष्ठ अथवा भूजलाधारित स्त्रोतांची) कामे हाती घ्यावीत. भूजलाधारित स्त्रोतांचे काम पुर्ण झाल्यानंतर पावसाळ्यापुर्वी त्याची चाचणी करावी. स्त्रोतांच्या कामाबरोबरच स्त्रोतांच्या बळकटीकरणाच्या दृष्टिकोनातून भूजल पुनर्भरणाची कामे हाती घेण्यात यावीत. स्त्रोतांचे खोदकाम झाल्यानंतर त्याची क्षमता चाचणी (Yield Test) करुन भूजल विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र प्राप्त करावे व त्यानंतर त्याचे बांधकाम पुर्ण करावे.

**(क) पंपिंग व्यवस्था, उर्ध्व / गुरुत्व वाहिनी व जलशुद्धिकरण केंद्र -**

स्त्रोतांचे काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर पंपहाऊस, पंपिंग मशिनरी, उर्ध्व वाहिनी/गुरुत्व वाहिनी व आवश्यक असल्यास जलशुद्धिकरण केंद्रांच्या कामांना सुरुवात करावी. ही कामे पुर्ण झाल्यावर व विद्युत जोडणी मिळाल्यानंतर योजनेतील स्त्रोताद्वारे उपलब्ध होणारे पाणी, गावातील अस्तित्वात असलेल्या साठवण टाकी / वितरण व्यवस्थेशी जोडून पाणी पुरवठा सुरु करण्यात यावा.

पंपहाऊस, पंपिंग मशिनरी, उर्ध्व वाहिनी / गुरुत्व वाहिनी, जलशुद्धिकरण केंद्र इत्यादि कामे समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर योजनेतील साठवण टाकी व वितरण व्यवस्थेची कामे हाती घेण्यात यावीत. वितरण व्यवस्थेतंर्गत सर्व घरांना नळजोडण्या देण्यात याव्यात. ही कामे पूर्ण झाल्यानंतर पाणी पुरवठा सुरु करुन एकंदर नळ योजनेची चाचणी करावी.

## १६) कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या बहिर्गमनाचा टप्पा (Exit Phase) :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची कामे पुर्ण झाल्यानंतर नळ योजना चालविण्याकरिता पुर्व नियोजनानुसार व्यवस्था निश्चित करावी. त्यानंतर योजनेच्या देखभाल दुरुस्तीची व्यवस्था ठरवावी. योजनेच्या सर्व टप्प्यांमध्ये झालेल्या खर्चाचे वित्तीय लेखापरीक्षण, सामाजिक लेखापरीक्षण व तांत्रिक परीक्षण करुन योजनेतील त्रुटी दुर कराव्यात आणि लेखे पुर्ण करुन बहिर्गमनाची कार्यवाही करावी. **योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर संबंधीत अंमलबजावणी यंत्रणेने योजना पुर्णत्वाचा दाखला (Completion Certificate) सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक राहील.**

## १७) कार्यक्रमांतर्गत निधीची तरतूद करण्यासाठी कार्यपध्दती :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या परिशिष्ट-अ मधील एकूण १००३ योजनांपैकी ९७२ योजना स्वतंत्र स्वरुपाच्या आहेत. तर ३१ योजना प्रादेशिक स्वरुपाच्या आहेत. या योजनांचे आराखडे तयार करुन या पाणी पुरवठा योजनांकरिता अनुदानाचा हिस्सा देण्यासाठी राज्य स्तरावर एक लेखाशीर्ष उघडण्यात येईल. या लेखाशीर्षातून पुढील ४ वर्षाकरिता शासन मान्यतेनुसार प्रस्तावित आवश्यक निधीची तरतूद करण्यात येईल. त्यास अनुसरुन दरवर्षी निधीच्या उपलब्धतेनुसार वाटप करण्यात येईल.

बहुतांश पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती अभावी बंद आहेत. त्यामुळे या योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी दरवर्षी रुपये १०० कोटी इतक्या निधीची तरतूद स्वतंत्रपणे करण्यात येईल. त्यासाठी राज्य स्तरावर स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यात येईल.

राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यामध्ये आदिवासी उप योजनेमधून प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना हाती घेण्यात आल्या आहेत. त्यापैकी बहुतांश योजना वीज बिलांचा भरणा न करणे, ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणे व योग्य त्या देखभाल दुरुस्तीचा अभाव या कारणांमुळे बंद पडलेल्या आहेत. या बंद पडलेल्या परंतु पुनरुज्जीवीत करणे शक्य असणाऱ्या सर्व योजनांकरिता पंचायत समिती पातळीवर आदिवासी उप योजनेमधून ठोक रक्कम प्रकल्प अधिकारी व सरपंच यांच्या संयुक्त खात्यात जमा करण्यात यावी आणि या रक्कमेच्या व्याजातून संबंधितांनी योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी खर्च करावा. परंतु, यासाठी किमान २० टक्के पाणीपट्टी वसुली होती किंवा नाही, हे तपासणे अनिवार्य राहील.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत एकूण वित्तीय मर्यादेत उपलब्ध निधीचे तीनही परिशिष्टांतील अंतर्गत बदल करण्याचे अधिकार मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखालील समितीस राहील.

## १८) प्रस्तुत कार्यक्रमातील योजनांकरिता नव्याने तीन स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यात येईल.

१) नवीन ग्रामीण नळपाणी पुरवठा योजना

२) पुनरुज्जीवीत करावयाच्या योजना

३) नळपाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती

१९) प्रस्तुत कार्यक्रमांतर्गत निधी वितरणासाठी लेखाशीर्ष उघडण्याची कार्यवाही स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे करण्यात येईल.

## २०) कार्यक्रमांतर्गत निधी वितरणाची कार्यपध्दती :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी शासनाकडून जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना पुढीलप्रमाणे टप्पानिहाय निधी वितरण करण्यात येईल. या योजनांसाठी Mobilization Advance देण्याची कोणतीही तरतूद नाही.

| अ.क्र. | हप्ता क्रमांक | निधीची टक्केवारी | कामाची प्रगती |
|---|---|---|---|
| (१) | पहिला हप्ता | ३० टक्के | योजना मंजूर झाल्यानंतर व कार्यादेश देण्यापुर्वी |
| (२) | दुसरा हप्ता | ३० टक्के | योजनेचे ३० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर व योजनेची प्रथम त्रयस्थ तांत्रिक तपासणी पुर्ण झाल्यानंतर. |
| (३) | तिसरा हप्ता | ३० टक्के | योजनेचे ६० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर व योजनेची द्वितीय त्रयस्थ तांत्रिक तपासणी पुर्ण झाल्यानंतर. |
| (४) | चौथा (अंतिम) हप्ता | १० टक्के | योजना पुर्णत्वानंतर पुढील एक वर्ष योजना यशस्वीरित्या चालविल्यानंतर |

## २१) कार्यक्रमांतर्गत योजनांच्या अंमलबजावणीसाठी वेळापत्रक :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची मागणी, सविस्तर गाव कृती आराखडा, जिल्ह्याचे व राज्याचे कृती आराखडे, योजनांची तांत्रिक (मान्यता) तपासणी, प्रशासकीय मान्यता, प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. हे वेळापत्रक तयार करण्यामागचा हेतू या योजनांची अंमलबजावणी कालबध्द पध्दतीने व्हावी व योजनेस टप्पानिहाय आर्थिक तरतूद उपलब्ध व्हावी, असा आहे. प्रत्येक विशिष्ट वर्षाचा कृती आराखडा तयार करण्याची प्रक्रिया आधीच्या वर्षामध्येच सुरु होईल. त्यानुषंगाने योजनेची मागणी व पुढील कार्यवाहीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाहीचा तपशील | कालावधी (महिने) |
|---|---|---|---|
| (१) | नियोजन टप्पा | योजनेची मागणी, तांत्रिक तपासणी व अंदाजपत्रक तयार करणे. | २ महिने |
| | | योजनेस सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घेणे. | २ महिने |
| | | योजनेस सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय मान्यता घेणे | २ महिने |
| (२) | अंमलबजावणी टप्पा | योजनेची निविदा प्रक्रिया पुर्ण करणे व कार्यारंभ आदेश देणे. | ३ महिने |
| | | स्त्रोताचे खोदकाम पुर्ण करणे व सुरक्षित टप्प्यापर्यंत आणणे. | ३ महिने |
| | | स्त्रोताचे काम पुर्ण करणे. | २ महिने |
| | | उपांग-२ ची कामे पुर्ण करणे. | ४ महिने |
| | | उपांग-३ ची कामे पुर्ण करणे. | ५ महिने |
| (३) | बहिर्गमन टप्पा | आर्थिक व भौतिक प्रगती पुर्ण करुन योजना पुर्णत्वाचा दाखला देणे. | १ महिना |
| | | **एकूण कालावधी** | **२४ महिने** |

वरील वेळापत्रकानुसार योजनेच्या मागणीपासून ते बहिर्गमनापर्यंत सर्वसाधारणपणे दोन वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आलेला असून योजनेची प्रत्यक्ष निविदा प्रक्रिया सुरु करण्यापासून ते योजनेच्या पुर्णत्वाचा दाखला देईपर्यंत १८ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. यामध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

## २२) कार्यक्रमाकरीता प्रशासकीय यंत्रणा :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP) हा पुर्णपणे मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येईल.

या कार्यक्रमाचे संनियंत्रण, पर्यवेक्षण व समन्वयन संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापुर, नवी मुंबई यांच्यामार्फत करण्यात येईल. यासाठी पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था स्तरावर ग्रामीण पाणी पुरवठा सनियंत्रण व व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात येईल. या कक्षाची रुपरेषा स्वतंत्र शासन निर्णयान्वये विहित करण्यात येईल.

(१) पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था ही या कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा प्रकल्पांच्या सुयोग्य व विहित कालमर्यादेतील अंमलबजावणीसाठी पर्यवेक्षीय संस्था म्हणून काम करेल.

(२) या कार्यक्रमांतर्गत मंजूर सर्व प्रकल्पांचा प्रगती अहवाल, निधी वितरणाचा तपशील, योजनेची आर्थिक व भौतिक प्रगती यावर पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेचे संनियंत्रण असेल व शासनास वेळोवेळी या संदर्भातील अहवाल सादर करेल. तसेच शासनाने मागविलेल्या सर्व माहितीची पुर्तता शासनास करील.

(३) पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था ही जिल्हा परिषदा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व राज्य शासन यामधील दुवा म्हणून काम करेल.

(४) मंजूर प्रकल्पांच्या प्रगतीप्रमाणे खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे व प्रकल्पांच्या पुर्णत्वाचे दाखले संबंधित अंमलबजावणी यंत्रणांकडून प्राप्त करुन घेवून शासनास सादर करण्याची जबाबदारी पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेची राहील.

(५) शासन स्तरावरील योजनांच्या मंजुरीसाठी मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत राहील. या कार्यक्रमामधील सर्व योजनांच्या प्रशासकीय मंजुऱ्या, निधी वितरण, योजनेचे सनियंत्रण, योजनांची अंमलबजावणी, योजनांचे समन्वयन व व्यवस्थापन विभाग स्तरावरील एकाच कक्षाकडून पार पाडले जाईल. यासाठी स्वतंत्र कार्यासन निर्माण करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ज्या योजनांना शासनाची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे, असे प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावांबाबत तांत्रिक अभिप्राय मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग)

यांच्याकडून प्राप्त करुन घेतले जातील. तद्नंतर प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही संबंधीत कार्यासनाकडून करण्यात येईल.

(६) या कार्यक्रमांतर्गत जिल्हा स्तरावरील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या मंजुरीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत राहील.

(७) राज्य स्तरावरील योजना मंजुरीचे अंतिम अधिकार मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांना राहतील. तर जिल्हा स्तरावरील योजना मंजुरीचे अंतिम अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहतील.

(८) या कार्यक्रमांतर्गत योजना अंमलबजावणीमध्ये कोणत्याही स्वरुपाची अनियमितता, अपहार अथवा गैरव्यवहाराच्या बाबी निदर्शनास आल्यास या योजना कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे सर्व अधिकार राज्य शासनास राहतील. तसेच या योजनांना राज्य शासनामार्फत केलेले अर्थसहाय्य वसुलपात्र राहील. याशिवाय संबंधितांविरुध्द कारवाई करण्याचे निर्देश देण्याचे अधिकार राज्य शासनास राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०५०७११४७४५८१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Kumar

(राजेश कुमार)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

**(परिशिष्ट २.२)**

महाराष्ट्र राज्यातील पाणी पुरवठा योजनांसाठी "पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजना" जुलै,२०१५ पासून राज्यात लागू करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : पापुयो-२०१५/प्र.क्र.५५/ऊर्जा-५**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१५.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतर्फे राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील शासकीय व निमशासकीय पाणी पुरवठा योजनांना वीज पुरवठा करण्यात येतो. महावितरण कंपनीतर्फे सर्व शासकीय, निमशासकीय व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणी पुरवठा योजनांना मासिक वीज वापराची देयके देण्यात येतात. वीज देयके वसूलीसाठी विद्युत कायदा-२००३ अन्वये पाठपुरावा व कारवाई करण्यात येते. पाणी पुरवठा योजनांनी चालू वीज बिलाचा भरणा न केल्यास त्यांचा विद्युत पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात येतो. सद्य:स्थितीत बऱ्याच ठिकाणी नियमितपणे वीज बिलाचा भरणा न केल्यामुळे पाणी पुरवठा योजनांच्या थकबाकीमध्ये वाढ होत आहे.

२. राज्यात पडलेला अल्पसा पाऊस त्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती याचा विचार करता पिण्याच्या पाण्याचा मुद्दा हा अत्यंत गंभीर स्वरुपाचा विषय होत आहे. सबब, पाणी पुरवठा योजना सुरु असणे अत्यंत आवश्यक आहे.

३. महावितरण कंपनीतर्फे वीज बिलाच्या वसूलीसाठी नियमितपणे मोहिमा राबविण्यात येत असून, त्यामध्ये पाणी पुरवठा योजनांच्या बिलांचा सुध्दा समावेश आहे. चालू वीज बिलाचा भरणा न केल्यास पाणी पुरवठा योजनेचा सुध्दा वीज पुरवठा नाईलाजास्तव खंडीत करण्यात येतो. सद्य:स्थितीत राज्यात बऱ्याच ठिकाणी पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा थकबाकी असल्यामुळे खंडीत करण्यात आला आहे. एकंदरीत चालू योजनांपैकी बहुतांश योजनांची मोठी थकबाकी असल्यामुळे त्यांचादेखील वीज पुरवठा खंडीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे उन्हाळयात जनतेला पिण्याचे पाणी न मिळाल्यास शासनाविषयी रोष निर्माण होण्याची शक्यता आहे.

४. वरील परिस्थितीत राज्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई व त्यावर मात करण्यासाठी संबंधित पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा सुरळीत ठेऊन जनतेस पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होण्यासाठी सदर योजनांना सवलत देऊन त्यांचा वीज पुरवठा चालू ठेवण्यासाठी पेयजल पाणीपुरवठा संजीवनी योजनेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यावर मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

शासनातर्फे कृषी ग्राहकांसाठी प्रस्तावित केलेल्या कृषी संजीवनी योजनेच्या धर्तीवर राज्यात "पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजना-२०१५" लागू करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

१) या योजनेत स्वेच्छेने सहभागी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था यांनी जून,२०१५ अखेर असणाऱ्या वीज बिलाच्या मूळ थकबाकी रक्कमेपैकी ५०% रक्कम एकरकमी किंवा दहा सलग समान मासिक हप्त्यात महावितरणकडे भरावी. या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी जुलै, २०१५ पासूनची चालू विजेची बिले विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे. याशिवाय ८०% पाणीपट्टी वसूली असणे आवश्यक आहे. शहरी भागांमध्ये पाणी चोरीचे प्रमाण ५०% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

२) ही योजना पहिल्या टप्प्यामध्ये, राज्यात यावर्षी जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळग्रस्त गावांमध्ये राबविण्यात यावी. त्याकरिता मात्र उपरोक्त पाणीपट्टी वसूली व पाणी चोरीचे प्रमाण या संबंधीच्या अटी लागू राहणार नाहीत.

३) मूळ थकबाकीची दहा मासिक हप्त्यांची रक्कम व चालू वीज बिलाची रक्कम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांचे सामान्य खर्चाचे अकाऊंट, इस्क्रो अकाऊंटमध्ये रुपांतर करुन महावितरण कंपनीस अदा करावी. स्थानिक स्वराज्य संस्थांनी या योजनेत सहभागी होण्यापूर्वी किंवा या शासन निर्णयाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्यांचे सामान्य खर्चाचे अकाऊंट, इस्क्रो अकाऊंटमध्ये रुपांतरीत करुन घेणे आवश्यक राहील. याबाबतचे आवश्यक ते निर्देश ग्रामविकास विभाग व नगर विकास विभाग यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना तात्काळ द्यावेत. तसेच जुलै, २०१५ पासूनची चालू वीज बिले अग्रक्रमाने भरण्यासाठी देखील निर्देश द्यावेत. या योजनेत सहभागी न होण्याऱ्या थकबाकीदार पाणीपुरवठा योजनांचा वीज पुरवठा खंडीत करण्याची कार्यवाही महावितरण कंपनीकडून होईल.

४) पाणीपुरवठा ही अनिवार्य नागरी सुविधा असल्याने शासनातर्फे भरण्यात येणारी मूळ थकबाकीची उर्वरित ५०% रक्कम, या योजनेत स्वेच्छेने सहभागी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना, त्यांना चौदाव्या वित्त आयोगाअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून त्या संस्थांमार्फत महावितरण कंपनीस अनुदान स्वरुपात देण्यात यावी. याबाबत देखील स्थानिक स्वराज्य संस्थांना ग्रामविकास विभाग व नगर विकास विभाग यांनी तात्काळ निर्देश निर्गमित करावेत.

५) महावितरण कंपनीमार्फत या योजनेत सहभागी होणाऱ्या पाणीपुरवठा योजनांच्या वीज बिलाच्या थकित रकमेवरील संपूर्ण व्याज व दंडाची रक्कम माफ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) वरील योजनेत स्वेच्छेने सहभागी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना वीज बिलाची मूळ थकबाकीची रक्कम आणि व्याज व दंड याबाबत येणारा आर्थिक दायित्वाचा तपशील खालीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | बाब | आर्थिक दायित्वाचे प्रमाण | प्राधिकरण | आर्थिक स्त्रोत |
|---|---|---|---|---|
| १ | जून,२०१५ अखेर वीज बिलाच्या मूळ थकबाकीची रक्कम | ५०% | स्थानिक स्वराज्य संस्था | स्वत:च्या उत्पन्नातून |
| | | ५०% | शासन | १४ व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून |
| २ | व्याज व दंड | १००% | महावितरण | रक्कम माफ करणे |

७) दुसऱ्या टप्प्यामध्ये ही योजना राज्यातील उर्वरित भागांमध्ये राबविण्यासाठी मंत्रीगट नियुक्त करण्याबाबत ऊर्जा विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे. सदर मंत्रीगट याबाबत आवश्यक निकष ठरविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करील. सदर मंत्रीगटामध्ये मा.मंत्री (वित्त), मा. मंत्री (ऊर्जा) व मा. मंत्री (पाणीपुरवठा) यांचा समावेश राहील.

८) महावितरण कंपनीने या योजनेस तात्काळ प्रसिध्दी देऊन सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक त्या सूचना सर्व संबंधितांना त्वरीत द्याव्यात व या योजनेच्या अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घेऊन शासनास अहवाल सादर करावा.

२. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३९४/१५/व्यय-१६, दि.९/११/२०१५ यास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१११९१६१७१०१३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhimashankar Yallapa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallapa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400051, st=Maharashtra, cn=Bhimashankar Yallapa Manta
Date: 2015.11.19 16:21:09 +05'30'

(भि. य. मंता)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

५) मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक
६) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव ,ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव ,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) महालेखापाल (लेखापरिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०००२०
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०००२०
१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३) महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४) अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पू) मुंबई-४०००५१.
१५) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१६) निवासी लेखाधिकारी, मुंबई
१७) संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई
१८) मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधीलेखा, कोकण भवन, नवी मुंबई
१९) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधार कं. मर्या. प्रकाशगड, वांद्रे(पू), मुंबई-५१
२०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या.प्रकाशगड, वांद्रे(पू), मुंबई-५१
२१) अवर सचिव (रोखशाखा), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२) अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३) कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२४) ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई
२५) निवड नस्ती (ऊर्जा-५)

**(परिशिष्ट ४.१)**

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान 15 टक्के रकमेतुन मागास-वर्गीयांच्या कल्याणासाठी घ्यावयाच्या योजना.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/34,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 1 सप्टेंबर 1993.

वाचा :-
(1) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांक मागास-1089/प्र.क्र.418/34, दिनांक 14 सप्टेंबर 1989.
(2) शासन परिपत्रक क्रमांक मागास-1089/प्र.क्र.555/34, दिनांक 5 ऑक्टोबर 1989.
(3) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांक मागास-1091/849/34, दिनांक 12 जुलै 1991.
(4) शासन परिपत्रक क्रमांक पराम-1091/प्र.क्र.921/34, दिनांक 31 जुलै 1991.
(5) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1105/34, दिनांक 14 मे 1993.
(6) शासन परिपत्रक क्रमांक मागास-1089/प्र.क्र. 555/34, दिनांक 5 जुलै 1990.
(7) शासन परिपत्रक क्रमांक मागास-1089/प्र.क्र.418/34, दिनांक 3 सप्टेंबर 1990.
(8) शासन परिपत्रक क्रमांक मागास-1089/प्र.क्र.418/34, दिनांक 8 जानेवारी 1991.
(9) शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र.938/34, दिनांक 30 नोव्हेंबर 1991.
(10) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक मागास-1093/सीआर-1109/34, दिनांक 7 जानेवारी 1993.

प्रस्तावना :

उपरोल्लेखित सर्व आदेश निष्प्रभावी करुन या निर्णयान्वये खालीलप्रमाणे सर्व समावेशक आदेश काढण्यात येत आहेत. जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या किमान 15 टक्के इतकी रक्कम प्रतिवर्षी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती व नवबौध्दांसाठी राखून ठेवून सदर रक्कम मागास-वर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करावी असे धोरणात्मक आदेश व त्यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचना शासनाने उपरोक्त शासन निर्णय/परिपत्रकान्वये निर्गमित केल्या आहेत. विशेष घटक योजनेखाली मागासवर्गीयांच्या विविध सामुहिक विकास योजना राबविल्या जात असल्यामुळे 15 टक्के उत्पन्नातून प्रामुख्याने मागासवर्गीयांच्या वैयक्तिक लाभाच्या व उत्पादक योजनांवर भर देण्यात यावा असेही आदेश दिलेले आहेत. तथापि, ही रक्कम निश्चित कोणत्या बाबींवर खर्च करावी याबद्दल स्पष्ट खुलासा नसल्यामुळे शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही जिल्हा परिषदांनी या निधीतुन जाहिराती, कार्यालयीन इमारत, नोकर वर्गावरील पगार व दूरदर्शन संच/व्ही.डी.ओ. संच आदि मनोरंजक साधने खरेदी करणे, सहली, दौरे इत्यादी बाबींवर खर्च केला आहे. हे अर्थातच शासन निर्णयास अनुसरुन नाही. अनुसूचित जाती कल्याण समितीच्या निदर्शनास ही बाब आली असता, समितीने असे सुचविले आहे की, जिल्हा परिषदा/पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नातील 15 टक्के निधीतून निश्चित कोणत्या योजना हाती घ्याव्यात व कोणत्या घेऊ नयेत याबद्दल शासनाने सर्व जिल्हा परिषदांना स्पष्ट आदेश देणे आवश्यक आहे.

शासन निर्णय :

जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी परिच्छेद 2 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींपासूनच्या उत्पन्नाच्या किमान 15 टक्के रक्कम अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती व नवबौध्दांच्या कल्याणासाठी राखून ठेवून खर्च करावी असे धोरणात्मक निदेश, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 च्या कलम 261 पोटकलम (1) खालील अधिकारांचा वापर करुन या निर्णयाव्दारे शासन असे आदेश देत आहे की, सदर

जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली

रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या सामुहिक विकासाच्या व वैयक्तिक लाभाच्या खालील बाबींवर खर्च करावी :-

(1) मागासवर्गीयांसाठी बालवाड्या.

(2) मागासवर्गीयांना नवीन घरबांधणीसाठी अगर घरदुरुस्तीसाठी अर्थसहाय्य.

(3) मागासवर्गीयांना वसतीगृह, अभ्यासिका तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना/विद्यार्थिनींना गणवेश पुरविणे.

(4) आंतरजातीय विवाहित जोडप्यांना पूरक अर्थसहाय्य.

(5) मागासवर्गीयांसाठी पाणीपुरवठा सोयी/विहीर दुरुस्ती इत्यादी.

(6) मागासवर्गीयांना लघुउद्योगासाठी अर्थसहाय्य, उदा. प्रशिक्षित मागासवर्गीयांना शिलाई मशिन पुरविणे, लेथ, ऑईल इंजीन, इलेक्ट्रिक मोटार खरेदीसाठी अर्थसहाय्य इत्यादी.

(7) मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहातील मुलांच्या शैक्षणिक सहली.

(8) मागासवर्गीयांना बायोगॅस प्लॅण्टसाठी अर्थसहाय्य.

(9) मागासवर्गीय वस्तीत जोडरस्ते बांधणे, रस्त्यावरील दिवाबत्ती.

(10) मागासवर्गीय वस्तीमध्ये उद्याने/बगीचे/समाजमंदिरे, प्रौढ शिक्षण व्यवस्था, क्रीडांगण, ग्रंथालय, इत्यादी.

(11) प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील मागासवर्गीय हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, पुस्तके, लेखन साहित्य गणवेश पुरविणे.

(12) मागासवर्गीयांसाठी कमी खर्चाचे संडास.

(13) मागासवर्गीयांना घरगुती वापरासाठी विद्युत पुरवठा करणे.

(14) मागासवर्गीय कुष्ठरोग्यांना पुनर्वसनासाठी अर्थसहाय्य.

(15) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वासंतिक वर्ग चालू करणे.

(16) समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणा-या हरिजन वस्त्यांची सुधारणा या योजनेअंतर्गत बांधलेल्या समाजमंदिराचे अपूर्ण काम पूर्ण करण्यास आर्थिक सहाय्य.

(17) व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांना मिळत असलेली शिष्य-वृत्ती अपुरी पडत असल्यास अर्थसहाय्य.

(18) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे.

(19) मागासवर्गीय लोकांना 15 टक्के उत्पन्नातून बायोगॅससाठी शेगडी, कॉक व पाईप इत्यादी साहित्याचा पुरवठा करणे.

(20) जीवनधारा/जवाहर रोजगार योजनेअंतर्गत मागासवर्गीय लाभार्थ्यांचे विहिरीवर विजेचे पोल पुरविण्याकरिता अर्थसहाय्य देणे.

(21) मागासवर्गीय एस.एस.सी. अनुत्तीर्ण उमेदवारांना स्वयंरोजगाराला संधी उपलब्ध करुन देण्यासाठी वाहन चालकाचे प्रशिक्षण देणे.

(22) गवती छप्पर बदलून घरावर टिनपत्रे घालणे.

(23) मागासवर्गीय शेतक-यांना शेतीची अवजारे व चाकजोडी पुरविणे.

(24) बेघर भूमिहीन घरकुल योजनेखाली बांधलेल्या घरांना नागरी सुविधा पुरविणे.

(25) सिंचन योजना (एकूण निधीच्या 25 टक्के जादा खर्च होणार नाही या अटीवर).

वर नमूद केलेल्या योजनांची यादी ही विशिदीकरणात्मक (इलस्ट्रेटिव्ह) असून ती परिपूर्ण (एक्झॉस्टिव्ह) नाही. अशाच प्रकारच्या इतरही अनेक सामुदायिक अथवा वैयक्तिक लाभाच्या सद्भावमूलक योजना (बोनाफाईड) जिल्हा परिषदांनी स्वत:च्या अखत्यारित संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र यांच्या सल्ल्याने घ्याव्यात. मात्र वैयक्तिक लाभाच्या उत्पादिक योजना हाती घेताना, अशा योजनांचा लाभ ज्या मागासवर्गीय कुटुंबाचे उत्पन्न 6400 रु.पेक्षा जास्त आहे त्यांना देण्यात येऊ नये, तसेच एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस एकाच वेळी दुहेरी मिळणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

2. जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी त्यांना मिळणा-या खालील बाबींपासूनचे उत्पन्नाचे 15 टक्के रकमेसाठी विचारात घ्यावे :-

(1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 चे कलम 157 खाली जिल्हा परिषदेने बसविलेले कर व शुल्क.
(2) सदर अधिनियमाच्या कलम 155(1) खाली जमीन महसुलावरील उपकरात होणारी वाढ.
(3) सदर अधिनियमाच्या कलम 155(2) अन्वये पंचायत समित्यांनी सुचविलेली जमीन महसुलावरील उपकरात होणारी वाढ.
(4) सदर अधिनियमाच्या कलम 144, 151 व 152 खाली बसविलेला जमीन महसुलावरील दर रुपयामागे 20 पैसे जमीन उपकर.
(5) उपकर सापेक्ष अनुदान.
(6) सदर अधिनियमाच्या कलम 158(3) खाली मिळणारे मुद्रांक शुल्क अनुदान (पंचायतीचा वाटा वगळून).
(7) सदर अधिनियमाच्या कलम 150(2), 151-ए(3) वा 152-एक(3) अन्वये देय असलेले पाणीपट्टीवरील उपकरापासूनचे उत्पन्न.

3. शासन असेही आदेश देत आहे की, उपरोक्त निधीतील रक्कम खालील योजनांवर खर्च करण्यात येऊ नये :-

(1) कार्यालयीन इमारतीचे बांधकाम.
(2) कर्मचा-यांचे वेतन/भत्ते.
(3) मनोरंजनात्मक व प्रेक्षणीय स्थळांना भेटीसाठी आयोजित केलेल्या सहली अथवा अधिका-यांचे दौरे.
(4) दुरचित्रवाणी संच अथवा तत्सम चैनीच्या वस्तूंची खरेदी.
(5) जाहिरातीवरील खर्च.
(6) पुतळे/स्मारके उभारणे.
(7) हरिजन सप्ताह साजरा करणे, मेळावे आयोजित करणे.

4. सर्व जिल्हा परिषदांनी सोबतच्या प्रपत्रामध्ये नोंदवही तयार करुन सर्व मागासवर्गीय जातीनिहाय/गावनिहाय याद्या तयार कराव्यात. ज्यावेळी लाभार्थींना वैयक्तिक सहाय्य दिले जाईल त्यावेळी लाभधारकाची व दिलेल्या सहाय्याची नोंद नोंदवहीत घेण्यात यावी. एकाच कुटुंबातील एका व्यक्तीला त्या वर्षी पुन्हा पुन्हा या योजनेचा लाभ मिळणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. जेव्हा या यादीतील सर्व लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळेल तेव्हा त्या कुटुंबातील दुसरी व्यक्ती लाभ घेण्यास पात्र ठरेल. ही वही गट विकास अधिकारी यांनी नियमित तपासावी. त्याचबरोबर संबंधित समाजकल्याण अधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही त्यांच्या भेटीच्या वेळी नोंदी तपासून पहाव्यात. आयुक्त किंवा सहाय्यक आयुक्त (विकास) हे दौ-यावर असतील किंवा कार्यालय निरीक्षणाचे वेळी जातील तेव्हा या नोंदवहीची तपासणी करावी. नोंदवही विवरणपत्र "अ" प्रमाणे ठेवण्यात यावी.

5. जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने परिच्छेद 2 मध्ये नमूद केलेल्या सर्व बाबींपासूनचे बाब-निहाय एकूण उत्पन्न व त्याच्या 15 टक्के रक्कम याची माहिती संबंधित समाजकल्याण अधिकारी यांना कळवावी. सदर रक्कम जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने समाजकल्याण विभागाला उपलब्ध करुन द्यावी. जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समिती व समाजकल्याण विभाग यांनी मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजना आखून त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करावी व 15 टक्के रक्कम त्याच वर्षी खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. उपरोक्त सर्व बाबींपासूनच्या उत्पन्नाची 15 टक्के रक्कम ही मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर योग्य त-हेने व त्याच आर्थिक वर्षात होते की नाही, हे पाहण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व समाजकल्याण अधिकारी यांची असून, रक्कम खर्ची न पडल्यास त्यांना जबाबदार धरले जाईल. जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीने सुध्दा याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करुन 15 टक्के रकमेची तरतूद करुन घ्यावी व ती रक्कम त्याच वर्षी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. 15 टक्के रकमेच्या अनुशेषाच्या सनियंत्रणाची जबाबदारी शासन पत्र क्रमांक विकका-108/प्र.क्र.499/34,

दिनांक 5 जून 1989 अन्वये विभागीय सहाय्यक आयुक्त (विकास) यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यानुसार त्यांनी 15 टक्के रकमेचे नियंत्रण व सदर रकमेतून घेण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी योग्य त-हेने होते किंवा नाही हे पहावे. जिल्हा परिषदेने योजनांवरील खर्चाचे त्रैमासिक अहवाल पुढील महिन्याच्या 10 तारखेपर्यन्त संबंधित विभागीय सहाय्यक आयुक्त (विकास) यांच्याकडे पाठवावेत. सोबतच्या "ब" विवरणपत्रात त्रैमासिक अहवाल पाठवावेत.

6. ज्या विकास योजना शासनाने मंजूर केल्या आहेत अशा योजनांना विभाग प्रमुखांना रु. 50,000/- पर्यन्त खर्च करण्याची अनुमती असून, इतर योजनांना रु. 30,000/- पर्यन्त खर्च करण्याची अनुमती आहे. तथापि या निर्णयाच्या परिच्छेद 1 मध्ये नमूद केलेल्या बाबींवर खर्च करण्यापूर्वी ज्या योजना नित्य स्वरुपाच्या (रुटीन) असून पूर्वी त्यांना तांत्रिक मंजुरी दिली आहे अशा योजनांच्या बाबतीत पुन्हा तांत्रिक मंजुरी देण्याचा प्रस्ताव संचालक, समाजकल्याण, पुणे यांना पाठविण्याची जरुरी नाही. तथापि अशा योजनांव्यतिरिक्त काही नवीन योजना असतील तर त्याचे प्रस्ताव जिल्हा परिषदांनी संबंधित विभागीय समाजकल्याण अधिकारी यांच्या मार्फत संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवावेत व आवश्यकता वाटल्यास सदर प्रस्ताव संचालकांनी ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचेकडे पाठवावेत.

7. जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी 15 टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता परिच्छेद 2 मध्ये नमूद केल्याप्रमाणे योजना घ्याव्यात. तसेच त्यासारख्या इतर योजना सुध्दा जिल्हा परिषदांनी स्वतःच्या अखत्यारीत संचालक, समाजकल्याण यांच्या सल्ल्याने घ्याव्यात. मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राखून ठेवलेली 15 टक्के रक्कम ही त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना आखून त्याच वित्तीय वर्षी खर्ची पडेल या दृष्टीने लाभार्थींचे अर्ज स्वीकारताना मुळातच ते परिपूर्ण असावेत याची दक्षता घेण्यात यावी. त्यामुळे कार्यान्वित करण्यात येणा-या योजनांची अंमलबजावणी सत्वर होऊन रक्कम अखर्चित राहणार नाही व सदर रकमेचा अनुशेषही राहणार नाही. अशा योजना वर्षाच्या सुरुवातीपासूनच आखण्यात याव्यात. हा कार्यक्रम प्रभावीपणे अंमलात येण्यासाठी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मासिक कृती कार्यक्रम तयार करुन दर महिन्यास आढावा घ्यावा. तसेच संबंधित विभागीय आयुक्तांनी सुध्दा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मासिक बैठकीमध्ये आढावा घ्यावा. योजनांची अंमलबजावणी करण्यास दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर योग्य ती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. या योजनेचा कार्यक्रम सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे आखण्यात यावा :-

| | | |
|---|---|---|
| (1) | एप्रिल | लाभार्थींचे सर्वेक्षण करुन याद्या तयार करणे. |
| (2) | मे | याद्यांची फेरतपासणी. |
| (3) | जून | लाभार्थींच्या याद्या निश्चित करणे, लाभार्थींची निवड करणे. |
| (4) | जुलै | योजनेच्या अंमलबजावणी । प्रस्ताव तयार करणे. |
| (5) | ऑगस्ट | साधनसामुग्रीची खरेदी करणे. |
| (6) | सप्टेंबर | लाभार्थींना योजनेचा प्रत्यक्ष लाभ देणे. |
| (7) | ऑक्टोबर | कार्यक्रमाचा आढावा घेऊन उणीवा भरुन काढणे. |
| (8) | नोव्हेंबर-डिसेंबर | मागील राहिलेले काम पुर्ण करणे. |

8. मागासवर्गीयांसाठी असलेल्या ज्या योजनांना शासकीय अनुदान प्राप्त होते, अशा योजनांसाठी जिल्हा परिषदांनी स्वतःच्या उत्पन्नातील 15 टक्के रकमेतून तात्पुरता सुध्दा खर्च करणे ही बाब तत्वतः उचित होणार नाही.

9. 15 टक्के रकमेतून आदिवासी उपयोजना क्षेत्रात एखादी सामूहिक विकासाची योजना कार्यान्वित करण्यापूर्वी जिल्हा परिषदेने संबंधित प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांच्याशी संपर्क साधावा. तसेच प्रामुख्याने मागासवर्गीय वस्ती असलेल्या भागात अशा सामूहिक लाभाच्या योजना घेण्यापूर्वी त्यांनी संबंधित विभागीय समाजकल्याण अधिका-यांशी संपर्क साधावा. जर अशा सामूहिक योजना शक्य तो आदिवासी उपयोजनेच्या निधीतून अथवा विशेष घटक योजनांतर्गत असलेल्या घेणे शक्य असल्यास या 15 टक्के राखीव निधीतून त्या कामासाठी विनियोग करु नये.

शासकीय निधीतून किंवा आदिवासी उपयोजनेखालील निधीतून योजना घेणे शक्य नसेल तरच मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या 15 टक्के निधीतून योजना घ्याव्यात.

10. 15 टक्के निधीतून मागासवर्गीयांसाठी विकास योजनेवर करावयाचा खर्च अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, नवबौध्द यांच्या जिल्हयांमधील लोकसंख्येच्या प्रमाणाच्या आधारावर करण्यात यावा. तसेच पंचायत समित्यांनी सुध्दा त्याच प्रमाणात खर्च करावा.

11. जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी 15 टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी तयार केलेल्या योजनांसाठी लाभार्थी उपलब्ध होत नसतील तर त्यांनी जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे मातंग विकास महामंडळ व वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ व संबंधित प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून लाभार्थी उपलब्ध करुन घ्यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

म. रा. गावित,
उप सचिव, महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

प्रति

1 विभागीय आयुक्त (सर्व),
2 विभागीय सहाय्यक आयुक्त (विकास), (सर्व),
3 सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
4 संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे,
5 सचिव, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई 400 032,
6 महालेखापाल-1, मुंबई (लेखा परीक्षण),
7 महालेखापाल-2, नागपूर (लेखा परीक्षण),
8 महालेखापाल, महाराष्ट्र-1, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता),
9 महालेखापाल, महाराष्ट्र-2, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता).

जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली

**(परिशिष्ट४.२)**

GR-200462051544-6001-1201

(परिशिष्ट ४.२)

जिल्हा परिषदांनी योजना राबवितांना पाळावयाचे वेळापत्रक व त्यानुषंगाने विविध स्तरावर सोपविण्यात आलेली जबाबदारी

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
परिपत्रक क्र.झेडपीए-2000/प्र.क्र.41/33,
मंत्रालय मुंबई-400 0323
दिनांक :- 17 जानेवारी, 2001

परिपत्रक -

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, ज्या योजना जिल्हा परिषद स्तर त्या नियंत्रणाखाली राबवित आहे त्या योजनांचे वेळापत्रक जिल्हा परिषदांद्वारे व्यवस्थितपणे पाळले जात नसल्याकारणाने विकास कामाचे व्यवस्थापन पूर्णपणे ढासळलेले आढळते. यामुळे ज्या योजना प्रत्यक्षात 31 मार्च पूर्वी पूर्ण करावयाच्या असतात (उदा. लाभार्थी निवड, साहित्य वाटप इ.) दिनांक 31 मार्च नंतर देखील सुरु असतात. या संदर्भात शासनाने योग्य त्या वेळापत्रकाचे पालन करावे अशा सुचना वारंवार दिलेल्या आहेत. तथापि त्याला सुयोग्य परिणाम झालेला दिसून येत नाही. विकासाच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता तांत्रिक मान्यता निविदा मंजूरी व लाभार्थ्यांच्या निवडी बाबत अधिकार शासनाने विविध स्तरावर दिलेले आहेत. यापैकी कोणत्याही स्तरावर विलंब झाल्यास विकास कामाचे वेळापत्रक ढासळते.

योजना काटेकोरपणे विहित कालावधीत पूर्ण व्हाव्यात यासाठी आता खालीलप्रमाणे वेळापत्रक आखून देण्यात येत आहे.

| अ. क्र. | योजनेचा स्तर | सक्षम अधिकारी / समिती यांनी त्यांचे संबंधित काम पूर्ण करावयाचा अंतिम दिनांक | सक्षम अधिकारी / समिती यांनी कामे पूर्ण न केल्यास मु.का.अ. यांनी ही कामे पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | वैयक्तिक योजनांची निवड व अंमलबजावणीची रुपरेषा ठरविणे | 30 जून | 7 जुलै |
| 2 | तांत्रिक व प्रशासकीय मान्यता | 30 जून | 7 जुलै |
| 3 | एक) लाभार्थ्यांची निवड<br>दोन) निविदा प्रक्रिया सुरु करुन अंतिम करणे<br>(दोन्ही बाबी एकत्रित सुरु कराव्यात) | 30 सप्टेंबर | 7 ऑक्टोबर |
| 4 | प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे | 1 नोव्हेंबर | 8 नोव्हेंबर |
| 5 | साहित्य वाटप | 1 जानेवारी | 8 जानेवारी |
| 6 | प्रदाने | 10 मार्च | |

शासनाकडून वेळेवर दर करार मंजूर झाला नसेल वा पूर्वीचा दर करार व्यपगत झाला असेल तर निविदा प्रक्रिया सुरु करण्यास हरकत नाही.

वरील वेळापत्रकात नमूद केलेली कामे विहित दिनांकास पूर्ण झाली नाहीत तर विपरित परिणाम टाळण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अध्यक्षांशी सल्लामसलत करुन थकीत निर्णय विहित दिनांका पासून 7 दिवसाचे आत पूर्ण करतील. ( उदा. लाभार्थ्यांच्या निवडीचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अध्यक्षांच्या सल्ल्याने अंतिम करावयाचा आहे. निविदा मान्य करावयाची कार्यवाही मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेशी विचारविनिमय करुन पूर्ण करावयाची आहे )

योजनेची प्रत्येक स्तरावरील कार्यवाही ही संबंधित अधिकारी / विभागप्रमुख / समिती यांच्यावर निश्चित करण्यात आलेली आहे. विहित कालावधीत ही कार्यवाही न झाल्यास त्यासाठी ते व्यक्तिशः जबाबदार राहतील. अशी अपूर्ण कार्यवाही वर नमूद केल्याप्रमाणे निश्चित दिनांकास पूर्ण करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर राहील. मात्र प्रत्येक खाते प्रमुखांची ही जबाबदारी राहील की, त्यांनी प्रत्येक योजनेच्या कार्यवाहीची स्थिती वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणावी व वेळापत्रक पाळले जात नसेल तर सदर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या लक्षात आणून द्यावे.

सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन व्हावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वंदना अभ्यंकर)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

1. सर्व विभागीय आयुक्त
2. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
3. सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद.
4. सर्व कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद.
5. सर्व कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद.
6. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
7. सर्व उपमुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नाशिक, पुणे, नागपूर, औरंगाबाद, अमरावती.
8. सर्व जिल्हा स्थानिक निधी लेखा अधिकारी
9. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
10. महालेखापाल, (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
11. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
12. महालेखापाल, (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
13. सार्वजनिक बांधकाम विभाग इमा--2, मंत्रालय, मुंबई.
14. पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई.
15. इतर सर्व मंत्रालयीन विभाग
16. ग्राम विकास विभागातील सर्व अधिकारी व कार्यासने
17. निवड नस्ती.

**(परिशिष्ट ४.३)**

जिल्हा परिषद स्तरांवर राबविण्यात येणा-या
विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी
विशिष्ट मुदतीमध्ये पूर्ण करणे.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक:झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक: २० जून, २००८.

वाचा:- परिपत्रक क्रमांक: झेडपीए २०००/प्र.क्र.४१/३३, दिनांक : १७ जानेवारी,२००१

परिपत्रक :-

जिल्हा परिषदांनी योजना राबविताना योग्य वेळापत्रकानुसार योजना राबविण्यासाठी उपरोक्त शासन परिपत्रकांन्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. तथापि जिल्हा परिषदांकडून केंद्र व राज्य शासन पुरस्कृत विविध योजनांची तसेच जिल्हा परिषदांनी स्वतःच्या उत्पन्नातून हाती घेतलेल्या योजनांची अंमलबजावणी करताना, उद्दीष्ट पुर्तीसाठी व्यवहार्य नियोजनाचा अभाव आणि विविध स्तरांवर घ्यावयाच्या निर्णयासाठी लागणारा विलंब, यामुळे अनेक योजनांची उद्दीष्टे पूर्ण करण्यांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ लागणे, वर्षाअखेरीस निविदा मंजुरी, लाभार्थी निवड करणे, आर्थिक वर्ष संपल्यानंतरही साहित्याचा पुरवठा न होणे इ. सारख्या गंभीर व आक्षेपार्ह चूका मोठ्या प्रमाणात होताना दिसून येतात, **परिणामी जिल्हा परिषदांच्या आणि पर्यायाने शासनाच्या कार्यक्षमतेवर अकारण टीका होत राहते.** यास्तव जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणा-या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी व्यवस्थित व जाणीव पूर्वक नियोजन करुन, त्या पध्दतीने अंमलबजावणी झाल्यास बहुतांशी योजनांची उद्दीष्टे त्याच **आर्थिक वर्षाच्या नोव्हेंबर- डिसेंबर** अखेर पूर्ण करता येणे शक्य आहे. ही बाब विचारांत घेवून विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासन स्तरावरुन सर्वंकष सूचना निर्गमित होणे आवश्यक आहे. **यास्तव उपरोक्त शासन परिपत्रक अधिक्रमित करण्यात येत असून,** या शासन निर्णयान्वये पुढील प्रमाणे नव्याने सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

D:\Backup\Backup\shinde\wordpro

(१) **केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजना -**

१. केंद्र पुरस्कृत योजनांच्या नियोजन व अंमलबजावणी संदर्भात विविध टप्पे निहाय करावयाची कार्यवाही व अशा कार्यवाहीची अंतिम मुदत यांची माहिती व वेळापत्रक परिशिष्ट "अ" आणि "ब" मध्ये नमूद करण्यात आले आहे.

२. सदर परिशिष्टामध्ये नमूद बाबीवरील कार्यवाहीची जबाबदारी संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर व पंचायत समिती स्तरावर प्रथम निश्चित करावी. ज्या अधिकारी आणि कर्मचा-यांवर अशी कार्यवाहीची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यांनी कार्यवाही पूर्ण न केल्यास संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई त्याच आर्थिक वर्षात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पूर्ण करावी.

(२) **जिल्हा परिषदांकडील हस्तांतरित योजना ( बांधकाम विषयक ) -**

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांपैकी ज्या योजनांमध्ये बांधकामाचा (work) समावेश आहे. अशा योजनांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक "परिशिष्ट क" मध्ये नमूद करण्यात आले आहे. निर्धारित वेळेनुसार प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रथमत:निश्चित करावी व त्या प्रमाणे अंमलबजावणीचे विविध टप्पे मुदती मध्ये पूर्ण करावेत.

बांधकाम विषयक योजनांच्या बाबतीत काही योजनांच्या आराखडयांना किंवा कामांना शासनाची मंजूरी आवश्यक असते अशा कामांच्या बाबतीत सर्व योजनांचे आराखडे शासनाकडे मान्यतेसाठी मुदतीमध्ये सादर करण्यात यावेत यामध्ये विलंब करणा-या अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

ज्या योजनेच्या आराखडयास किंवा योजनेस समिती /सभा यांची मान्यता आवश्यक असेल तर समिती /सभा यांचे समोर आराखडा मान्यतेसाठी /संमतीसाठी / शिफारसीसाठी सादर करावा. विहीत केलेल्या मुदतीमध्ये समितीची /सभेची मान्यता न मिळाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तसे नमुद करुन विभागीय आयुक्तांकडे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम २६२ खाली प्राप्त अधिकाराचा वापर करण्यासाठी त्वरीत प्रस्ताव पाठवावा.

(३) **जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नातून राबविण्यात येणा-या योजना.**

जिल्हा परिषदा स्वतःच्या उत्पन्ना मधून बांधकाम विषयक व वैयक्तीक लाभांच्या येजना राबवतात. अशा योजनांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक परिशिष्ट "ड" व "इ" मध्ये नमुद करण्यात आले आहे.

विविध योजनांच्या अंमलबजावणी प्रक्रियेत जिल्हा परिषद स्तरांवर योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, निविदा मंजूर करणे, लाभार्थी निवड यादीस मान्यता देणे इ. बाबतचे अधिकार विषय समित्यांना प्रदान करण्यात आले आहेत. तथापि विविध कारणास्तव विषय समिती समोर प्रस्ताव सादर करताना मोठया प्रमाणात विलंब होतो, असे दिसून आले आहे.

परिशिष्ट "ड" व "इ" मध्ये विहीत केलेल्या वेळेनुसार विषय समित्यांनी प्रस्तावांना मान्यता देणे, संबंधीत विषय समितीवर बंधनकारक राहील. अशा मान्यतेचे प्रस्ताव मुदती पूर्वी किमान १५ दिवस अगोदर संबंधित समिती /सभे समोर सादर करणे ही विभाग प्रमुखांची जबाबदारी राहील. विहित वेळेत विषय समितीची मान्यता मिळणेसाठी नियमित मासिक सभे व्यतिरिक्त विशेष सभा बोलविण्यासाठी वा विहित केलेल्या कालावधीमध्ये जिल्हा परिषद /विषय समितीची बैठक घेण्यात आली नसल्यास, अथवा याबाबत वेळ काढूपणाचे धोरण स्वीकारले जात आहे हे निदर्शनास आल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम २६२ अनुसार विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव पाठवून संबंधित समिती /सभेची बैठक बोलाविण्याची कार्यवाही करावी. व त्यामध्ये या विषयाचा निर्णय घेण्यात यावा.

वस्तु /साहित्य खरेदी संदर्भात अनेक वेळा शासन दर करारासाठी प्रतिक्षा करण्यात येते. त्यामुळे साहित्य खरेदीच्या प्रक्रियेस विलंब होवून वेळेवर साहित्याचा पुरवठा होत नाही. यासाठी साहित्याच्या खरेदीसाठी शासन स्तरावर होणा-या दर कराराची वाट पाहू नये. **खरेदी करावयाच्या साहित्य /वस्तूसंबंधी त्यावेळी दर करार अस्तित्वात असेल** तरच दर करारानुसार खरेदी करण्यात यावी. अन्यथा खुल्या बाजारातून निविदा मागवून साहित्य खरेदीची प्रक्रिया वेळेतच पूर्ण करावी.

**(४) निधी खर्चासाठी कालमर्यादा:-**

विविध योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात या परिपत्रकानुसार विहित केलेल्या काल मर्यादेत कार्यवाही पूर्ण करण्याची दक्षता सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. आर्थिक वर्षाच्या अखेर सर्व योजनांचा निधी खर्च होणे आवश्यक आहे. चालु वर्षासाठी माहे फेब्रुवारी २००९ नंतर कोणताही अखर्चित निधी शासनाच्या परवानगी शिवाय खर्च करता येणार नाही. तसेच सन २००८-०९ पासून पुढे अखर्चित निधी खर्चासाठीची अंतीम मर्यादा जानेवारी अखेरची राहील. याची नोंद सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक २००८०५१४१७४८५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवाने व आदेशानुसार,

(ना.रा.भागवत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
१)महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा व परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
२)महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा व परिक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.
३)वित्त विभाग, व्यय-१५ व अर्थसंकल्प-१९.
४)सर्व विभागीय आयुक्त (विकास शाखा)
५)मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा कोकण भवन,नवी मुंबई.
६)उप मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती.
७)सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
८) सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
९)सर्व जिल्हा लेखा परिक्षक अधिकारी स्थानिक निधी लेखा,
१०)ग्राम विकास व जलसंधारण विभाग, का.क्र.आस्था ४,६,८,
११)निवड नस्ती, कार्यासन क्रमांक वित्त-९.

## परिशिष्ट "अ"

## केंद्रपुरस्कृत योजना (बांधकामे)

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सूचना | सन २००९-१० पासून पूढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | उद्दिष्टांची निश्चिती मागील वर्षाचे उधिष्ट ग्राहय धरावे. | ३१ मे | १५ एप्रिल पर्यंत |
| २ | उधिष्टांचे तालुका निहाय वाटप एकुण उधिष्टांच्या १० % वाढ करुन वाटप करणे. | १५ जुन | १५ एप्रिल पर्यंत |
| ३ | प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीस्तव सादर करणे. | ३० जुन | ३० एप्रिल पर्यंत |
| ४ | जिल्हा स्तरावर प्रस्तावांची छाननी करुन प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे. | १५ जुलै | १५ मे. |
| ५ | लाभार्थ्यां सोबत करारनामे पूर्ण करणे. | १५ जुलै १५ ऑगस्ट | १५ मे ते १५ जून |
| ६ | कामाचे line out घेवून कामे सुरु करणे. | १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर | १५ जून ते १५ जूलै |
| ७ | बांधकामे पूर्ण करणे. | १५ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर, ०९ | १५ जुलै ते ३१ डिसेंबर |
| ८ | बांधकाम पूर्णत्वाचे दाखले प्रदान करणे. | ३१ जानेवारी पर्यंत | ३१ जानेवारी पर्यंत |
| ९ | अंतिम देयके अदा करणे. | फेब्रुवारी अखेर | ३१ जानेवारी पर्यंत |
| १० | बांधकामाचे हस्तांतरण व नोंदी घेणे | मार्च | मार्च |

## परिशिष्ट "ब"
## केंद्रपुरस्कृत वैयक्तीक लाभांच्या योजना
## स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सूचना | सन २००९-१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | पुढील वर्षाचे नियोजन करणे. | मे पूर्वी | मार्च पूर्वी |
| २ | तालुकानिहाय उद्दिष्ट वाटप करणे. | १५ जून पर्यंत | १५ एप्रिल पर्यंत |
| ३ | कर्ज प्रकरणे/प्रस्ताव सादर करणे. | ३१ जुलै पर्यंत | ३० जून पर्यंत |
| ४ | कर्ज प्रकरणे/प्रस्ताव बँकांकडे सादर करणे. | ३१ ऑगस्ट पर्यंत | ३१ जुलै पर्यंत |
| ५ | कर्ज प्रकरणास मंजूरी प्राप्त करुन घेणे. | ३१ ऑक्टोबर पर्यंत - | ३० सप्टेंबर पर्यंत |
| ६ | कर्ज प्रकरणे वाटप करणे | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |

परिशिष्ट " क "

जिल्हा परिषदांकडील बांधकाम विषयक शासकीय योजना

CR, SR, MNP, NON MNP वैधानिक विकास मंडळ, तीर्थक्षेत्र विकास योजना, १२ वा वित्त आयोग (राज्य स्तर ), गौण खनिज इत्यादी अनुदान.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-२००९ साठी सुचना | सन २००९ -२०१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना |
|---|---|---|---|
| १ | वार्षिक नियोजन आराखडा तयार करणे. | ३१ मे पर्यंत | ३० एप्रिल पर्यंत |
| २ | आवश्यकतेनुसार आराखडयास समिती/सभा यांची मान्यता घेण्यासाठी आराखडा समिती/ सभेला सादर करणे. | १५ जून | १५ मे |
| ३ | आराखडा मंजूरीसाठी शासनास सादर करणे. | जून अखेर पर्यंत | मे अखेर पर्यंत |
| ४ | कामांना प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी प्रदान करणे. | जुलै अखेर | जून अखेर |
| ५ | कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करणे. | सप्टेंबर अखेर | ऑगस्ट अखेर |
| ६ | कामाचे कार्यारंभ आदेश देणे. | १५ऑक्टोबर | १५ सप्टेंबर |
| ७ | कामाचे linc out देवून कामे सुरु करणे. | ऑक्टोबर अखेर | सप्टेंबर अखेर |
| ८ | कामाचे पूर्णत्वाचे दाखले देवून अंतिम देयकाची अदाई करणे. | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |
| ९ | विनियोग दाखले घेणे. | ३१ मार्च | ३१ मार्च |

परिशिष्ट "ड"

## जिल्हा परिषदाकडील बांधकाम विषयक शासकीय योजना

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सुचना | सन २००९-१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | योजनाची निवड व अर्थसंकल्पीय तरतूद करणे. | ३१ मे | ३१ मार्च पूर्वी मागील वर्षाची |
| २ | योजनेचे प्रारुप व कामांना प्रशासकीय आणि तांत्रिक मंजूरी प्रदान करणे. | ३१ जुलै | ३१ मे |
| ३ | कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करणे. | ३० सप्टेंबर | ३० जुलै |
| ४ | कामाचे कार्यारंभ आदेश देणे. | १५ ऑक्टोबर | १५ ऑगस्ट |
| ५ | कामाचे line out देवून कामे सुरु करणे. | १६ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर | १६ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर |
| ६ | काम पूर्णत्वाचे दाखले देवून अंतिम देयकाची अदाई करणे. | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |
| ७ | विनियोग दाखले घेणे. | ३१ मार्च | ३१ मार्च. |

## परिशिष्ट " इ "
## जिल्हा परिषदांकडील वैयक्तिक लाभांच्या योजना.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-२००९ साठी सुचना | सन २००९-२०१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना |
|---|---|---|---|
| १ | योजनांची निवड व अर्थसंकल्पात तरतूद करणे. | मे पूर्वी | मार्च पूर्वी |
| २ | विविध योजनांचे प्रारुप निश्चित करुन त्यास विषय समितीची मान्यता / मंजूरी घेणे. | ३० जून | ३० एप्रिल |
| ३ | योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देणे. | ३१ ऑगस्ट | ३० जून पर्यंत |
| ४ | पंचायत समिती निहाय उद्दिष्ट वाटप व प्रस्ताव मागणे, प्रस्तावाची छाननी करणे. | ३१ जुलै अखेर | ३१ मे अखेर |
| ५ | लाभार्थींची निवड करणे. | ३१ जुलै अखेर | ३१ मे अखेर |
| ६ | निविदा प्रक्रीया पूर्ण करुन खरेदीस सक्षम अधिकारी/समितीची मान्यता घेणे. | ३१ ऑक्टोबर पर्यंत | ३१ ऑगस्ट पर्यंत |
| ७ | साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश. | ३० नोव्हेंबर | ३० सप्टेंबर |
| ८ | लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे. | ३१ जानेवारी | ३० नोव्हेंबर |
| ९ | पुरवठादाराचे देयके अदा करणे. | फेब्रुवारी पर्यंत | ३१ जानेवारी |
| १० | विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे. | मार्च | मार्च |

**(परिशिष्ट ४.४)**

जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणीबाबत...

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: झेडपीए-२०१६/प्र.क्र.९/वित्त-९
बांधकाम भवन, २५,मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४००००१.
तारीख: १९ मे,२०१६.

वाचा :

१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. झेडपीए-२००८/ प्र.क्र.४४६/वित्त-९, दिनांक: २० जून, २००८
२) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक ६ जून, २००८.

परिपत्रक :

जिल्हा परिषदांनी योजनांची अंमलबजावणी करावी यासाठी उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ दिनांक २० जून, २००८ च्या शासन परिपत्रकानुसार वेळापत्रक निश्चित करुन दिले होते. काही प्रशासकीय कारणास्तव या वेळापत्रकाप्रमाणे अंमलबजावणी होत नसल्याचे व पर्यायाने लेखा आक्षेप येत असल्याची बाब जिल्हा परिषदांनी निदर्शनास आणली आहे.

जिल्हा परिषदांना शासनाकडून ( केंद्र व राज्य हिस्स्यांचे ) देण्यात येणारे अनुदान टप्प्याटप्प्याने दिले जाते. त्यामुळे जिल्हा परिषदांना योजनांसाठीचा निधी एकाच वेळी उपलब्ध होत नाही. शिवाय काही वेळा निधीचे वाटप आर्थिक धोरणात्मक सूचनांमुळे करता येत नसल्यामुळे कामाच्या / योजनांसाठी विहित वेळेत कार्यपूर्ती करताना अडचणी निर्माण होतात. तसेच वित्त विभागाच्या उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ च्या शासन निर्णयान्वये एका आर्थिक वर्षात मुक्त केलेला व अखर्चित राहीलेला निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षाअखेरपर्यंत खर्च करण्याची अनुमती जिल्हा परिषदांना देण्यात आली आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता व शासनाच्या वित्तीय व्यवस्थापनामुळे जिल्हा परिषदांना योजनेची विहित मुदतीत कार्यपूर्ती करताना व्यवहारिक अडचणी उद्भवत असल्याचे निदर्शनास आले आहे. **यास्तव संदर्भाधीन क्र. १ येथील शासन परिपत्रक व अनुषंगिक शासन पत्रे अधिक्रमित करण्यात येत असून या संदर्भात खालील प्रमाणे नव्याने सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. :-**

१) योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेने कोटेकोरपणे नियोजन करणे आवश्यक राहील.

२) योजनांचा निधी नियमानुसार व निकषानुसार खर्च करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदांची राहील.

३) विशेषत: वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी प्राप्त झालेला निधी विहित निकषानुसार व विहित कालमर्यादेमध्ये खर्च होईल व योजनांचा लाभ लाभार्थींना वेळेत मिळेल याची जबाबदारी जिल्हा परिषदांची राहील. याची नोंद सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०५१९१७४९०१४०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vaibhav R Rajeghatge

Digitally signed by Vaibhav R Rajeghatge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vaibhav R Rajeghatge
Date: 2016.05.20 15:05:58 +05'30'

(वैभव राजेघाटगे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परीक्षा) महाराष्ट्र-१ / २
सर्व विभागीय आयुक्त (विकास शाखा)
संचालक तथा मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व अमरावती)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
सर्व जिल्हा लेखा परीक्षक अधिकारी स्थानिक निधी लेखा
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, का. क्र. आस्था ४,६,८.
वित्त विभाग, व्यय-१५ व अर्थसंकल्प-१९
मा. प्रधान सचिव (ग्रा. वि. व पं. रा.)यांचे स्वीय सहाय्यक
निवडनस्ती (वित्त-९)

**(परिशिष्ट ५.१)**

जिल्हा परिषदांनी आपल्या स्वतःच्या निधीतून आर्थिक मदत देण्याकरीता हृदयरोग, किडनी व कॅन्सर या दुर्धर आजारामध्ये इतर सर्व प्रकारच्या कॅन्सर रोगाचा समावेश करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-एलएफसी-२००६/प्र.क्र. ४७१८/वित्त-३,
मंत्रालय, मुंबई -४००,०३२, दिनांक : १५ डिसेंबर, २००६.

वाचा :- १) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, पत्र क्रमांक -एलएफसी-१०९४/ प्र.क्र.२८२३/२४, दिनांक २ नोव्हेंबर १९९५.

२) सार्वजनिक आरोग्य विभागाचा शासन निर्णय क्रमांक-एमएजी-२००५ / प्र.क्र. २५१ /आ.३ , दिनांक १० फेब्रुवारी २००६.

३) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक- एलएफसी-२००१/ प्र.क्र.३११०/ २४, दिनांक ९ नोव्हेंबर २००१.

प्रस्तावना :-

जिल्हा परिषदांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामधील रहिवाश्यांचे आरोग्य सुरक्षितता, शिक्षण इत्यादी किंवा त्यांच्या सामाजिक आर्थिक किंवा सांस्कृतिक कल्याणाचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १०० (३) मधील तरतुदीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून जिल्ह्यातील ग्रामीण जनतेमधून कॅन्सर, हृदयरोग व किडनी निकामी होणे या दुर्धर रोगाने पिडीत असलेल्या रुग्णांना आर्थिक मदत देण्याची योजना राबविण्यासाठी या विभागाच्या उपरोक्त दिनांक २ नोव्हेंबर, १९९५ च्या पत्रान्वये कॅन्सर, हृदयरोग व किडनी या दुर्धर आजाराकरीता रुग्णांना आर्थिक मदत देण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

परिपत्रक

जिल्हा परिषदांकडून वरील दुर्धर आजारांमध्ये कॅन्सरच्या इतर सर्व प्रकारच्या कॅन्सर रोगांचा समावेश करण्याविषयीच्या प्रस्तावास अनुकरुन सार्वजनिक आरोग्य विभागाने रक्ताच्या कॅन्सरशिवाय इतर सर्व प्रकारच्या कॅन्सर आजारांचे वाढते प्रमाण, आजारातील गांभीर्य व उपचारावर उद्भवणारा खर्च या सर्व बाबींचा विचार करुन, शासन निर्णय क्रमांक -क्रमांक-एमएजी-२००५ / प्र.क्र. २५१ /आ.३ , दिनांक १० फेब्रुवारी २००६ मध्ये नमूद केल्यानुसार कॅन्सर, हृदयरोग व किडनी या दुर्धर आजारामध्ये समाविष्ट असलेल्या रक्ताच्या कॅन्सर रोगासह इतर सर्व प्रकारच्या कॅन्सर आजारांचाही सामावेश केलेला आहे. त्यामुळे संदर्भाधीन

क्रमांक १ च्या पत्रात मान्यता दिलेल्या कॅन्सर हृदयरोग व किडनी या दुर्धर आजारामध्ये कॅन्सर या ऐवजी " हृदयरोग, किडनी व इतर सर्व प्रकारच्या कॅन्सर रोग या आजारांसाठी " या विभागाच्या क्रमांक एलएफसी - २००६/प्र.क्र.४७७०/ वित्त-३, दिनांक ३ नोव्हेंबर २००६ च्या परिपत्रकान्वये प्राधिकृत केलेल्या रुग्णालयामध्ये उपचार घेतलेल्या रुग्णांना जिल्हा परिषदेच्या स्व:निधीतून मदत देण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मंजुरी देण्यात येत आहे.

१ सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक-२, येथे नमूद दिनांक १० फेब्रुवारी २००६ च्या आदेशातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमुद केल्यानुसार हे आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून अंमलात येतील . तथापि या आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत औषधोपचार घेतलेल्या अनिर्णित प्रकरणांना अथवा आदेशाच्या दिनांकास औषधोपचार सुरु असणा-या प्रकरणांना देखील हे आदेश लागू रहातील. मात्र या आदेशाच्या दिनांकापूर्वी निर्णयीत झालेली प्रकरणे पुन्हा सुरु करण्यात येऊ नयेत.

हृदयरोग किडनी व कॅन्सर अशा दुर्धर रोगाने पिडीत असलेल्या रुग्णांना जिल्हा परिषदेच्या स्व:तच्या निधितून मदत देतांना संदर्भ क्रमांक २ मध्ये विहीत केलेल्या आर्थिक मर्यादेत देण्यात यावी.

२ रुग्ण हा संबंधित जिल्हयातील ग्रामीण भागाचा रहिवाशी असावा.

३ रुग्ण हा भूमीहीन अल्पभूधारक दारिद्र रेषेखालील अथवा स्वातंत्र्य सैनिक असल्यास प्राधान्य द्यावे.

४ रुग्ण दुर्धर रोगाने पिडीत असल्याबाबतचे प्राधिकृत वैद्यकीय संस्थेच्या तज्ञ डॉक्टरांचे अथवा जिल्हा शल्यचिकित्सकाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे

५ दुर्धर रोगाने पिडीत असलेल्या रुग्णांची निवड करण्यासाठी व योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करावी. त्यात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी , मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांचाही सामावेश असावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि. ज. विजवे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
विभागीय आयुक्त सर्व,
जिल्हाधिकारी सर्व,
अध्यक्ष , जिल्हा परिषद सर्व,

**(परिशिष्ट १.१)**

जलसंधारण विभागासाठी सिमेंट
पुरवठादार निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र.सिमेंट २००९/प्र.क्र.११४/जल-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २० एप्रिल, २०११.

संदर्भ :- १) वित्त विभाग शासन निर्णय क्र.सिमेंट २००१/सं.क्र.३४५/व्यय-१२, दि.२३/८/२००१ व दि.१७/१०/२००१.
२) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २००८/प्र.क्र.१५२/यंत्रकक्ष-बां.सा. दि.१८/११/२००९.

प्रस्तावना :-

जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग या विभागांच्या कामांकरीता लागणारे सिमेंटचे एकूण परिमाण मोठे असल्याने सिमेंटची वार्षिक मागणी निश्चित करुन त्या आधारे सिमेंट कंपन्यांकडून दरपत्रके मागविल्यास अधिकाधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होतील हे लक्षात घेऊन वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.२३.८.२००१ व दि.१७.१०.२००१ च्या शासन निर्णयान्वये सचिवस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भाधीन दि.१८.११.२००१ च्या शासन निर्णयान्वये "ब-१ व ब-२" इत्यादि प्रपत्रावर बोलाविण्यात आलेल्या निविदेत "परिशिष्ट-अ" मध्ये खात्यामार्फत कंत्राटदारास पुरवठा करावयाच्या भांडार साहित्याची असलेली तरतूद निरंक ठेवणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभाग यांची सिमेंटची मागणी निरंक असल्यामुळे फक्त ग्राम विकास व जलसंधारण विभागास सिमेंटची आवश्यकता आहे. तरी सिमेंट प्रापणाची कार्यवाही ग्राम विकास व जलसंधारण विभागाने करावी असा दि.६.२.२०१० रोजीच्या सिमेंट प्रापणाच्या सचिवस्तरीय समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने सिमेंट प्रापणाच्या प्रचलित पध्दतीत बदल करुन ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या कामांसाठी लागणारे सिमेंट खरेदी करावयाची पध्दत निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मृदसंधारणाच्या कामांसाठी ग्राम विकास व जलसंधारण विभागास लागणा-या सिमेंटचे एकूण परिमाण मोठे असल्यामुळे विभागाची सिमेंटची एकूण वार्षिक मागणी निश्चित करुन त्या आधारे पुरवठादारांकडून दरपत्रके मागविल्यास अधिकाधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होतील हे लक्षात घेऊन या प्रयोजनासाठी वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.२३.८.२००१ व दि.१७.१०.२००१ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या सचिवस्तरीय समितीऐवजी पुढीलप्रमाणे समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| आयुक्त (कृषि) | - | अध्यक्ष |
| मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) | - | सदस्य |
| संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन | - | सदस्य |
| संचालक, सामाजिक वनीकरण | - | सदस्य |
| विभागीय कृषि सहसंचालक, पुणे / ठाणे. | - | सदस्य |
| सहसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे. | - | सदस्य |
| सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, पुणे | - | सदस्य |
| कृषि उपसंचालक (मृद), कृषि आयुक्तालय, पुणे | - | सदस्य सचिव. |

२. उपरोक्त समितीने वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.२३.८.२००१ व दि.१७.१०.२००१ च्या शासन निर्णयात नमूद खालील मार्गदर्शक तत्वानुसार कार्य करावे.

१) विभागास लागणा-या सिमेंटची वित्तीय वर्षाची एकूण मागणी व कामाचा कालावधी विचारात घेऊन सिमेंट उत्पादक कंपन्यांकडून दरपत्रके मागवून सर्वात किफायतशीर असे दर निश्चित करावेत.
२) या समितीच्या बैठका ३ महिन्यांतून एकदा घेण्यात याव्यात.
३) समितीने अशा बैठकीच्या वेळी त्यावेळी अस्तित्वात असलेल्या दरांचा आढावा घ्यावा आणि सिमेंटचे दर कमी झाले असतील तर कमी झालेले दर निश्चित करावेत.
४) दरपत्रके मागवितांना महाराष्ट्राबाहेरील कंपन्यांचा विचार करण्यास हरकत नसावी. परंतू महाराष्ट्राबाहेरील कंपन्यांकडून सुरळीत पुरवठा न होण्याची शक्यता लक्षात घेता, महाराष्ट्राबाहेरील सिमेंट कंपन्यांकडून सर्वात कमी दराचे ग्राहय देकार प्राप्त झाले तर अशा कंपन्यांकडून पुरवठयाची शाश्वती म्हणून बँक गॅरंटी घेण्यात यावी. बँक गॅरंटीची रक्कम "L-१ (प्राप्त झालेल्या निविदांमधील सर्वात निम्नतम दराची निविदा) व L-२ (प्राप्त झालेल्या निविदांमधील दुस-या क्रमांकाच्या निम्नतम दराची निविदा) यामधील दरातील फरक X वर्षभराची एकूण मागणी" इतकी निश्चित करण्यात यावी. अशी बँक गॅरंटी देण्यास कंपन्या तयार असतील तरच महाराष्ट्राबाहेरील कंपन्यांचा विचार केला जावा. तसेच अशा कंपन्यांनी सिमेंटचा पुरवठा महाराष्ट्रातील सिमेंट डेपोमधूनच करावा असे बंधन त्यांचेवर घालण्यात यावे जेणेकरुन विक्रीकराद्वारे राज्य शासनास उत्पन्न प्राप्त होईल.

३. सिमेंट पुरवठयासाठी तपशिलवार अटी व शर्ती :-

१) <u>अंतिम दर निश्चिती</u> :- विविध सिमेंट कंपन्यांनी दिलेले एक्स फॅक्टरी दर (व्हॅट सहीत) विचारात घेऊन आपल्या अधिपत्याखालील प्रकल्पस्थळी आर्थिकदृष्टया किफायतशीर दर असणाऱ्या कंपनीचा दर, तुलनात्मक अभ्यास करुन प्रापणाबाबत आवश्यक कार्यवाही करावी. तुलनात्मक अभ्यास करताना त्यामध्ये सिमेंटचा एक्स फॅक्टरी दर (व्हॅट सहीत) + अनुषंगिक खर्च + रेल्वे/रस्त्याने प्रकल्प स्थळापर्यंत येणारा वाहतूक खर्च + सिमेंट उतरविण्याचा खर्च इ. एकंदरीत प्रकल्पस्थळापर्यंत किंवा गोदामामध्ये सिमेंट पोहोचवून थप्पी लावण्यापर्यंतचा सर्व खर्च विचारात घेऊन येणारा अंतिम पोहोच दर विचारात घ्यावा. अंतिम पोहोच दर (at destination) हे त्या ठिकाणच्या बाजारभावापेक्षा कमी असतील, ही बाब विचारात घेणे बंधनकारक राहील.

२) <u>वाहतुक</u> :- सिमेंटची वाहतुक करताना ती आर्थिकदृष्टया किफायतशीर ठरेल अशाच मार्गाने (रेल्वेने, रस्त्याने) करण्यात यावी. रोडने वाहतुक प्रस्तावित असल्यास, वाहतुकीचा खर्च काढताना मान्यताप्राप्त वाहतुक निविदेनुसार व अशी वाहतुक निविदा अस्तित्वात नसल्यास, विभागीय दरसुचीनुसार काढण्यात यावी.

३) <u>अधिदान अटी</u> :-

अ) प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध असून सिमेंटची देयके अदा करणे शक्य असेल तरच सिमेंट प्रापणाची कार्यवाही करावी. ज्या सिमेंट कंपन्यांची देयके प्रलंबित राहतील त्यांना कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ब) लोहमार्गाने सिमेंट वाहतुक केल्या प्रकरणी :-

सिमेंट पुरवठयाचे दृढ आदेश प्राप्त होऊन तसेच सिमेंट पाठविल्यानंतर व रेल्वे पावती सादर केल्यानंतर तातडीने ९८ टक्के अधिदान प्रदान केली जाईल व उर्वरित २ टक्के अधिदान ३० दिवसांच्या आत सिमेंट सुस्थितीत प्राप्त झाल्याचा निर्वाळा दिल्यानंतर संबंधित मालप्रेषिती अधिकाऱ्यांकडून अदा केली जाईल.

/

क) सडक मार्गाने सिमेंट वाहतुक केल्याप्रकरणी :-

सिमेंट सुस्थितीत प्राप्त झाल्यानंतर १०० टक्के अधिदान दर्शनी धनाकर्षाने (डिमांड ड्राफ्ट) ३० दिवसांचे आत संबंधित मालप्रेषिती अधिकाऱ्यांकडून अदा केले जाईल.

पुरवठा आदेशात आगाऊ अदायगीचे खंड (क्लॉज) नसावे.

४) <u>सिमेंटचे परिमाण, चाचणी व बांधाबांध करणे</u> :-

सिमेंट पुरवठा आदेशास अनुसरुन ओ.पी.सिमेंट आयएस ८११२/१९८९ प्रमाणे पुष्टीकरण केलेला ४३ ग्रेड व ५३ ग्रेड सिमेंट, आयएस ४५५/१९८९ व आयएस ८७१२/१९८९ प्रमाणे पुष्टीकरण केलेला पोर्टलँड स्लॅग सिमेंट, ५० किलो ग्रॅमचा आयएस ११६५२/१९८६ प्रमाणे पुष्टीकरण केलेल्या एचडीपीइ गोणीतून पुरवठा करणे. प्रत्येक पॉलिथीन गोणीवर १५ एमएम जाड व ८० एमएम अक्षरात दोन ओळीत महाराष्ट्र शासन असे काळ्या रंगात चिन्हांकित करावे व पाठीमागे सिमेंटच्या गुणधर्माबाबतचा मजकूर असावा. प्रत्येक माल पाठविल्यानंतर सिमेंटच्या गुणवत्तेबाबतचे चाचणी प्रमाणपत्र पाठविण्याची व्यवस्था करावी. पाठविलेल्या सिमेंटची चाचणी मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत केली जाईल व पुरवठा केल्यानंतर २ महिन्यांच्या आत संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी सदर सिमेंट भारतीय मानकाच्या (आयएसआय पेक्षा) तुलनेने कमी पडत असल्याबाबत कळविले तर सिमेंट बदलून देणे कंपनीवर बंधनकारक राहील. त्यानंतरही काही बाब उद्‌भवल्यास सदर सिमेंटची चाचणी जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संघटना, नाशिक (मेरी, नाशिक) यांचेकडून केली जाईल व त्याचे निष्कर्ष कंपनी व संबंधित मालप्रेषिती अधिकारी या दोहोंवर बंधनकारक राहतील..

५) <u>पुरवठयाचे प्रगतीबाबत</u> :-

सिमेंट कंपनीने, प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आत सिमेंट पुरवठयाची सद्य:स्थिती शासनास तसेच आयुक्त (कृषि) यांना सिमेंटचा पुरवठा केल्यानंतर तात्काळ कळवावी. आखून दिलेल्या वेळापत्रकानुसार सिमेंटचा पुरवठा न झाल्यास, कंपनीचे नाव पुढील तिमाही सिमेंटच्या पुरवठा आदेशाच्या यादीत विचारात घेतले जाणार नाही.

६) कंपनीकडून कोणत्याही महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयास/ संस्थेस/निमशासकीय कार्यालये/ महामंडळ/ महाराष्ट्र शासन अंगिकृत उपक्रम यांना सहमतीचे, कारखाना किंमतीपेक्षा कमी दराने सिमेंट पुरवठा करणार नसल्याबाबत लेखी संमतीपत्र दयावे. प्रसंगी कमी दराने पुरवठा करावयाचे असेल तर संबंधित विभागास कंपनीला तसे कळवावे लागेल व कोणताही विलंब न करता तातडीने दरातील फरक संबंधित विभागास अदा करावा लागेल.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१४७/११/व्यय-१५, दि.३१.३.२०११ अन्वये मिळालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०४२०१७२८०६००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सुनील चव्हाण )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.

मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय.
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय.
आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, पुणे.
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे.
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) पुणे.
संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, पुणे.
विभागीय कृषि सहसंचालक, सर्व.
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, सर्व.
जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.
वित्त विभाग (व्यय-१५) मंत्रालय.
कार्यासन अधिकारी (जलसंधारण विभाग खुद्द), ग्रा.वि. व ज.सं.विभाग, मंत्रालय.
निवडनस्ती जल-७.

**(परिशिष्ट ७.१)**

**गौण खनिज नियमांतर्गत आकारण्यात येणा-या**
**<u>स्वामित्वधनाच्या दरात सुधारणा करण्याबाबत.</u>**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग.
शासन निर्णय : क्र.गौखनि १०/१००९/प्र.क्र.३०९/ख
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक : ११/०२/२०१०

**<u>शासन निर्णय :-</u>**

१. मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विदर्भ विभाग) नियम, १९६६ आणि गौण खनिजाच्या कार्याचे नियमन करण्याबाबत नियम, १९५४ या प्रचलित तीनही गौण खनिज विषयक नियमातील गौण खनिजावरील स्वामित्वधनाचे दर अनुसूची-१ व २ मध्ये दर्शविण्यात आलेले आहे. गौण खनिजावरील स्वामित्वधनाचे दरात सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार उपरोक्त नियमातील अनुसूची -१ व २ मध्ये दुरुस्ती करण्यात येत आहे.

२. त्या संबंधीची अधिसूचना क्र.गौखनि १०/१००९/प्र.क्र.३०९/ख (१) (२) व (३) दिनांक ११/०२/२०१० ही महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्र भाग ४-अ मध्ये स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येत आहे. अधिसूचनेची प्रत सोबत जोडली आहे.

३. गौण खनिजावरील स्वामित्वधनाचे सुधारित दर हे दिनांक ११/०२/२०१० पासून अंमलात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रविंद्र नलावडे)
उपसचिव,
महसूल व वन विभाग.

सहपत्र :वरीलप्रमाणे.

MNL
eyNO
आवा

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\KH BRANCH-2010\Letter 2010-1
एच-२५४४[१०००-२-२०१०]

## अधिसूचना

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ११ फेब्रुवारी, २०१०.

खाणी व खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७

क्रमांक : गौखनि १०/१००९/प्र.क्र.३०९/ख (१)- खाणी व खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याचे कलम १५ च्या पोटकलम (१) आणि (३) द्वारे महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतील त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहे :-

१) या नियमांस मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम, २०१० असे म्हणावे.

२) मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ याच्या विद्यमान अनुसूची एक व दोन ऐवजी पुढील अनुसूची जोडण्यात येत आहे.:-

### अनुसूची एक

स्वामित्वधनाचे दर

( पहा नियम १८, २२ आणि २९)

| अ.क्र. | खनिज | स्वामित्वधनाचे दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारा चुना तयार करण्यासाठी भट्टयांमध्ये वापरण्यात येणारी चुनखडी व शिंपल्यापासून केलेला चुना | रुपये २०० प्रति ब्रास |
| २ | उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड मग त्याचा आकार कसलाही असो आणि दगडाची भुकटी | रुपये २००प्रति ब्रास |
| " | अ) बांधकामासाठी वापरण्यात येणारा जांभा दगड (लॅटराईट स्टोन) | रुपये ५०प्रति ब्रास |
| ३ | (अ) उत्खननाद्वारे काढलेले किंवा गोळा केलेले गोटे, बारीक खडी, मुरुम, कंकर . | रुपये २०० प्रति ब्रास |
| | (ब) केवळ बॉलमिल्सच्या प्रयोजनाकरीता वापरण्यात येणारे चॅल्सेडोनी खडे. | रुपये १००० प्रति ब्रास |
| | (क) खालील प्रयोजनाकरीता वापरण्यात न येणारी सर्वसामान्य वाळू :-<br>(एक) वक्रीभवनाच्या किंवा मृतिकाशिल्पं तयार करण्याच्या प्रयोजनार्थ ;<br>(दोन)धातुशास्त्रीय प्रयोजनार्थ ;<br>(तीन) दृष्टिविषयक प्रयोजनार्थ ;<br>(चार) कोळसा खाणी मध्ये साठवून ठेवण्याच्या प्रयोजनार्थ ;<br>(पाच) सिल्व्हीक्रेट सिमेंट तयार करण्यासाठी ;<br>(सहा) सोडीयम सिलिकेट तयार करण्यासाठी ; किंवा | रुपये २०० प्रति ब्रास<br>मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या परिसरात हे दर दुप्पट म्हणजे रुपये ४०० प्रति ब्रास असतील. |

| | | |
|---|---|---|
| | (सात) मातीची भांडी व कांच सामान तयार करण्यासाठी. | |
| ४ | कौल (मंगलोरी किंवा अन्य कोणत्याही प्रकारची) तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी चिकणमाती | रुपये २०० प्रति ब्रास |
| ५ | अंतर्गत बंधारे,रस्ते, लोहमार्ग, व इमारती यांचे बांधकाम करतांना भरणा करण्यासाठी / भुपृष्ठ समपातळीत करण्यासाठी वापरण्यात येणारी "साधी माती" (Ordinary earth) | रुपये २०० प्रति ब्रास |
| ६ | बांधकामाचे साहित्य म्हणून वापरण्यात येते, त्यावेळी पाटीचा दगड किंवा नरम खडक | रुपये २०० प्रति ब्रास |
| ७ | विटा तयार करण्याच्या व इतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी साधी माती, गाळ व सर्व प्रकारची चिकणमाती इत्यादी. | रुपये ८० प्रति ब्रास |
| ८ | फुलरची माती किंवा बेंटोनाईट | रुपये ५१२ प्रति ब्रास |
| ९ | सजावटीच्या प्रयोजनासाठी वापरावयाचे इतर सर्व प्रकारचे दगड (ग्रॅनाईट वगळून) | रुपये ९६० प्रति ब्रास |
| १० | इतर सर्व गौण खनिज (ग्रॅनाईट वगळून) | रुपये २०० प्रति ब्रास |

टिप :- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग चार -अ, दिनांक ४ जानेवारी, २००७ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली महसूल व वन विभागाची अधिसूचना क्रमांक गौखनि १०/०२०६/प्र.क्र.५७/ख (१) दिनांक १५ डिसेंबर, २००६ आणि * महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग चार -अ, दिनांक ७ ऑगष्ट, २००८ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली महसूल व वन विभागाची अधिसूचना क्रमांक गौखनि १०/०२०७/प्र.क्र.३७/ख दिनांक ४ ऑगष्ट, २००८ अन्वये या नियमामध्ये शेवटची सुधारणा करण्यात आली होती.

## अनुसूची-२

**खुडीत भाड्याच्या (खंडाच्या) मर्यादा**

**(नियम २६ व १८ पहावेत)**

| | |
|---|---|
| इतर सर्व गौण खनिजे (ग्रॅनाईट वगळून) | रु.३,००० प्रति हेक्टर किंवा त्याच्या भागावर |

टिप:- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग चार -अ, दिनांक ४ जानेवारी, २००७ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली महसूल व वन विभागाची अधिसूचना क्रमांक गौखनि १०/०२०६/प्र.क्र.५७/ख(१) दिनांक १५ डिसेंबर, २००६ अन्वये या नियमामध्ये शेवटची सुधारणा करण्यात आली होती.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रविंद्र नलावडे)
शासनाचे उपसचिव

५

**NOTIFICATION**

Revenue and Forests Department,
Mantralaya, Mumbai 400032,
Dated the 11 February, 2010.

Mines and Minerals ( Regulation and Development ) Act, 1957

No.Gaukhani-10/1009/C.R.-309/Kh (1) :- In exercise of the powers conferred by sub- sections (1) and (3), of section 15 of the Mines and Minerals (Regulation and Development ) Act, 1957 (67 of 1957), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby

makes the following rules further to amend the Bombay Minor Mineral Extraction Rules, 1955, as follows, namely :-

1. These rules may be called the Mumbai Minor Mineral Extraction (Amendment) Rules, 2010.

2. In the Mumbai Minor Mineral Extraction Rules, 1955, for the existing schedule- I and schedule- II, the following Schedule I and II shall be substituted, namely :

**SCHEDULE - I**

**RATES OF ROYALTIES**

**(*See* rules 18, 22 and 29)**

| S.No. | Mineral | Rate of royalty |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | Limestone and lime shell used in kilns for manufacture of lime used as building material | Rs.200.00 per brass |
| 2 | All Stones removed irrespective of size including stone dust either by excavation or collection. | Rs 200.00 per brass |
| * | (a) Laterite Stone ued for building purpose (Jambha stone) | Rs 50.00 per brass |
| 3 | (a) Shingle, Gravel, Murum, Kankar all removed either by excavation or collection. | Rs.200.00 per brass |
| | (b) chalcedony pebbles used for ball mill purposes only | Rs.1000.00 per brass |
| | (c) Ordinary sand not used for the following purposes, namely :-<br>(i) Purposes of refractory and manufacture of ceramic ;<br>(ii) Metallergical purposes ;<br>(iii) Optical purposes ;<br>(iV) Purposes of stowing in local mines ;<br>(v) For manufacture of silvicrete cement ;<br>(vi) For manufacture of Sodium silicate ; or<br>(vii) For manufacture of pottery and glass. | Rs.200.00 per brass the rate of royalty on sand will be Rs.400 per brass in Mumbai Metropolitan regional Development Area. |

8

| | | |
|---|---|---|
| 4 | Ordinary clay, when used for manufacture of tiles (Mangalore pattern or any other purpose) | Rs.200.00 per brass. |
| 5 | " Ordinary earth" used for filling or levelling purpose in construction of embankment, roads, railways and Building | Rs. 200.00 per brass |
| 6 | Slate and shale when used for building material. | Rs.200.00 per brass. |
| 7 | Earth, Silt and all types of clays etc. used for manufacture of bricks and other purposes. | Rs.80.00 per brass. |
| 8 | Fuller's earth or Bentonite | Rs.512.00 per brass. |
| 9 | All stones,(excluding Granite) intended for use for decorative purpose | Rs.960.00 per brass. |
| 10 | All other minor minerals (excluding Granite) | Rs.200.00 per brass " |

*Note* :- These rules were last amended by Government Notification, Revenue and Forests Department, No.Goukhani -10/0206/C.R.57/ Kh(1), dated 15th December, 2006 published in the *Maharashtra Government Gazette*, Extra ordinary, part IV-A, dated 4th January, 2007 and * Government Notification, Revenue and Forests Department, No.Goukhani -10/0207/C.R.37/ Kh, dated 4th August, 2008, published in the *Maharashtra Government Gazette*, Extra ordinary, part IV-A, dated 7th August, 2008.

## SCHEDULE II
## LIMITS OF DEAD RENTS
(See rules 16 and 18)

| | |
|---|---|
| All other minor minerals (Excluding Granite) | Rs. 3,000 per hectare or portion thereof |

*Note* :- These rules were last amended by Government Notification, Revenue and Forests Department, No.Goukhani -10/0206/C.R.57/Kh(1), dated 15th December, 2006 published in the *Maharashtra Government Gazette*, Extra ordinary, part IV-A, dated , 4th January, 2007.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

(RAVINDRA NALAWADE)

Deputy Secretary to Government

(परिशिष्ट ७.३)

जिल्हा परिषदेमधील बांधकाम/
लघुपाटबंधारे विभागातील कामांचे कं:
देताना निधी व कामाची विभागणी
करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक. झेडपीए-१०९३/प्र. क्र. १५१६ (भाग-२)/३३.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ एप्रिल २०००.

वाचा : (१) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीए-१०८९/प्र. क्र.८५४/३३, दिनांक ८.२.१९९०.

(२) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीए-१०९३/प्र. क्र. १५१६/३३, दिनांक १०.१२.१९९३.

परिपत्रक

शासनाने जिल्हा परिषदांमधील बांधकाम विभाग व लघुपाटबंधारे विभागां कामाच्यां विभागणीस केवळ अपवादात्मक परिस्थितीत अनुमती दिली हो. ही अनुमती देताना कामाची विभागणी करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची मान ध्यावी असे स्पष्ट निर्देश शासनाने दिले होते. तथापि या निर्देशांचे पालन करता कोणतेही संयुक्तीक कारण नसताना कामाची विभागणी अयोग्य नियमबाह्य पद्धतीने करण्यात येत असल्याचे शासनाचे निर्देशनास आले पंचायती राज समितीने या प्रकाराबाबत तीव्र आक्षेप घेतलेला आहे.

शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद तसेच पंचा समितीमधील निधीचे वाटप [illegible] करण्यात येते व अशा निधीम [illegible] कामे घेण्यात येतात, त्यातील कामाचे अनेक तुकडे करून कामे करण्य येतात अशा पद्धतीमुळे पुढे जिल्हा परिषदांचे आर्थिक नुकसान होण्या शक्यता असते.

वरील बाब लक्षात घेऊन शासन असे आदेश देत आहे की, कोणत्याही परिस्थीतीत कामांचे विभाजन करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद वा पंचायत समितीने निधी व कामांचे सदस्यनिहाय वाटप करणे तात्काळ बंद करावे.

संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी बांधकामाला तांत्रिक मान्यता देतेवेळी व तसेच निविदा मागविण्यापूर्वी कामाची विभागणी केलेली नाही याची तपासणी करावी. कामाची विभागणी शासनाची पूर्वअनुमती न घेता केली असल्याचे आढळल्यास त्यांनी त्याबाबतचा अहवाल तात्काळ वरिष्ठ अधिकारी व या विभागाला पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

जयश्री चौधरी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**(परिशिष्ट ८.१)**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांचे समायोजन करुन त्यांना इतरत्र बदली देऊन त्यांना सेवेमध्ये समायोजित करण्यासंदर्भात.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्रमांक :-जिपब-५११/प्र.क्रं.५४/ आ-१४
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दि. १२/५/ २०११
18

वाचा

१. शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक : जिपब-९०८/प्र.क्र.१३६/आस्था-१४, दि.६ ऑक्टोंबर, २००८.

प्रस्तावना : दरवर्षी दि.३० सप्टेंबर अखेर जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांची पटसंख्या निश्चित केल्यानंतर त्याआधारे अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जास्त प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनाने बदल्या करण्याचे अधिकार जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. प्रत्यक्षात कार्यवाही करित असताना अनेक जिल्हा परिषदांकडून शासन परिपत्रकात काही त्रुटी असल्याबाबत काही सूचना व तक्रारी करण्यात आल्या होत्या. शासन परिपत्रकात सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. तसेच वरील वाचा मधील समायोजन संबंधाने असलेला संदर्भ १ अधिक्रमीत करुन (रद्द करुन) पुढीलप्रमाणे आदेश देण्याचाही प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय

दरवर्षी दि.३० सप्टेंबर अखेर जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांची पटसंख्या निश्चित केल्यानंतर त्याआधारे अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जास्त प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनाने बदल्या करण्याचे अधिकार जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. तसेच सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरवर्षी खालील मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्राथमिक शिक्षकांचे समायोजन करावे:-

१. दि.३० सप्टेंबर रोजी निश्चित केलेल्या पटसंख्येनुसार अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जास्त शिक्षक असलेल्या शाळांमधून अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा कमी शिक्षक असलेल्या शाळांवर शिक्षकांचे समायोजन करण्यात यावे.

२. असे समायोजन करित असताना तालुक्यातच जर अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा कमी शिक्षक असलेल्या शाळा असतील तर प्रथमतः तालुक्यातील अशा शाळांमधून समायोजन करण्यात यावेत. (जर ते अन्यथा तालुक्याबाहेर बदलीस पात्र नसतील तरच)

३. एखादया शाळेत पटसंख्या निश्चिती नंतर अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जास्त शिक्षक झाले असतील तर जे शिक्षक त्या शाळेत जास्त काळ (ज्येष्ठत्तम) कार्यरत असतील, अशा शिक्षकांचे समायोजन करावे. असे अतिरिक्त शिक्षक निश्चित करतांना मुख्याध्यापकांच्या व पदवीधर शिक्षकांच्या जागी जर सहाय्यक शिक्षकांना तात्पुरती नियुक्ती दिली असेल तर अशी पदे समायोजनाची संख्या निश्चित करतांना वगळावी.

असे करत असताना शक्यतो खालील शिक्षकांची समायोजनासाठी निवड करण्यात येऊ नये.

अ. जिल्हास्तरीय मान्यताप्राप्त शिक्षक संघटनांचे पदाधिकारी यांच्या पैकी संघटनांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष.

ब. ज्या शिक्षकांच्या समायोजन दिनांकापासून (३० सप्टेंबर पासून) सेवानिवृत्तीस ५ वर्षे कालावधी शिल्लक राहिलेला असल्यास (तरीसुध्दा समायोजनाद्वारे शाळेत अतिरिक्त ठरत असल्यास त्यांच्या विनंती प्रमाणे त्याच तालुक्यात इतर शाळेत प्राधान्याने समायोजन करण्यात यावे.)

४. समायोजन करत असताना विधवा, परितक्त्या / कुमारिका, अपंग शिक्षक तसेच एकत्र कार्यरत पती-पत्नी अतिरिक्त ठरत असल्यास त्यांचे समायोजन तालुक्रांतर्गत प्राधान्याने करावे.

५. एखाद्या तालुक्यात मंजूर पदांपेक्षा जास्त शिक्षक अतिरिक्त ठरत असल्यास वरील मुद्दा क्र.३ प्रमाणे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची तालुक्यातील जास्तीत जास्त सेवा झालेल्या शिक्षकांतून उतरत्या क्रमाने वास्तव्य ज्येष्ठता यादी तयार करुन जे शिक्षक त्या तालुक्यात सलग जास्त काळ कार्यरत असतील त्यांचे समायोजन जिल्हा स्तरावरुन करण्यात यावे. मात्र असे समायोजनाद्वारे बदली करताना जिल्हयातील त्यांच्या मूळ तालुक्याच्या शेजारच्या तालुक्यात बदली मागितल्यास प्राधान्य द्यावे.

६. तालुकांतर्गत किंवा जिल्हास्तरावरुन अतिरिक्त शिक्षकांच्या बदल्या समुपदेशनाने कराव्यात. समुपदेशन करताना अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना खालील प्राधान्य क्रमाने पदस्थापना देण्यात यावी.

अ. विधवा
ब. परित्यक्त्या / कुमारिका
क. अपंग कर्मचारी (अस्थिव्यंग, अल्पदृष्टी व इतर)
ड. स्वत: गंभीर आजाराने त्रस्त कर्मचारी (जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र / प्रति स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र आवश्यक)
इ. सैनिक व अर्ध सैनिक जवानांच्या पत्नी
ई. पती- पत्नी एकत्रिकीकरण
फ. तालुका वास्तव्य ज्येष्ठतेनुसार ज्येष्ठ असलेले

समायोजनाची कार्यवाही करत असताना सर्व रिक्त पदे जाहीररित्या दाखविणे अनिवार्य राहील.

७. तालुक्यामध्ये समायोजन करत असताना कोणत्याही द्विशिक्षकी किंवा तीन शिक्षकी शाळेत पद रिक्त राहणार नाही अशा रितीने समुपदेशनाने पदस्थापना देण्यात यावी. *(उदा. जर तालुक्यामध्ये १५ पदे रिक्त आहेत आणि फक्त १० शिक्षकांचे समायोजन करावयाचे आहे तर सर्व १५ रिक्त पदे दाखविण्यात यावीत. परंतु १५ मध्ये जर तीन द्विशिक्षकी किंवा तीन शिक्षकी शाळा असतील तर प्राधान्य क्रमानुसार ७ शिक्षकांना पदस्थापना दिल्यानंतर ३ शिक्षकांना द्विशिक्षकी किंवा ३ शिक्षकी शाळेत पद रिक्त राहिल्यास प्राधान्यक्रमाने पदस्थापना द्यावी.)*

८. शिक्षकांचे समायोजनापूर्वी पदोन्नतीची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक आहे. जिल्हास्तरावरुन ३१ जुलै पर्यंत पदोन्नतीची कार्यवाही करणे बंधनकारक राहील. पदोन्नती दिल्यानंतर सर्व संबधितांना ३१ ऑगस्टपर्यंत रुजु होणे आवश्यक राहील.

पदोन्नतीसाठी किमान ५०% प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी, जेणेकरुन रूजू न होणाऱ्या व पदोन्नती नाकारणाऱ्या शिक्षकांच्या जागी पदस्थापना देणे सोईस्कर होईल. पदोन्नती दिल्यानंतर त्यांच्या नियुक्तीबाबत समुपदेशन पध्दतीचा अवलंब करावा व त्यासाठी प्राधान्यक्रम वरील अ.क्र.६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अ ते ई पर्यंत तसेच फ-सेवाज्येष्ठतेनुसार ज्येष्ठ असा राहील. जेणेकरुन जास्तीत जास्त शिक्षक पदोन्नतीच्या पदावर रुजू होतील. नियमित पदोन्नत्या त्याच्या नंतरसुध्दा करता येतील.

९. समायोजन करताना दरवर्षी ३० सप्टेंबर ही तारीख विचारात घेऊन प्रचलित नियमानुसार पटसंख्या व शिक्षक संख्या निश्चित करावी. त्याअनुषंगाने २० ऑक्टोंबरपर्यंत विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी मान्यतेची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुदतीत प्रस्ताव सादर करुनही जर विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्रस्तावाला २५ ऑक्टोबर पर्यंत कोणताही निर्णय कळविला नाही. तर त्यांची मान्यता गृहीत धरुन कोणत्याही परिस्थितीत ३० सप्टेंबर पर्यंत पटसंख्या व शिक्षक संख्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित करावी. तसेच जिल्हयातील समायोजनाचे काम ३१ ऑक्टोंबर पर्यंत पूर्ण करावे.

१०. समायोजनाद्वारे अतिरिक्त ठरवून इतरत्र झालेल्या बदल्यांच्या अनुषंगाने काही कर्मचाऱ्यांच्या तक्रारी असल्यास दि.१५ नोव्हेंबर पर्यंत विभागीय आयुक्त यांचेकडे करण्यात याव्यात. विभागीय आयुक्त यांनी तक्रार प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करुन दि.२५ नोव्हेंबर पर्यंत निर्णय द्यावा व दि.३० नोव्हेंबर पर्यंत संबंधित जिल्हयाने त्याची अंमलबजावणी करावी. विभागीय आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील. विभागीय आयुक्त यांना अशा तक्रारींची दखल घेता यावी म्हणून त्यांना तक्रार निवारण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

११. काही शिक्षक परस्पर समायोजनाबाबत शासनाकडे तक्रारी करतात, असे शिक्षक प्रशासकीय कारवाईस पात्र राहतील. अशा तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

१२. समायोजनासाठी विहित कालावधी ठरवून दिलेला असल्याने ज्या जिल्हयात सदरची कार्यवाही विहित कालावधीत होणार नाही त्या जिल्हा परिषदांचे मुख्य

कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना जबाबदार धरण्यात येईल. जिल्हा परिषद शिक्षकांच्या समायोजनांतर्गत बदल्यांबाबत तक्रारी प्राप्त होतात. त्यामध्ये शासनाने निश्चित केलेल्या निकषांचे पालन न करता समायोजन केल्याच्या बहुतांश तक्रारींचा अंतर्भाव असतो, त्यामुळे अनेक प्रशासकीय अडचणी व न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. हे सर्व टाळण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ. शिक्षकांच्या समायोजनामध्ये पारदर्शकता राहावी यासाठी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करुन समुपदेशाद्वारे समायोजनांतर्गत बदल्या करण्याची दक्षता सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

ब. कोणत्याही प्रकारच्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबधितांविरुध्द नियमानुसार आवश्यक ती कारवाई करावी.

क. समायोजन करताना निवडणूक आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

वरीलप्रमाणे प्राथमिक शिक्षकांचे समायोजन करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनाकडे माहितीस्तव वेळोवेळी पाठविण्यात यावा.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून पुढे होणाऱ्या समायोजनांसाठी लागू राहील.

सदर शासन निर्णय संगणक संकेतांक क्र.२०११०५१३१७१२५०००१ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुधीर ठाकरे)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
८. महालेखापाल -१/२ , मुंबई / नागपूर
९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१०. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
११. संचालक, शालेय शिक्षण, पुणे.
१२. सर्व उपसंचालक, शालेय शिक्षण.
१३. मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
१४. मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
१५. ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व कार्यासने.
१६. निवडनस्ती.

# परिशिष्ट “ब”

समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

## गुरुवार, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अमरावती

**उपस्थिती**

(१) श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

(२) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

(३) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(४) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

(५) श्री. समीर कुणावार, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(८) श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

(९) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

(१०) श्री. अमित झनक, वि.स.स.

(११) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

(१२) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**स्थानिक आमदार**

(१) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(२) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**ग्राम विकास विभाग, मंत्रालय**

श्री. नं. म. शिंदे, सह सचिव

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

श्री. सुनिल निकम, सहायक आयुक्त (चौकशी)

**जिल्हा परिषद, अमरावती :**

श्री.सुनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.संजय इंगळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी

डॉ.उन्मेश देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) तथा प्र.सं.,जि.ग्रा.वि.य.

श्री.जालीदंड एन. आभाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

श्री.कैलास एन. घोडके, उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक (महिला व बालकल्याण)

श्री.चंद्रशेखर डी. खंडारो, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.पुरुषोत्तम जी. भागवत, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्रीमती श्वेता स. बॅनर्जी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा

श्री.प.पु. पोटफोडे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन

श्री.नितीन भालेराव, जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग

डॉ.पुरुषोत्तम सोळंके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग

श्री.भाऊराव आर. चव्हाण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी

श्री.उदय डी. कातोडे, कृषी विकास अधिकारी

डॉ.श्रीराम पानझाडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

श्री.सी.आर. राठोड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

श्री.पी.पी. अभ्यंकर, शिक्षणाधिकारी (निरंतर)

श्री.एस.पी.बोडके, लेखा अधिकारी, वित्त विभाग

श्री.आर.एम.खैरनार, वरिष्ठ लेखा अधिकारी, वित्त विभाग

श्री.प्रमोद कापडे, गटविकास अधिकारी, अमरावती

श्री.भास्कर रेंगडे, गटविकास अधिकारी, अंजणगाव

श्री.दिलीप मानकर, गटविकास अधिकारी, मोर्शी

श्री.सुरज गोटाड, गटविकास अधिकारी, नांदगांव ख.

श्री.कपिलनाथ कलोडे, गटविकास अधिकारी, धामणगाव रेल्वे

श्री. बी.एस. अककाडे, गटविकास अधिकारी, चांदूर बाजार

श्री.जि.एस.धायगुडे, गटविकास अधिकारी, तिवसा

श्री. बी.एस.रायबोले, गटविकास अधिकारी, अचलपूर

श्री.ए.यु.गुडधे, गटविकास अधिकारी, दर्यापूर

श्री.एस.पी.थोरात, गटविकास अधिकारी, भातकुली

श्री.एस.के. तलवारे, गटविकास अधिकारी, चांदूर रेल्वे

श्री. प्रकाश तट्टे, गटविकास अधिकारी, वरुड

श्री. एन.टी.देसले, गटविकास अधिकारी, चिखलदरा

श्री.रामचंद्र जोशी, गटविकास अधिकारी, धारणी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील अमरावती जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

## शुक्रवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अमरावती

**उपस्थिती :**

(१) श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

(२) श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

(३) श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

(४) श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

(५) श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

(६) श्री.समीर कुणावार, वि.स.स.

(७) श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

(८) श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(९) श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

(१०) श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.

(११) श्री.अमित झनक, वि.स.स.

(१२) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

(१३) श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव

(२) श्री.प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

**जिल्हा परिषद, अमरावती**

श्री.सुनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.संजय इंगळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी

डॉ.उन्मेश देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) तथा प्र.सं.,जि.ग्रा.वि.य.

श्री.जालीदंड एन. आभाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

श्री.कैलास एन. घोडके, उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक (महिला व बालकल्याण)

श्री.चंद्रशेखर डी. खंडारो, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.पुरुषोत्तम जी. भागवत, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्रीमती श्वेता स. बॅनर्जी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा

श्री. प. पु. पोटफोडे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन

श्री. नितीन भालेराव, जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग

डॉ. पुरुषोत्तम सोळंके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग

श्री. भाऊराव आर. चव्हाण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी

श्री. उदय डी. कातोडे, कृषी विकास अधिकारी

डॉ. श्रीराम पानझाडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

श्री. सी.आर. राठोड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

श्री. पी. पी. अभ्यंकर, शिक्षणाधिकारी (निरंतर)

श्री. एस. पी. बोडके, लेखा अधिकारी, वित्त विभाग

श्री. आर. एम. खैरनार, वरिष्ठ लेखा अधिकारी, वित्त विभाग

श्री. प्रमोद कापडे, गटविकास अधिकारी, अमरावती

श्री. भास्कर रेंगडे, गटविकास अधिकारी, अंजणगाव

श्री. दिलीप मानकर, गटविकास अधिकारी, मोर्शी

श्री. सुरज गोटाड, गटविकास अधिकारी, नांदगांव खं.

श्री. कपिलनाथ कलोडे, गटविकास अधिकारी, धामणगाव रेल्वे

श्री. बी. एस. अककाडे, गटविकास अधिकारी, चांदूर बाजार

श्री. जि. एस. धायगुडे, गटविकास अधिकारी, तिवसा

श्री. बी. एस. रायबोले, गटविकास अधिकारी, अचलपूर

श्री. ए. यु. गुडधे, गटविकास अधिकारी, दर्यापूर

श्री. एस. पी. थोरात, गटविकास अधिकारी, भातकुली

श्री. एस. के. तलवारे, गटविकास अधिकारी, चांदूर रेल्वे

श्री. प्रकाश तट्टे, गटविकास अधिकारी, वरुड

श्री. एन. टी. देसले, गटविकास अधिकारी, चिखलदरा

श्री. रामचंद्र जोशी, गटविकास अधिकारी, धारणी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात अमरावती जिल्ह्यातील पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

## शनिवार, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अमरावती

**उपस्थिती**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१०. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
११. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१२. श्री. अमित झनक, वि.स.स.
१३. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
१४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**ग्राम विकास विभाग, मंत्रालय**

श्री. नं. म. शिंदे, सह सचिव

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

श्री. सुनिल निकम, सहायक आयुक्त (चौकशी)

**जिल्हा परिषद, अमरावती**

श्री. सुनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. संजय इंगळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी
डॉ. उन्मेश देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) तथा प्र.सं.,जि.ग्रा.वि.य.
श्री. जालीदंड एन. आभाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
श्री. कैलास एन. घोडके, उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक (महिला व बालकल्याण)
श्री. चंद्रशेखर डी. खंडारो, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री. पुरुषोत्तम जी. भागवत, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
श्रीमती श्वेता स. बॅनर्जी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा
श्री. प .पु. पोटफोडे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन
श्री. नितीन भालेराव, जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग
डॉ. पुरुषोत्तम सोळंके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग
श्री .भाऊराव आर. चव्हाण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी
श्री. उदय डी. कातोडे, कृषी विकास अधिकारी
डॉ. श्रीराम पानझाडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
श्री. सी.आर. राठोड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
श्री. पी.पी. अभ्यंकर, शिक्षणाधिकारी (निरंतर)
श्री. एस.पी.बोडके, लेखा अधिकारी, वित्त विभाग
श्री. आर.एम.खैरनार, वरिष्ठ लेखा अधिकारी, वित्त विभाग
श्री. प्रमोद कापडे, गटविकास अधिकारी, अमरावती
श्री. भास्कर रेंगडे, गटविकास अधिकारी, अंजणगाव
श्री. दलीप मानकर, गटविकास अधिकारी, मोर्शी
श्री. सुरज गोटाड, गटविकास अधिकारी, नांदगांव खं.
श्री. कपिलनाथ कलोडे, गटविकास अधिकारी, धामणगाव रेल्वे
श्री. बी. एस. अककाडे, गटविकास अधिकारी, चांदूर बाजार
श्री. जि. एस. धायगुडे, गटविकास अधिकारी, तिवसा
श्री. बी. एस.रायबोले, गटविकास अधिकारी, अचलपूर
श्री. ए. यु. गुडधे, गटविकास अधिकारी, दर्यापूर
श्री. एस. पी. थोरात, गटविकास अधिकारी, भातकुली
श्री. एस. के. तलवारे, गटविकास अधिकारी, चांदूर रेल्वे
श्री. प्रकाश तट्टे, गटविकास अधिकारी, वरुड
श्री. एन. टी. देसले, गटविकास अधिकारी, चिखलदरा
श्री. रामचंद्र जोशी, गटविकास अधिकारी, धारणी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील अमरावती जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

५. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.

६. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

७. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

८. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१०. श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

११. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. बा. तु. माने, अवर सचिव (समिती)

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री.प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

श्री. श्यामलाल गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,

श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग,

श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग,

श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग,

डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,

श्री. र.अ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. ना.भा.रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. संतोष कुमार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**अमरावती जिल्हा परिषद**

श्री. के. एम. अहमद, मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती

श्री. संजय येवले, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, अमरावती

श्री. आर. डी. तुरणकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), अमरावती

श्री. प्र. उ. तलवारे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन, अमरावती

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री.चरण वाघमारे, वि.स.स.
४. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.
५. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
६. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
७. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
८. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
९. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. बा. तु. माने, अवर सचिव (समिती)
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग,
श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग,
श्री. गिरिश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग,
श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,
श्री. विजय चांदेकर, अवर सचिव, ग्रामविकास विभाग,

**अमरावती जिल्हा परिषद**

श्री. के. एम. अहमद, मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती
श्री. जे. एन. आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, अमरावती
श्री. संजय येवले, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, अमरावती
श्री. आर. डी. तुरणकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), अमरावती
श्री. प्र. उ. तलवारे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन, अमरावती
श्री. द. द. फिस्के, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अमरावती

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांची उर्वरित साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७**

**स्थळ : विधान भवन, नागपूर**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
७. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.
८. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
९. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१०. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
११. श्री. तानाजी सावंत, वि.प.स.
१२. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
१३. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

१४. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
१५. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
१६. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत आठव्या व नवव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणांसह संमत केले.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.

शामुना-एचबी-२१२७-मविसना-१२-२०१७-४१० प्रती-पीए४*